१९२६
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २०९१

# ...चारी महाराज

चे

# समग्र ग्रंथ.

## भाग १ ला.



REFBK-0003148
REFBK-0003148

प्रकाशक

दामोदर सांवळाराम आणि मंडळी,

ग्रंथसंपादक व ग्रंथप्रकाशक इ. ठाकुरद्वार रोड, मुंबई नं. २

किंमत १। रुपया.

६८८८
संदर्भ
३१-३-७२

कै. प्रभाकर विठ्ठल गुप्ते, रा. ठाणे
यांचे स्मरणार्थ
संग्रहालयास देणगी.

प्रभाकर विठ्ठल गुप्ते
ठाणे
ता. ५-८-१९८३

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
क्रमांक ६८८८ वि: काव्य
२०८८ नों. दि. ३१-३-७२

॥ श्रीमद ॥

# श्रीअनंतनाथ ब्रह्मचारी महाराज

यांचे

# समग्र ग्रंथ.

## भाग १ ला.

हा ग्रंथ श्रीमदनंत भक्तमंडळीच्या आज्ञेवरून

**जी. कृष्णराव, पे. पोष्टमास्तर पैठण**

यांनीं श्री महाराजांच्या दफ्तरानुक्रमानें तयार केला आहे.

REFBK-0003148

REFBK-0003148

प्रकाशक

**दामोदर सांवळाराम आणि मंडळी,**

ग्रंथसंपादक व ग्रंथप्रकाशक इ. ठाकुरद्वार रोड, मुंबई नं. २

हा ग्रंथ रा. रा. दामोदर सांवळाराम यंदे यांनीं आपल्या इंदुप्रकाश छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला.

ह्या पुस्तकासंबंधाचे सर्व हक्क प्रकाशकांनीं आपणाकडे राखून ठेविले आहेत.

शके १८४८, सन १९२६ इ.

किंमत १। रुपया.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

श्रीअनंतनाथ ब्रह्मचारी योगी महाराज हे सुमारें २५ वर्षांपूर्वी मांजरी, तालुका गंगापुर येथें समाधिस्त झाले. यांचे पूर्ववृत्त त्यांच्या शिष्यमंडळीकडून जितकें मिळालें तितकें संक्षिप्त चरित्र रूपानें पुस्तकारंभींच जोडलें आहे. त्यावरून श्रीअनंत महाराजांची योग्यता किती मोठी होती हें लक्षांत येणार आहे. श्री जनार्दन स्वामींचा अवतार असें त्यांस मानीत असत. त्यांनीं आपल्या अवतार कार्यांत चाळीस हजार काव्य ग्रंथ लिहून ठेविला आहे. त्यांत १५ हजार श्लोक १९ हजार अभंग व ३० हजार पदें, शिवाय दोहरे वगैरे आहेत. हें सर्व काव्य प्रासादिक असून प्रेम, भक्ति, ज्ञान, वैराग्य, इत्यादि रसांनीं तें भरलेलें आहे. असें हें संपूर्ण काव्य छापुन मुमुक्षुजनांस त्याचा लाभ मिळावा अशी उत्कट इच्छा, महाराजांच्या भक्तमंडळास होणें साहजिक आहे. त्या इच्छेनुरूप महाराजांचे एक प्रेमळ शिष्य, पैठणचे पेन्शनर पोष्टमास्तर श्रीयुत जी. कृष्णराव, यांनीं श्री. महाराजांचे समग्र ग्रंथ प्रकाशनाचें काम आम्ही शिरावर घ्यावें, अशी आग्रहाची मागणी केली. श्री. महाराजांचें प्रासादिक वाणीनें निघालेलें हें सुंदर काव्यप्रकाशनाचें काम जरी अत्यंत खर्चाचें होतें, तरी केवळ त्यांच्या प्रासादिक वाणीचा लाभ मराठी भाषा बोलणाऱ्या बहुजनसमाजास व्हावा, अशा सद्इच्छेनें मास्तर साहेबांच्या विनंतीस मान देऊन हें काम आम्हीं शिरावर घेतलें.

श्रीअनंत महाराजांचा एकंदर ग्रंथसंग्रह बराच मोठा असल्यामुळें लोकांच्या व प्रकाशकाच्या सोई लक्षांत घेऊन तो भागरूपानें प्रसिद्ध करण्याचें आम्ही ठरविलें आहे. आणि त्याचा पहिला भाग आज वाचकांच्या सेवेंत सादर करीत आहोंत. या भागांत श्रीमहाराजांची तीन दप्तरें क्रमानें घेऊन पूर्ण केलीं आहेत; व पुढचीं दप्तरेंही अशाच क्रमानें प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. यांत विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं, हें सर्व काव्य श्रीमहाराजांच्या मूळ दप्तरास धरूनच आम्ही छापीत आहोंत. त्यांत स्वतःचें असें कांहींच घातलेलें नाहीं. भावीक भक्तजन या प्रासादिक काव्याचा लाभ घेऊन आम्हास उपकृत करतील असा भरंवसा आहे.

प्रकाशक

# प्रस्तावना.

परमेश कृपेनें आज श्रीअनंत महाराज उर्फ ब्रह्मचारी बोवा यांच्या समग्र ग्रंथाचा प्रथम खंड ग्राहकांकडे रवाना करण्याचा सुयोग आला. श्री. रा. पांगारकर, मुमुक्षुकर्ते व कै. रा. बापुराव वावळे यांनीं " निवडक वेचें " व " अनंतनाथ स्फूर्ती " या दोन पुस्तकद्वारां महाराजांच्या काव्यामृताचा अल्प परिचय करून दिलेलाच आहे. सध्यां या दोन्हींही पुस्तकांच्या प्रती मजजवळ शिल्लक नसल्यामुळें त्याच पुस्तकांची पुनरावृत्ती काढण्यापेक्षां समग्र ग्रंथच प्रसिद्ध करून महाराजांचे प्रेमी मंडळीची सेवाकरितां आली तर अधीक श्रेयस्कर होईल व मी आजपर्यंत जो महाराजांचा ग्रंथ संग्रह करून पोटाशीं बाळगून ठेवला, ती जबाबदारी कमी होईल. या उद्देशानें प्रस्तुत प्रयत्न आरंभिला आहे. तरी ही माझी सेवा अल्पांशानें तरी कारणीं लागो येवढीच त्या जगच्चालकाजवळ प्रार्थना आहे.

श्रीअनंत महाराजांचा जन्म कारवार जिल्ह्यांत एका "नाथ भक्त" ब्राह्मण कुळांत झाला. वयाच्या नवव्यावर्षी गृहत्याग करून फिरत फिरत गोकर्ण क्षेत्रीं गेले. तेथें कर्मधर्म संयोगानें "योगेश्वर " नांवाच्या एका सत्पुरुषाची गांठ पडली. योगेश्वरांचे तेथेंच कांहीं कालपर्यंत रहिवास केला. यांच्याचजवळ जो योगाभ्यास झाला असेल तेवढाच. योगेश्वरांचें निधनानंतर कांहीं दिवस पी. डब्ल्यु. खात्यांत नोकरी केली. तेथेंही वरिष्ठ अधिकाऱ्यांचें प्रेम यांच्यावर बरेंच जडलें. एकदां फौजेकरितां रातोरात एक अतिशय अडचणीचा रस्ता दुरुस्त करण्याकरितां कान्ट्राक्टरांनीं आपली पराकाष्ठा व सर्व अक्कल खर्च करून पाहिली, परंतु व्यर्थ. महाराजांनीं संयमद्वारें कामकरी मंडळींत चैतन्य भरविलें, व तोच रस्ता रात्रीचे आंत तयार करून देऊन दुसरे दिवशीं मिळणाऱ्या पारितोषकाची वाट न पहातां स्वारी तेथून नाहींशी झाली तीं चारी धामें करून संतवृंदांच्या भेटी घेत घेत फिरत फिरत श्री क्षेत्र हरीहरेश्वर येथें आली. तेथें महादेवाचें देवालय गांवापासून १॥ मैलावर समुद्रकांठीं होतें तेथें राहिले. महाराज निद्रा फार क्वचित घेत. एक रात्रीं ध्यानस्थ बसले असतां एकाएकी गवाक्षांतून काठ्या, लांकडें, यांचा मारा यांचेवर होण्यास सुरवात झाली. हा काय प्रकार आहे म्हणून पहाण्यास गेले, तो दरवाजा

बाहेरून बंद. देवालय जवळजवळ अर्धें अधीक लाट्यांनीं भरून गेलें. काय करावें हें सुचेना. इतक्यांत जवळ असलेल्या चाकूची आठवण होऊन खिडकीचे लांकडी गज कांपून टाकून पलीकडे समुद्रांत उडी टाकली. तेथूनच कवित्वस्फूर्तिस प्रारंभ झाला. हाच वरद हस्त झाला असावा असें म्हणण्यास हरकत नाहीं. या पुढें जो एकंदर ग्रंथ कोकणप्रांतीं झाला, तो कै. रा. बळवंतराव मास्तर यांनीं प्रतकरून मजकडे महाराजांचें सांगण्यावरून पाठवून दिला. महाराज पुष्कळ वेळेस कवित्वा-मध्येंच बोलत असत. महाराजांचें चमत्कार पहाणारी मंडळी कांहीं आज हयात-आहेत. दुसऱ्याचे मनोगत जाणण्याची कला महाराजाजवळ सज्ज असल्यामुळें कोणाचेही लपंडाव त्यांच्या पुढें चालत नसत.

महाराजांना चित्रकला फार उत्तम अवगत असे. पैठणास नाथरायांच्या समाधी-वर नेऊरगांव, [ शिवालयांत ) नेवांसें, ( मोहनीराजाचे देवालयांत ) औरंगाबाद नागेश्वर मंदिरांत नातें ( कोंकण ) वगैरे ठिकाणीं त्यांचा हातवळा अद्यापही पहावयास मिळतो.· उपनिषदें, गीता वगैरे ग्रंथावरही कधीं कधीं व्याख्यान होई; परंतु नाथरायांचें " रुक्मिणी स्वयंवर" सांगण्याची आवड विशेष व अध्यात्मपर अर्थ सांगण्याची शैली तर अवर्णनीयच. श्रोतृवृंद तहानभूकही विसरून जाई.

आरंभीं दिलेल्या अष्टकावरून या पुरुषाचे रहाणीचा बोध होण्यासारखा आहे. सत्पुरुष नेहेमींच लपून छपून असतात. आपल्या भजनीं लोक लागावे, लोकांकडून मान सन्मान मिळवावा, ही त्यांची मुळींच इच्छा नसतें. ते ग्रंथ लिहून ठेवतात. त्यांत विशेषतः भगवद्‌गुणानुकथनावांचून कांहीं सांपडावयाचें नाहीं. मुमुक्षूंस ईश्वराचें आस्तित्व प्रत्यक्ष पटवून देण्याकरितां कधीं कधीं सत्पुरुषांना प्रगट व्हावें लागतें. नरदेहाची इति कर्तव्यता म्हणजे चित्तशुद्धीद्वारा परमेश्वर प्राप्ती करून घेण्याची–म्हणजे " मी कोण आहे " याचा शोध लावण्याचा–आहे. व ही चित्तशुद्धी साधण्याबद्दल अनेकांनीं अनेक मार्ग सांगितलें आहेत. परंतु त्यांतल्यात्यांत अधीक सोपा व श्रेयस्कर असा नामस्मरणासारखा दुसरा मार्ग नाहीं, हें आपल्या इकडील संतपुरुषांनीं आपल्या ओजस्वी वाणीनें वेळोंवेळीं सांगितलें आहे. " नाम रुपा नाहीं मेळ । अवघा वाचेचा गोंधळ. " नाम म्हणजे काय व तें कसें घ्यावयाचें, हें संतपुरुषांनाच जिज्ञासू पुरुषानें विचारल्या शिवाय समजणें शक्य नाहीं. मनुष्यपणाच अंगीं आणण्याचा प्रयत्न केला

पाहिजे. 'विठ्ठल मात्रा' भवरोगासारख्या दुर्धर रोगावर रामबाण उपाय असला तरी पथ्य सांभाळल्याशिवाय या मात्रेचा काडीमात्र उपयोग होणार नाहीं. पाश्चात् संस्कृतीनें पूनित झालेल्या लोकांची "को विधिःकोनिषेध" कडे विशेष ओढा असल्यामुळें हा पथ्यापथ्य विचार म्हणजे त्यांना एक संकट वाटत आहे. व त्यामुळें सत्पुरुषांनीं आम्हांस निर्बल केलें असा शेरा मारण्यास त्यांस कांहींच दिक्कत वाटत नाहीं. लिंग आणि जिव्हा यांचा निग्रह करण्यास सांगणें म्हणजे सत्पुरुषांचा एक अक्षम्य अपराध आहे असें त्यांस वाटत आहे. हीं दोनच इंद्रियें सर्व अनर्थपणाला कारण असल्यामुळें घरास अग्नी लागला असता त्यास तेल व लाकडें यांचें साह्य न देणें जितकें श्रेयस्कर होईल, तितकेंच या दोन इंद्रियांचा निग्रह करणें, श्रेयस्कर आहे, असा सत्पुरुषांचा अनुभव आहे. आधीं सत्पुरुष अनुभव घेतात मग दुसऱ्यास सांगण्याच्या भानगडींत पडतात. लांड्या कोल्ह्यासारखें मात्र कधीं करीत नाहींत. अशाच तऱ्हेचें अनुभव त्यांनीं आपापल्या ग्रंथांत ग्रथीत करून ठेविलेले आहेत. लोकांना निर्बल करण्याचा त्यांचा विचार असता तर श्रीशिवाजी महाराजासारखे राष्ट्रकार्य धुरंधर पुरुष निर्माणच न होते, तत्ववेत्ते महात्मे सर्व देशामध्यें सर्व जातींत उत्पन्न झालेले आहेत. परंतु तें तत्वज्ञान आचरणांत आणून दाखविणारे महात्मे मात्र या भरतभूमीशिवाय इतरत्र आढळणें नाहींत. क्रियेशिवाय वाच्यता करणें म्हणजे आपला उपहास करून घेणें आहे. ज्या योगानें आपण अधींक कार्यक्षम होऊं असाच मार्ग आपण आंखला पाहिजे. ज्ञानी पुरुषांचे हातून अन्यथाचरण होणें शक्य नाहीं. अग्नीचें ज्ञान झालें असतांना जसें स्वतःस भाजून घेण्याचा प्रयोग आपण करणार नाहीं, तद्वत मी परमात्मा आहे, असें ज्ञान झाल्यावर अन्यथाचरण कसें घडणार ?

सत्पुरुषांचे ग्रंथ दिसावयास, फार सोपे आणि सरळ दिसतात. त्यांत क्लिष्टता मुळींच सांपडावयाची नाहीं. जसे बदामाचे वरील कवच काढून टाकल्याशिवाय आंतील मगजाची लज्जत येणार नाहीं, तद्वत त्यांचे ग्रंथाचा अर्थ लावल्यावांचून खरा आनंद प्राप्त होणार नाहीं. संत भाषेंत शब्दाला प्रतिशब्द नाहीं. शब्दांचें खरें स्वरूपच समजावें लागतें. शब्दच मूळ द्व्यर्थी. एक अंतरार्थ व दुसरा बाह्यार्थ. ह्यासच लक्षांश वाच्यांश असे पर्यायवाचक शब्द आहेत. व अशा तऱ्हेनें संत काव्याचा अर्थ लावणें म्हणजेच गुणाचें शोधन होय. त्रिगुणाचें शोधन झाल्याशिवाय त्याचें स्वारस्य कळणार नाहीं.

यांचे ग्रंथांत बरीच प्रकरणें अपुरीं आहेत व कांहीं ठिकाणीं छंद भंगही आहे, परंतु अर्थरसामर्थ्य मात्र कोठें विसंगतपणा नाहीं. महाराज, हे ग्रंथ संभाळून ठेवण्याची काळजी करीत नसत. ग्रंथ जेथें लिहिला जाई तेथेंच पडे किंवा सहवासीमंडळी घेऊनही जात. ग्रंथांत कोठें खोडाखोड केलेली आढळून येत नसल्यामुळें झालेला ग्रंथ हे कवींवाचून पहात नसावेत असें अनुमान करितां येतें. एकादेवेळीं कोणाशीं संवाद चाललेला असला तर लिहीत असलेलें प्रकरण अपुरेंच रहात असे.

या खंडांत छापलेल्या प्रकरणांत योगेश्वर निजविला, मानसबोध, स्वात्मानुभव, निजानंद भक्ती, वगैरे व श्रीकृष्णलीला वगैरे प्रकरणें मनन करण्यासारखीं आहेत. १९००० अभंग, १५००० श्लोक, ३००० पदें, कांहीं दोहरे वगैरे मिळून ४०००० ग्रंथ आज उपलब्ध आहे. कै. रा. बापुराव यांचे मळ्यांत असतांना बराचसा ग्रंथ मंडळींच्या हलगर्जीपणामुळें एकागाईनें खाऊन टाकला. असा बराच ग्रंथ ठिकठिकाणीं नाहींसा झाला असावा. चै. शु. ६ रोजीं अशारीतीनें सत्कालक्षेप करून महाराज १८२०सालीं मांजरी मुक्कामीं देह ठेविते झाले. तेथून तो नेरुरगांव गंगापुर, पो. सुरेगांव, ता नेवासा येथें आणून श्री गोदाबाईचे कांठीं दहनविधी झाला व ह्याच ठिकाणीं पुढें समाधीही बांधली गेली. महाराजांची ठिकठिकाणची सहवासी मंडळी दरवर्षीं त्यांचे पुण्यतिथि उत्सव यथानुशक्त्या अजूनही साजरा करीत आहे.

प्रस्तावनेंदाखल ४ शब्द लिहिलेच पाहिजेत म्हणून माझ्या अल्प बुद्धीस जे चार वेडेवांकडे शब्द सुचले ते यथामती जनतेपुढें मांडले आहेत ते आपण गोड करून घ्यावे, येवढीच प्रार्थना आहे.

ग्रंथ प्रकाशनाचे कामीं द्रव्याची साह्यता, सर्व ग्रंथाचा उतारा करणें, तसेंच प्रूफें तपासणें वगैरे विषयीं जीवभ्य केलेल्या खटपटीबद्दल महाराजांचे प्रेमी भक्तांचा मी फार फार ऋणी आहे. तसेंच माझे परम मित्र श्री. रा.रा. दामोदर.सांवळाराम यंदे इंदुप्रकाश छापखान्याचे मालक यांनीं महाराजांचा समग्र ग्रंथ छापून देण्याचे कामीं प्रेमळ उदारपणा दाखवून माझे विनंतीस मान दिला, याबद्दल त्यांचे महत्तामहत् आभार मानतों. सर्वांतर्यामी परमात्मा त्यांचे अंतःकरणांत सदैव जागृत राहून त्यांस ग्रंथप्रकाशनाची स्फूर्ति देवो, अशी त्याचे चरणीं सविनय प्रार्थना करितों.

आपला कृपाकांक्षी,

**जी. कृष्णराव,**

**पेन्शनर, पोष्ट मास्तर, पैठण.**

# अनुक्रमणिका.

## दफतर पहिलें.


| विषय. | | | पान. |
|---|---|---|---|
| महाराजांचें संक्षिप्त चरित्र | ... | | १ |
| श्रीमदनंताष्टक | ... | ... | ७ |
| करुणापर व बोधपर | ... | ... | ९ |
| ज्ञानोपदेश | ... | ... | १२ |
| हितसार | ... | ... | १४ |
| मनोबोध | ... | ... | १७ |
| करुणालहरी | ... | ... | १९ |
| करुणापर | ... | ... | २२ |
| बोधपर | ... | ... | २२ |
| रामकृष्णभक्तिसुधा | ... | ... | २३ |
| नामसुधा | ... | ... | २५ |
| नामसुधा | ... | ... | ३६ |
| रामस्तव अभंग | ... | ... | ३९ |
| शिवस्तुति | ... | ... | ५७ |
| चिरंजीव पत्र | ... | ... | ५८ |
| विज्ञानविलास | ... | ... | ६१ |
| हरिविलास | ... | ... | ६६ |
| रंग | ... | ... | ६६ |
| अनुष्टुपछंद | ... | ... | ६८ |
| अभेदावळी | ... | ... | ६९ |
| निजानंद वार्ता | ... | ... | ७१ |
| बोधतत्व | ... | ... | ७३ |
| हरीगीत | ... | ... | ७६ |


द० पहिलें समाप्त.

| प्रकर्णे. | ओव्या. | श्लोक. | एकूण. |
|---|---|---|---|
| २१ | ४८ | ६१५ | ६६३ |

## दफतर दुसरें.


| विषय. | | | पान. |
|---|---|---|---|
| नौकाचरित्र | ... | ... | ८१ |
| राधाप्रीति | ... | ... | ८८ |
| आत्मनिवेदन | ... | ... | ९९ |
| कुब्जाअन्योक्ति | ... | ... | १०३ |
| कुब्जा नुवाद | ... | ... | १०५ |
| राधा भुजंग | ... | ... | १०९ |
| गोपी विनोद | ... | ... | ११६ |
| दधि मंथन | ... | ... | ११८ |
| गोपी गाराणी | ... | ... | १२३ |
| निजभक्ति | ... | ... | १३७ |
| रुक्मिणी विलास | ... | ... | १३७ |


द० २ रें समाप्त.

प्रकर्णे ११ श्लोक ५४२

## दफतर तिसरें.


| | | |
|---|---|---|
| योगेश्वर निजलीला ( १ ) | ... | १४८ |
| सिद्धभाव ( २ ) | ... | १५२ |
| साधूभाव ( ३ ) | ... | १५३ |
| संतभाव ( ४ ) | ... | १५६ |
| मुनीभाव ( ५ ) | ... | १५७ |
| ब्रह्मनिष्ठभाव ( ६ ) | ... | १५९ |
| ब्रह्मज्ञान भाव ( ७ ) | ... | १६२ |
| समाधि रंग | ... ... | १६६ |
| मनोबोध | ... ... | १७० |
| बोध | ... ... | १७१ |
| हितबोध | ... ... | १७५ |
| नीतिबोध | ... ... | १७८ |

| विषय. | पान. | विषय. | पान. |
|---|---|---|---|
| मनोबोध ... ... | १८५ | रामसगुणवर्णन ... ... | २२२ |
| सारविचार ... ... | १८८ | युगभाव ... ... | २२४ |
| मानसबोध ... ... | १८९ | सदपदानुभव ... ... | २२५ |
| नीतिबोध ... ... | १९३ | स्वरूपरूपवर्णन ... ... | २२७ |
| मानसबोध ... ... | १९५ | नामानंद ... ... | २२९ |
| बोधरूप ... ... | १९६ | करुणापर ... ... | २३१ |
| रामजन्म ... ... | १९९ | प्रार्थनाष्टक ... ... | २३३ |
| साधनतत्व ... ... | १९९ | मानसहेत ... ... | २३४ |
| प्रार्थना ... ... | २०२ | प्रार्थना ... ... | २३६ |
| नामसारविचार ... ... | २०४ | स्फूर्तस्वानंदयोग ... | २३८ |
| कृष्ण गोपीलीला ... ... | २०५ | प्रेमपरप्रार्थना ... ... | २३९ |
| मुरली ... ... | २०८ | प्रभुकीर्ति ... ... | २४४ |
| प्रेमसुधा ... ... | २१६ | उमा रमा संवाद ... ... | २४७ |
| निजठाय कथन ... ... | २१९ | ३ रें दफतर समाप्त. | |
| रुद्रगाथा ... ... | २२१ | प्रकर्णे ३४ श्लोक १०६३ | |




श्रीयोगीराज अनंत महाराज ब्रह्मचारी-पैठण.

3७९८

# ब्रह्मचारी श्री अनंत महाराज.

## संक्षिप्त चरित्र.

श्री अनंत महाराज ज्यांचें संक्षिप्त चरित्र आज येथें देत आहोंत, ते कारवार जिल्ह्यांतले रहाणारे असून त्यांचे वंशांत नाथभक्ति मूळचीच होती. श्री नाथांचे " रुक्मिणी स्वयंवर " वाचण्याचा परिपाठ त्यांस असे. महाराज आठ वर्षांच्या वयांतच रुक्मिणी स्वयंवराची पोथी घेऊन घरून निघाले ते गोकर्णनजीक ब्रह्मगिरी नांवाची टेकडी आहे, तेथें ' योगेश्वर ' म्हणून एक सत्पुरुष रहात असत, त्यांचेजवळ येऊन राहिले, व त्यांची सेवा भक्तिभावानें करूं लागले. सहा महिने पर्यंत महाराज व योगेश्वर यांचें कांहींच भाषण झालें नव्हतें. सहा महिन्यांनंतर उभयतांत भाषणास आरंभ होऊन एकमेकांविषयीं भक्तिभावाचा आदर व्यक्त झाला; आणि योगेश्वर महाराजांकडून सर्व रुक्मिणीस्वयंवर त्यांनीं भावार्थासह समजून घेतलें, व ते त्यांस गुरुस्थानीं मानूं लागले.

नंतर महाराज पैठणास आले. सकाळीं चार वाजतां श्री गंगाबाईंचें प्रातःस्नान करावयाचें आणि पांच ते आठपर्यंत अभंगलेखन करावयाचें. असा त्यांचा नियम होता. महाराजांची ब्रह्मस्वरूपीं लीन असलेली मूर्ति पाहून पैठणचे पोष्ट मास्तर जी. कृष्णराव हे त्यांचें शिष्यत्व पत्करून त्यांच्या भजनीं लागले होते. महाराजांच्या सहवासांत त्यांना जो अनुभव आला, तो असाः—श्री अनंत महाराज रोज जे अभंग, श्लोक किंवा पदें करीत, ते मंडळीस वाचून दाखवीत असत. त्या वेळीं ज्या कांहीं शंका येत त्यांचें निरसन लगेच पुढील कवितेंत होत असे. प्रश्न विचारण्याची पाळीच येत नसे. मनांत आलेली गोष्ट त्यांस कशी समजे नकळे, परंतु आपल्या मनांतील प्रश्नाचें उत्तर महाराजांच्या मुखावाटे ऐकावयास मिळे.

पैठणचे पोष्ट मास्तर लिहितात, एकदां श्री ब्रम्हानंद महाराज पिंपरीकर यांचा उपदेश मजला असल्यामुळें पैठणास येतांना मीं पिंपरीस गेलों होतों रुक्मिणी-स्वयंवराचा अर्थ तेही सांगत आणि माझे नाथांचें रुक्मिणीस्वयंवर असें म्हणत. एक दिवस तेथें होतों. रात्रौ त्यांचे पाय दाबीत बसलों असतां, त्यांस स्वप्न पडल्याचें त्यांनीं मला सांगितलें. त्यांत त्यांनीं मला संन्यास दिला; व मजला संतांचे मेळ्यांत नेऊन ही असामी माझी आहे, असें सांगितलें. या स्वप्नाचा भावार्थ न समजल्याकारणानें त्यांचे चरणावर मस्तक ठेऊन मीं स्वस्थ बसलों. पैठणास आल्यावर कुटुंब व मुलगी वारल्याचें समजलें. अर्थात् स्वप्नाप्रमाणें संन्यास दीक्षा मिळाली. एके दिवशीं रात्रीं बारा वाजण्याच्या सुमारास मी रुक्मिणी स्वयंवराचा

१६ वा अध्याय वाचीत होतों व त्याचा अर्थ अनंत महाराज सांगत होते. त्यावेळीं महाराजांचा आवाज व सांगण्याची शैली, थेट ब्रह्मानंद महाराजासारखी होती. महाराज समाधिस्त झाले होते याची जाणीव मजला एकदम होऊन मी तटस्थ झालों. पैठणीं असतांना पिंपरीस कसा आलों, हा काय प्रकार आहे म्हणून वर दृष्टी करून पाहिलें. तों मी पिंपरीस नसून श्री अनंत महाराजांसमोर बसलों आहें; व त्यांचें अंतःकरण प्रेमाश्रूनें सद्गदीत झालें आहे, असें दिसलें. महाराज म्हणाले, " मास्तर, ब्रम्हानंद व मी वेगळा नाहीं " हें ऐकतांच ब्रम्हानंद पिंपरीकर यांचे स्वप्नाची खूण–" संताच्या मेळ्यात नेलें व ही असामी माझी आहे " ही मनास पटली; आणि रुक्मिणी स्वयंवराच्या सोळाव्या अध्यायांतील जिव शिवाचे ऐक्याचा अनुभवानुग्रह होऊन वृत्तीस समाधान वाटलें.

एकदां श्रीनाथषष्ठीस दिंडी निघाली असतां, तिचेबरोबर जाण्यास महाराजांसह सर्व उठले. जोडा पायांत घालतांना ' आज जनार्दन स्वामी यावयाचे आहेत ' असे उद्गार महाराजांच्या तोंडून निघाले. मीं अगदीं जवळ असल्यामुळें तें स्पष्ट ऐकलें. महाराजांनीं जोडा घातला नाहीं. तें पाहून मीहि त्यांच्याबरोबर तसाच निघालों. महाराजांचे डाव्या बाजून मीं एक पावलाचे अंतरानें चालत होतों. संगत सुटल्यास श्रीच्या दर्शनास मुकावें लागेल, म्हणून मनही अगदीं तत्पर व दक्ष होतें. दिंडी, बाहेरच्या नाथीं गंगेकडील द्वारानें आंत गेली. वाळवंटांत असतांनाच महाराजांनीं डाव्या हाताची तर्जनी उत्तर दिशेस करून ' ते जनार्दन ' असें बोलले. त्यावेळीं दिंडीबरोबर गर्दी फार होती, तरी माझी दृष्टी त्यांच्या बोटाकडे गेली. तोंच एक १८ वर्षांची गौरवर्ण व दैदीप्यमान बालमूर्ति माझेजवळ डावे बाजूस येऊन उभी राहिली. अंगांत स्वच्छ पांढरी कफनी, डोक्यास हिरव्या रंगाचा जाळीदार फेटा, व डाव्या हातांत रामफळ असून ते खांत असतांना त्याचा कांहीं रस कफनीवर पडत होता. माझें सर्व लक्ष व दृष्टि त्यांचेकडे वेधली होती. त्यांची दृष्टि महाराजांकडे असून ते हंसत होते. हा सर्व देखावा ५–७ सेकंदच होता. माझे चिंतनाप्रमाणें दर्शनाचा लाभ होतांच मी चित्रासारखा उभा राहिलों. त्यांस वंदन करण्याचेंहि भान राहिलें नाहीं.

अनंत महाराज शके १८२० मध्यें समाधिस्त झाले. त्यानंतर दीड वर्षानें एके दिवशीं श्रीनाथषष्ठीचा देखावा पहात माझे स्नेही रा. माधवराव फडके मास्तर यांसह आम्ही यात्रेंतून बाहेरच्या नाथी दर्शनास चाललो होतों. ' अनंत महाराज समाधिस्त झाले, आतां त्यांचें दर्शन कोठून होणार ! ' असें आमचें बोलणें चाललें होतें. इतक्यांत उजवीकडे दत्ताचे देवळा जवळ एक विहीर आहे तेथें झाडाखालीं महाराज व गणपतसा खत्री असें उभे असतांना दृष्टीस पडलें. तें मी रा. फडके यांस दाखविलें आणि आम्ही उभयतां तिकडेच वळलों. जवळ गेलों तेव्हां महा-

राजांनीं गणपतसा खत्री यांस सांगून बसण्यास पांढरी घोंगडी अंथरविली. महाराजांस नमस्कार करून मीं विचारलें, महाराज आपण समाधिस्त होऊन पुन्हा येथें कसें ? तेव्हां महाराज म्हणाले; " मीं आलों नाहीं व गेलों नाहीं, आहे त्या स्थितींतच येथें आहे. " इतकें सांगून महाराज अदृश्य झाले. आम्हास फारच विस्मय वाटला, आणि विचार करीत घरीं परत आलों.

श्री नाथसंस्थानचे जाहगीरदार शामरावबावा हे दररोज मठांत महाराजाकडे येत असत व महाराज त्यांजबरोबर फिरण्यास जात असत. एके दिवशीं त्यांचे येण्या-पूर्वींच एक तास अगोदर महाराज फिरण्यास निघून गेले. पाठीमागून शामरावबोवा आले. महाराज गेल्याचें समजल्यावर ते त्यांच्या शोधास गेले. सर्वांची वाळवंटांत बसण्याची एक कायम जागा होती. तेथेंही ते गेले, परंतु महाराजांची भेट झाली नाहीं. सूर्यास्तानंतर आम्ही सर्व मंडळी वाळवंटांत महाराजांकडे गेलों, तों महाराज नित्याप्रमाणें बसलेले होते. शामराव आपणास शोधीत आहे, असें मंडळी म्हणाली. त्यावर महाराज म्हणाले, शामरावास येथून जाता येतांना मी पाहिलें. आश्चर्य हें कीं, महाराज शामरावाच्या दृष्टीस पडले नाहींत. अशा तऱ्हेची आणखीही १।२ उदाहरणें झालीं. महाराजांचे मनांतून भेट द्यावयाची नसली, तर ते जवळ असूनही भेटीचा योग येत नसे.

एकदां महाराज बाहेरील पडवींत भात शिजत ठेवून आपण आंतील खोलींत लिहित बसले होते. कांहीं वेळानें भाताखालील लांकडें विजत आल्याचें पाहून रा. घोंडोपंत नांवाचे शिष्य तीं लांकडे पुढें करण्यास गेले. इतक्यांत आंतून महाराजांनीं—" मी निजलों नाहीं, जागाच आहें. आतां लाकडें सारण्याचें काम नाहीं. कारण भात शिजून तयारच झालेला आहे " असें म्हटलें. पुढें बाहेर येऊन त्यांनीं तो भात. रा. साठे यांस दाखविला, व लांकडे आंत सारलीं असतीं तर भात जळून खाक झाला असता, असें म्हणाले. यावरून महाराज किती जागृत होते हें दिसून येतें.

महाराज पाण्यांत पोहण्यांत फार पटाईत होते. एकदां गंगाबाईस पूर आला असतां सर्व मंडळीसह स्नानास गेले. त्यावेळीं त्यांच्या पोहण्याच्या अनेक कला दृष्टोत्पत्तीस आल्या. महाराज पद्मासन घालून पाण्यावर बसत, एका कुशीवर डावा हात उशा-खालीं घेऊन पाण्यावर निजत. पाण्यांत अर्धा तास बुडी मारून त्याच ठिकाणीं निघत, ४–५ शें यार्ड पाण्यांतून जाऊन पलीकडे निघत, वगैरे अनेक खेळ पाहून मंडळी थक्क झाली.

एकदां नाथषष्ठिस महाराजांनी रा. बळवंतराव मास्तर यांस सहा मनुष्याचें अन्न तयार करण्यास सांगितलें. मास्तरानीं स्वयंपाक केल्यावर पानें मांडूं कां ? म्हणून विचारिलें. महाराजांनीं सर्व अन्न पात्रावर वाढवून ६ पात्रें तयार करविलीं. नंतर एकपात्र गाढेश्वराचे उत्तरेस गंगेचे

काठीं एकवृद्ध कुष्ट भरलेली मुर्ती आहे, त्यास तें नेऊन देण्याची आज्ञा केली. दुसरें पात्र पूर्व दिशेस सिद्धेश्वर महादेवाचे नागफणी जवळ झाडाखालीं एक अती वृद्ध मूर्ती बसली आहे, त्यांस पोंचविण्यास सांगितलें. तिसरें पात्र दक्षिण दिशेस नंग्याच्या बागेंत कोटाजवळ मशीद आहे तेथें बाहेरचे बाजूस पांढरे दाढीची एक मूर्ती आहे त्यास देण्यास सांगितलें. चौथें पात्र गंगेचें काठीं वाळूंत एक बाल स्वरूप मूर्ती आहे, त्यास देण्यास सांगितलें. याप्रमाणें चार पात्रें पोंचविल्यावर राहीलेलीं दोन पात्रें कोणास द्यावयाचीं म्हणून मास्तरानें विचारलें. तेव्हां महाराज म्हणाले, एक तुमचें व दुसरें माझें. भोजनास बसल्यावर ४ पात्रे दिलीं. त्या मुर्ती कोण ? म्हणून मास्तरानीं प्रश्न केला. उत्तर नाहीं. म्हणून मास्तरानें पुन्हा प्रश्न केला. तेव्हां महाराज म्हणाले, मास्तर तुमचा फारच आग्रह दिसतो. तुम्हीच त्यांस कां विचारलें नाहीं ? शेवटीं मास्तरांची फारच उत्सुकता जाणून महाराज म्हणाले;–' त्या मूर्ति म्हणजे रामदास, एकनाथ, ज्ञानेश्वर व शुकाचार्य होत. आपलें कांहीं पुण्य होतें म्हणून दर्शन झालें.'

एकदां सेवाग्रास महाराज मोहनीराजाचे देवालयांत चित्रें काढीत बसले होते. ( चित्रें काढण्याचा महाराजांस फार नाद असे ) इतक्यांत एक बाई डोक्याच्या विकारानें रडत तेथें आली व महाराजांजवळ औषध मागूं लागली. महाराज म्हणाले; मी कांहीं वैद्य नाहीं. तूं वैद्याकडे जा व औषध घे. बाई म्हणाली, महिना झाला, मी डोक्यानें बेमार झालें आहे. पुष्कळ वैद्यांचीं औषधें घेतलीं, पण कांहीं गुण नाहीं. डोक्याच्या दुखण्यानें मी त्रासलें आहे. कृपा करा, मला दुखण्यांतून सोडवा. असें म्हणून तिनें महाराजांचे पाय धरले. तेव्हां महाराजांनीं देवळासमोर उगवलेलें गवत तोडून तिला दिलें, व तें वाटून त्याची चिपटी करुन डाव्यापायाचे आंगठ्यास बांध म्हणजे डोकें राहील, असें ते म्हणाले. त्याप्रमाणें बाईनें करितांच तिचें डोकें दुखणें आजिबात बंद झालें. ती बाई अर्ध्या-तासांतच परत येऊन तिनें महाराजांस साष्टांग नमस्कार घातला, व आपलें डोकें साफ बरें झाल्याचें सांगितलें. सर्व कृपा मोहनीराजांची आहे, असें महाराज म्हणाले.

महाराज कधीं कधीं उपनिषदें व गीता सांगत असत. प्रसिद्ध नाटककार वासुदेव-राव डोंगरे हेही येऊन बसत, व महाराज जी उपनिषदांची फोड करीत, त्याचा दुसरें दिवशीं कवितांत तरजुमा करुन ते महाराजांकडे आणित व महाराज त्या दुरुस्त करुन देत असत. एकदां महाराजांनीं स्वत: उपनिषद न सांगतां जवळच बसलेले बळवंतराव मास्तर यांस बृहदारण्याचा अर्थ सांगण्यास आज्ञा केली. बळवंतराव हे साधारण शिकलेले होते. त्यांस उपनिषदाचें ज्ञान तर मुळींच नव्हतें. तेव्हां बृहदारण्यासारख्या उपनिषदाचा अर्थ ते कसा सांगणार याचें सर्वांना आश्चर्य वाटलें, व जो तो महाराजांच्या तोंडाकडे टकमक पाहूं लागला. परंतु

जेव्हां बळवंतराव अर्थ सांगू लागले, तेव्हां महाराजांचे सांगण्याच्या शैलींत व त्याच्यांत कांहीं फरक दिसेना. तो चमत्कार पाहून महाजांच्या सामर्थ्याचें कौतुक वाटलें, आणि 'आपुलीया बळें नाहीं बोलवत, सखा भगवंत वाचा त्याची' या साधुक्तीची आठवण झाली.

एकदां महाराज कोंकणांत नातेगांवच्या मुक्कामीं असतां जवळ मंडळी बसली होती, व महाराज वेदांताचें निरूपण करीत होते. निरूपण संपल्यानंतर मंडळी उठून जाऊं लागली व महाराजही उठले. तोंच त्यांचे मांडीखालून एक सर्प निघाला. सर्प पहातांच मंडळी घाबरली व त्यास मारण्याच्या खटपटीस लागेल. तेव्हां महाराज म्हणाले 'जाऊंद्या त्यास कशाला मारतां, सर्वत्र त्याचें वास्तव्य आहे' इतक्यांत तो सर्पही नाहींसा झाला.

अनंत रंगनाथ नगरकर या नांवाचे गृहस्थास सावकाराचें देणें पुष्कळ झालें होतें. एकदां सावकारानें त्याच्यावर हुकूमनामा मिळविला. आपल्या घरावर जप्ती येणार असें त्यास कळतांच त्यानें आपल्या कुटुंबास दागदागिने व रोकड देऊन मुलासह रातोरात टांग्यातून औरंगाबादेस रवाना केलें. हें वर्तमान सावकारास कळतांच त्यानें शिपाई रवाना करून नगर पासून ५।६ कोसांवर आडरानांत टांगा आडविला. महाराजांचे ठिकाणीं नवराबायकोचें अत्यंत प्रेम होतें. कठीण प्रसंग पहातांच बाईनें महाराजांचा धावा केला. इतक्यांत महाराज फौजदाराचे रूपानें तेथें प्रगट झाले, व त्या शिपायांस धमकी देऊन बाईची मुक्तता केली; आणि बाई सुखरूप औरंगाबादी पोहोंचली. ही हकीगत तिनें स्वतःच सर्वांस सांगितली.

रा. दामोदरपंत वाहेगांवकर हे महाराजांचे प्रेमांतील असून महाराजही बाहेरगांवीं त्यांचे घरीं कधीं कधीं जात असत. एकदां त्यांची सून पैठणास माहेरी प्रसुती करितां आली होती. प्रसुतीचे वेळीं पुष्कळ इलाज केले, परंतु बाईची सुटका होईना. सर्व आप्त मंडळी घाबरून गेली. इतक्यांत दामोदर पंतास महाराजांची आठवण होऊन तो त्यांजकडे धांवत गेला, व सर्व हकीकत त्यानें महाराजांस सांगितली. महाराज म्हणाले—त्यांत काय आहे ? अनंत ऋषीचे मठांतील पादुकांचें तीर्थ घे आणि तिला दे, म्हणजे झालें. त्याप्रमाणें त्यानें करतांच तत्काळ बाळंतिणीची सुटका झाली.

एकदां कोंकण, नगर, पुणें, सोलापूर, वगैरे ठिकाणांहून मंडळी नाथषष्ठीस महाराजांकडे पैठणास आली होती. नाथषष्ठी झाल्यावर मंडळी कांहीं दिवस तेथें

राहून आपआपले गांवाकडे जावयास निघाली. श्री अनंत महाराजही कोकणांत जाण्यास त्यांचे बरोबर निघाले. रस्त्यांत बैल थकल्यामुळें गाड्या शेवगांवास सोडून मंडळी पायींच पुढें चालली. महाराजांसह मंडळी दररोज ३।४ कोस चालून मुक्काम करीत असत. महाराजांचा प्रवास करण्याचा क्रम बहुतेक रात्रीच असे. मार्ग आक्रमण करतांना करंज घाटाजवळ एका अंब्याचे झाडाखाली यांचा मुक्काम पडला. करंजीस अदल्या दिवशींच दरोडा पडणार अशी वदंता उठल्यामुळें गांवांतील सर्व मंडळी बाहेर पडली होती. दुसरे दिवशीं बारा वाजण्याच्या सुमारास, दरोडेखोर झाडाखालीं उतरल्याची खबर ऐकून पोलीसपाटील व कुळकर्णी, शिपाई घेऊन तेथें आले. तेथें आल्यावर मंडळीच्या नांवा गांवाची चौकशी करूं लागले. महाराजांनीं सर्वांस सांगितलें कीं, कोणी खोटें बोलूं नका. खरें नांव गांव असेल तें सांगा. त्याप्रमाणें सर्वांनीं केलें, परंतु शिपायांची खात्री होईना. कारण एक, एका गावचा, तर दुसरा, दुसऱ्या गांवचा. याप्रमाणें स्थिती पाहून हेच चोर असावेत असा त्यांचा समज झाला, आणि सर्वांस कैद करून नेण्याचें कुळकर्णी व पाटील हुकूम सोडले. त्यावेळीं महाराजांनीं इतक्या उग्र दृष्टीनें त्यांजकडे पाहिलें कीं, त्यांचें तेज पाहातांच सर्व शिपाई गर्भगळीत झाले व पाटील कुळकर्ण्यांसह सर्व शिपायांनीं जीव घेऊन घरचा रस्ता धरला. कुळकर्णी सांगतात, त्या वेळीं महाराजांचे स्वरूप आम्हा सर्वांस शंकरासारखें भासलें.

शके १८१९ सालीं महाराज नाथषष्ठी करून नेरुर गावीं आले होते. त्यावेळीं त्यांनीं स्वतःच मंडळीस सांगितलें कीं, पुढील षष्ठी म्हणजे चैत्रशुद्ध षष्टी आमची आहे. त्याप्रमाणें चैत्र शुद्ध षष्ठी शके १८२० रोजी महाराजांनीं निर्याणापूर्वी एक घटका सहजासन घातलें व देह ठेवला. मांजरीस तेव्हां पासून दरवर्षी उत्तम प्रकारची वृष्टी होऊन पीकपाणी उत्तम येऊं लागलें आहे व लोकही सधन झाले. मांजरी गांव खडकाळ आहे. मांजरीचे लोक महाराजांचा उत्सव दरवर्षी आनंदानें करितात. तेथें एक आड आहे, त्यांत पूर्वी कधींहीं पाणी मिळत नसे. त्या आडांत आतां नेहमीं पुष्कळ पाणी असतें व उत्सवास त्याच पाण्याचा पुरवठा होत असतो. याठिकाणीं महाराजांची समाधी आहे. महाराजांचा देह मांजरीहून नेउरगांवीं अग्नीसंस्कारास नेला, व तेथें संस्कार झाला. नेऊरगांवीं व्यंकटेश्वराचे मंदिरानजीकही त्यांची समाधी बांधली आहे. तेथेंही दरवर्षी रा. ध्यानगीर बोवा हे महाराजांचा पुण्यतिथीचा उत्सव साजरा करीत असतात.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ........ वि: ........

# श्रीमदनताष्टक.

( शार्दूलविक्रीडित )

शङ्का खंड नसे जयासि मथितां वेदांतिंच्या सौरसा ॥
आत्मानात्म विचार वर्णुनि जनां पाजी अभेदा रसा ॥
बोले तेसरिं वर्तुनी जगिं निजानंदांत राहे सदा ॥
पूर्ण ब्रम्ह गुरू अनादि नमि त्या प्रेमें अनंतापदा ॥ १ ॥

सह्याद्री तटिं पार पश्चिम–समुद्राचे पुनीता भुमी ॥
तेथें पूर्व वयांत काळ अपुला सत्शोधनीं आक्रमी ॥
भासे बाळपणीं अनित्य जग हें मानी भवीं आपदा ॥
पूर्ण ब्रम्ह गुरू अनादि नमि त्या प्रेमें अंनतापदा ॥ २ ॥

सौख्याचा लवलेश शोध करितां ना येत दृष्टीस ज्या ॥
नित्यानित्य विचार भाव सहजीं ठायीं उदासीनित्या ॥
क्षेत्रीं वास करी बहू महि असे ना एकदेशी कदां ॥
पूर्ण ब्रम्ह गुरू अनादि नमि त्या प्रेमें अनंतापदा ॥ ३ ॥

चारी धाम फिरे वनीं उपवनीं ग्रामीं दरीं पर्वतीं
राहोनी मठ देव देवि बघुनी तीर्थें बरीं सर्व तीं ॥
घेई सारचि काढुनी अनुभवा मानीतसे संपदा ॥
पूर्ण ब्रम्ह गुरू अनादि नमि त्या प्रेमें अनंतापदा ॥ ४ ॥

साधू संत मुनी महंत कविही वैरागि कोवीद त्या ॥
संगें वास करोनि नित्य कसणी देहास लावीत त्या ॥
जेथें ढोंग दिसे पळे तिथुनियां थारा न कामां मदां ॥
पूर्ण ब्रम्ह गुरू अनादि नमि त्या प्रेमें अनंतापदां ॥ ५ ॥

पक्षातें त्यजुनी विवाद मिटवी ठावा नसे मीपणा ॥
सोहंभाव स्फुरे करी समपणी तल्लीन हो आपणा ॥
पूर्णानंद पदा निजीं मिळवि जो शोधोनि सच्चित्पदा ॥
पूर्ण ब्रम्ह गुरू अनादि नमि त्या प्रेमें अनंतापदा ॥ ६ ॥

होतां प्राप्त वसंत संत सहजीं कोयाळ वाणी फुटे ॥
स्फूर्तीची कविता करी अमित ती देखोनि भ्रांती तुटे ॥
नेवासीं कधिं कोंकणीं मठिं प्रतिष्ठानांत राहे कदां ॥
पूर्ण ब्रम्ह गुरू अनादि नमि त्या प्रेमें अनंतापदा ॥ ७ ॥

ऐसें वागुनि जो जनातित जनीं देहावसाना करी ॥
षष्ठी सोमदिनीं सुशुद्ध प्रथमी मासांत त्या मांजरीं ॥
अठ्ठावें विस आद्धिं शांत समयीं गा माधवा सत्पदा ॥
पूर्ण ब्रम्ह गुरू अनादि नमि त्या प्रेमें अनंतापदा ॥ ८ ॥

( कै. म. रा. फडके पैठण )

---

## ॥ आर्या. ॥

अष्टादशशतविंशति मधुमासीं सोमशुद्ध षष्ठीला ॥
पूर्ण ब्रम्ह सनातन अनंत गुरू पावले स्वरूपाला ॥ १ ॥

# श्रीअनंत महाराजांचे समग्र ग्रंथ

---*-:०:-*---

## १ करुणापर व बोधपर.

( करुणामालिनी वृत्त )

ॐ अनंतायनमः

नरहरि दिनपाळा माधवा गा कृपाळा ॥
कलिमल अविनाशा या दिना पायिं पाळा ॥
सदयघन रुपा रे श्यामला राजिवाक्षा ॥
अमलपण मति दे हारवीं दृश्य कांक्षा ॥ १ ॥

सकल दुरित भावो हारुनी प्रेम ठावो ॥
अवगत अनुभावो कामने ही उठावो ॥
नरतनुसम देवा दीधली ही रमाया ॥
परि विसर स्वसूखा दृश्य जाहीर माया ॥ २ ॥

विसरुनि तुजलागीं वीषयीं भूललों मीं ॥
हरहर नरपाळा व्यर्थ रे वाढलों मीं ॥
अभिमति बहु वाढे लीनता येइना ती ॥
स्वपरमति रुपाची मोहुनी भावि नातीं ॥ ३ ॥

स्थिर गति कधिं नाहीं धांवते सैरवैरा ॥
द्विविध मति अभावें स्वार्थ ते आत्पवैरा ॥
षड्रिपू षड्भावें भाविती अंतरीं जे ॥
सुख मन बहु मानी तूजला अंतरी जे ॥ ४ ॥

रुचिकर तवनामा टांकुनी वीष प्याले ॥
भरभरुनि सुखानें दृश्य ताकांच घ्याले ॥
तळमळ अजिं ऊठे नासुचे काय देवा ॥
मजप्रति जी उपाया सांगणे देव देवा ॥ ५ ॥

अजिं बहु भित देवा या भवीं भ्रांति भावा ॥
पडत मति अपायीं आजिं हारी अभावा ॥
अभिमति दुर व्हावी, प्रेम दृष्टी करावी ॥
सदय घन सुबोधीं मेघ वृष्टी भरावी ॥ ६ ॥
भ्रममति सम होण्या पाय तुझे दयाळा ॥
भुवनिं तरण पायो ना दुजा भेदमाळा ॥
कलिमधिं तप दूजें साम्य ना नाम योगा ॥
म्हणुनि वदत ग्रंथी शूक तो भक्तियोगा ॥ ७ ॥
नचकधिं मति माझी आठवी तूजलागीं ॥
भ्रमणिं दुरित चिंती ज्ञानबीजे जळागीं ॥
नच विट विषयाचा येतसे अंतरंगा ॥
स्वसुख विसरुनीयां बुद्धि भूले तरंगा ॥ ८ ॥
सकळहि अवगूणीं माफि मातें असावी ॥
शिशुसम प्रिति भावो बापता ते दिसावी ॥
जनन-मरण बंधापासुनी सोडवावें ॥
घन ढग वितळावे जेविं ते वायुभावें ॥ ९ ॥
दिनजन प्रतिपाळा कारणीं ब्रीद गाजे ॥
सुरगण मुनि राजे वर्णिती त्री जगा जे ॥
म्हणुनि दिनमती दे मानसा प्रेमरंगा ॥
मग सहजचि येसी पाडसी ते कुरंगा ॥ १० ॥
भजन पुजन नेणे कर्मयोगादि कांहीं ॥
तुजप्रति नच मागें देह भोगादि कांहीं ॥
निजपद मजदावी जेथ नां यातना ती ॥
जिवशिवपणभावा मीळवावें सनाथीं ॥ ११ ॥
भुमिधरशयना गा माधवा मारिकामा ॥
करिं भाविं मज आतां नाम गाथा रिकामा ॥
धन सुत सति कांता येथ गा नावडी दे ॥
सुजन अनुभवी तो संगती आवडी दे ॥ १२ ॥

दिनानीशिं मति माझी चिंतनीं राहुं देगा ॥
तवरव मुखियावें बाप आता हुं देगा ॥
स्वरुदिं दिठि भरावी वासना शांत यावी ॥
कालिमालि तनु जे कां काम गा शांत यावी ॥ १३ ॥
परमसुखस्वरूपा माधवा आत्मबोधा ॥
स्वसुखरुपमनोघा भावनात्म प्रबोधा ॥
सद्चिद्रवकंदा नंदनंदा मनोघा ॥
समजवि अनुभावें सर्व तूझ्या मनोघा ॥ १४ ॥
मज बहु आजिं वाटे आवडी गूण गावे ॥
मतिमधिं कळ वाहे अंतरा खूण गावे ॥
सम समज जडे हा जन्म कर्मानुभावें ॥
बिजरुप उगवावें पेरिलेल्यानुभावें ॥ १५ ॥
गुण नच तुजलागीं रूप ना निर्विकारी ॥
अमल अजर देवा जीव मी हा विकारी ॥
पुजन करुं कुणाचें दृश्य हें नाशकारी ॥
स्थिरपण नच याला साध्य कैंची शिकारी ॥ १६ ॥
दगड करुनि ऊभा देव मानी मनीं मीं ॥
तनु भुतगुणरुपें कोण मानीं मनीं मीं ॥
कळत नच मिहा जी प्राज्ञक्षेत्री वदे हा ॥
तनुच जरीं म्हणूं ये सत्यता नाश देहा ॥ १७ ॥
स्थिरचर अवघा तूं मीपणा ठाव नाहीं ॥
बहुविध बहुभाती भावते भावना ही ॥
स्मरत मति अशी ही देव तूं सर्व ठायीं ॥
हरिहर विधिभावो पुंडलीके विठाई ॥ १८ ॥
सकळ तुज मतीची भावना ठाव आहे ॥
परि वदत विनोदा काम नाडावया हे ॥
द्विविध करुनि भावो आदिं गाऊं सगूणा ॥
मतिदरिंतुनि त्यागूं भावना द्वैतगूणा ॥ १९ ॥

समपण तवनामें वृत्ति आराम पावे ॥
अरिभय टळुनीयां अंतरीं राम भावे ॥
इहवरि मजलागीं अंत ये या तनूतें ॥
तववरि वदनातें नाम दे नित्य नूतें ॥ २० ॥

गहिवर तुजलागीं नाम बोधान्वयानें ॥
म्हणुनि सतत गाऊं बाळ जानी वयानें ॥
तन मन धन भावें भाव भावें स्वभावें ॥
दिन मतित अनंता नित्य हें साश्रभावें ॥ २१ ॥

---

## २ ज्ञानोपदेश.

( विबुध प्रिया. )

ॐ श्रीअनंतायनमः

कामिनी गजगामिनी मनिं मानुनी मति माजिं कां ॥
भूलसी किति धांवसी तिज मागुनी फट कामिका ॥
पाहुनी नयनाकृती गति फांकली सुद गेलिरे ॥
वीषयीं विष मानुनी नच फीरली मति पाठिंरे ॥ १ ॥

भूल ही जग मोहिनी भवभ्रांतितें तुज मीळवी ॥
कालवी विष ऊदरीं अरि सौभरी जग नाडवी ॥
थोर ते परि ढोरसे इज मानुनी भवि गुंतले ॥
गेइं तूं मन दाखले इतिहासिंचे बहुचांगले ॥ २ ॥

पाहि पां बहुथोर हा मुनि तो पराशर वृद्धगा ॥
येमुने मधिं ढीवरी दिठि पाहुनी पडि भूलगा ॥
ज्यानिची वृतकूमरी मधिं होडीच्या तिस भोगिली ॥
भाव ही नच जींकिली उगिं धांवती गति ना भली ॥ ३ ॥

ब्रम्ह हा निजकन्यके प्रति पाहुनी बहु लुब्धला ॥
पूज्यता मग भंगिली नच दैवतीं जगिं पूजिला ॥
विष्णु हा जगिं नाटकी बहु कामिनी घरीं भोगुनी ॥
गाजवी ब्रिद ब्रम्हचारि मि या रितिं तिन भूवनीं ॥ ४ ॥
थोरला इश शंकरू अरि जाळता परि भूकला ॥
भिल्लीणी करिं नाडिला तप सोडुनी मधिं बूडला ॥
मारिली मिठि तीजला नच लाजला मनिं वृद्ध हा ॥
कोणिरे नच मोकळा इज पासुनी मन तूं पहा ॥ ५ ॥
गाधिज तप मांडिलें वनिं जाऊनी बहु दारुणी ॥
मेनिके अवलोकुनी कटि सूटली तप तें धुणी ॥
चंद्रमा गुरुपत्नितें बहु लुब्धला मग डागिला ॥
ही लिला जग दृष्टिला दीसते भली भग कांतिला ॥ ६ ॥
गात ते बहु पावले परकामिनी रति भावनीं ॥
रावणें जनकात्मजा वनिं चोरिली रघुकामिनी ॥
वानरां करिं मारिला मग आनुजा नृपस्थापिका ॥
कौरवेश तसा मरे अरि द्रौपदी कुरुध्वंसिका ॥ ७ ॥
कीचका परि नाश तो पर कामिनी कुळिं नाडला ॥
नारदें मनिं कामिनी सुख मानुनी हितिं सूटला ॥
नारदी मग होउनी सुत साठ ते जगिं स्थापिलें ॥
कौतुकें जग मोहिनी भविं पाडुनी बहु नाडिले ॥ ८ ॥
नाहिंरे इज वांचुनी दुर राहिला विरळा कुणी ॥
या जगीं जग कारिणी मुळ कौतुकी बहु देखणी ॥
भक्तिनें निजयुक्तिनें नच शक्तिनें कुणि सोडिली ॥
ईजला जरिं ये दया तरिं सोडिते सद्पाउलीं ॥ ९ ॥
कायसे जप योग ते इज टाळण्या करिता भले ॥
नाडले दुहि बाजुला नर साधकांतुनि चूकले ॥
जाणुनी मतिमाजिं तूं हरि चिंतनीं धरि मेदिनी ॥
लागुनी समभागिं ये बहु चांगली रित मानुनी ॥ १० ॥

आसरा तुज हा बरा हरिभक्तिचा जरिं लाधला ॥
त्यागिसी सहजागती मग इंद्रियच्या भवभ्रांतिला ॥
मायही मनि मानते हरिदास हें मुल आपुलें ॥
पाळितें कनुवाळसें जसि माउली सद कोंवळें ॥ ११ ॥
कां तरी दिठिं कामिनी मनिं कातरी विषयीं नरा ॥
बावरा करि हांवरा मति मोहुनी गतिचा चुरा ॥
नाहिं ज्या दिठिची भुली मन मोकळी इज पासुनी ॥
तोचि रे परपारिची नित देखणा गति बोधनीं ॥ १२ ॥

साव हा सद्‍भाव ज्या मनिं प्रेम तो बहु आभरे ॥
शांतिचें नित स्नान ज्या अनुभावनीं तनु सांवरे ॥
माव ना नच ढोंगिसा तट ज्ञातिचा जिथ खुंटला ॥
पीकला निजिं टीकला नच वीकिला हरि पाहिला ॥ १३ ॥

सांवळा मति गोंवळा नच आकळे इतरां कळें ॥
सूमनें नच तीं मनें नव कोंवळें सकळीं कळे ॥
फूललें मति तोषलें भ्रमरामिषें हरि येतसे ॥
संत हे इह रीतिनें रस प्रेमते निज सौरसें ॥ १४ ॥
हें मना सद्‍सेवनीं अजिं जोड तूं बहु गोड तें ॥
पाहिती निज संत ते प्रितिं आवडीं पय गोड तें ॥
नंद सूत अनंत कंद अमोघओघ भवामधीं ॥
होत जात अनंत त्यांत समागमास जमा निधी ॥ १५ ॥

---

## ३ हितसार.

( इंद्रजावृत्त. )

सदां सर्वदां ध्यायिंरे राघवातें ॥ नको काळ हा घालवूं वीषयातें ॥
धनाला मनानें सदां आठवावें ॥ हिता नाडणें पाप खाणीं पडावें ॥ १ ॥

नको तूं मना घोर पंथांत जाऊं ॥ नसे सूख तेथें जिवाला अभावू ॥
नको कामना कामिनीची दुज्याचे ॥ असें पाप ना दूसरें दुष्ट नीचें ॥ २ ॥

नको काम कल्पूं फुकाचा मनानें ॥ जसें देव ठेवी वसे त्याच मानें ॥
मनानें जपावें तुला तें नसे रे ॥ उगां भ्रांति वारे भ्रमाचार सारें ॥ ३ ॥
असे भोग हा सूखकारी जिवाला ॥ दिसे मात्र साचा परी हाच घाला ॥
मना रोग हा भाव तो भोग योगें ॥ कदां सूख नाहीं बहू दुःख भोगे ॥ ४ ॥
सुखा इच्छितां दुःख येतें स्वभावें ॥ सुखीं सूख तें एकटें ना स्वभावें ॥
दिना पालटा रात्र येती जसी रे ॥ कळा जाणिवेची तळा मेळवीरे ॥ ५ ॥
परावें असें स्थूळ हें पंचभूतीं ॥ उगां तूं मना वेतली येथ बुंथी ॥
नसे भोग स्थूळा मना खेळ तूझे ॥ तनू मी अशी मानुनी घेसी ओझें ॥ ६ ॥
जसें आपणा राहण्या हो घराला ॥ बरें बांधिलें हें तया आंत ठेला ॥
तया मांजि भोगी तदां भोग सारें ॥ घराला तया त्यांत नाहीं चुरारे ॥ ७ ॥
प्रती दीवशीं झाड लोटी करावी ॥ तशी देख रेखी बरी वागवावी ॥
परीवार सारा बरा आंत राहे ॥ मुलें माणसें दास दासी जमा हे ॥ ८ ॥
तयाचें रितीं स्थूळ हें जाण बापा ॥ विसाव्यास जागा भवीं व्याप्य व्यापा ॥
कुटुंबी तुची नांदसी तेथ साचे ॥ बरें भोगिसी भोग तेही भ्रमाचे ॥ ९ ॥
बरें माजविलें कुटुंबास येथें ॥ मदा मोह कामा वरी क्रोध नातें ॥
अभीमान हा दादला वासनेचा ॥ मुळारंभ जोडे घरा हेतु याचा ॥ १० ॥
पुढें पुत्र झाला महामोह तो हो ॥ वरी कन्यका ती असे कूनिती हो ॥
व्यभीचार येथें गमे वास दोघां ॥ बहीणी सवें लग्न लावी सबोधा ॥ ११ ॥
असे भाव संगें बहीणी विवाहो ॥ अनाचार मोठा अविंदीच ही हो ॥
अशा भ्रष्ट योगें तया ऊभयांसी ॥ पुढें पुत्र झाले अविचारवासी ॥ १२ ॥
पहीला असे लोभ हा थोरला हो ॥ मदा वास दूजा तिजा काम तो हो ॥
असे धांकुटा क्रोध हा कूसदूना ॥ सदां तामसी दुःख तें मूळ माना ॥ १३ ॥
अशा या रितीनें स्थूळा मांजि साचें ॥ कुटुंबी मना नांदसी भ्रांति नीचे ॥
कदां वीट नाहीं तुला या घराचा ॥ नसे शाश्वतीं जीर्ण तें वास साचा ॥१४॥
मना नष्ट हें स्पष्ट जाणूनि सोडी ॥ रघूनाथकाला अर्जी हात जोडी ॥
तुला देइ तो दूसऱ्या रे घराला ॥ निराभासठायीं करी ऐक्यतेला ॥ १५ ॥
तदां सूख वाटे मना देव भेटे ॥ तुटे कार हा संसृती अंगि मीटे ॥
बरा बोध हा मानसा मांजि घेई ॥ नको मानूं तूं या तनूची बढाई ॥ १६ ॥

नसे शाश्वती सार कांहींच सिद्धी ॥ उगे रे उगें सर्व ही नष्ट बुद्धी ॥
हटानें तटानें मठा बांधुनीयां ॥ पटा रंगवीलें जटा जूट काया ॥ १७ ॥
महंती भरानें बरा नांदतोसी ॥ अभीमान योगें बरा ताठ होसीं ॥
कशी नाहिंरे लाज ती तूज अंगीं ॥ फजीती फुकां कां उगीं देह भागीं ॥१८॥
बरा पोट धंदा सुखानें करी तूं ॥ उगां सोंग कां रे फुकां पाहि बा तूं ॥
कशाची असे सिद्धि ती तूज लागीं ॥ जनाला भुली घालसी रे अभागी ॥१९॥
जरीं पिंड ज्ञानी बरा जाहलासी ॥ तथापी मना नाहिं तें सूख तूसी ॥
अभीमान हा नावचे ज्ञान योगें ॥ दुणावे खरा रे खरा फीर मागें ॥ २० ॥
नसे तत्व शोधीं नसे आत्म बोधीं ॥ अभीमान हा सांचला सर्व बोधीं ॥
जसा देह झाला तया काळ गांठी ॥ तसें ज्ञान तेथें अभीमान पोटीं ॥ २१ ॥
असें ज्ञानि मीं वाटतें ज्यासि पाहीं ॥ तयाचें दिठीं दूसरा हीण पाहीं ॥
असे दृष्टीनें काळ गेला रिकामा ॥ चुकेना चिपाहे कदां येमधामा ॥ २२ ॥
वदावें बरें ज्ञान तें याजलागीं ॥ समाधानी बाणे जयाचेनि भागीं ॥
जया ज्ञानयोगें भुता सर्व भागीं ॥ घडे साम्यता ऐक्यरूपें स्वभागीं ॥ २३ ॥
अनूमान खुंटे तुटे वाद सारा ॥ तया हो दिनीं त्या गमे हो निवारा ॥
पुढें शांति साचे क्षमा आंगें जोडे ॥ सुखाचे ळळे कावळे बाळ चाडे ॥ २४ ॥
दया सर्व भूतीं गया हाच तथ ॥ भया हारविल पयाणीच पंथें ॥
अनूहात खोली बरी देखियेली ॥ मनानें तदां गाढहीठीस केली ॥ २५ ॥
तदां स्तब्ध झाले तनूतींत बोले ॥ मना आमनी देशभागीं निवाले ॥
वरी तोषली आदिमाता भवानी ॥ गरू लिंग कांति कुमारी वयानी ॥ २६ ॥
खुली केली दृष्टी प्रकाशी उजेडा ॥ तमाचा तदां मोडला भ्रांतिवाडा ॥
रजाचा घडा तो तळां फूटलासे ॥ प्रकाशानियोगें तदां सर्व दीसे ॥ २७ ॥
सबोधामृताचा घडा तेथ स्थापी ॥ जुन्याचा नवा वानवा हा प्रतापी ॥
झडे नोबती तो अनूहात बाजा ॥ निराभास हा ज्या सरे त्यास साजा ॥ २८
असी संपती पावल्या सौख्य वाटे ॥ तदां मूस भागीं सखा राम जोडे ॥
परेचा परां देखु ये ऐक्यतेनें ॥ परे ठायिं ये भावनें ऐक्यतेनें ॥ २९ ॥
तदां चित्त चैतन्य ऐक्यान्वयानें ॥ सबोधें स्फुरे कक्ष ना दृश्यमानें ॥
भ्रमाचें धुकें तेजयोगें निमालें ॥ गुरूकीरणीं नेत्ररे चेतळेलें ॥ ३० ॥

अशी संपती तीच सायुज्य मुक्ती ॥ परी भाविकांचे कुशीचीच भक्ती ॥
निजाच्या रुपानें हरी ऐक्य केला ॥ स्थुळांतूनी गेला निराभासिं ठेला ॥ ३१ ॥
अशा रीतिनें लाज जेथें असे हो ॥ विदेहीच मुक्ती तया कागीं फावो ॥
असे सर्व धात्री रजांशेंच ज्ञानी ॥ स्थुळीं जाग्रती भासवी गूणमानीं ॥ ३२ ॥
पशूपक्षि ज्ञानी असे कीड मुंगी ॥ सदा स्थूळ भोगीं असे स्वार्थसुगी ॥
गुणाच्यानि योगें असे हार निद्रा ॥ तमाची हिची जाग्रती माजि मुद्रा ॥३३॥
पुढें काम ऊठे रजो भावनेनें ॥ विजाची कळा जाग्रती दृश्य मानें ॥
असे लिंगदेहीं अभीमान कंदू ॥ भवा वास रे नाश हाची सुगंधू ॥ ३४ ॥
असे ज्ञान हें सर्व भूतीं भरोनी ॥ बरें आभरें सर्व भूतीं समानी ॥
कळा जाग्रती द्वादशीं शोभताहे ॥ तशी षोडशी चेयवींग्यासभोहें ॥ ३५ ॥
प्रभातें नभीं हो भवीं कोंदलीसे ॥ दिसे नास्तिकीं दीठि कागींच पीसें ॥
घडा मोडि साऱ्या असे भ्रांति भागीं ॥ तमाची भुमी चेतली गूणभागीं ॥३६
तनू थोरली मानवी येथ आहे ॥ अघोरीपणा व्हावया सत्य पाहे ॥
परी कोंगि नाहीं वगी आपणातें ॥ फुका नासती भ्रांतिनें दृश्यमत्तें ॥ ३७ ॥
सदासाउदारा दया सागरा रे ॥ करा आजि थारा पदीं या दिना रे ॥
मला जोडि हेची तुझे पाय रामा ॥ असे भाव शेतीं निजाचेनि कामा ॥ ३८ ॥
गळों काम ताठा अभीमान तूटो ॥ जळो मोह धंदा अगा क्रोध वीटो ॥
मना शांति देई वरी बोध सासा ॥ तुटो भ्रांति पाशा अगा ईशईशा ॥ ३९ ॥
दिनाची दया केशवा येऊं तूतें ॥ असे मागणें पूरवी हेत मातें ॥
कधीं दुष्ट गांवीं नको वास राखूं ॥ असो संत भेटी भ्रिती प्रेम चोखूं ॥ ४० ॥
अनंता मवाळा गुणातीत योगा ॥ अनंतासि पाजा सबोधानुयोगा ॥
निराभासिं ठावो करी गा सनाथा ॥ असो गोडि गीता तुझी हेचि गाथा॥४१॥

## ४ मनोबोध

( वसंततिलका. )

कां तूं मना वणवणा चहुं मार्गिं होसीं ॥ भ्रांति मधें भरुनियां बहु दुःख घेसीं ॥
दृश्यामधिं गुतुनियां फसलासि साचें ॥ पाहे तुंची तुज भजीं तुज आस कैचे ॥१॥

माऊ तुझे परि तुला दुरि टाकिती ते ॥ नाहीं जरी घन करीं मग कोण नातें ॥
मागें जरी जवळि तें मग सर्व गोतें ॥ नाहीं तरी उलट तें पुनरेव लातें ॥ २ ॥

कांता लवे बहु घरीं करि सपती ते ॥ बोले बहु रसिकता मनमोहनातें ॥
हांसेरुसे घडि घडीं तुज लावयाचे ॥ पाहे तुंचो तुज अशीं तुज आस कैचे ॥३॥
वाडे घरें सकळहीं म्हणसील माझें ॥ माझें म्हणें इतुकियांतचि मृत्यु माजे ॥
अंतीं न येति तुजला स्थुळ नास साचें ॥ पाहे० ॥ ४ ॥
कां तूं उगां तनुवरी भित वागवीसी ॥ माझा म्हणोनि रमतां श्रमि फार होसी ॥
नाहींच चीरजिव तीं स्थुळ नासण्याचें ॥ पाहे० ॥ ५ ॥
कर्मं करित बससी जरिं मुक्तिकाजा ॥ बाजार हा समज तूं भिपर्गेच साजा ॥
मणोन्त मुक्ति सकळां तुज नाच वाचें ॥ पाहे०॥ ६ ॥
साक्षी नसे अजवरी दिकि येथ कोणीं ॥ येवोनियां पुनरपी पितरें हि कोणीं ॥
शास्त्रांतरें बहु तुरी बहुवीध वाचे ॥ पाहे० ॥ ७ ॥
दानें करोनि तनु ही जरि शुद्ध होते ॥ मानूं खरें परि सुदान न होत हातें ॥
कर्तेपणा घरुनियां रुपवे ययाचें ॥ पाहे० ॥ ८ ॥
सर्वांभुतीं नच घडे समत्रोग दृष्टी ॥ कैचीं, फळें तंववरी भ्रममेवसृष्टी ॥
नाहींच शांति सुख तें गुरुवीण वाचे ॥ पाहे० ॥ ९ ॥
घोडे गडी चवघडे करणं नगारे ॥ ऋतीभरें दिसत हें सकळीक वारें ॥
गावें हरी दिननिशीं ननु काम साचें ॥ पाहे० ॥ १० ॥
गोविंदनाम वदतां वदतां पुढा रे ॥ वाचें करो अमनता मन तेंचि वीरे ॥
नाहींच आठव स्थुळीं मग वास वाचे ॥ पाहे० ॥ ११ ॥
भूली भ्रमाचि निमग्रास उपाव हाची ॥ साचो मना समज तूं रघु आण साची ॥
नामाविणें नचडुजें कळिमाजिं साचें ॥ पाहे० ॥ १२ ॥
कर्मांतरें जसजशीं मति त्याचरूनें ॥ कर्में करीं अभिमतो फळ देत मार्गे ॥
होणार तें चुकवितां नच कोण साचें ॥ पाहे० ॥ १३ ॥
मायाच ही हरिजिची गुणरंग वाणी ॥ वीजोद हा करितसे पद चारि खाणी ॥
उद्भीज अंडजरजें मित स्वेद ज्याचें ॥ पाहे० ॥ १४ ॥
आहे मती नरकुडी गाडि जोडि ईशा ॥ फुका नको दवडुं तूं धरुनीच आशा ॥
मोहामधीं घुसमुसी भय त्या यमाचें ॥ पाहे० ॥ १५ ॥

सूखास ठाव रघुराव स्वभाव दावी ।। भावास भास नव ठाव भवांत दावी ॥
थुक्तींत युक्ति निजभक्ती सदोक्ति वाचे ॥ पाहे० ॥ १६ ॥
साधूस शोध सद्बोध अमोघ साधी ॥ साधींच आधिं गति रोध मतिस
बोधी ॥ काळांत काळ सुसकाळ प्रबोध वाचे ॥ पाहे० ॥ १७ ॥
मूखांत राम निजधाम समान भावे ।। गावें सदां गुण गिर्तीं अनुभाव भावें ॥
खग्रास भास भववास प्रितिमान नाचे ॥ पाहे० ॥ १८ ॥
मोहांत व्हात भवजात जनांत सारा ॥ भ्रांति तमांत भजनास धनास सारा ॥
कारस वार जनि नार मनास रूचे ॥ पाहे० ॥ १९ ॥
ईशास इष्ट करणें रमणें मनानें ॥ ध्यानांत हेत निजचेत क्षुधीत मानें ॥
आदी अनादि निरमोह, सओघ नाचे ॥ पाहे० ॥ २० ॥
गोविंद माधव अधोक्षज वासुदेवा ॥ गोपाळ बाळ वनव्याळ जमाव गावा ॥
वेणूधरावरि जरा जरि भावसाचे ॥ पाहे० ॥ २१ ॥
गोपींत पीत दधि जो हरि धीरधारी ॥ चारीत चोर गडि पोर परोघ पारी ॥
गोकूळ कूळ सकळीक मनांत ज्याचें ॥ पाहे० ॥ २२ ॥
घेई मना भरुनियां भननांत हेची ॥ तारिल तारक तमारि नभांत हाची ॥
ध्यानीं अनंत सदपंथ पदांत नाचे ॥ पाहे० ॥ २३ ॥

---

## ५ करुणा लहरी

### ( मालिनी. )

दिन जन दुबळ्यांच्या पाळका रामराया ॥
झडकरि मज लागीं भेटुनी तोडि माया ॥
षडरिपु पुर टाळी देशधाडी करावी ॥
सिपण मति मनाची सर्व ही आवरावी ॥ १ ॥

तुज विण जगदीशा कोण नाहीं मला रे ॥
तळमळ वहु वाटे थार देई पदीं रे ॥
भजन पुजन नेमें नेणता तूंचि कोला ॥
भ्रमत भ्रमत सारा व्यर्थ रे काळ गेला ॥ २ ॥

तुज विण गुणधामा नावडे आणि कांहीं ॥
मम हृदय निवासा कारणीं तूंच होईं ॥
शिणत भवपुरीं मी जाणसी सर्व हेवा ॥
सदयपण मती तें दातया आजि ठेवा ॥ ३ ॥

नच काशी तुज लागीं ती दया दीन भावीं ॥
सकळ हि सरलीसे वाटते आत्मभावीं ॥
निज जन हित काजीं पेरिली पेरणी रे ॥
मज वरि दिठि नाहीं कोण कामें हरी रे ॥ ४ ॥

स्वपिलीं जतन व्हाया कासवी दृष्टि पाहे ॥
दुरुनि च प्रतिपाळी या भवीं साक्षि आहे ॥
तव रिति निज दासा ठायिं बा याच भावें ॥
अवगत इतिहासीं गीत लेखानुभावें ॥ ५ ॥

नरहरि नरपाळा सांवळ्या सार्वभौमा ॥
सदय हृदय प्रेमा सागरा नीजधामा ॥
जगनग स्वरुपा तूं साक्षि रूपा परेशा ॥
मज वरि करुणा गा राहुं दे गोप वेषा ॥ ६ ॥

सदय हृदय व्हावें प्रेम कूसीं भरावा ॥
द्विविध मतिस नासी ऐक्यभावें जनावा ॥
रस भरी रसनेला कीर्ति तूझी वदाया ॥
सुजन सहज वासा ठाव दे रामराया ॥ ७ ॥

हरिजन गुण गाते तेथ नातें असों दे ॥
अभिमति मतिलागीं ऊफेंखातें नसूं दे ॥
कलिमळ समुदावो देह भावो नसावा
मन मिन जळपादीं सत्पदीं ठाव व्हावा ॥ ८ ॥

जननिति परिवारा पासुनी रामराया ॥
दुर करि मन गेहा प्रेम दे कीर्ति गाया ॥
निज हितप्रिति ठेवी सार ठेवा गमावा ॥
हरि अरि मद मोहा कामचित्तीं नसावा ॥ ९ ॥

नच मजहित मार्गी मानसीं आळसा तें ॥
किमपि धरुं दयाळा भाव दे ऐक्य मातें ॥
जड तनु हित हेंची मानवी साजि आहे ॥
सुख सदगद प्रेमा कीर्तनीं होत आहे ॥ १० ॥

मन अमन करावें आप आणी परावें ॥
किमपिहि नच यावें मानसाला स्वभावें ॥
जगतिंत तुज कार्गी साम्य योगें मनानें ॥
भरवि मम मुखीं हें आपुलीया करानें ॥ ११ ॥

रज तम गुण गाळी पाजळी ज्ञान दीपा ॥
दृढपण मन व्हाया साक्षि गा तूंचि बापा ॥
धन सुत घर सारे पाय तूझे कृपाळा ॥
तुज रितिं कर वाटे तें करी गा मवाळा ॥ १२ ॥

तव दिठि मम मार्गी जेधवां प्राप्त होई ॥
मग सहजजि स्वसूखा भाव हा ठाव होई ॥
उगम सुगम हाची साधकांसीच ठेवा ॥
गमत मज जि देवा योग हा प्रेम भावा ॥ १३ ॥

तुजविण गुणधामा कोण तारी मला रे ॥
जड तनु करुणा ही तूझिया मार्गि कां रे ॥
सदय घन पणातें दाखवी या दिनाला ॥
किति तरि बघसी हा आजि रे अंत झाला ॥ १४ ॥

तव पद महिमा गा दातया कोण वाणी ॥
अगणित पण ओघा सागरा कोण गूणी ॥
सकळ मति अनंती नीत तूझी असों दे ॥
इहपर सम भावो द्वैत भावो नसूं दे ॥ १५ ॥

## ६ करुणापर.

( कामदा. )

नित्य दे हरी नाम आननीं ॥ काम वारुनी गूणयामिनी ॥
मानसीं वसे रामचंद्रजी ॥ दीनबंधु जी सौख्यसिंधुजी ॥ १ ॥
ज्ञान ध्यान मी कांहिं नेणता ॥ सूख वाटतें नाम वाणितां ॥
आपुली हरी, स्वात्मभावना ॥ नीज पावलों वाढवा मना ॥ २ ॥
मागणें नसे सांगणें कशा ॥ भेदची तुटे जाणवी निशा ॥
गातसें गितीं स्वात्मया तुतें ॥ मीपणाविणें भावना विते ॥ ३ ॥
पक्ष सोडुनी लक्ष जोडिला ॥ आगमोक्तिचा पांग फेडिला ॥
नीगमागमें भाव वाढला ॥ भेद गीळुनी खेद वारिला ॥ ४ ॥
अच्युतासनीं नित्य वासना ॥ वास लाभली लीनता मना ॥
सर्व कामना पर्व संपलें ॥ स्वात्मयागमें नीज संचलें ॥ ५ ॥
कोण ना दुजा माधवा तुजा ॥ तूंचि सर्वही कांत नीधिजा ॥
भक्त देव तूं बाप लेक तूं ॥ भ्रात मात तूं दार गोत तूं ॥ ६ ॥
नित्य तूं हरी विग्रही तनू ॥ संगमीं अनित्यान्वयी मनू ॥
गूणभावने पूर मातला ॥ भेद हा जना खेद दे भला ॥ ७ ॥
वेद संगमी जंगमावधी ॥ भेद मातला स्वेद कंपधी ॥
काळ मानुनी आपणा वधी ॥ देह मी म्हणे काळ हे नदी ॥ ८ ॥

---

## ७ बोधपर.

( भुजंगप्रयात. )

कशाला भिशाला मसाला तुलारे ॥ नगारे मशाला बहूवीध तूरे ॥
निशाहे मदाची शिरीं फार वाजे ॥ अहंतामुळें काळ बाधाचि साजे॥१॥
नये कांहिं संगा भवामाजि दंगा ॥ कसा आवडे खेळ हा नास्तिकांगा ॥
रुचेना करी शाश्वताची गती रे ॥ अरे तूं भजे जानकीचा पती रे ॥२॥
अगा मानवा ना असा जन्म आगी ॥ सुरादीक ऐसी सदा वाणि वाणी ॥
वढे स्वात्मप्राप्ती हरीकीर्तनानें ॥ तुटे बद्धता नाम गा आननानें ॥ ३ ॥

मावें प्रभावें समता हरीची ॥ भक्ती असे ही निज जोडणीची ॥
वार्ता स्वभावें मिळवीत जावी ॥ दूजेपणाची मति ना उरावी ॥ ४ ॥
अंगेचि व्हावें उभयावसानें ॥ जीणोनि दोनी प्रगटेल माने ॥
तो स्वात्मभावो समदर्शनाचा ॥ गायी अनंतोद्भव मानसाचा ॥ ५ ॥
मी तूं पणाचा मिटला विनोदू ॥ गोविंद ध्यासें समता प्रबोधू ॥
गेली अहंता कशिते कळावी ॥ तो पक्ष कोणा कृतिचा न दावी ॥६॥
वागे जगाचे मधिं लोकरीतीं ॥ भासे परी ना प्रतिपादनातीं ॥
ना आग्रहो ज्या कवणेक ठायीं ॥ पावे न लाभे निचता कदांही ॥ ७ ॥

## ८ रामकृष्णभक्तिसुधा.

### ( उमा. )

प्रारंभ या भवसागरिं जो गुणनायक वा गणनाथ सखा ॥
गाउं मना सुखदायक जाणुनि पाय धरूं परब्रह्म सुखा ॥
टाळुनियां खळ बाळकसा मम भाव वसों पदिं बोधचि हा ॥
साधुनि जाइन साचचि वाटत आज मि रामपदासि पहा ॥ १ ॥
सोंड जया सरळाकृति हो उदरावरि लोळत मोदक त्या ॥
माजि विराजित नाग गळा मणि मौक्तिक शोभत हारचि त्या ॥
चार भुजा मंडितान्वय पाश शरांकुश वाटत तो बरवा ॥
मानुनियां मग भाव बळा सम पालियला मनि टाकुं भवा ॥ २ ॥
ओळट मानसिं घोळलिया मनिं सांभचि हा बरवा समजा ॥
तारक जो त्रिजगासि उमाधव वाणुं कसा गितवासरजा ॥
वामअंकावरि वारिजनेत्रि जि पात्र चराचरि तारक हो ॥
माचि मला मनिं भासत साचचि नाशक मोह नरा मन हो ॥ ३ ॥
नाम तुझा सुखकारक होईल तारिल हा भव सत्य मना ॥
पाय धरा निज कारण जाणुनि राखिल तो गुरु भावि जना ॥
अर्थचि हा सत् भात जयाचि रमाधव आस समान भजा ॥
वाळुनियां कलि मोकळि मोहुनि सारचि हा धणि मानि रिजा ॥ ४ ॥
राम जि धाम मला तुमि घालचि हा भर मानित सत्यपुरा ॥
वास्तव भावचि जाणु निराळस वाणु सज्ञान रे पाय धरा ॥

ठावचि आणिक सार न या परपार रमावर तारिल जा ॥
नम्र जना मधिं ऱ्हांच वळासम नेगम मानसिं बोलित जा ॥ ५ ॥
पाहुनियां मनिं सारविचार नको करुं भार जरा पळवा ॥
बाळक तो सद् सुतचि माधव यादव मानसिं ध्या बरवा ॥
रामचि हें निजधाम जनामधिं काम परांग नरासभरी ॥
सूखचि होईल जाउनि मोह जमा धरि ईश वरा कमरीं ॥ ६ ॥
कांत सिता मनिं आणुनियां बरि सोय धरीं नर तोचि बरा ॥
पूर्ण सुधाचि हि मानुनि गायिंच जानकिचा नवरा ग बरा ॥
ढोंग नकोच करूं मळ मायिक ताल मद माळ गळा अवला ॥
टाळचि आधिं परांग समाज रमाळ फसाळ म्हणा व्रजला ॥ ७ ॥
धार्डहि टोळचि जाणुनि बोलिलि वाणि क्षमा मजलागिं करा ॥
माफि करा मज बोबडि बोलि हि बोलिलि सोलिव बोध वरा ॥
कामवळा अबळा समजा धन त्यावरि मोह वरा बसला ॥
फांशचि हा वरता ममता मम मानसिं वाटत थोर मला ॥ ८ ॥
गोपि पयोधर गोधन पाळय गोप किशोर मला गसला ॥
आजचि काननिं कामिनि लागुनि भासत खासचि हा रमला ॥
जाणुनियां मग मार्गचि काढित काननिं जाउनि शोधियला ॥
ध्यासचि मानसिं बाळपणामधिं बोधित शोधनिं शोधियला ॥ ९ ॥
काळचि हा सुखकारक जाणुनि मारक मोह मनास निका ॥
खोडहि याचि न गोड निजासनिं फांशचि काम समान सुखा ॥
सार नसो निज जाल भवामधिं ताल न कांहीं मनास पुसा ॥
व्यर्थ कळा मज भासत दुर्मति खासचि नासिक नामि कसा ॥ १० ॥
वाटचि मोकळि रोख मनामधिं शोक कशास्तव मानितसा ॥
साधुसमागमें बोध धरा मनिं गाच रमावरया नवसा ॥
फांश मनांतिल आश न बाळगि सावध होईच चाळ कसा ॥
कोंवळि काळि ति बावळियावरि सावळि वानिच श्यामकसा ॥ ११
पाळियला मनिं हाचि अनामिक मार्गचि जो अरि नाशकसा ॥
काय मला मग जोग कशास्तव भोगचि भोगिन आर्यवसा ॥

७८८९ दि: १।१९४ ... ३१-३५

कर्मचि मागिल आदिल जन्मिचे भोग भला मनिं वाटत हा ॥
तर्क कशास्तव नर्क जगांतिल सोडिन हाचि हिशोब अहा ॥ १२
भ्रांतिच सारिहि मानु मनामाधिं कां मज नासचि अर्पु पुरा ॥
गाउनि रामचि धाम हें साधुं खरा परमार्थचि सर्कु धरा ॥
नांव नको कुळ गोत्र नको मठ धामहि काम न लागत या ॥
पाहिन आधिच शोधुनि मानसिं रोधक तो रत्रु मानुं तया ॥ १३
कामचि हें न मला सुखकारक धामिं निजात्म रसा वळवा ॥
पार करा मद मोह मनांतिल राम धरा समभाव नवा ॥
तारक हा सुखदायक जाणुनि वाद नको तुज राहि जरा ॥
मार्ग भला मज वाटत हा नव रात्र करा भव पार तरा ॥ १४
मूळचि हें जग तारक मानुनि जारणमारण सोडुनि द्या ॥
कर्म करा सम भाव भुतांवरि शांति वरा जग जोडुनि घ्या ॥
आत्मचि मानुनि कांत जसा मनिं शांत ति कामिनि भावितसा ॥
श्यामचि तो मनिंगाउनि सोकाळि हांकालि हा कालि धांव कसा ॥ १५
सांवळि गोमटि माळ गळ्या माधिं कौस्तुभ तो मणि आहे निका ॥
मूर्तिहि शोभत डोळस कानानिं पाळि मनामाधिं सत्य सुखा ॥
वाजवि जो निजभाव रवासम नांव जिचें समजा मुरली ॥
मानसिं साचचि वाटत आज हि भावबळावर हो विरली ॥ १६
सौंगडि गोप किशोर तयामधिं चोर निजासनिं वाणुं मना ॥
पोरपणामधिं गौळणिचा धणि बोधक आत्मसमाधिपणा ॥
दुर्मतिनाशक मूर्तिप्रकाशक सज्जन मानस ऐक्यपणा ॥
काय वदूं सकुमारपणा घननीळ कृपालस साक्षिगुणा ॥ १७
कोणि नसे सुखदायक नायक पावनकारक नीजपणा ॥
श्रीगुरु भाविक शांत सदां मनिं द्वैतविवर्जित ऐक्यपणा ॥
त्रैगुणनाशक कर्मविमोचक इंद्रियबोधक शोधपणा ॥
जाणुनि या रितिभाव धरा प्रिति देईल तो गति ईश उणा ॥ १८
ढोंग नको करूं सोंग नको धरूं पोरपणा विसरा समजा ॥
अर्थ नसे दुसरा समभावविणा मनुजा काळि मार्जि बुजा ॥

गाउनि आवडिं आवबळेंचि तूं साधुनि घेई जि आत्मखुणा ॥
फारचि काय वदूं नरनायक तोचि सदोदित राम म्हणा ॥ १९
भानुकुळांतचि मूळ जया असे ठाव पुसा तुमिं त्यांसचि हा ॥
वांचुनि सार्थक कारक नाहिंच या भुवनांत दुजाचि पहा ॥
कोण तुला परमार्थगतीसचि दाविल माइक बोल अहा ॥
नाथचि हा एक भूतदयापर वागुनि सामचि मानसिं न्हा ॥ २०
पक्षि जसा उडतो गगनांतुनि ईप्सित मार्गचि वेग करी ॥
त्याचरितीं मनिं वेग करा सदभाव धरा मनिं ध्याचि हरी ॥
ज्ञान नको अभिमानचि तो दुर टांकुनि बुद्धिस बोध धरी ॥
साधिं तुं काम जिवा वनवास नको करुं घोकित जाचि हरी ॥ २१ ॥
दाशरथे शरयूतिरवासनि कोदंडपाणि दयानिधि तूं गा ॥
साचचि वाटत दीन दयानिधि घालिसि पोटिं दुःखा भवभंगा ॥
भाविक जे मनिं ऐक्यमती नचि पाळित साक्षपि पार तराया ॥
तीच गती मज आवडती बहु वास्तव गांठित भाव भराया ॥ २२ ॥
पाय तुझे सुखकारक जाणुनि मानसिं ध्यात मिं आत्मसुखाला ॥
साधियल्या मग नाहिं उणें मज थोरचि लाभ जगांतर झाला ॥
काय वदूं ममभागिं समान हि बुद्धिच नाकळिता तनु याला ॥
कोण गती भगवान तुं लाविसि सत्य मला कळवा निजमाला ॥ २३ ॥
बांद दयानिधि पाहि दिनाकडे हीन मि गा मतिचा पुरता ॥
राखिसि लाज तरीं मग काय उणें हरि सांग मला पतिता ॥
साधन साधिन सावध मानसिं होउनि साधुसमागम तो ॥
भाविक जो मतिचा पुरता समची अरिमित्र जया नमुं तो ॥ २४ ॥
पंढरिनाथ सनाथ अनाथजनाप्रति पाळिक साचचि हा ॥
लक्षचि लावुनि पक्ष धरी मळ नाश करी सम ठावच हा ॥
भावबळें थिर राखुनि फांश कसा तरि मोकळि बुद्धि नरा ॥
नाहिं पुन्हां वरचे वर मानवि गा तनु जाणुनि बोधधरा ॥ २५ ॥
तो शिव रामसखा समभावबळें रत नाम धरूनिचहो ॥
घोर नसे शिरी जोर मि गा धरि तारक हा मजलागिंच हो ॥

ठाव मनीं गमतो निगमान्वय दाविल साचचि राम मला ॥
काम नको मति क्रोध नको उरिं ताठपणा हरि भोंदि मला ॥ २६ ॥
सर्व जगामधिं गर्वरुपी मन पर्वचिदूर सराम भजा ॥
कामरतासचि मोह बहूधन मान करी उरें सोडुनि जा ॥
थार नसे गम कार तुला बहु मारचि मारिती यास्तव हा ॥
दीनयती नमि पार करा यम जाव हरी पुरिं तारक हा ॥ २७ ॥
सोड मना जन खोडि नको बुरि गोडचि तें कडु जाण तसा ॥
आपुलिया अंगिं खूजलि झालि ति गोडचि खाजवि तामससा ॥
दुःखपुढें बहु होतचि आग ति जाणुनि मानसिं सावध व्हा ॥
जोड न मोडचि ही ममता शिरिं काम रिती रिपुला वध हा ॥ २८ ॥
एक मि हें पद मारक आत्मसुखा समजा मनिं शोध धरा ॥
घोरचि संस्कृति मानुनिया मति तारक तो यतिराज स्मरा ॥
गाथि दत्तात्रय पार करील भवांतुनि सत्यचि हो समजा ॥
भाविच ध्यान धराल तरीं मग कारचि या रितिंमाजिं मजा ॥ २९ ॥
जो जग बोलिच सोसुनि ज्ञानमदास फुगेचि रे न हिं मना ॥
आत्मचराचर दृष्टीस लक्षित पाहुनि बोध करीत जना ॥
मंत्रचि तो निज साधक जाणुनि साधुनि घेइंच आजिं कसा ॥
का करितां उमजा लटिकया सुख दीसत नाहिं जिं तेथ नसा ॥३०॥
साधु जगामधिं फार कळोंतचि कार दुणा सुख नाहींच ज्या ॥
मोह मनामधिं क्रोध जनावीर लोक जटा शिरिं थोर मजा ॥
ध्यान नसेंचिच ज्ञान मनामधिं कामिक कामिनिचा चळला ॥
काय दशा इश यांचि करील ति सांपडला यम हातिं गळा ॥३१ ॥
आळशि मानसि तामसि जो नर घोरचि थोर तया जडला ॥
बोलिति छेदक घावचि घालित फोडित छातितही वडिला ॥
काय असा सुत होउनि तारिल माय ब्हि मावसि ज्या न कुळें ॥
पापचि होइल मारक हा नर बूडवि आपुलि सप्तकुळें ॥ ३२ ॥
सावध मानसिं पाप भितीसचि भीत असे मति तोचि खरा ॥
तारुनियां कुळ आपणही तरतो सुख दे वडिलांसि बरा ॥

मा बहिणी घर बापहि यावर प्रीत करी बहु मोहन हा ॥
वाटतसे मति गायिन त्या प्रति देईल तो गति सेव्य पहा ॥ २३ ॥
बोधनिं रोधित शोधनिं मानस आस नसे दुजि ज्यासचि रे ॥
सावध साधक साधु भला मज वाटत सूखचि दायक रे ॥
सर्व भुती समभाव तयासचि देवहि तेथचि नित्य वसे ॥
पाय धरूं खळ नाशक तो मति देईलहो गति भासतसे ॥ २४ ॥
राम सखा शिवराम सिता प्रिय राम गुरू भज लागिंच हो ॥
तारकभाविक मारक रीपुस वारक शोकचि सारिल हो ॥
दाशरथे तुज गायिन आवडिं ने मज पैल थडी वरता ॥
दुःखमनांतील दूर करावें हें मोह दुजा मदती ममता ॥ २५ ॥
फार गुरू जगिं ढोंगिच ते नर बोलति बोलहि आत्मचि रे ॥
चालति ऊलट गूणत्रयाचरि भासति मायिक हेंचि खरें ॥
पाठक नाटकि चाळक वीषयिं माळ गळयामधिं जाळचि रे ॥
पाळियला मनिं काम रिपू तरि सार्थकिं कांचनसेच उरे ॥ २६ ॥
देतिल मंत्रचि घेतिल तेजन जातिल कोठवरी हें नकळे ॥
कारण येथिल जागत नाहिंच मायिक मायेंत हाचि गळे ॥
मी गुरु हें पद मारक जाणिल त्यासचि सत्यपणीं, जिरलें ॥
वाटळ हें जगिं देखणियामधिं लोक रितींत न हो विरलें ॥ २७ ॥
आधिं मना तुज लाजचि नाहिं हि सत्यपणीं मज वाटतसे ॥
नाचसि तूं किति संसृतिचेमधिं, सांग मला अजि काय पिसें ॥
कोण तुला धणि या जगतामधिं, सत्यपणीं मज भासत हें ॥
रामचि तारिल हा तुज लौकरि जाणुनि मी तरि सांगत हें ॥ २८
सत्य मना रघुनायक भेटति मानसिं खासचि यामधिं हो ॥
पार करा भवसागर नामक मोहचि हा तव आसक हो ॥
या विरहीत दुजा उपदेश नको परि बोधाचि साह्य असो
भाव धरा मति भक्ति करा पुरि जन्मचि हा तुज बाध नसो ॥ २९
हांसत हात मुखावरि ठेउनि जा परता मर खोडि नको ॥
काय तुला मते खोटिच लागलि वाट तुं सोड जि भरित चुको ॥

काराचि फार रे रोज तुझा हरि पोरपणा माधिं खुस्ति किती ॥
साखुस सांगुनि मोडिन खोडीहि आजचि वेळ न कोण मती ॥ ४० ॥
नष्टचि तूं मनिं कामिनि वाटसि दांडगि फूगरि नोक फुका ॥
काय ति सालु तुझी मज मारिल पाहुं कशी चल झोक नका ॥
पोर नसे परि थोरचि जोर मनीं अरिनाशक घोळतसे ॥
चोरहि नीजचि चोरितसे दिनिं भाविक मानसिं त्यास वसे ॥ ४१ ॥
येक दिनीं हरि कुंजवनामधिं खेळत हूंमरि गोपमुलीं ॥
गोरस घेउनि गोपनितंबिनि तेथचि पोंचलि भ्रांतिभुली ॥
पाहुनियां सग गोपिपयोधर रोखित नोक ति काय वदूं ॥
बोलत बोल ते काय वदूं मुखिं खोळचि मांजलि गोपवधू ॥ ४२
गोरस घागरि घेऊनियां शिरिं चालत कोण तूं मजसंगा ॥
दान गे आमुचें आधिच आणुनि द्या मजला गळि सोडु फुगा ॥
बाळसंगें बहु पाळक बोधचि चाळक नीज तें आत्मसुखाला ॥
नीगम गोरस गोपचि खातिल जाणुनि सावध याचिमुखाला ॥ ४३ ॥
ढंगाचि या जगिं बेढंग मानस संग नको मज रंगचि हो ॥
बोधकनीजचि घातकहोइल पातक हें मनमानित हो ॥
सूखचि तें दुख मानुनि हें जग मानसिं भावित दूःखित रे ॥
वाट हि नीटचि रामपदाचिच कामहि नाशक होडचि रे ॥ ४४ ॥
जा चल आजचि वेळ नको करूं साधुनि घे निज बोध बरा ॥
सोंगचि सोडुनि भावबळें मति सावळि ती गति शोध करा ॥
मायिकरूचिहि फांशचि घालिल ताळ नसे इसि सांगुं किती ॥
हातचि जोडुन सांगेन हो जन साचवि आज मि ऐक्यनिती ॥ ४५ ॥
पादचि हे सुखकारक जाणुनि पार करा मनिं काममदा ॥
श्यामळ कोमळ बोलत नीजचि खोलिंहि सोलिव सूख सदा ॥
शांति मनामधिं धीट जना मधिं भाविक मानस गोडचि हें ॥
थासचि फावेल पाहिल शोधक मायिक याजसि बा न्हव हे ॥ ४६ ॥
नेत्रचि मोहित छांदित फोडित सोडित बाणचि नीजरवें ॥
काय वदूं सुख नंदजियें मुक प्रेमळ कोमळ मी तुरवे ॥

पाळक जो जगचाळक मानासें माळ गळां कसि दीसतसे ॥
मीषद्दिमिस्किन डोळे गुंजेवरि सत्पाचि हा हरि पोर पिसें ॥ ४७ ॥
सुंदरसूराळि शोभत आधरिं सुस्वरता घरि नीजरवा ॥
राखित गायिच गोकुळ पाळक नीज तें बाळक सौख्य भवा ॥
हाटक हा पट पीतक तोंदिठिं देवुनियां मिठिं घालि मना ॥
पार तरा भव सारचि जाणुनि वाणि गितीं धरि आजि गुणा ॥ ४८ ॥
बासट ती मति राखुं नको मनिं धामानिं कामिनि पाहुं नको ॥
गाच तुंया हरि भाव बरा धरि रोष नको उरिं काळ झुको ॥
माळहि वाळि तुं एकपणा धरि बोलि हिगा वरिनिजहिता ॥
लाघव सावध आवधि नाहिंच बोल हे गोडच जाग गिता ॥ ४९ ॥
रुक्मिचा वर पक्षचि या धरि दिक्षित हा हरि आत्मसुखा ॥
पारचि तो जनि भाव बळें मनिं राखियला गुणिं रामसुखा ॥
वेळ असे बुरि हां कलि माजुरि वाटत खाजुरि गुंतु नको ॥
जाच कसा झट व्यर्थचि हा मठ नायिक कीगट प्रेम शिको ॥ ५० ॥
द्रिष्टि स्त्रियांचि हि ऐष्टिक जो मनिं कष्टचि पडुनि व्यर्थ मरे ॥
साधुसमागम आगमें पक्षिंच लक्षित राहेच चित्त विरे ॥
वित्तचि हें दिठिभूलचि गा घटिंथाटचि तो पटिं मायिक रे ॥
थोरपणा मनिं घोरनसे निट सत्यचि वा घट राभिंच रे ॥ ५१ ॥
पाजळि वाति हि ज्ञानअनूभव नाशिल हा भव संत मना ॥
रामचि घोळवि काम नको मनिं ठामचि हें करि शांति घना ॥
धीटचि तो निट भाव बळेंवरि सावचि आवरि या गतिला ॥
सूशिल जी मनिं पूजित ती करि सतकुळासह योग्य तिला ॥ ५२ ॥
ओर जसा निरमोह तयावरि मेवचि वा घरि चिंतित त्या ॥
काय मि वाणुं हें काणु मती हिंच जाणुनि ध्यातसे सत्यचि त्या ॥
रामचि हा घन मानस मोरचि जोर करो रुचि ध्यान धरा ॥
नाहिंच मागुति पंचभुती निति मानवि कायहि लाच तरा ॥ ५३ ॥
पोटभरी परि मोट नको करूं रामचि या घरं सत्य मना ॥
राखु नको चित्त त्या परकामिनि अंतर शोधानें शीघ्र मना ॥
भोगचि हा तुच्छ गोड बहू दिसे तोड करी हिच आत्मधना ॥ ५४ ॥

ही तरगी साते भावित मानसि भक्ति जशा कुशि वेष्टितही ॥
जो मनि घट्टिळ सोशिळ कष्टचि होईळ श्रेष्ठचि स्पष्टचि हो ॥
बोधनि रंगित रोजचि जो मनिं कामिनिधामिनि चित्त नसे ॥
त्याचचि यासिच सांपडे रामचि भावबळासचि साह्य असें ॥ ५५ ॥
गोरिच पोरिति जोरिहि फारचि माळति घालित नीजतुला ॥
थोरि नसे इसि बांकुळ ती मति पुष्कळ बोलत बोध निका ॥
गांठहि आजचि भावबळें मज मानसि येउनि खास बसे ॥
प्रेमळ हो किती वाणुं तिची गति ताळ चि माळ ति घालितसे ॥ ५६ ॥
वाजति पैंजण काईर हा झण मोहचि रोजण नाशक हे ॥
शब्दचि येथिल जो निज माखिळ होईळ आखिळ त्यासचि हें ॥
जोडचि जोडत्रि बोलति जे कवि सुश्रम हारवि शब्द निका ॥
मानित माशिच खासपणें मति शब्दचि तोनिति ठंठगका ॥ ५७ ॥
काय नथी निकि नासकि शोभत मोतें लि लोंबत ओंठ सुखा ॥
झीळमिळीं तिन मुक्तचि हे गुण पंचकडी खुण तत्त्वमुखा ॥
आधर हा वर नीज ति जीभळि आत्मसुखा भाळि झाळविते ॥
भक्ष जिचे पतियक्षगती मनिं लक्षचि लावुनि पाळविते ॥ ५८
वे रस हा मनें बोधचि लावुनि कामिनिचा मनिं दोष नसे ॥
ऐक्यचि होइळ लाजचि सोडिळ सोडिळ ओढिळ भोगवसें ॥
झाळिच भाळिंहि वाळि सुढाळिंच बोंळति मूळिंच नित्य असे ॥
सद्गुरुनाथचि दायक हा एक नाथचि हानंत मानितसे ॥ ५९
पार्वतिचा पति धावि मळा मातें उत्तम ती गति डोंगि नको ॥
पावन क.रक नाम तुझें हर मूरवि हा हर मोह झुको ॥
आस नको मज त्रासचि हा मिटि पूर्णचि दे दिठि बोधावरीं ॥
हे हर हे हर संसृतिला हर दीन नि गा नर भ्रांति तुरीं ॥ ६०
कोणि एके दिनिं कामिनि त्या मनें बोळति भामिनि नंदजिवे ॥
पोर तुझा िट चालत नाहिंच तूंहीहि साठेच काम निचे ॥
घाळि ग देतचि नष्ट तुझा हरि गोष्टि हि ना बरि वाटतसे ॥
बाटविलें कुळ मूळ तुझा मुळ रासिवरी बळ अन्न असे ॥ ६१ ॥

संसृती नाशक पोर कसा तरि घोरचि तो उरि लावितसे ॥
पोरपिसें नचि चोर निजासनिं बोल ते नीगमिं बोध मिषें ॥
सासुरवासिनि घांसुचि हो मनिं ह्यातचि यावरि जोर फिका ॥
दादुले मस्तकिं वासर धारव लीजचि ते रव आत्मसुखा ॥ ६२ ॥
आणिक दूसरि आळि जि हो मनिं नाम तिला जनिं कासि असे ॥
पूनित दोष ति सून निजासनिं जाणति ते बुध वाणुं कसें ॥
बोल तिचे जन कानिंच धारण कारण यांतचि फार असे ॥
सार नसे नवनीत ति हा रस सारचि वीधि ति भक्ति असे ॥ ६३
मागत हा मज आजचि साजणि मारिणि रांजणिं काय असे ॥
घाय बसे उरिं साथिचकाढुन आनंदें भूवन घांसतसे ॥
नासित आंगण उँङ्दति तें गुण जिंस्किनता घण नासितसे ॥
बुध्दि ति काढुन विवेक हालचि नाचत गातचि वाणुं कसें ॥ ६४ ॥
फूलि ग काढित मूतत त्याणिंच तोंडहि पूसत आनंद फंदा ॥
वारिज नेत्रचि वारितसे मति सांगुं तरीं किति तोचि ग धंदा ॥
धूळ करांमधिं घेऊनि झोंकित माजिच रोखित वाटग आई ॥
गोविंद सुंदर श्याम मनोहर मारक मोहचि हाचि अंताई ॥ ६५ ॥
प्रीतिच यावरि फार तुझी गे मारचि ऊगले कां मज लागीं ॥
ढोंगचि मूळचें सोंग जनामधिं मात्रचि अंबुधि व्हा समभागीं ॥
जाउचि तो बस आम्हिहि जातच भावुनि खासचि प्रेमळ होतो ॥
होइल तो गुरु शीत्रचि साक्षपि भालचि सोमचिपूर्णचि होतो ॥६६॥
ऐकुनियां मग पुसत ती हरि मायचि जी वरि श्रीहरिला ॥
कांरे तुं कामिनि चाळविली उगिं काय नसे लुगि मां घरला ॥
खोडिच गोडिहि जोडिचि मोढि तुं सोडुनियां मज देई सुखा ॥
ऐकुं किती सति कारचि तो दिनिं सार नसे तुज वाह्य सुखा ॥ ६७ ॥
नाहिंच मा मज खोडिचि हौस ति ऊगिच हांसति सांगुनियां ॥
नष्ट गे गौळणि चाळविलें मज नाहिंच तें गुज बाळटिका ॥
काय वदूं तुज मा मि गे बाळक चित्पद चाळक शोधलिचा ॥
गोपि मला सम भामिनिया श्रुति भासति गे मति बोधनिचा ॥ ६८ ॥

नेति मला गृहिं आग्रहकारिणि सत्यचि जारिणि पान तुं आई ॥
लज्जित ऊघडि पाहुनियां दिठिं झांकुनि गे मिठि साजणि गाई ॥
भीताचि मीपण नाहिंच गे मज त्रीगुण तें बिज सोडुनि आसे ॥
भक्तिलिळेमधिं गर्कचि होउनि प्रेमळ गे मनिं तेथचि बैसे ॥ ६९ ॥

ऐकुनियां मग गोपनितंबिनि हांसति त्या मनिं प्रेमचि हो ॥
चाळविल्याविण चाळत नाहिंच नीजचि बाळक बोधनिं हो ॥
साधिमना तुंचि भावबळें हरि गोजिरि सांवळि मूर्ति निको ॥
कृष्ण रमावर गोधनपाळय अनंत गीतचि आत्मसुखी ॥ ७० ॥

कुंजवनामाधिं पूज्यचि हा जणुं वाटत साजणि कामिनिचा ॥
वेष्टित त्या हरि गोपकिशोरि ग पोरि मनीं समबुद्धि निका ॥
काय ति वाणुं सि वाणि मुखा धणि कारण कार्येंहि सोडुनियां ॥
पायिंच लागुनि पार करूं भव उत्तम हा नव्र ये उदया ॥ ७१ ॥

मोडित नेत्र ति पात्र निजासमिं भावबळें सखि तींचहि राधा ॥
ऊभि पराभुवनांतरिं शोभत गौरचि तो रंग भक्तिच सूधा ॥
कृष्णगळी हृस शोधनिं मीळत राहेच लोळत कांस जसा तो ॥
प्रेमळ सज्जन गाउनि ध्या मनिं सोडुनि शोकहि घोकित जा तो ॥७२॥

गोपकिशोर हि बोबडि वाणिच गाणि नसें मित बोलुं किती ॥
सख्य तिघांसिच प्रेम तयांवरि ज्ञान भक्ति सम भाव निती ॥
बोबडि बोलि ति जीभ हि मोठवि साठवि ती मनिं प्रेम सखा ॥
कौस्तुभधारण तो तमशामन गाउ मनीं असुहीत सुखा ॥ ७३ ॥

नीरहि उत्तम ती यम नीयम उत्तम ही मति नीररुपें ॥
आगम नीगम त्या थडि हो तिज बोधकदंबरसौख्य कृपे ॥
शोकरहीत ते लोक इच्छिती पिका शुक बोधन ऐक्यनिती ॥
भागवता अति ठाणचि देऊनि विवेकि बाणति शुद्धमती ॥ ७४ ॥

कामदा वृत्त.

राधिके मनीं काम तो बहू ॥ धाम सोडुनि प्रेम हो नहू ॥
वीध ती रितीं भक्ति भाविका ॥ प्रेमळा मनीं सौख्य दायका ॥ ७५ ॥

संसृती नाशक पोर कसा तरि घोरचि तो उरि लावितसे ॥
पोरपिसें नचि चोर निजासनिं बोल ते नीगमिं बोध मिषें ॥
सासुरवासिनि घांसुचि हो मनिं हातचि यावरि जोर फिका ॥
दादुले मस्तकिं वासर हारव नीजचि ते रव आत्मसुखा ॥ ६२ ॥
आणिक दूसरि आलि जि हो मनिं नाम तिला जनिं कासि असे ॥
पूनित दोष ति सून निजासनिं जाणति ते बुध वाणुं कसे ॥
बोल तिचे जन कानिंच धारण कारण यांतचि फार असे ॥
सार नसे नवनीत ति हा रस सारचि वीथि ति भक्ति असे ॥ ६३
मागत हा मज आजचि साजगि मारिणि रांजणिं काय असे ॥
घाय बसे उरिं सायिचकाढुन आनंद भूवन वांसतसे ॥
नासित आंगण ॐ इति ते गुण सिस्किनता घण नासितसे ॥
बुद्धि ति काढुन विवेक हातचि नाचत गातचि वाणुं कसे ॥ ६४ ॥
फूलि ग काढित मूतत त्यांणिंच तोंडहि पूसत आनंद फंदा ॥
वारिज नेत्रचि वारितसे मति सांगु तरीं किति तोचि ग धंदा ॥
धूळ करांमधिं घेऊनि झोंकित माझिच रोखित वाटग आई ॥
गोविंद सुंदर श्याम मनोहर मारक मोहाचि हाचि अंताई ॥ ६५ ॥
प्रीतिच यावरि फार तुझी गे मारचि ऊगळे कां मज लागीं ॥
ढोंगचि मूळचें सोंग जनामधिं मात्रचि अंबुधि व्हा समभागीं ॥
जाउचि तो वस आम्हिहि जातच भावुनि खासचि प्रेमळ होतो ॥
होइल तो गुरु शीवांचि साक्षपि भालाचि सोमचिपूर्णचि होतो ॥६६॥
ऐकुनियां मग पुसत ती हरि मायचि जी वरि श्रीहरिला ॥
कां रे तुं कामिनि चाळविली उगिं काय नसे सुगि मां घरला ॥
खोडिच गोडिहि जोडिचि मोडि तुं सोडुनियां मज देई सुखा ॥
ऐकुं किती साति कारचि तो दिनिं सार नसे तुज बाह्य सुखा ॥ ६७ ॥
नाहिंच मा मज सोडिचि हौस ति ऊगिंच हांसति सांगुनियां ॥
नष्ट गे गौळणि चाळविती मज नाहिंच तें गुज बाळटिया ॥
काय वदूं तुज मा मि गे बाळक चित्पद चाळक शोधानिचा ॥
गोपि मला सम मानिनिया श्रुति भासति गे मति बोधनिचा ॥ ६८॥

नेति मला गृहिं आग्रहकारिणि सत्यचि जारिणि पान तुं आई ॥
लाजित ऊघडि पाहुनियां दिठिं झांकुनि गे मिठि साजणि गाई ॥
भीतचि मीपण नाहिंच गे मज त्रीगुण तें बिज सोडुनि आसे ॥
भक्तिलिळेमधिं गर्कचि होउनि प्रेमळ गे मनिं तेथचि बैसे ॥ ६९ ॥

ऐकुनियां मग गोपनितंबिनि हांसति त्या मनिं प्रेमचि हो ॥
चाळविल्याविण चाळत नाहिंच नीजचि बाळक बोधनिं हो ॥
साधिमना तुंचि भावबळें हरि गोजिरि सांवळि मूर्ति निको ॥
कृष्ण रमावर गोधनपालय अनंत गीतचि आत्मसुखी ॥ ७० ॥

कुंजवनामाधिं पूज्यचि हा जणुं वाटत साजणि कामिनिचा ॥
वेष्टित त्या हरि गोपकिशोरि ग पोरि मनीं समबुद्धि निका ॥
काय ति वाणुं सि वाणि मुखा धणि कारण कार्यहि सोडुनियां ॥
पायिंच लागुनि पार करूं भव उत्तम हा नव ये उदया ॥ ७१ ॥

मोडित नेत्र ति पात्र निजासनिं भावबळें सखि तीचहि राधा ॥
ऊभि पराभुवनांतरिं शोभत गौरचि तो रंग भक्तिच सूधा ॥
कृष्णगडी हुस शोधनिं मीळत राहेच लोळत कांस जसा तो ॥
प्रेमळ सजन गाउनि ध्या मनिं सोडुनि शोकहि घोकित जा तो ॥७२॥

गोपकिशोर हि बोबडि वाणिच गाणि नसें मित बोलुं किती ॥
सख्य तिघांसिच प्रेम तयांवरि ज्ञान भक्ति सम भाव निती ॥
बोबडि बोलि ति जीभ हि मोठवि साठवि ती मनिं प्रेम सखा ॥
कौस्तुभधारण तो तमशामन गाउ मनीं असुहीत सुखा ॥ ७३ ॥

नीरहि उत्तम ती यम नीयम उत्तम ही मति नीररुपें ॥
आगम नीगम त्या थडि हो तिज बोधकदंबरसौख्य कृपे ॥
शोकरहीत ते लोक इच्छिती पिका शुक बोधन ऐक्यनिती ॥
भागवता अति ठाणचि देऊनि विवेकि घाणति शुद्धमती ॥ ७४ ॥

कामदा वृत्त.

राधिके मनीं काम तो बहू ॥ धाम सोडुनि प्रेम हो नहू ॥
वीध ती रिती भक्ति भाविका ॥ प्रेमळा मनीं सौख्य दायका ॥ ७५ ॥

चालली जणूं चाल ती निकी ॥ वर्णिली असें भागवतीं शुकीं ॥
घागरीशिरीं घेउनी भली ॥ नोक भासते वास तो मुळीं ॥ ७६ ॥
गौर ती प्रभा भासते मुखीं ॥ सोम हा असे पूर्ण हो सुखीं ॥
घर्म बिंदु ते शोभती वरी ॥ भूमिकार जे कस्तुरी परीं ॥ ७७ ॥
कुंकु रेखिलें रेख ती निकी ॥ नेत्र मोहिते कामिका मुखीं ॥
वापया नसें लुब्धली परी ॥ भावतो पिके नीज अंतरीं ॥ ७८ ॥

चामर वृत्त.

सांवळामनामधींच आठवी ति मानसीं ॥
राधिका प्रियास खास तीस लक्षुनि हंसी ॥
चोर तो मनीं म्हणे मला असे हृची प्रिती ॥
साचची गमेलं पाहुं कौतुकी पुरी रिती ॥ १ ॥

शुद्ध कामदा वृत्त.

जवळ जाउनी पाहती हरी ॥ सकळि फार ती आद्य हो उरीं ॥
प्रणव साक्षिणी अर्धमातृका ॥ निजविलासि हा आत्म धायका ॥ २ ॥
गजगतीप्रती कृष्ण बोलतो ॥ नवरसी रसीक बोल खोल तो ॥
घर ग तूं कसें सोडुनी निकें ॥ क्रमसि पंथ हा कौतुकें सुखें ॥ ३ ॥
मम मती असी सत्य भासते ॥ कथिन ती बरी ऐक नीगुतें ॥
उभय पक्षि जी बुद्धि ती बरी ॥ जग गतींतला शब्द ना शिरीं ॥ ४ ॥
नवविधा मला भक्ति प्रेम तो ॥ सकळ शोधकां सत्य जाणतो ॥
चतुष्ट साधनीं साधि जो निका ॥ मुमुक्षु हाचि गे प्रेमळा सखा ॥ ५ ॥
कपट तें मला नाचि आवडे ॥ म्हणुनि बोल तो नीगमाकडे ॥
धरिल जो मनीं हीतकारणीं ॥ मग मिही तया सौख्य दे धणी ॥ ६ ॥

शिखरिणी छंद.

मला वाटे आजीं विलसत जणूं वीमानचि हरी ॥
तुझ्या पार्श्वी ठेवी मम शिरसि नावें रित बरी ॥
नको दाऊं देवा सजवरचि ही प्रेमलहरी ॥
दिनाळागीं रक्षा ब्रिद तव तुझेंची जगतिरीं ॥ ८५ ॥

# ९ नामसुधा.

वसंततिलका.

गाई मना निज सखा रघुराज राणा ॥ किर्ती गुणें महिवरी सद जो पुराणा ॥
नामामृता सम जिभे नच आणि भेला ॥ या मानवी तनुमधीं पुनिताघ ठेला १
नामासमान नच मान जमाव आणी ॥ सारांत सार कलि तें गित प्रेमखाणी ॥
पंथांत पंथ सकळां रघुराज साजे ॥ भानूसरी दिप कदां नच तेजिं साजे ॥२॥
योगादिकीं सकळ ते अभिमान योगें ॥ नाहींच शांति गमते सकळीक सोंगें ॥
नामें मना अमनता कलिमाजि जोडे ॥ थोडें असे परि कधीं नच सांग जोडे ॥३॥
वाल्मीक कोळि मुळचा वरि पाप गेहीं ॥ हत्या बहू घडति त्या द्विजविप्र गेहीं ॥
हिंसा करोनि वनिं फार कुटूंब पोसी ॥ झाली गती मर अशा वचनें तयासी ॥४॥
मूनींत इंद्र सम जो तिहिं लोकमाजीं ॥ नामें करोनि गति ही घडली भली जी ॥
पापी अजामिळ असे रत शूद्र कांते ॥ मूखीं कधीं हरि म्हणे नच देहनातें ॥५॥
झाला असे बहुत लंपट वीषयासी ॥ अंतीं गती बरि दिली असल्यास कैसी ॥
पुत्रामिषें वदत सीतळ पाज पाणी ॥ नारायणीं जडलिसे मति नाम वाणी ॥६॥
भावीक भाव करणें सदसंगयोगें ॥ शांती जडे वरि बरी मग भक्ति वागे ॥
प्रेमा जमें अनुभवें भव भ्रांति जाई ॥ नामें करोनि सकळीक हि हो कमाई ॥७॥
तीर्थें शुची करिति तीं जळस्नान कर्मे ॥ दानादिकें करुनियां सकळीक वर्मे ॥
चित्तांतरा प्रति नसे किमपीहि शुद्धी ॥ नाहीं वळे स्वपण तें द्विविधाचि बुद्धि॥८॥
वागों मनीं भजन रे सकळीक सोडी ॥ गोडी असों सदयता मनिं काम तोडी ॥
साधी घडी नरकुडीं मधिं राम जोडी ॥ मोहादिकां दुर करी नच सोसुं ओढी ॥९॥
कामें करावि वरदार स्थुळाव भावीं ॥ मूखीं कसों हरि रसायण गीत ओवी ॥
प्रीती मनीं निरमयीं अजडीं जडों रे ॥ नासों विकल्प सकळी मिपणा उडों रे॥१०॥
काया मनें करुनियां जरि राम वाणी ॥ कोणी स्मरे दिन निसीं पुरति सिराणी ॥
या यूगमानि वरवा जगिं योगि हाचि ॥ भेटी घडे तरिं अवें टळतील साची ॥११॥
माया खणी दुखणि ती मिपणा मतीची ॥ भ्रांती भ्रमें करुनियां जग भूल हेची ॥
नामें करोनि निमते वरि देहभागीं ॥ भागीं स्वभाविकपणा जडते स्वयोगीं॥१२॥
नामामृतास स्मरतां नच सोंवळें तें ॥ वाचें अखंड वदणें सद भाव पंथें ॥
गावे पराक्रम अनूभव मानसानें ॥ शांतीस कारण दुजें नचि या जि मानें॥१३॥

सोडा टवाळ मति तें मनिं राम जोडा ॥ नाहीं अशी तनु पुढें भव भ्रांति सोडा ॥
ज्यानें दिली नरतनू मति वागण्याला ॥ त्या हो धन्याप्रति भजा नववीध बोला
नामें करोनि दुरितें सकळीक जातीं ॥ साक्षीस कारण सवेद प्रताप रूपीं ॥
भाटा समान बरवा जन वेदसूभा ॥ स्तूती करी दिन निशीं सदयोग ऊभा ॥१५॥
गाती पुराण पठणीं हरिचे पवाडे ॥ शास्त्रें विरुद्ध झगडा अनुमान कोडें ॥
सारा पसार भरला मद मोह वाटे ॥ जाणोनि सार समजा हरिगूण सांटे ॥१६॥
कांहीं पढाव पढणें नच वेद लागे ॥ ताठा चढे मग गती नच नीत वागे ॥
मोहांतुनी नच तडी वरि कोणि काढी ॥ जाणोनि सार वदणें द्विपणासितोडी॥१७॥
कोणी जरी प्रितिमिषें रसने करोनी ॥ नामामृतीं चवि सुधा भरि गेहिं कानीं ॥
त्याचें घरीं रघु बरा निज दासभावें ॥ वागे सदां समिप तो कनवाळु भावें॥१८॥
नाहीं उणें किमपि त्या बरवा धणी हा ॥ आणी दुजा इहसरी नच देखणा हा ॥
जाणोनियां मति अनंत स्वभाव भावीं॥ भावी अनंत गतिची नत्ररंग गोंवी १९

## १० नामसुधा.

मालिनी वृत्त.

नमन सदय नाथा पाद पद्मीं करोनी ॥
भवकृत मतिभावो जातसे ओसरोनी ॥
गुणगति समसाम्यीं ऐक्यता देव देवीं ॥
उपरमगति तूर्यें उन्मनी बोध ठेवी ॥ १ ॥
अभय वरद पाणी मस्तकीं स्पर्शतां या ॥
हृत मल कलिदृष्टी ईश्वरी भाव माया ॥
कुळ मुळ घर ज्ञाती माणसें सोडियेलीं ॥
सकळ भुति समानी वासना जोडियेली ॥ २ ॥
कळकळ नच वाटे प्रेम दाटे प्रभाते ॥
तम हरत रजादि रात्र जैसी प्रभाते ॥
नय उभव समावे शून्य सांडोनि चित्ता ॥
कवण करिल आतां मानवी लोकचिंता ॥ ३ ॥
मिपण निरखितां तें ना दिसे कोण ठायीं ॥
ममविण जग नाहीं दूसरी आपमाई ॥

धनसुतसतिबंधू गोत्रज्ञाती वदंती ॥
भवकृतविधिज्ञसी भ्रांति सारी महंती ॥ ४ ॥

स्वागता.

घोर हा सकळही मनुजाप्रती ॥ लाधला मतिबळें नसती कृती ॥
पापपुण्य दिठि मान सदां असे ॥ वेदभाव विधिचा गतिला दिसे ॥ ५ ॥

इंद्रवज्रा.

माया असी हे हरिची सबाह्यीं ॥ व्यापोनि भूतीं वसते समोही ॥
ना रूप ईसी नच रंग गोडी ॥ मिथ्यत्व मानूं तरिं नाच सोडी ॥ ६ ॥

शार्दूल विक्रीडित.

कांती कांचन संगती रवि प्रभा माया तसी आत्मिही ॥
रूपीं वेगळि कीं गणूं नच घडे जाणोनि वागे मही ॥
सोडावें इह भानची जशि तनू संगें फिरे साउली ॥
भावेना असुनी प्रतीत सकळां बुद्धी न त्या माखली ॥ ७ ॥

शास्त्रें वेद तशीं अनेक कविचीं वाक्यें जमा मातली ॥
बा रे सर्वहि आगमोक्त कथनीं द्वंद्वार्थ ते सांचली ॥
शांतीचा नचठाव यांत किमपी कामादिकें व्यापिलीं
जाणोनी शुक वामदेव निगमीं वस्ती सदां राखली ॥ ८ ॥

आत्माराम समान सर्व भुतिं हा ना पुण्य पापामधीं ॥
गूणातीत अरूप साक्ष वदतां कैसा मिळे हा मंदीं ॥
ज्याचेनी जगती दिसे परि नसे व्यापोनि त्याचे मधीं ॥
भूतें सर्व तयांत भाव लहरी जैशा रितीं ऊदधी ॥ ९ ॥

इंद्रवज्रा.

स्वआत्मतुर्या गुण साक्षिणी हे ॥ जाणे सुषुप्ती उभयांस ही हे ॥
कांती महा कारण कर्म गेहीं ॥ वागे सदांची सुख भाव गेहीं ॥ १० ॥

संसार येथें नच मूळ ठा ।। ॥ व्यव्हार गूणाकृति हे रमाया ॥
त्रैगुण्य रंगें विविधा कृतीतें ॥ व्याली स्वमाया क्रिडणार्थ येथें ॥ ११ ॥

सवाई.

रजतम सत्व गुणात्म प्रभे जडले तर्धि हे भव भासतसे ॥
हरिहर ब्रह्म सदोदित क्रीडत हे जगती मधिं आप तसे ॥
विधिकरि उद्भव हरि प्रतिपाळक संहरणीं हर सामवळे ॥
श्रुत गुण सांख्य किं विश्व विराट जगा कृति पिंड समान कळे ॥ १२ ॥

अवस्थात्रियेची गुण मांडणी हे ॥ दिसे पिंड मात्रीं वसेची सदां हे ॥
जगा जागृती ब्रह्म दृष्टी रजाची ॥ जडे स्वात्मसत्वीं कळा हे हरीची ॥ १३ ॥
सुषुप्ती हराची तमाकार व्यापी ॥ हरी ब्रह्मव्याप्ती गिळी जो प्रतापी ॥
बधा गूण भावा प्रती जाणती जे ॥ तया नाम तुर्यास्वदीप्तीविराजे ॥ १४ ॥

शिखरिणी.

नसे तुर्ये लागीं गुणविण भवीं तापजडणी ॥
कळा गूणीं फांके अनय भ्रमवी सृष्टि कसणी ॥
गुणाच्या आधारें जगनग दिठी गूण निरखी ॥
गुणातीतालागीं भव नच दिठीं नाटकमकी ॥ १५ ॥
गुणातीता अंगीं समपण सदां आत्मभुवनीं ॥
नसे कार्यां कार्यीं कलि मति दिसे जीव भुवनीं ॥
जगाच्या व्यव्हारीं अगुण गति ते वांतिवतसी ॥
जिरे नाची पोटीं विषय सुख तें मासि घरसी ॥ १६ ॥

जगीं मानवी देहप्राप्ती सुकाळीं ॥ सुखी व्हावया ज्ञानदृष्टी कपाळीं ॥
परी पापपुण्यें करोनी मतीला ॥ असे वेष्टिली जाग्रती दृश्य काला ॥१७॥

इंद्रवज्रा.

नाना रितीचे भवबंध हेतू ॥ भावार्थ होती जड भोग किंतू ॥
मोहाधिठायीं बुद्धि देऊनियां राहे अविद्या गतिमान काया ॥ १८ ॥
ना भाव एकी गुण आकृती तो ॥ होई त्रिकांडी भ्रमणा वरी तो ॥
माझें दुजाचें इह कल्पनेनें ॥ गेलें लयाला नरभाव केणें ॥ १९ ॥
येथें तराया सुलभाकृती हे ॥ आहे कलीला हरिनाम पाहे ॥
नामें करोनी भ्रमणा मिटेही ॥ साक्षी बहू ती वदले कवीही ॥ २० ॥

शार्दूल.

साधुसंत मुनीसनातन कवी कोवीदही बोलती ॥
थोरी राघव नाम भाव भजनीं दूजी नसे या रिती ॥
सुधा ही भवकाननीं पसरली लीला सगूणा वरी ॥
गाती त्या अजराकृती घडविते भ्रांती पळे कांचरी ॥ २१ ॥

रमानाथ गातां वहू आवडीनें ॥ भरी नीर देवो घरीं कावडीनें ॥
प्रतिष्ठान ठायीं गुरूंयेकनाथें ॥ जगा दाविलेले असे भाव हो ते ॥ २२ ॥

रमा नावडे आवडे भक्त देवा ॥ सुलीनाकृती साम्यता भूतभावा ॥
मती भाविकी पाहिजे साच पोटीं ॥ रघूनाथ वाणी वसो नित्य पोटीं ॥२३॥

## ११ रामस्तव अभंग.

कां रे तुजलागीं आठवण नाहीं ॥ अनाथ गा पाही आहे बापा ॥ १ ॥
सोडवण करा घ्यावें पदरांत ॥ दाखवावा पंथ नीज सुखा ॥ २ ॥
पाप ताप दैन्य हरी माझें सारें ॥ भ्रांतिचें तें वारें देऊं नको ॥ ३ ॥
करा सोडवण अगा नारायणा ॥ दीनाची करुणा असों द्यावी ॥ ४ ॥
वारी भव भ्रम शांती सुख देई ॥ अनंतासी पायीं राख बापा ॥ ५ ॥

उमावृत्त.

टांकुनिया भिति गात असे गिति सावपणें धृति शांति सुखा ॥
लाज ति नाहिंच गा मज वाटत प्रेम रसीं मन दूखविका ॥
श्रीगुरु माय ति दीन जना प्रति राखित भाळिंच हस्त जिचा ॥
काय वदूं मन शांति सुखास्पद आपदते हरि सत्य हिचा ॥ १ ॥

बाळक मी तव चाळक ही मति शांति ति नाहिंच सूख जरा ॥
टाळुनियां भव पार करा मज थार हरी तव पायिं बरा ॥
शंकित हें मनिं आहे सदोदित आण तुझी वरि घालुनियां ॥
श्री गुरुनाथजि पूर्ण दशा मज घालचि हे सत भाळुनियां ॥ २ ॥

पाहि मना तुंचि शोधुनियां जगिं कोण तुझें हित सत्यपणीं ॥
सोयरिं सोबति दो दिवसांचिच काळ रिती बरि याचि गुणीं ॥

काळ छुरा तरिं कोणिच ते घरिं राहति हे मित मानुं नको ॥
जोंवरि हातित आहे तुझ्या नित शोधुनि पाहे तूं सोडुं नको ॥ ३ ॥
थोरपणीं फुगि मानुं नको मनिं पार नसे इसि जाणचि या ॥
मोठेपणीं बहु फूगुनि नाडले पार नसे सरि साक्षिस या ॥
रावण पाहिच हेमवतीपुर फार धुरंधर अहंपणीं ॥
मारक त्या कपि साक्षि हि वाल्मिकी यावरि तूं किति सांग धणीं ॥ ४ ॥
तोंड तिखाग्निति गोड मना तुज फारचि वाटति भावुं नको ॥
मूर्खपणें हित होईल कैं तरिं देख सुं शोधुनि रीजुं नको ॥
दीनहिनावरि क्रोध नको करुं रीत बरी धरि कां दंगा ॥
सावध सावध बोधनिरोधचि घेइ तूं साधुनि सत्संगा ॥ ५ ॥
ब्राह्मण होउनि कारण ही तनु लाविलि ना जरिं कार्य मजा ॥
शुभ्र पटा जरि थोडच काजळि ओंगळवाणि ति घांसित जा ॥
हें पद ब्राह्मण सायुज ती खुण नासुनियां हिण होउं नको ॥
लक्षिच खूणहि शोधुनियां मति बाणुनि घे निति काळ झुकों ॥ ६ ॥
मीपण हें जरिं सोडिल कोणिहि गांठिल पैलचि थडिये हो ॥
सावध होउनि हे रिपु बा वधि आवधि थोडिच जोडिये हो ॥
कामचि हा खळ वाखळ देहचि माखलि जी मति नासिल रे ॥
मोह तयावरि घांसित हातचि या जगिं तो सुख वासिल रे ॥ ७ ॥
हें मन तूजचि तारक होईल राखिल बोधनिं शोधचि रे ॥
भावबळाविण येथिल बोलिहि नाहिंच ती मति वाचित रे ॥
पार तरा निधि हाचि असे विधि शोधित जा सुधि वाचि गिता ॥
नाहिं तरीं उगिं रामचि गाउनि प्रेमळता धरि शांति सुखा ॥ ८ ॥
गाउनियां मनिं त्या घरिं जाईन घेईन सूखचि रामपदीं ॥
ही मति ठामचि घामट त्यागुनि जोडिन त्या निजिं आस सुदीं ॥
काम नको गति भाव धरूं मति शांतिधना हितिं झोंबुं चला ॥
माव हि राक्षसि त्रीगुण साक्षिसि धा मनिं सत्यचि आग तुला ॥ ९ ॥
पोथि ति सोडुनि वाचित रोजचि नेम खरा परि अर्थ नसे ॥
अंतर कुसरि शोधिलि नाहिंच कामिक हेतुंत चित्त वसे ॥

तो ईश वा तुज देईल आणुनि इच्छित गोष्टि ति कांमि नसे ॥
साधुचि संगत नामचि तें गित गर्भिच शोधित त्यासि असे ॥ १० ॥
देव पुजा वरि षोडश भावनिं नाकहि दाबुनि नाहिं मजा ॥
भावचि ना जरि भक्ति कशाचि ति इच्छित मुक्ति जि जाळचि जा ॥
ढोंगचि दाविच सत्य जना प्रति माळ ति नीगुति तीच कंठा ॥
नेत्रचि लावुनि गोमुखिं तो कर शोभत ढोंगचि होत ठंठा ॥ ११ ॥
राम भजी मन प्रेमळ तें गित भाव धरी मित सोडुं नको ॥
रागे नको हरि मीपण आवरि भ्रांतिच ही वरि सोड झुको ॥
मान नको तुज भानचि ना हिति रानचि हें जग सोडुनि दे ॥
आवडि घे रघुनाथ कथेवरि भावबळें हरि कानचि दे ॥ १२ ॥
निर्मळ मानस प्रेमळ ती मति तें सुख हो मनिं गांजित रे ॥
जे गति कोकिळ कंठचि कीं जणुं कारण तेथचि हा संत रे ॥
वसंत काळिंच कोकिळ तो रव संतचि वासर बोधनिं हो ॥
त्या गुरुलागिं तूं आजि मना उठ पाहुनियां निट शोधचि हो ॥ १३ ॥
सोडुनि देह तुं खोडि मनांतिल राखुं नको पद मीपण तें ॥
देइल तो पद निर्मळ तें कालिमाजिंच हो निज भाग्यचि तें ॥
रोधनि ही मति धारण होईल शोधिल तो गति येथ निकी ॥
मायिक जो घट गूणत्रया धणि निंदक जो गुणिं तोंड झुको ॥ १४ ॥
कामिनि चिंतेत काळ सदोदित घालवि मातिंत व्यर्थचि रे ॥
संपति ज्या सम तो प्रिय त्याजसि इतर जे दिन त्रासिच रे ॥
ताठत मानसिं निंदक फारचि विकल्प तो कुशिं नित्य वसे ॥
पोकळ झालि ति पोफळ वांकलि हा कालि आकलि त्यासिअसे ॥ १५ ॥
बाळक मी दिन धारक नामचि लीन मती मनिं गातचि रे ॥
पामर मी नर पावन करि तुं पार करी रिपु मारक रे ॥
बोधक ती मति आत्मविलासचि भावहि साधिंच मौज असे ॥
त्यासचि हात रे जोडुनि रामसखा मज दाविल सत्य वसे ॥ १६ ॥
काय मि पापिच आहे दयानिधि सांग मला हरि या क्षणिं गा ॥
नाम तुझें बहु हीतचि दायक वेदहि बोलति लक्षुनि गा ॥

पावन या अघ ओघचि राम जि सत्यपणीं मज दीसतसे ॥
आणुनियां गिति प्रेम भरास्तव रोजचि रोजचि घोसित ते ॥ १७ ॥
माय दिनाचि तूं सांचपणीं ठिक सूखचि दायक नीजहितीं ॥
भक्त जना मुळ भान भवामधिं तारक तूं शिरिं आत्मरितीं ॥
गोड तुझें गित नीतहि यांतचि जाणुनियां मनिं पाय तुझे ॥
धारण मस्तकिं कारण जाणुनि रामसखे तुंचि माय मुझे ॥ १८ ॥
कांत सिता प्रिय वाटत मानसिं देइल तो मसिं उत्तम रे ॥
साच गती मनिं भाविक हें सुख आहे सदोदित वांछित रे ॥
नेइल तो पदिं दीनपणें जरिं गाइल जो हरि त्यासचि रे ॥
नीज हितांतरिं शोधुनि पाहिल वाणिल राघव साचचि रे ॥ १९ ॥
राघव गा मनिं धामिंच राहुनि काननिं व्यर्थचि जाऊं नको ॥
भावचि राखुनि प्रेमभरें मनिं आठवितां जनिं सिद्धि नको ॥
भक्तिच हो करि सावध होऊनि कामिक बुद्धि ति भावुं नको ॥
संतसमागम आगम धामिंच साधुन घेइं तुं काळ झुको ॥ २० ॥
साधुसमागम दुर्लभ दुर्लभ या जगतांतरिं सत्यपणें ॥
वाटत मानसिं हो दिनरात्रिसि रामचि गाइन आत्मगुणें ॥
काय नको मज देउं तूं आणखि भक्तिच मात्र ति खासचि दे ॥
भावबळें हरि आनंद कूसरि विवेक तो धरि वास वदे ॥ २१ ॥
तें घर आवरि कामचि बा अरि शोधसि तूं जरिं जासि सुखा ॥
पावनकारक मूर्ति प्रकाशक सत्सुखदायक प्रेमसुखा ॥
राक्षस रावण मीपण जें व्रण टांकुनियां खुण पाहे निकी ॥
वारिजनेत्रचि रात्रंदिनीं मनिं आणुनियां धणि होई सुखी ॥ २२ ॥
बाळपणीं मनिं होईल जोधाणि प्रेमळता जनिं भक्तसखा ॥
तोचि मि मानिन संत जगा माधिं पायिंच ठेविन डोइ सुखा ॥
शांतिस जो वर भाव बरोबरि नीजसुखावरि लोळतसे ॥
त्यासिच गाउनि हा भवसागर सारुन जाइन वाटतसे ॥ २३ ॥
ओळखि या जगिं काय तुझें हित शोध करी मनिं गा पुरता ॥
कोण असे हित आसहि कोण ति कोण तुला धणि हो निगुता ॥

मायिक सोयरिं गोडपणासचि जोडुनि राहिलीं मीत हिता ॥
भास नसे जगिं वीषम काळचि जातिल सोडुनि ही ममता ॥ २४ ॥
मानवि ही तनु मानि·हितास्पद मारचि आधिं तुं या ममते ॥
सोडुनि ढोंगचि ओघ सितापति ठेउनि यां जरिं पाहसि तें ॥
हें परमामृत आनंद गांठुनि विवेक अन्वय साधुनि घे ॥
मोहनदासाचि टाकुन पाहति मीपण मोडुनि साधु निघे ॥ २५ ॥
ज्ञानहि पूर्णचि ध्यानचि हें सुख हार हरे शिव सांभचि रे ॥
नाहिंच हें जग रीतिंत पाहिंच बोधचि शोधनिं भांग पिरे ॥
जानकिकांत जि हा मनिं शांतचि वांति करी रिपु कामाळा ॥
शीरिं लपोनि ति नारि असे बरिं शांतचि तें निर गामाला ॥ २६ ॥
माय ति माझिच बापहि तो मज लाजहि माझिच तूज असो ॥
कोदंडपाणि जि द्यावि मला मति ती सद्‌संगति नित्य असों ॥
मानसिं मानित सत्यपणेंचि मि दुष्ट ति सर्पिणि आस नको ॥
सोडवि या जागिं गुणत्रय नासुनि वीवेक घांसुनि रोव झुकों ॥ २७ ॥
गोडिच तूमचि या चरणाचिच मानासिं माझिये नित्य असों ॥
हांजि सितापति बाळक वाणिहि खाणि निजाचिये मीत असों ॥
भक्तसखा तव नामचि गा रघुराज तुं साजन हीच सिता ॥
बोलचि हा जणुं भारतिं व्यासचि भारतिं बोलिलि हे च गिता ॥ २८ ॥
सोडुनियां भिति मान लज्जेचिच सावध होउनियां रघुवींरा ॥
गावुनि आणुंच भावबळें नमुं पाय ते मस्तकिं हाचि तुरा ॥
पूर्णानंदचि आनंदान्वयिं बोधबळें पिउं आत्मसुखा ॥
कारण हेंचि जि या नर जन्मिच साचचि बोलि हि काळ झुका ॥ २९ ॥
हें मन थूसर पाहि तुं मागिर काय तुला भर संसृतिचा ॥
रामचि गाउनि साव तुं होइ जि फीटल मोहचि या मतिचा ॥
आद्यवसे जनिं भोगक हें कर्म सत्यचि तूं मनिं जाणति जे ॥
बाइट आणिक फारचचांगलि ही सहजा गति वृत्ति जे ॥ ३० ॥
ही तनु रे तुज मानवि मीळलि लाभचि तो परि रंग फिका ॥
नासविली जरिं थोरपणामधिं काम धणी तरि व्यर्थ झुका ॥

जानकिचा धव आठवि मानसिं भ्रांतिस तो सत्य नासिल रे ॥
कारण मोहचि जाईल सोडुनि तारिल तूजसि हा धणि रे ॥ ३१ ॥
या जगतीमधिं तारक रामचि साक्षि असे मुनि वाल्मिक रे ॥
ऊलट नामचि घेउन तो सम राघव प्रेमळ गाईच रे ॥
चोरचि ही मति वीषयिं गुंतुनि मोह धरी शिरिं खासचि रे ॥
क्रोधपुढें मग आगचि लावित नाचत द्वैतहि तालिंच रे ॥ ३२ ॥
याविण दूसरि गोष्टचि खोटि ति सत्यचि हा धणि राघव रे ॥
हा शिव हा शिव ध्यात सदां मनिं धा मनिं सांगत पार्वति रे ॥
तारक हा एक दायक धामचि मारक कामचि सत्य खरें ॥
सावध सावध साधुजनाप्रति विकल्प सांडुनि पूसचि रे ॥ ३३ ॥
दाशरथे तव पादसरोजनि नाशक मोहचि सत्यपणीं ॥
वाटत मानसिं खासचि सांगेन दासहि होईन तूंचि धणी ॥
मान नको मज ध्यान तुझें धरुं काम मुखासचि लावुं गुणीं ॥
हे रघुवंशज हे मुनिपालय गा लयकारक रामपणीं ॥ ३४ ॥
बूधनहो रविवंश पुरोहित संसृतिनाशक अरुंधतिचा ॥
जो पति शांतचि नाम वसिष्ठजि स्पष्टचि भानुच भास मतीचा ॥
शुभ्र जटेवरि माळचि शोभत रुद्रचि ती धृति अक्षपणाची ॥
पक्ष बरा मज वाटत साचचि नीगम ही गति दक्ष गुणाची ॥ ३५ ॥
दुःखचि तें सुख भाउनि मानसिं अंतर शोधनिं चित्त वळे ॥
काय उणें मग त्यासि नसे जगिं पूर्ण सनातन सूख फळें ॥
विलक्षण हीं तनु दृश्यचि लक्षणिं मायिक त्रैगुणि नांदतसे ॥
सावध सावध हा भव बा वध वेळ दिसे बुरि सांगतसे ॥ ३६ ॥
सज्जन संगति इच्छित जी मति सूख तयाप्रति रामचि दे ॥
भक्तचि तो इश ईशहि भक्तचि साचपणीं हिच गिरा वदे ॥
शीवचि तो रघु रामचि गा शिव ऐक्यपणीं मनिं साधुच ये ॥
या भवपारिंच मानव कूडिहि वीकल सोडुनि साधु वये ॥ ३७ ॥
शांजि जि एकचि एकपणें मति भूतदया धृति जेथ वसे ॥
नीमळ सज्जन प्रेमळ भाविक पूर्णपणें जणुं नाथ असे ॥

आपपरीं सम निर्मोह लक्षण शिक्षण तातचि मान मनीं ॥
श्रीगुरु एकचि तो एकनाथ जि पार करी मज आत्मधणी ॥ ३८ ॥
तारक तूं जगदीश्वर साचचि जाणुनियां मनिं सूखि असे ॥
माय तुं मानुनि वाणितसे गिर्ति बाळक मी तव पायिं वसे ॥
राम दया निधि काम नको मज ठामचि हें जग सोडुनियां ॥
पाय तुझे रघुराज मला मनि सूखजि दायक जोडलिया ॥ ३९ ॥
हा सरदारचि शोभत साजणि नीज गतीचहि आत्मसुखा ॥
ज्याचिये मानसिं बोधनि शोधित भाव बळावरि काळ झुका ॥
प्रातःकाळचि आळस सांडुनि मानसिं हा रघु ध्यायिंच रे ॥
पंचवटी तट वासचि जो सुख कारक राम जि गायिच रे ॥ ४० ॥
गांठ बरी मज मीनलि राघव सत्यपणें बरि या चरणासी ॥
प्रेमचि मात्र तूं देइ दिना हरि मोहचि संहरि आभरणासी ॥
काकुळती किती येऊं सितापति द्यावि मला मति सत्संगाला ॥
पार करा भव भान हरा जगिं तारक तूं शिरिं या भुजगाला ॥ ४१ ॥
काय दयानिधि चैन नसे मति दाखवि पाय जि याच दिना ॥
लीन मिगा मति पायिंच भावित थार करा गुरु हेचि धना ॥
देइ भक्तप्रिय सांप्रत हें मज नामिं तुझे गति कांत सिता ॥
राघव राघव सारिच हा भव देइ अनूभव प्रेमहिता ॥ ४२ ॥
विश्व कुटूंब जि राजिव नेत्र तुं श्याम मनोहर रामचि गा ॥
मूनि जनाप्रति संग तुझा मनिं दंगचि होउनि निःसंग गा ॥
पालय मां रघु धाम निजासनिं काम रहीत तुं सत्यपणीं ॥
घोरचि हा भव येथिल वैभव तारक तूं जिव ऐक्यपणीं ॥ ४३ ॥
गूण व दोषहि सोडुनि पाहिन पाय जि हे मज वाटतसे ॥
पूर्ण करा धणि कामचि हा जणुं गूण तुझे म्हणुं सूखवसें ॥
कानहि कामिंच लावि सदोदित साधु समागमिं गीत रवा ॥
साधुन घेई तुं अक्षय सूख जें संत मुखें निज टाळि भवा ॥ ४४ ॥
ज्या घरिं हा हरि वास सदोदित भावबळावरि करीतसे ॥
नामचि गाउनि प्रेमभरें मनिं शांत स्वभावचि वरीतसे ॥

तो नर दुर्लभ दुर्लभ या जगिं काज नसे दुजि गोष्टि हितीं ॥
जो गुण सोडुनि द्वैतहि ती मति टांकुनियां मन आत्महितीं ॥ ४६ ॥
पाव दयानिधि श्याम मनोहर तारि मला हरि घे पदरीं ॥
व्यर्थ मि पामर या जगतीमधिं वाटत आजचि दुःख पुरी ॥
काम मर्दे मन घाणचि ती करि शांति नसे उरिं वेळ बुरी ॥
घोरच लावित ही ममता मज क्रोधहि ऊठवि हेचि सुरी ॥ ४७ ।
मायिक हें मन गूणसंगें भविं भ्रांतिरुपीं दिनिं खेळतसे ॥
जाग्रति नीमलि मागुन आपण स्वस्थपणें निज घेत असे ॥
आयुष्य यांतचि गेलिच या मग अंतरलें सुख दुःख दुणें ॥
काय प्रभू तुज काकुळती नसे दीन मि पामर कर्म उणें ॥ ४८ ॥
या जगरींतित वागणुकीं बुरि काळ गती कलिं नामचि रे ॥
वा मन स्थीराचि नाहिं कदां उरिं शांति जरा तरि यासिच रे ॥
निंदक दुष्टहि फार जगामधिं भाविक वीरळ दृष्टि पडे ॥
त्यासहि दुःखचि देतिल हे जन आपमतें शुचि दुष्ट भिडे ॥ ४९ ॥
क्षूटि हि संगति कामिक मानवि सोडुनि दे अजि चाल कसा ॥
मोहचि घालुनि बांधति तूजसि फीर मना चल सावधसा ॥
सूखाचि तें दुःख पुढतिं होइल फांसाचि हा तुज सत्य असे ॥
काळाचि घालिव भार नको धरुं आणिक ना धणि राम असे ॥ ५० ॥
तो गुरु हे मन साधुन घेई ग आपुलिया सुख धामाला ॥
द्वैतविवर्जित मोह समागम नाहिंच तो जणुं गूणाला ॥
हा एक सज्जन जाणुनियां मन सावध होउनि आठिव रे ॥
जाताचि जी तुज बाटिव जा चल जो अज नामिक गांठिव रे ॥ ५१ ॥
सोडि मना तुंचि भेद नको भुलिं घोराचि हा मनिं हें समजा ॥
वीषम काळाचि द्वैतबुद्धि ही जाणुनियां हरि आजिं भजा ॥
भूतदयेसम दूसरें साधन नाहिंच या जगिं सत्यपणीं ॥
कोण नसे धणि मानवलोकिं जि तुज धरीं करि ईश धणी ॥ ५२ ॥
मातलिया मनिं काम अरी मग या भवपारिंच घाण हि रे ॥
मोहमदें फुग रावत हा अरि संभृति ना बरि सोडचि रे ॥

शोध करी निज मानसिं मीपण कोठुनि यासि तुं आणसिरे ॥
नाशक याजसि राम रघूत्तम दाशरथीसुत गायिच रे ॥ ५३ ॥
हे अमरेश जि नाम तुला सम शोभत हो मित गूढजि गा ॥
अर्थ मनीं मम भासत हाच किं सत्यपणें गिर्ति बोलेन गा ॥
वारण जो निट शोभत शोभित हा ऐरावत वीवेक हा ॥
बोधरुपीं गुरु अंकुश तो अनुभावपणें तम सारि भवा ॥ ५४ ॥
पंचभुती तनु जाणतसां जगिं माणिक मानुनि कां मरतां ॥
गुणत्रयाचिच साक्षिहि वाणल व्यर्थ जि मोहक ही ममता ॥
आधवसीं गुणि वाईट चांगलि कर्मगतीस्तव भोगवि गा ॥
पाहिं मनामधिं शोध करूनिचि यावीण आणखि क्रोध भुंगा ॥ ५५ ॥
मानति सूखचि सर्व जगामधिं मायिक मायेचि ही ममता ॥
सांचपणीं जरि पाहुंच लागसि सूटसि यांतुनी जाण हिता ॥
रोजचि हें दुःख सूख मुळीं नच भास भ्रमीतचि कैंचि गिता ॥
वांचुनिपाठक काय ति घोकिलि अर्थ नसे जणुं तो पुरता ॥ ५६ ॥
वाद नको जगिं ढोंगहि सोडुनि सावध मानसिं नित्य रहा ॥
आगमपक्षिंच लक्षित राहसि सोडुं नको घर हीत पहा ॥
गायि मनोगति राघव ही मति काय उणें मग हो तुजला ॥
नामचि गाउनि पार बहू जनिं थोरचि ते मुनि पार पहा ॥ ५७ ॥
आत्मसुखासम मायिक वाणित कोठुनियां तुज दृष्टि पडे ॥
विषम मानसिं कामचि ऊठवि मोह तिच्यावरि दुःखि पडे ॥
कोण तुला धणि या जग मिळणिं पाहि विचारुनि शोध निका ॥
आजि सिताधव गाउनियां मनिं शांतचि होई जि प्रेम सुखा ॥ ५८ ॥
माय रमाधव माधव नामचि श्याम मनोहर गायिंच रे ॥
तारण या जगिं याविण आणिक नाहिंच जाण तुं सत्यचि रे ॥
हा कलि मोकळि भाकळि बोधचि सांकळि तोडि हि मोहचि रे ॥
सूखचि वा धरि राहुनि वेड तुं रामचि गाउनि भ्रांति विरे ॥ ५९ ॥
गोड तुझें रुप नामहि गोडचि गोड ति गोष्टि जि काय वदूं ॥
आधर मूरलि पाझर हा रव गा जरनाशक लोट मदूं ॥

मूकुटिं जो मणि सोमचि भासत चांदणि मौक्तिक मुक्ति सुखा ॥
मुक्तचि तें गुच्छ हळति शोभित रोखित हें मन काय रुका ॥ ६० ॥
हे गुरुनाथजि येकपणीं मज ठावचि या जगिं हा गमला ॥
पाय तुझे मज तारक होउत प्रेमभरें गित गाउं चला ॥
बाळक मी दिन हीन मती गुरु तारक तूं यतिराजचि रे ॥
तात अनामिक माय जनार्दन साउलि नाथ तुं मी हिन रे ॥ ६१ ॥
हेर मि तूं धणि साचपणीं खुण आजचि वाणळि हीच मजा ॥
थोरपणा मज नावड तेंथिळ साचपणीं दिन हे समजा ॥
सार चराचरिं मारक रीपुसि तारक तो दिन राघव रे ॥
रावण नाशक सागर तारण तो रिपु कामचि सत्य खरें ॥ ६२ ॥
कोमळ ही तनु श्यामळ शोभत राजिवनेत्रचि हा बरवा ॥
राघव तो मनिं जानकिचा धणि आणुनया जणुं सार भवा ॥
गोपिपयोधर गोपचि वेषज गोरसचोरचि ध्यानिं धरा ॥
मुनिजना हित कोदंडपाणि जि तारक भाविक सूखि तरा ॥ ६३ ॥
सोग कशास्तव भोगचि भोगुनि राघव गाउनि सूखि रहा ॥
प्रेमभरें गित गाउनियां मनिं आननिं हे मति रामिं वहा ॥
कोणि नसे तुज या जगतामधिं सत्यपणीं तुचि पाहुनि घे ॥
कारचि हा तरिं मायिक वीपायिं मारक मोहचि सोड निघे ॥ ६४ ॥
चोर रे कामचि कामिनि शोधित धामिंच गुंतुनि नासितसे ॥
मोहित ही मति वेष्टित मायिक नाम नये मुखिं जाण असे ॥
इच्छित भोगचि ध्यास सदोदित मानस गोंवुनि राधियलें ॥
काय जिणें हरि भक्तिच वांचुनि शोध करी मनिं नीजबळें ॥ ६५ ॥
तारक हें पद जाणुनि मानसिं कांहिं तरी मति गांठवि रे ॥
पूर्णदयाघन राजिवलोचन तो भरताग्रज आठवि रे ॥
गांठवि मानसिं हा भव नासिच भ्रांति नको भरं सत्यचि रे ॥
कोण तुला धणि राघववांचुनि शोधकरी मनिं पूर्णचि रे ॥ ६६ ॥
माधव मानसिं वास निशीदिनिं साचपणीं मनिं जेथ असे ॥
काय उणें मग सांग तयासचि पूर्णसुखी जगिं तोचि असे ॥

भाववळें मन भक्तिस लावुनि प्रेमभरें गित गायिच रे ॥
सोडुनि देइं तुं दुष्टजनांप्रति संगत त्यांचि ति मायिक रे ॥ ६७ ॥

कामिनिची चट कामिक तो जणुं संगत त्याचि करूंचि नको ॥
फांश तुला जणुं घालिल सत्याचि जाणुनियां भुलिं भरूं नको ॥
वेळ हि थोडिच या कालिमाजिं हि कां मनिं सावध होतचि ना ॥
मोह भुली हिचि घाण जनांमधिं नष्टचि कामजि सोडिचना ॥ ६८ ॥

हें मन खोडिल गोडिच वीषयिं धांवत काननिं संसृतिचा ॥
नासुनि जाइल ही तनु साजिरि शोध मनीं करिं या मतिचा ॥
टाळ भवाप्रति पापचि जाणुनि बापचि तो धणि राम भजा ॥
कार्मुकपाणिच तारक या जगिं साधन हें धरि काम त्यजा ॥ ६९ ॥

हा भव नाशिल घांसिल जो मनिं जाण अनूभव त्यासिच रे ॥
राव रमापति भाव धरूनिच गायिल त्याजसि सूखचि रे ॥
या विण साधन व्यर्थचि जाणुनि घाण नको करूं पार तरा ॥
गोविंद गोपति गोपिपयोधरं मानसिं हा धणि नित्य धरा ॥ ७० ॥

मानचि इच्छित काम उरामधिं ठामचि नासिल ही तनु रे ॥
यास्तव सावध हा रिपु बा वध गायिच रामचि ही मति रे ॥
फूगुं नको मनिं दंभचि घातक हा अरि जाणुनि सावध व्हा ॥
श्याम रमाधव राम सितापति गाउनियां मनिं मुक्तचि व्हा ॥ ७१ ॥

देखुनियां मनिं नारि पराचि ति ज्या मनिं मोहचि फार जडे ॥
कामचि इच्छित राहि सदोदित दुःखहि त्यासचि भोग पडे ॥
मीन जसा जाळें स्वानंदभूवनिं क्रीडित चित्तचि तो तळपे ॥
कामचि तो गळ देखुनि लोचनिं आपण जाउनियां झडपे ॥ ७२ ॥

शोक कशास्तव हा दृश्य भास जि स्वप्नचि केवळ समजाना ॥
गेलि जि वेळ तिं जो भर भोगुनि मागुति नाहिंच उमजाना ॥
मोहचि मारक पार करा जणुं तारक तो हरि करि ठावा ॥
रात्रदिनीं मनिं चिंतित राहि तुं रामसखा हर जिवभावा ॥ ७३ ॥

रामचि तो निजधाम मनामाधिं कामरिपू दवडा कलिला ॥
आणिहि फारचि थोर मुनीजन वसिष्ठ वामन फारचि जे ॥
सज्जन साधुजि तापसि सिद्धहि रामालिकेंतचि थोरत जे ॥ ७४ ॥

कोठिहि मागिलि कर्म भुमी गत भोगवि भोगाचि हे समजा ॥
सूखहि इच्छित चित्त सदोदित काम मदामाधिं जीव रिजा ॥
द्वैत करी मन मोह विलक्षण आप्तजनावरि प्रीति करी ॥
निंदित दूसरिं मानुनि मानसिं कोडि हिची ममता न धरी ॥ ७५ ॥

भीतचि नाहिं मि या भवकाननिं रामचि गायिन भावबळें ॥
टाळिन काळहि साधिन प्रेमचि होइन गाजि जि भ्रांति टळे ॥
कोणिं नको मज मात्रिक सोयरिं मोह तयावरि दीसतसे ॥
विश्वकुटुंबिच मानुनि राहिन नित्य सुखी मनिं भोगवसें ॥ ७६ ॥

सत्यचि हें मनिं मानुं सदोदित देहिं मि नाहिंच याजि रितीं ॥
कारण कर्मचि आद्य असे मग भोगिल स्थूलचि भोगगती ॥
येक अहंपण टाकुनि पाहिन सत्यपणीं तुजलागिं हरी ॥
गाउनियां गित शांत सदोदित राहिन मानसिं याच पुरीं ॥ ७७ ॥

काय उणें प्रभु नाहिंच मानित भक्ति गुणें मति माझिच गा ॥
आनंद हा मज भासत मानसिं देह गुणें मज भक्तिच गा ॥
शक्त्यनुरूप जि नाम तुझें धरुं साधन ना कलि हीच मजा ॥
हे प्रभु देव दयानिधि तारक तूं रघुराजचि वासर जा ॥ ७८ ॥

कोण मला तुजवांचुनि रक्षिल सांग सख्या हरि सत्यपणीं ॥
नाश करी अरि मोह मनांतिल क्षोभ नको मज तूंचि धणी ॥
भ्रांति हि गा मनिं दुष्टचि पापिणि ही त्रिगुणी मति साचचि गा ॥
श्याम मनोहर धांवत येउनि तारि मला अजिं सत्वर गा ॥ ७९ ॥

साधक मी असि बुद्धि नको मज साचपणीं रघु जानकिनाथा ॥
मी पण तूजसि आर्पिग होऊं जि तूं पाणें पाळक हो रघुनाथा ॥
हे गुण दोषचि सोडुन पाहिन गायिन नामचि सत्यपणें गा ॥
पार करी भव सारचि हें हरि क्रोधचि संहरि ह्याच दगा गा ॥ ८० ॥

क. ग्रं



ग्रं. क्र. ३७४८

फार जि जन्म म्रि-भोगुन श्री हरि दुःखित हें मन संसृतिला ॥
या नर जोन्मसहि मोह भ्रमें मति भूलचि पांघरि हे सहिला ॥
तारक तूं परि मारक कर्म हें थारत नाहिंच ऐक्यपणीं ॥
काय गती हरि कैसि तुं लाविलि सांग मला निज आप्तपणीं ॥ ८१ ॥
हें मन पार्थिच राहुं सदोदित भाववळें निज आत्मसुखा ॥
नामिं मला बहु प्रेमळ ती मति देईं सदोदित कामसुखा ॥
गोडि ति सज्जनिं नित्य असो मनिं तोडुनियां जणुं काम सुखा ॥
सात्विकता प्रगटो रज नाश तमा अभवार्णव लावि मुखा ॥ ८२ ॥
घोर नको मज रोगचि हा जणुं सत्यचि भोगहि दुःख दुणें ॥
पुर्ण नसे मन द्वैत करी मति धांमट ही गति सत्यपणें ॥
थोर विचार जि काम नको उरिं राम जपूं घरीं बैसुनियां ॥
देइच ही परि सौख्य असो उरिं काजचि संहरि या घडि या ॥ ८३ ॥
मानव देहाचि दुर्लभ दुर्लभ या जग लागुनि सत्यपणीं ॥
त्यांत हि भक्तिच दुर्लभ वाटति नीजपणीं हरि ऐक्यगुणीं ॥
सोडुनि हा भव घोर धुरंधर पार तरा भ्रम हा हरि गा ॥
वीषयिं घांसुनि नासुं नको मति त्रासचि दायक हा हरि गा ॥ ८४ ॥
या हरि रंगणिं मानसही जड व्यर्थ हि या वढि दौडुं नको ॥
रामकथेवरि चित्त सदोदित प्रेम भरी मनिं सोडुं नको ॥
आगमधामिंच आश्रमवर्णि तुं कर्मिंच राहुनि प्रेम पिको ॥
संत समागमिं नीगम ही मति आत्मप्रचीति तुं तोडुं नको ॥ ८५ ॥
संन्निध काळचि लक्षुन मानसि नासिल साचचि हा न बरा ॥
वा फससील तुं कामिक घोकणिं मोहचि हा मनिं पाहें बरा ॥
वास्तव सोडुनि राम करी धणि ज्या मुकुटामणि नीज निका ॥
सांवळि ती तनु ध्यान मनोहर लक्षि चराचर आत्मसुखा ॥ ८६ ॥
सान्वित ही मति सत्यचि या जगिं ही धन जोडिच रामसखा ॥
गाउं सदोदित भाउं मनामधिं होउंचि या धणि प्रेमसुखा ॥
हा हर प्रीयचि भाववळावरि शांति ति हो शिरिं श्रींगंगा ॥
पार्वति ही सति ज्ञानगती निज[illegible] शिव [illegible]गा ॥ ८७ ॥

अनुक्रम ५८८८९

हात मिशावरि दर्पणिं पाहुनि मोडिसि नेत्रहि फार मजा ॥
कां गमजा तरिं सार नसे जणुं वारचि घालित काम गजा ॥
थाटहि हा मिट फारचि वाइट घोर नसे निट संसृति ही ॥
बोध धरी मनिं शांत करी मति ध्यानिं सितापति सत्यचि ही ॥ ८८॥
मानव होउनि राम स्मरा मनिं तारक तो धणि या जगतीं ॥
पार करी तुज हा भव सागर तो पतितोद्धर ईश गती ॥
याविण आणखि येथ दुजा धणि नाहिंच जाणुनि साधि हिता ॥
भास्कर वासिनि वासहि काननिं गाति मुनीजन आत्महिता ॥ ८९ ॥
भोगचिभोगुनि कामचि मीटवि ऐशि हि रीति तुं जाणचि गा ॥
राम मनामधिं गाउनियां गुणिं प्रेम चढो वरि सत्यचि गा ॥
कर्मचि हे गति देइल नीगुति भावधरी गिति एकपणीं ॥
सावध होइ तूं मान नको मनिं व्यर्थचि कामिनी द्वैतपणीं ॥ ९० ॥
त्रासचि हा घरिं मोह बरोबरिं काम असे उरिं हाचि बुरा ॥
नासिल ही मति आग्रह गांठित सत्यपणीं मन येथ झुरा ॥
वास्तव सांगणें बा तुजलागिंच मानासिं घे नित तारिल रे ॥
तो जगदीशचि शीव गुरूवर पार्वतिचा वर सांचचि रे ॥ ९१ ॥
तारि सितापति मी दिन पामर नाहिं मला मति सत्यपणा ॥
नामचि गायिन भाव धरूनि जि ठावचि दे मज ऐक्यपणां ॥
कांहिं नको मज आणिक जोड ति सिद्धपणीं फुग घाणचि ही ॥
पाव दयानिधि पार करी मज देइ विवेक तुं साणचि ही ॥ ९२ ॥
ये रघुवीर जि ये जगपालक तारि मला हरि ये मजला ॥
धांव दयानिधि धांव सितापति देइ मती मज हे विठ्ठला ॥
पाहि मला तरि दृष्टिस लक्षुनि कष्टित ही मति फारचि गा ॥
देइ मला निज मोडि भवा बिज सत्यपणीं जिव तारिच गा ॥ ९३ ॥
सोडुनि कामिनि ही जणुं भामिनि होऊं भवीं निज भाक्त सुखा ॥
भावचिं देउनि भक्ति धरा मनिं शक्यनुरूपचि रामसखा ॥
हेचि प्रियासम नाहिंच दूसरि मानुनियां शिरीं भारचि घे ॥
हैचिच संगति जाण भवीं बुधिं धारण धारक सूखचि घे ॥ ९४ ॥

पाव दयानिधि तारक तूं जग मारक दुष्टचि साचपणीं ॥
खोडिच मोडिहि माझि हरी तुज सांगु किती तरी तूंच धणी ॥
घोर मती निति पार करी हरि थाराचि पायिं दि नित्य सुखा ॥
हे क्षिरसागरवासि प्रभू मज मारुं नको उगिं हीनमुखा ॥ ९५ ॥
हा यति न्यासजि न्यासचि अंतरिं या विषयावरि चित्त नको ॥
बाहिर सोंग मना तुज नाशिल सत्यपणीं धरि वित्त नको ॥
हीं भगवीं तुज शोभतिं चांगलिं मानसिं मानचि कां धरिसी ॥
रामचि गाउनि होइ तुं साम जि ढोंग नको करुं हेचि कुसी ॥ ९६ ॥
माळ कशास्तव काम चढे मग रोगचि हा जणुं तूज डसे ॥
मोह वळावरि नाचत अंतरिं सूख घडीभरि यासि नसे ॥
ही ममता उरिं क्रोध करी शिरिं व्यर्थचि चावरि चाळुं नको ॥
यास्तव आधिंच सावध होउनि वेळहि व्यर्थ तुं दौडुं नको ॥ ९७ ॥
विश्व कुटुंब तुझेंच मि मानुनि ध्यान धरी तव पायिं बरें ॥
याविण आणिक कांहीं न जाणत सत्यपणें रघुराज हरे ॥
ध्यान व ज्ञानहि सोडुनि पाहिन नाम तुझें हरि आननिं गा ॥
तारि मला सुख दायक रामजि पोंचवि पैल थडी वर गा ॥ ९८ ॥
पूर्ण कृपा जरि झालि हरी तुझि काय उणें मज सांग मला ॥
सर्वहि काळजि शूभचि होइल आनंद हा मानिं हो गमला ॥
यास्तव फारचि गोडि तुझी मज लागलि आसजि सत्यपणीं ॥
तारि रमापति येइ सितापति धांव उमापति ऐक्यपणीं ॥ ९९ ॥
मीचि उताविळ पामर फारजि घाबरली मति दीनपणीं ॥
रक्षण कोण जि तूजविणें हरि या नरपूरिंत सत्यपणीं ॥
वेळचि व्यर्थहि चाललि जाणुनि हांवरि हेमति तूं मुनिया ॥
पार करी भवसागर हे इश तूं जगदीश जि हे धनिया ॥१००॥
कोणिं एके दिनिं गोपसंगें हरि खेळत चालले त्या यमुने ॥
गोपिहि सुंदर मागुनि चालति घेउनि गोरस त्या नितिनें ॥
बोलति साजणि आपमधीं गुज होउनि पुंजचि कामनिचा ॥
थारचि जाचणि हा अरे नौतिंत कामरिपू उरिं मोहजिचा ॥ १ ॥

मूळेंच तें मजमाजिच नाहिं जि अर्पण तूजासि मीपण तें ॥
देहरुपें गति भासत जाणुं ति कर्मचि भोगित हें निरुतें ॥
ऐसिच साचपणीं मति ज्या नरिं भासत तोचि जि येथ धणी ॥
बोधचि माखुनि नीगमकाननिं आनंद त्यासचि शोध गुणीं ॥ २ ॥

कोण समर्थ जि या भुवनांमधिं रामजिवांचुनि देखुं न ये ॥
सागर साक्षिसि कोणति गा नदि सत्यपणीं जगिं दीसुन ये ॥
लोकत्रयावरि चालक हा रघु मारक हो अरि शोधपणीं ॥
पार करी निज भक्तजना जसि तारिच ती तिर नावपणीं ॥ ३ ॥

भुक्ति नको मज मुक्ति नको हरि भक्ति च ही बरि वाटतसे ॥
काय प्रभू तुजलागिं उणें धन मानहि फाराचि सत्यवसे ॥
बाप शिरावरि तूं धणि गा मज तारक हो तरिं काय उणें ॥
श्रीमंत जो नर त्याचिये अंगने कां उपवास जि दैन्यपणें ॥ ४ ॥

ज्याचि तुला प्रिति त्या गति काय ति वर्णुं तरी कशि या मुखिं गा ॥
प्रेमाचि पोटिंच पेटिं करूनि तूं ठेवियला नर नामचि गा ॥
सायुज मानित नाहिंच सज्जन सत्यपणीं रघु तूंचि सखा ॥
पूर्ण कृपेचिच ठेव हि गांठिल तोचि धणी जगिं आत्म सुखा ॥ ५ ॥

दुर्लभ हा जगिं देखणि या गुणिं साजणिची प्रित ज्यासि नसे ॥
कामिक मोहिनि मोहत नाहिंच वीरळ कोणिंहि धूर्त असे ॥
दैविच भोगति साक्षिरुपी मन मीपण टाकुनि नित्य सुखी ॥
संगत याचिच अनंत इच्छित रात्रदिनीं मनिं विश्वसुखी ॥ ६ ॥

पाय तुझे गुरु धाल जरी मज काय उणें नच हे मजला ॥
मानित नाथजि हेंचि सदोदित भावित भावहि ते तुजला ॥
एकपणीं मज पायिं धरा जणुं दीन मि बालक लीनपणीं ॥
हे गुरु नाथजि अनंत हा हिन ठाव करी निज ऐक्यपणीं ॥ ७ ॥

बोलाविता धणिं तूंचि मला जगिं याविण आणखि कांहि नसे ॥
मीपण गाळुनि दीप जि लाविसि ज्ञानकळा निज साच वसे ॥
नाहिं तुला सम साक्षि भुमी ताळिं शोधलिया बहु कोटि गुणें ॥
हे रघुनाथजि जानकि कांतजि नीजसखा तुजि आप्तगुणें ॥ ८ ॥

हेजि रमाधव माधव मोहन गोधन पाळय श्यामल गा ॥
जानकिकांत जि राम दयानिधि कामरिपू दुरिकारक गा ॥
गोपिपयोधर तो वर सुंदर सख्य धनुर्धर पार्थंचि रे ॥
कार्मुक पाणिजि तापस मेळिच आनंद भूवन अर्थंचि रे ॥ ९ ॥
तो हरि पाहिन भावत मानसिं दीननिशीं मज चैन नसे ॥
जो अरिमर्दनिं साह्य मुनीजनिं सज्जन मानसिं नित्य वसे ॥
कोण मला असि संगत देसि जि ज्या मनिं भावचि सत्यपणीं ॥
नीजचि चिंतित आनंदि जो रत अनंत मानित तोचि धणी ॥ १० ॥
कामिक हें कलियूचि जणुनि हा धणि मानसिं नित्य जपे ॥
कौस्तुभ तो मणि धारण जो करि मानि मुरारिच हीत कृपें ॥
खासचि खोदुनि त्या गिगमा खणि जाण सखा मनिं हीच असे ॥
खारट हा रज खाजवितो मति खायिल काळचि वाटतसे ॥ ११ ॥
गोविंद हा गुणिं गाथि सदोदित गीतहितें निज जाण ग गा ॥
घामट ही मति घांसुनि टाकि तुं घाण करीलचि हीच घ घा ॥
ङ्हा घननीळ तारि जनाप्रति येक निती मति जेथ असे ॥
हेंचि चराचर चालत ज्याचेंनि हींचि च चा मज वाटतसे ॥ १२ ॥
छत्रपती यति छंदचि वोंकित रामजि रामजि तो सत्संगा ॥
जाण सदाशिव ज्याशिरिं ती सति शांतचि ते निर नाम गंगा ॥
झोटचि भांबर झोंक जटेमधिं तो शशि शीतळ खंडपणी ॥
गांउ मनामधिं भावुं सदोदित टाळुंच काळजि ऐक्यपणीं ॥ १३ ॥
गोडि हरी मज देई सदोदित नामिं तुझे गति प्रेम भरूं ॥
सत्संगति मति प्रेमचि भावुनि नीज हितास्तव अर्थिं भरूं ॥
तूजविणें मज कोण धणी जगिं नाहिंच दिसत हीतकरी ॥
यास्तव चिंतित पाय सदोदित लावि रघू मज नीत वरी ॥ १४ ॥
रामचि तो सुख धाम चराचरिं जाणुनियां मनिं सौख्य वरी ॥
सारचि हा धणि मानुनि मानसिं वाणुनियां गितिं भाव भरी ॥
पार करी मति सार नको लुटुं कारचि जाणूनि पाव तिरा ॥
हा भव रौरव लावि मनांत असें समजूनचि दूर करा ॥ १५ ॥

नाराचि वार करी मनिं सार नसे इचि बोलणि गार परी ॥
थार नसे जसि तार विण्याचिच वाजति गोड ति बोलिपरी ॥
हा भव नाव इचेंचि नरा फसधी मति माजि जसी मदिरा ॥
मोहचि कारण या भरिं मारक जाणुनियां भर आधिं तरा ॥ १६ ॥

कांहिं तुं यांतुनि हें मन तो धणि पार करी तुज भाव धरी ॥
गोविंद गाउनि गोंधळ हा मिटि गोडिच प्रेम जि पोटभरी ॥
काय तुला किति काकुळती करूं काळमती बुरि या कलिची ॥
सोडवि साधुनि साधुजनीं संग सावध नीगुति या मतिची ॥ १७ ॥

गोड तुझे हरि गूण मी गाइन गोपसती जणुं देइ मला ॥
गौळणिचा संग गोप मुलामधिं गोकुळवासि जि तारिं मला ॥
मोह नको शिरिं मारक हा अरि मानित खासचि लावुं नको ॥
आणिक कामहि कांहिं नको मज काळजि कायसि काळ झुको ॥ १८ ॥

येइ रमापति या गतिच्या मति या जगिं नीगुति तारि मला ॥
तामसता उरिं ताल नको मज तारिच तूं हरि सत्य मला ॥
फार फजीतिहि पार नसे इसि पावन तूं परपूरुष गा ॥
भ्रांतिच मोडिहि भाट मि भाविक भार तुला निज अनंत गा ॥ १९ ॥

पोरपणीं हरि पाळियला मनिं पावन तो धणि नीजहितीं ॥
हीतचि साधिन हा वय वैभव हारिन हांसत काळगती ॥
कामचि तोरडि तोडिन ये घडि तारक तो गडि नित्य जपूं ॥
नीज हितास्तव नीजचि साधिन दीन अनंत मि काळरिपू ॥ २० ॥

घोरचि नाहिं जि बोकित रामजि वालवुं काळ जि कर्म सुखें ॥
वर्मचि हें जणुं वागवुं मानसिं वारिज नेत्रचि वर्णु मुखें ॥
जानकिचा धव जाण हरा प्रिय जागत हें मन पाळुं निती ॥
पाळक जो जग पार नसे गुणिं हा जि अनंतचि वाणि गिती ॥ २१ ॥

विकल्प जाउनि वीनवि हें मन वीट बहू जनिं वाटतसे ॥
आठव नाठव दोनिहि मोडि तूं भाव धि नाहिंच कर्मवसें ॥
सोडुनि मायिक सोंगचि सारि जि शोध मनीं मज हाचि गमो ॥
सायुज्य तें पद साधनिं आवडि नाहिं अनंतजि प्रेम गमो ॥ २२ ॥

फार किती तुज फांशाचि ह्या वदुं पावन तूं जग पाळ कसा ॥
दीन मिं दुर्बल दादाचि घेइं तुं दास जनावरि प्रेमळसा ॥
सार कथीं मज सायुज्य वाटत साधु जनामधिं अनंत ह्या ॥
तारि दयानिधि तारि रघूपति या रंक पींपरिं राहत ह्या ॥ १२३ ॥

## १२ शिवस्तुति.

( शिखरिणी )

नमो आदीनाथा शिववर गुरो तापशमना ॥
मनामध्यें ध्यातों निशिदिनिं तुंतें सौख्य सदना ॥
अगा तापानें या भवगतिरुपें फार तपलों ॥
तुझ्या नामें शांती अवगम दिसे व्यर्थ भवलों ॥ १ ॥
अगा शांतानंतोद्र मति परीणाम करणी ॥
गुणीं वागोनीयां अनुभवपणीं योग धरणी ॥
तुंतें गाती सारे विलय मनसा सद्गुरुवंरा ॥
वरालागीं भोळा सदय सदना पार उतरा ॥ २ ॥
लिलाधारी सारे गणभुत गती खेळ रचिसी ॥
नसोनीयां अंगीं विलसत जसी कींर्ण निरसी ॥
मृगाची तृष्णेनें गति बहु सुके नीर प्रितिनें ॥
भ्रमाचेंचीं मानी मृगजळ तया नाम वदणें ॥ ३ ॥
नसोनीयां कांहीं रविगति क्रुरें भास भ्रमवी ॥
वना ठायीं स्थूळाकृति पशु चमू हेत दमवी ॥
तसा नेणोनीयां भुवन दर ह्या आदर करी ॥
सदांचा तो गेला तव गति सिमा चित्त समरीं ॥ ४ ॥
गमावा नित्याचा उगम मतिला याजकारितां ॥
न दूजा साह्यार्थीं गुरुवर सखा तूज परता ॥
पिता माता बंधू स्वगत परिणामाकृति दुजे ॥
कृपेवीणें मिथ्या भविं जनन हें घातक खुजें ॥ ५ ॥
स्मशानी भूतानी विधि हरि मुनी ताप शमना ॥
सदां येती भेटी मदन दहना भव्य सदना ॥

विरुपाक्षा दक्षा कृत यजन नाशा तमगती ॥
तयालागीं नामें भवति विरभद्राचि म्हणती ॥ ६ ॥
तमापासोनीयां उभव पहिला तामसपणा ॥
पणा घालूनीयां हरिवित असे कर्म सदना ॥
अजातीच्या थोरा विजय वचना दर्शन शुभा ॥
सदां तिष्टे द्वारीं निजहित वसें भावित उभा ॥ ७ ॥
करावी आतांही नव नव लिला नित्य रमणी ॥
तुझ्या कीर्ती मात्रें पद पदसरी आत्मतरणी ॥ ८ ॥ + +

## १३ चिरंजीवपत्र. (ओंव्या)

ॐनमोजी दातया ॥ कळा संपन्न गुणालया ॥
गुरुवरा नाथगाया ॥ निज गाया ठाव दे ॥ १ ॥
काय वाणूं तुझी थोरी ॥ आधींच तूं निर्विकारी ॥
गुणमाया शब्दसरी ॥ दृश्याभारीं नाच तूं ॥ २ ॥
सदया प्रेमळ मानसा ॥ निर्विकारा सोहंहंसा ॥
मोह कामोद्भवोध्वंसा ॥ अहंहिंसानिर्दाळित्या ॥ ३ ॥
दात्या आतां माझ्या तापा ॥ शांतवाया प्रेमकृपा ॥
देई सज्ञानाच्या दीपा ॥ बोल बापा आननीं ॥ ४ ॥
माझें जें कां मीपण ॥ तेंचि करूनी आसन ॥
वरी स्थापिलें नाथपण ॥ आतां कारण देहीं तूं ॥ ५ ॥
तुझा जो कां प्रेमभावो ॥ कारण देहीं उठविसी वावो ॥
+ ॥ तोचि ठावो लेखकीं ॥ ६ ॥
स्थूळ मानणें लेखकू ॥ ग्रंथार्थांचा प्रमाणिकू ॥
सत्य मानसाची भाकू ॥ तूंचि एकू जनार्दना ॥ ७ ॥
दीन वाणी परिसोनी ॥ गोंहिवरले नाथधनी ॥
केला आरंभ वोधनीं ॥ निज आननीं संतोषें ॥ ८ ॥
तेंचि शब्द जी लिहिले ॥ नाहीं आणीक योजिले ॥
येथें साक्ष पाउलें ॥ गुरुमाउले नाथाची ॥ ९ ॥

आदी दिली अभयता ॥ जेवीं बाळकाप्रति पिता ॥
पाठीं थापटोनी हातां ॥ सांगती कथा आवडीं ॥ १० ॥
आतां मना तूं हो धीट ॥ साधी गा मार्ग हा नीट ॥
करी कर्माचें पीठ ॥ वाट नीट लाधली ॥ ११ ॥
आजीं चिरंजीव ठावा ॥ लिही साधकांच्या भावा ॥
जरामरण गोवा ॥ भ्रांति वावानासावया ॥ १२ ॥
साधन चतुष्टसंपन्न ॥ त्याचें नाम साधक जाण ॥
मुमुक्षुता शब्द मान ॥ बुद्धी लीन जेथ वसे ॥ १३ ॥
अनूतापभावें जो तपे ॥ नैराश्यें निवटला साक्षपें ॥
प्रेमळू सज्जन भाव रूपें ॥ गुरुकृपे पात्र तो ॥ १४ ॥
अर्जवी लीनता मता ॥ दुर्विषयीं ना ममता ॥
× × ॥ त्या नामला साधक ॥ १५ ॥
सर्वकळा जो संपन्न ॥ जाणे तारतम्य ज्ञान ॥
दीनाप्रती दे मान ॥ तोचि साधन साधावया ॥ १६ ॥
इतर प्रकृतीचे भावो ॥ त्याचा येथें नाहीं रिघावो ॥
सिवूं नये जी हा ठावो ॥ विष भावो तयांसी ॥ १७ ॥
आत्मभाव प्रगटावया ॥ साधन दुर्गम आहे राया ॥
शब्दज्ञानें सुटेचिना माया ॥ मोह काया मूळची ॥ १८ ॥
सोंगें घेवोनि साधू होणें ॥ येथें अर्थ सिद्ध जाणे ॥
नाहीं परी जग भोंदणें ॥ याचि कारणें सोंग तें ॥ १९ ॥
अर्थाविना मानसा ॥ तेथें परमार्थ कैसा ॥
वांजेच्या सुता बारसा ॥ कोणी वसा देखिला ॥ २० ॥
नटें घेतलेंसे सोंग ॥ हावभाव करी चांग ॥
न जोडे स्त्रियेचें अंग ॥ पुरुषत्व भंग न पावे ॥ २१ ॥
ऐके बापा हा निवाडा ॥ तोडाया भव जन्माचा खोडा ॥
लक्ष देवोनियां गाढा ॥ प्रेमें जोडा भाव हा ॥ २२ ॥
सदां असावें सावचित्त ॥ विकल्प नाणावा मनांत ॥
निर्विकार साधायापंथ ॥ शुद्ध भावार्थ राखणें ॥ २३ ॥

कल्पनेचा द्वैतभावो ॥ त्याचेंचि नाम गा भवो ॥
हा शांतवाया अभिप्रावो ॥ हाचि उपावो अवधारीं ॥ २४ ॥
बहू काळ एकदेशी ॥ वसणें नाहीं साधकासी ॥
परीचया अंतीं मोहासी ॥ ठाव कुसीं होईल ॥ २५ ॥
नैराश्य पाहूनियां जन ॥ लाविती मनाला मोहन ॥
देतील देहा सिद्धपण ॥ तेथें मन संतोषे ॥ २६ ॥
प्रतिष्ठा वाढेल अंगीं ॥ मग अभिमाना सुगी ॥
अभिमाना अंतीं जगीं ॥ काम रंगीं चढेल ॥ २७ ॥
कामा मागें क्रोध येई ॥ विवेक तो न राहे कांहीं ॥
मग नाहीं दाहीं वाहीं ॥ हितावं पाही कांहींही ॥ २८ ॥
कायापुरीं ठाणें गांवीं ॥ हकीम आत्मा गोसावी ॥
वृद्ध अनादी या भवीं ॥ समाधी भावीं वर्ततो ॥ २९ ॥
वासना सेता वाटेकरी ॥ इणें वस्ये करोनियां चौधुरी ॥
हिशोब न देतां हुजुरीं ॥ होत व्यापारी ग्रामाची ॥ ३० ॥
विसरोनि गेली धणी ॥ पती केला जीवपणीं ॥
घुसमुसी रांड धणी ॥ काम खाणी मूळची ॥ ३१ ॥
रैत सर्व हांकली ॥ सुख वस्तूला भूलली ॥
धन्याची हो त्या बोली ॥ नाहीं ऐकिली कानींही ॥ ३२ ॥
जीव करोनि आरोपीं ॥ जन्म मृत्यूच्या वाली कूपीं ॥
शांती नाहीं कदापी ॥ माया आपी सर्वथा ॥ ३३ ॥
बोध केणें वसूल बुडे ॥ जिवाजी हे पाजी गडे ॥
सदां कांते मागे दडे ॥ राहे भिडे वाइलेच्या ॥ ३४ ॥
याचा वडील भाऊ सिवाजी ॥ तो त्रासला याचें काजीं ॥
नसे याला कधीं राजी ॥ खडकामाजीं राहिला ॥ ३५ ॥
बंधूचें कर्म मानेना ॥ चुगलीक लात्री आत्मसदना ॥
जीव ठाणें बुडे जाणा ॥ दुष्ट वासना संगतीं ॥ ३६ ॥
हकनाक काया ग्राम ॥ लया जातो बेफाम ॥
कारभारी तेथें पाहिजे साम ॥ विचार परम पाठवावा ॥ ३७ ॥

मग आत्मसदनाहूनी ॥ विचार आला साधक धणी ॥
त्यांणीं केली मांडणी ॥ बाप ती काणीं ऐकावी ॥ ३८ ॥

वस्यें झाला कुळीण कुळा ॥ केला ठाणेगांवीं हल्ला ॥
झाला एकची गलबला ॥ परी भ्याला नाहीं हा ॥ ३९ ॥

गांव पाटील विवेकनाना ॥ कायापुरीचा हा जुना ॥
वासनेचा याचा बेबना ॥ मिळे मना विचाराचे ॥ ४० ॥

अनुतापबाबा कुळकर्णी ॥ याची जाती उंचवर्णी ॥
ठाणेदाराची घसणी ॥ फार जुनी याजसी ॥ ४१ ॥

तिघे झाले एकभागीं ॥ मधूनी शिवाजी लावी आगी ॥
बुडाली वासनेची सुगी ॥ चीरभागीं ठाव केला ॥ ४२ ॥

शिवाजीचा ज्ञानू गडी ॥ हा जातीचा कुळवाडी ॥
नांगर बांधोनि भूमीफोडी ॥ मोठ्या पेढी काढिल्या ॥ ४३ ॥

वासनेचें खुंट मोडी ॥ ममतेच्या ढेपी फोडी ॥
मदाच्या पालव्या तोडी ॥ कास काढी भूमीची ॥ ४४ ॥

भूमी करोनियां शुद्ध ॥ पाहूं आले तिघे बूध ॥
सम देखोनि भूमीपद ॥ केला शोध पेरकाचा ॥ ४५ ॥

पेरक पातले सद्गुरू ॥ जे गुणातीत निर्धारू ॥
त्यासी करूनि नमस्कारू ॥ सर्व व्यापार जाणवीला ॥ ४६ ॥

भूमीची शुद्धता जाणोनी ॥ प्रेमानंदती गुरुधणी ॥
केली सेताची पेरणी ॥ सोहंकर्णी धान्याचा ॥ ४७ ॥

त्यावरी वर्षला घन ॥ खेत म्हामूर आलें जाण ॥
पुढें करी राखण ॥ भक्तीमाळा घालूनी ॥ ४८ ॥

## १४ विज्ञानविलास.

( मालिनीवृत्त. )

जयजय करुणाब्धे निर्विकारा उमेशा ॥ अगुण अरुप भासा नीलकंठा सुरेशा ॥
दिनजनकरुणेच्या प्रेमबोधा सुकाळा ॥ अभयमति असावी चूकवी मृत्युकाळा ॥ १ ॥

( वसंततिलकावृत्त. )

कैलासनाथभजनीं श्रमजाय सारा ॥ संसारसार गवसे समता उभारा ॥
जंजाल रंजक सखा सुख आत्मप्राप्ती ॥ सर्वांभुती विभुति हे उपमे न [illegible] ॥१॥
अद्वैत बोध करण्या गुरुराज माझा ॥ योगेंद्र शंकर भवीं असला न दूजा ॥
ज्यांचेंनि रामयश हें हृदयीं वसाया ॥ जाई कया अभिमती सुफळार्थ [illegible] ॥२॥
अज्ञान अंधरजनी मुळ वासना हे ॥ जाणीव जोड जडणी भवभ्रांति [illegible] हे ॥
ना ज्ञान नाश करि या विपरीत अर्थां ॥ अर्थार्थ ते शिवगुरू स्मरणें समर्थी ॥ ४ ॥
गंगाधरा मुखिं धरा भवभ्रांति हारा ॥ हारा करा निजकळा जमवा सुधारा ॥
दावील कोण दुसरा स्वरुपानुभावा ॥ जो शांतिचा अखिल शोध हरी अभावा ॥५॥

( मालिनीवृत्त. )

शिव वदनिं वदावा प्रेम भावें करोनी ॥ सहजचि मग जावें मोक्ष भावा वरोनी ॥
दिनजनकनवाळू दास पाळी अभेदें ॥ मति नय विनया दे अंतरीं प्रेमबोधें ॥ ६ ॥

( इंद्रवज्रा. )

वाक्यें करोनी गुरु शिष्य भावो ॥ सारा हरोनी उभवे स्वभावो ॥
भक्ती गुरूची शिवनाम कारी ॥ बाकी उपाधी बहुतां प्रकारी ॥ ७ ॥

( स्वागता. )

श्रीगुरूवर रूपा करितां न ये ॥ गूण भाव महिमे वदण्या भिये ॥
वर्णितों तरि तया सम व्हावया ॥ भावनेमधिं असे भयनाश या ॥ ८ ॥

( शार्दूलवृत्त. )

संतांचा महिमा अपार वदतां संतोष वाटे मना ॥
संतापा उरण्या उरीं गति नसे भावार्थ हे भावना ॥
संता संतपणा अनंत जगतीं दूजेपणा त्यागुनी ॥
नाहीं गा अध पुण्य मानस वरी ना कष्ट त्या साधनीं ॥ ९ ॥

( भुजंग. )

मनाचा मवाळू दिनाचा कृपाळू ॥ सुबोधामृतें रीजवी जो भुकाळू ॥
अभीमान जागा नसे कोण कर्मीं ॥ मिळेना कधीं साक्षिला दृश्यवर्मीं ॥१०॥
सदां शांतता शोभवी वाच्य वाचे ॥ जवा देखणें सर्व ठायीं सदांचें ॥
रुची वीषयीं नाहिं ज्या अंतरानें ॥ कशाला अशा पाहिजे घोर रानें ॥ ११ ॥

हटानें तटा माजवी ना कधीं जो ॥ नये शब्द भावें धराया प्रती जो ॥
समे आपरूपी गती सज्जनाची ॥ समानी जयाला जनीं वीजनींची ॥ १२ ॥
अभेदी गिरेचा सुवासा विये जो ॥ सदा सारिखा आरसासा दिसे जो ॥
अगा पाप तापा ययाचेंनि जाणें ॥ जरीं भेटि होई वदूं थोर पुण्यें ॥ १३ ॥
रमानाथही वाट पाहे अशांची ॥ न ज्या आवडी दृश्यभावीं कशाची ॥
अनाथाकृती दीनमुद्रा समुद्रा ॥ सनाथी तया अंतरीं पादमुद्रा ॥ १४ ॥

( मालिनी )

कळ खळ गळ घाली घांट घंटा विनासी ॥
चळ छळ जळ झांकी झांकवी जाण खासी ॥
तळ थळ टळवोनी टांकला गाव शांती ॥
पळपळ फळ बा हें मानसा आत्मकांती ॥ १५ ॥

( भुजंग. )

जसा इक्षुदंडू समानीच गोडी ॥ रसाची करी सज्जनीं तेचि जोडी ॥
जसा लावित्या आणखी गाळि त्याला ॥ रुची सारखी भाव देयी जिभेला ॥ १६ ॥

( इंद्रवज्रा. )

साधू म्हणों ये नचि ज्या उसोसी ॥ निंदा स्तुती ज्या समताचि पोखी ॥
स्वानंदगाभा भवशोभवी हा ॥ चित्तांतरीं भाव भरों महा हा ॥ १७ ॥
परोपकारी मति मान ज्याचा ॥ वमा समावे च्युत आकृतीचा ॥
रसाळ आणी सम सर्व लोकां ॥ असे लवोनी फळतां विलोका ॥ १८ ॥

( शार्दूलवृत्त. )

ज्याजेनी जन जीव मानवि विटे नाहीं कधीं कोणही ॥
राजा रंक समानभाव मनसा साधू भला हा महीं ॥
निर्लोभी निजरंग नांदत उरीं निःसंग संगांतरीं ॥
निर्वीकल्प निराश्रयीं निरखितां निर्लक्ष लक्षांतरीं ॥ १९ ॥
वांटा मोक्ष तटा हटा हटवुनी सांटा सुटा साठवी ॥
कांटा काम फुकावया निज मुखें काका न आका भवीं ॥
टीकाकार पिका भत्रीं उभविता आत्मार्थ भावें कवी ॥
कोवीदा किरकोळ कोश सकळी भावार्थ जो दाववी ॥ २० ॥

फांटा टांक.तटा भटा हट मठा दूठाव कूटा तुटा ॥
फूटा पूर्व घटा नटाकृति कटा खोटा वराना सुटा ॥
भेटा भेद सभे उभे नभ सुभे जीभे दुभे आवडी ॥
भेटाया हरि ये हरान्वय प्रभे वेदां भुजीं सांवडी ॥ २१ ॥

( मालिनी. )

कुच चटक कळेची काजळी अंतरी ना ॥
सुखकर रस वाणी वर्णि भावार्थनाना ॥
मन अमन जयानें होउनि शीघ्र ठाके ॥
समपण दिठि पावे ज्ञेयज्ञसी सुफांके ॥ २२ ॥

( शार्दूल. )

कर्मांकर्मगती कदां निरखिना ना कामकर्मी लिंपे ॥
कामें काम झुकावुनी मति सुखा काराप्रती जी लिंपे ॥
विज्ञाना भरणें वितोष भुमिके वीलास आत्मान्वयें ॥
विज्ञप्ती मम विद्यमान मतिची सद्भाव या बोलुं ये ॥ २३ ॥
बाकीचे बरवें बळें बहु गुणीं बाजेकरीं भ्रांतिचे ॥
बाजारी भणगे बकाकृति कथे गाबाळ संसारिचे ॥
नाना ढोंग मते न ते विनयते दाते घरें धुंडिती ॥
मुंडी ते तनु आश्रमीं सकळही मुद्दा न त्यांचे मती ॥ २४ ॥
शास्त्राचे कसले सभाधिटपणा वेदार्थ पांघूरले ॥
मायेनें मद मारवले मन कळे वृत्त्यांश ते वाढले ॥
ढीले धीट कसे अवीट धिंवसे धीरा धरूं हे गणू ॥
वाणूं काक कसा समान भविं या त्या राजहंसूं म्हणूं ॥ २५ ॥

( शिखरिणी. )

विधीचें चालेना मत मति जया तेथ नर हे ॥
विधीच्या छंदानें विलसति कसें भ्रांति भव हे ॥
न वाचे वर्णूं ये परपुरुष हा प्राप्त चिकळे ॥
परेहूनी जो कां पर विरम तो वीर सुबळें ॥ २६ ॥

( शार्दूल० )

संताचें वर दूर फार गमतो भावेंविणा ना कळे ॥
जैसें जाग्रति जोर ना शशिकरीं भानूकळे आकळे ॥
भोळे भाविक भोंदण्या वळ भरें वाक्यार्थ ते कोंवळे ॥
अर्थाचें धन धान्य मोहक खरे कामार्थ वारी तळें ॥ २७ ॥
वीणा ताळ कशास झांज चिपुळ्या काळ्या प्रती गावया ॥
काळा काळ अकाळ कारणाविणें कार्यार्थ हारी भया ॥
माया मोह तया भयाकृति नसे वार्ता असे वार्तिकी ॥
वर्ते शून्य अभावुनी मतिदरी माजीं न हो लौकिकीं ॥ २८ ॥

( मालिनी. )

परपुरुष वराया बावरा अंतरानें ॥
परतनुपदभावा भाववावें मनानें ॥
परपण जवं भूतीं भास दे वासना हे ॥
भवभ्रम समजावा ज्ञान अन्योन्य तें हे ॥ २९ ॥
परम पद पराचें प्राणिमात्रें भजावें ॥
परि पळतचि गेले जेथ लागे गळावें ॥
कलिमळ वळ भावो भाळिं वाजे विकारा ॥
भजन पुजन ठायीं मानसानें नकारा ॥ ३० ॥
तनुभर घर कांता सूत लेकी सुनांदी ॥
मति मद रमताहे आसमानें स्वभेदीं ॥
सहजचि मति रंगे द्वैत भावीं ययानें ॥
अभिमति गति बंधें भ्रांतिच्या काननीं न्हे ॥ ३१ ॥

( पृथ्वीछंद. )

गुरूवर सदां सदाशिव वदा मदा त्यागुनी ॥
नराधिक परात्परा उगम हा मिळे साधनीं ॥
वनीं उपवनीं जनीं विजन तें समानी सुखा ॥
सुकाळ कथितों फुका शिवकथा वदे तूं मुखा ॥ ३२ ॥

मुका नच बसूं सुखा त्यजुनियां गड्या साधका ॥
अभाव भव सागरीं भ्रमबळे बसे गा धका ॥
मवाळ मनसा असे निसिदिनीं सदा जोडणी ॥
अनंत मतिचा सखा विनय तो जगा जो धणी ॥ ३३ ॥

## १५ हरिविलास.

( भुजंग. )

मना साधकाची कळा ऐक आतां ॥ गुरू प्राप्तिलागीं नसावी अहंता ॥
अहंता झडाया झटात्रें हटानें ॥ न जो सूख मानी मठादी नटानें ॥ १ ॥
विरक्ती गतीची मुळी मानसाला ॥ जया विषयींचा न सोसे मसाला ॥
कशाला वळे दृश्यभागीं सभागी ॥ सुदैवीच तो वाढताहे जगांगीं ॥ २ ॥
लक्षांश साधी गित गातवाचे ॥ ना सांकडें कर्मगती भवाचें ॥
ज्याला सदांची भवभान चींता ॥ गांजादला जो तनु मान वेतां ॥ ३ ॥
साधनें सकळ हीं घडलीं जया ॥ आगमीक विधिभाव तरीं तया ॥
भासणें विषय कालकुटाकृती ॥ जन्मनाश भय ज्या कुमराकृती ॥ ४ ॥

( शार्दूल. )

नित्या नित्य विचार मानस गती ठायीं असे जोडला ॥
वांच्छी सद्गुरुप्राप्ति पावन करी ऐसा मिळावा मला ॥
शास्त्रांचें नच मानणें गतिप्रती ना शांति त्या होतसे ॥
जैसें जीर्ण पडे नवें वसन तें घेतां जना होतसे ॥ ५ ॥

ग्राम्यगीत अरुची कर मानसा ॥ चंचळाकृति दिसे जगिं माणसा ॥
येकला रिजतसे नच संगती ॥ कर्मधर्म सकळीं नच रूचती ॥ ६ ॥
दक्षते करुनियां परपाक्षि जो ॥ भाव भावित मना हरि लक्षि जो ॥
भक्त तो भवजतीं प्रति टाळिता ॥ ना म्हणूं भ्रम भवांत विटाळिता ॥७॥

निंदानुवादें नच वाणि वागे ॥ जो कारणार्थी रववाणिवा धे ॥
कोणाप्रतीही गति वैर नाहीं ॥ प्रीती न मानी जनदेहगेहीं ॥ ८ ॥
सिद्ध साधक समान करूं घडे ॥ येक लक्ष उभयां गति ऊघडे ॥
सिद्धगूण निरखी मति साधकू ॥ सिद्ध साधनविगा मग कौतुकू ॥ ९ ॥

मुमुक्षूपक्षातें उगम मतिचा मुक्तिविषयीं ॥
सदां मुक्तां गाती भरिन भरती तेच विषयीं ॥
गुरूभक्ती मोठी इतर सकळी प्राप्ति गुरुसी ॥
गुरू लाधे तेंव्हां सकळहि समी आपवतसी ॥ १० ॥

बहू लक्षणें साधकांचीं सुकाजीं ॥ तितिक्षा उरीं नम्रता भूतकाजीं ॥
जया मानसासी विवेकान्वयानें ॥ असे व्यापिलें प्राण जेवीं तनूनें ॥ ११ ॥

श्रद्धा शुद्धमती स्वभाव रमवी, सात्वीक निःशेष जो ॥
कामादी उदरीं विमूख विषयीं गांजी निती नीज जो ॥
त्याचें मानस वज्रभाव मतिनें मोहादिकां ताडण्या ॥
थोडा हा विर मानवी इतरही येई जि कां देखण्या ॥१२ ॥

( पृथ्वी. )

उपद्रव परां स्वभाव सहजे कदां ना करी ॥
सुखें विचरणें गुणार्णवगितीं असी चाकरी ॥
करी नरहरी मुखें भजन जो सदां सारिखा ॥
रमापति तयाहुनी कधिंहि ना दिसे पारखा ॥ १३ ॥

निष्ठुराकृति नसे कधिं लौकिकीं ॥ वाणि वाक् सरळ ज्यास अलौकिकी ॥
दृश्य नैश्वर असें अनुभवानें ॥ भाविलें रुप जिणें अजपा मनें ॥ १४ ॥

यात्रा अनेकीं गुरुपायिं भावी ॥ भावीक चित्तीं भव हा अभावी ॥
संसार नाशास्तव देहधारी ॥ आला हरी हा विधि भाष्यकारी ॥१५ ॥

सुपुत्र जननी प्रती उगवला कुळां उद्धरी ॥
भवांबुधि मधीं जगा तरविण्या असे जो तरी ॥
अलाभ जडणी सुसाधक मती प्रती बाणते ॥
समोह दवडावया नरगतीमधीं वाण ते ॥ १६ ॥

आहेत भारीं गति लक्षणें तीं ॥ कांहीं वदें मी उचिता कृतीं तीं ॥
याचेविणा ईतर थोर सारे ॥ सारार्थवीगा भविचे पसारे ॥ १७ ॥

गुरुवर सुखकरी पाहुनी साधकाला ॥ समजुन वरि तूं हे मानसा साध काला ॥
जनन मरण दुःखा पासुनी सूट आतां ॥ अभय वर अनंता नाथपायीं पहातां ॥१८

## १६ रंग.

विनोदार्थ वाणी गुणें या गणेशीं ॥ वदों आननीं नामलीला सुखासी ॥ नमूनी पदीं प्रार्थना प्रेमरंगें ॥ करी आवडी दे मती ऐक्य रंगें ॥ १ ॥ मना प्रार्थना हेचि तूतें करी मी ॥ नको वीसरूं ठाव घे अंतरामीं ॥ नको गुंतु कोठें कदां लौकिकीं या ॥ अपाराकृती सर्वही जाण माया ॥ २ ॥ नराकार देहो मनूजा सुखाचा ॥ वरा लाधला नाससी तूं फुकाचा ॥ अभीमानभारें सदां द्वेषनिंदा ॥ तमें माजसी सोडिसी हीत धंदा ॥ ३ ॥ कांता कांचन कारभार गतिचे कांचे तुळे रंग हे॥ चित्ता चिंतन त्यागणें हरि गुणें राहे बहू सूख हें ॥ नामाचा महिमा अपार पसरे साधू सुसंता मुखें ॥ सद्यःप्राप्ति पदीं जडोनि नुरवी इच्छा मदांदी भुके ॥ ४ ॥ देहावसान समयीं समता गमाया ॥ न्हेयी लयास सकळी तनु राग माया ॥ देहांत काळवरि जो अभिमान वागे ॥ तेथें समाधि सुख तेज जमा न वागे ॥ ५ ॥ रंगावें स्वरुपीं स्वबोध कसणीं प्रत्यान्वयें पाहुनी ॥ आत्मानंद सबाह्य दृष्टि उभवे नाहीं नफा या हुनी ॥ बाकीं साधनिं सार साधत नसे भ्रांती कळो लौकिकीं ॥ ज्ञानें पिंड न तत्व साद्दश कळे सामावती लौकिकीं ॥ ६ ॥ ज्याचेंनी सकळा कळा प्रभवती तो साच आत्मा उरीं ॥ भावेंभावित भावना तनुमिषें बंधत्व स्वप्नांतरीं ॥ नाहीं जाग्रत जाहला समरसें कैसा सुखीहोय तो ॥ घोंटाळे विपरीत आपणपणें जाणे खुणे थोर तो ॥ ७ ॥ कमळ नयन कृष्णा कौतुका काय वाणूं ॥ समपण जड साक्षी दृश्यता ही न वाणूं ॥ अजर अमरकंदा ईशईशा अनंता ॥ सदय हृदयछंदा ऐक्यकारा महंता ॥ ८ ॥

## १७ अनुष्टुप छंद.

सायुज्य पद साधाया साधनें बहु कोटिलीं ॥ परी गुरुकृपेवीणा अदेती फळ सर्व ही ॥ १ ॥ शास्त्रवादें विवादीता वाद वाढे न सार्थकीं ॥ वेदवाणी सिमा झाली कोण तेथें रिघे गती ॥ २ ॥ शद्वभावा अभावोनी माळ घाली समान्वया ॥ भावना शुद्ध ज्या गेहीं त्यासि साधे सहजाकृती ॥ ३ ॥ अभीमान न वागे ज्या अंतरीं निजदेखणा ॥ असक्त विषयाभागीं देखणा परमापदा ॥ ४ ॥ बहू शीणे तनूभावें नाशकारी म्हणोनियां ॥

लपोनियां जगीं वागे लौकिकीं वेड पांघरी ॥ ५ ॥ अनूभवी भवीं नीती धत्यावृत्ति करूनियां ॥ जैसा हंस नीर क्षीरा विभागी गति आपुले ॥ ६ ॥ नित्यानित्य विचारी जो सारसाक्षी समान्वयीं ॥ अलक्ष लक्षणें चिंती चित्तचतुष्टय साधनीं ॥ ७ ॥ गुरुशिष्य गतीभावो साधका द्वैत लक्षणें ॥ अनंताकृति कामारी साधनीं शब्दभावना ॥ ८ ॥

## १८ अभेदावळी.

( शार्दूल. )

द्वंद्वाकार अभास साधन धना ध्यानाविणें ध्याउनी ॥
ध्यातों ध्यान समान आत्म भवती ऐक्यान्वया भावुनी ॥
गूणातीत गती निती अमहिमा वाणी परा जाणण्या ॥
साक्षी दृश्यविणा अभाव इजसी भावार्थ हा भोगण्या ॥ १ ॥

स्वानंदान्वयसार साक्षिविण तें साक्षित्व साक्षीरुपें ॥
साक्षी क्षीण क्षणेक क्षोभ भवती शिक्षा सुरक्षी कृपे ॥
शिक्षी राक्षस लक्ष दक्ष मति जो तो निर्विकाराकृती ॥
वर्णी हें मग वाणि काय वदनीं दृष्टोत्पती प्राकृती ॥ २ ॥

जेथें ना गुरुशिष्य द्वंद्वगतिनें द्वंद्वातिता त्या कसें ॥
द्वंद्वार्थी कथुं ये अनेक वचनें गूणाब्धिवाणी वसें ॥
जैसें कांचन कोळसे कृति जमे साक्षान्वया वाणिलें ॥
किंवा हंस सुशांत शुभ्र गणिले कृष्णाकृती कावळे ॥ ३ ॥

वांजेचा सुत लग्न लावित वधू देहाविणें आणिली ॥
त्याचीं संतति पोसली मृगजळें तेथें वनें कावली ॥
रोगानें बहु जाचिला अजर तो त्या तें कधी वैद्य जी ॥
कूर्माचें घृत भक्षणें सुखकरी ऐसी रुपीं साक्ष जी ॥ ४ ॥

ना बोलवे परि वदूं सहजानुमीसें ॥ नाना गती वळधती सदरे अमोसे ॥
सामावले सदय ते गति हेत त्यांचे ॥ जें साधकांनुभव ते सदशोधनाचें ॥ ५ ॥
अनुभव भवभ्रांती भावभागी विभागी ॥ सम गति रवि वाटे अंधकारा नभांगी ॥
समपण समयातें येत ना याग योगी ॥ सुत नच धन लाधे भ्रष्टल्या वर्णे योगी ॥ ६ ॥

पितृ धनातें सुत भोगिताहे ॥ जो वागवी आश्रम आपणाहे ॥
तैसा स्वसुखाकृति आत्म ठेवा ॥ जो जागवी स्वात्म अभेद भावा ॥ ७ ॥
स्वबोधाविणें स्वस्वरूपीं अरूपी ॥ गती वाद वीवाद नाना प्रतापी ॥
नये तत्वज्ञानें समाधानि अंगीं ॥ तनूभावनें सर्वेही रंग रंगीं ॥ ८ ॥

( शिखरिणी )

घनानंदाःकंदा परम सुखदा कारण महा ॥
प्रभा तुर्या सूर्या विपरितपणें तूंचि भव हा ॥
अगा तूजी माया अपरिमित ही स्थूळ गतिला ॥
बहू पुण्यें लाधे क्वचित भवती साधु विरळा ॥ ९ ॥

सागरांगिं लहरी नग कांचनाचे ॥ वास तंतुगतिनें रस लोचनाचे ॥
सर्वभूत भवती बहुताकृती ॥ ऐक्य आत्मपदवी जनआकृती ॥ १० ॥
आत्मा न सूखी नचि दुःखकारी ॥ भ्रांती गुणाची बहु हे विकारी ॥
साक्षी यथार्थीं समजे मना तूं ॥ बाणोनि त्यागीं सकळीक हेतू ॥ ११ ॥

( शार्दूलवृत्त. )

जैसा नाचवि खांबसूत्रि कळ तो काष्टाकृती बाहुलीं ॥
नाना भेद करोनि दावित जनां नाचावया लागली ॥
कोणी जन्मत संहरे कवणही लीलाकृती सूत्रिची ॥
नाहीं सूख न दुःख सूत्र धरि त्या आत्मार्थ तैसा शुची ॥ १२ ॥

भानू नभांगी उदयास्तकारी ॥ कांती तयाची जगदृश्यकारी ॥
सर्वाभुतीं जो दिठियेक दीसे ॥ जो सर्वठायीं उगमो प्रकासे ॥ १३ ॥
अनेका घटीं नीरसंयोगयोगें ॥ प्रतीबिंब भासे कृति कारणांगें ॥
घटीं नीर हाले रवी तेथ तैसा ॥ समाधानिठायीं तयाच्या सरीसा ॥ १४ ॥
घटाकाशठायीं नसोनी तमारी ॥ उपाधीरूपें भासणें तेजकारी ॥
घडा भंगतां भंग ना होत सूर्या ॥ तनूअंगिं तैसी प्रभा आत्मतूर्या ॥ १५ ॥
घेतां न देहा प्रिति आत्म ज्याची ॥ नासे तधीं नाहिं जया अशूची ॥
मायाविकारे नच हा विकारी ॥ ना जाड्यता या नच हा भिकारी ॥ १६ ॥

ना गूणयोगें गुणिं व्यापुनी हा ॥ चित्तान्वयाचे गति वेगळा हा ॥
जें चित्त चिंती मति बोध बुध्धी ॥ देहावसानीं नच आत्मशुद्धी ॥ १७ ॥

क्रियेवीण जेथें ळळे इंद्रियांचे ॥ सदां पूरती कोड ना आणिकांचें ॥
कदां देहपांगें न भागे मतीनें ॥ जया आत्मप्राप्ती समानी गतीनें ॥ १८ ॥
जया लागीं लाधे जधीं दैवयोगें ॥ धनाचा सुठेवा तधीं भीक मागे ॥
असे ना घडे पाहुनी त्या धनाला ॥ दरिद्री बहू तोषताहे मनाला ॥ १९ ॥

( शार्दूलवृत्त. )

बाला भोजन जेउनी वरि विडा खायीं समाधानि त्या ॥
अंगीं ना क्षुधिताकृती समपणें निद्रा वरी तेथ त्या ॥
आत्मानूभव भाव बोध उदरीं स्वानंदकारी सुखा ॥
जेवीं जेवण तेधवां मग गमे तेंजी तयाच्या मुखा ॥ २० ॥
गातां गोपिपयोधरा धरणिचा हा मानवी मानुं ये ॥
नाहीं ज्या हरि आवडी तरि नरा कायापुरी व्यर्थ ये ॥
बाकी जन्म अनेक भोगित गती तेची जरी मानवी ॥
काया काय करी मती भ्रमवितें ऐसी गती या भवीं ॥ २१ ॥
नाडीले भवभ्रांतिनें गति बहु भांबावले ते जनीं ॥
मानीतीं तनु हेतपूर्ण पदवी ना चित्तशांती मनीं ॥
रानीं राहत ग्राम त्याग करुनी कामावरी कावुनी ॥
बा गा व्यर्थ कशास सोस असला गायीं रघू आननीं ॥ २२ ॥

## १९ निजानंदवार्ता.

( भुजंग. )

नमो आदिनाथा अनादी परेशा ॥ नमो मोहमुक्ता महंता सुरेशा ॥
नमो दीनबंधो सर्वसाक्षी स्वभावा ॥ नमो गा नमो मोकळी भ्रांतिभावा ॥१॥
गुणातीत छंदा अभेदा मवाळा ॥ गुणाकारवृत्ती दिनाच्या कृपाळा ॥
सुखालागीं गोडी निजानंदवार्ता ॥ करोनी स्वयें ना दिसे कार्यकर्ता ॥ २ ॥
वाचा वदाया श्रमती तुळाजी ॥ वेदांत लाजे समता न साजीं ॥
सिद्धांत सिंधू भरला परी तो ॥ सिद्धाश्रमाचा अभिमान घेतो ॥ ३ ॥

कार्याविणें कर्म कसें घडावें ॥ कार्यार्थ बोधें समते दडावे ॥
आहेत येथें बहुते नटावे ॥ या कारणानें स्मरणें नटावें ॥ ४ ॥
ज्याची मती हो सहजाकृतीची ॥ दूजा न वाणी भ्रमभाव टोंची ॥
कोण्याहि भावें दुसऱ्यास त्रासी ॥ ना डाव ऐसा गुरुसुख त्यासी ॥ ५ ॥
बाकी तमासे सकळीक खोटे ॥ इच्छा मनाची फिरते तिवाटे ॥
मायीकभावें जग हें अविद्या ॥ विद्या करी ते सकळी अविद्या ॥ ६ ॥
कांहींच नाहीं प्रित या स्थुळाची ॥ ना कारणाची तनुलिंग याची ॥
जो कां महाकारण भेद दावी ॥ तेथें प्रभावे प्रचिती अभावी ॥ ७ ॥
वायां दुजाची करणें पुजा रे ॥ जेथें न भेटे स्थिति प्रेम बा रे ॥
काया मनाचे भरिला भरावें ॥ वारी समस्ता समते धरावें ॥ ८ ॥
मुक्ती कशाची मरणें भ्रमानें ॥ युक्ती फुंका रे सकळीक जाणे ॥
शांती न जेथें तिळमात्र प्राप्ती ॥ वार्ता त्यजावी नच कोण आप्ती ॥ ९ ॥
आदी अनादी जगदांतरंगी ॥ रंगे मना तूं नच या तरंगी ॥
भंगी भवातें सुजनाख्यसंगें ॥ विश्वास राखी स्वरुपीं प्रसंगें ॥ १० ॥
निराकार आकार वीकार त्यागी ॥ नको भ्रांतिठायीं अनूराग रागीं ॥
नको भाव नाना प्रकारें करूं रे ॥ वसे सद्गुरू चींतनीं सौख्य घे रे ॥ ११ ॥
नको हे मना घेउं माथां अहंता ॥ नको द्वेष जोडूं वसे क्षेम आतां ॥
मरावें असे एक दीनीं कळोनी ॥ स्थुळाचें भरीं कां तरी व्यर्थ ध्यानी ॥ १२ ॥
दारा सुतांदी करुनी समोही ॥ थारा सुखाचा म्हणसी न होई ॥
अंगावर सेजे शयनीं सुखावें ॥ कैसें घडे हें म्हणणें अवाधें ॥ १३ ॥
ना कोण संगा परिणाम काळीं ॥ जाणोनि मूढा पर मोह गाळी ॥
आका न ताई भगिनी न बंधू ॥ पीता न काका भवभ्रांतिसिंधू ॥ १४ ॥
नीका असावा मतिरंग बोधें ॥ आत्मा स्वभावें मतिमान शोधे ॥
चिंता नसावी स्थुळ पोसण्याची ॥ नामें वदावीं रघुनाथ याचीं ॥ १५ ॥
बहू ज्ञान ध्यानीं कवी कोविदादी ॥ कळा तर्कवादी न होती अभेदी ॥
गुणावेगळी वासना तोष नाहीं ॥ फुकांचींच ढोंगें मनोधी प्रवाहीं ॥ १६ ॥
सज्ञान ज्ञानें उपदेश दाते ॥ आत्मान्वयाचे परिपूर्ण भोक्ते ॥
साक्षांतकारी गुरु हिंडताती ॥ शिष्यार्थ हारी जगतींत नीती ॥ १७ ॥

कोणी अभेदी अवधूत झाले ॥ वर्णाश्रमाचे गति पार गेले ॥
साचें परी हें वदती मुखानें ॥ दीक्षा गुरूची अवधूत मानें ॥ १८ ॥
मूखें वदाया सकळीक सोपें ॥ चालावयां तें नच कोण थोपे ॥
स्वार्थार्थछंदें गति हेत नाना ॥ जाणे मना तूं सकळी तनाना ॥ १९ ॥
मी देहधारी मुळभाव चित्ता ॥ आहे वरी तों सकळीं अहंता ॥
ना दृष्टि येई दिननाथसिंधू ॥ वीकल्प पोटीं अनिवार बंधू ॥ २० ॥
असो बोलणें वाउगें काय कामा ॥ परी बोलवी मीळण्या सौख्यधामा ॥
कळाया मुळासी तळीं दृष्टि यावी ॥ म्हणोनी कळा वाह्य भावार्थ भावी ॥२१॥
तापत्रयातें पळणेंच जेथें ॥ भेदीत बोधें सहजाकृतीतें ॥
दावोनि रंगा निजआत्म ठेवी ॥ देहींच तुष्टीं मतिला न ठेवी ॥ २२ ॥
हारोनि तापा रमवी अलक्षीं ॥ ऐसे हरीचे प्रिय संत पक्षी ॥
कर्मानुबंधें कसतीं जनार्थीं ॥ कर्मीं विमुक्तीं गति ते समर्थीं ॥ २३ ॥
शांती सदांची अनुभाव बोली ॥ ज्यांचें मुखीं हो निगमार्थ खोली ॥
भ्रांतीस थारा नचजेथ कांहीं ॥ श्रीनाथ माझी गुरुमाउली ही ॥ २४ ॥
दावील तैसें लिहिणें प्रसंगा ॥ स्थूळार्थभावें न म्हणूं प्रसंगा ॥
दासानुदासी वसणें अनंता ॥ गायी सुखानें हरिला अजीता ॥ २५ ॥

## २० बोधतत्व.

(भुजंग.)

मुखें काय वाणूं मुखा मूख तूंची ॥ सुखालागि हेवा सुखी होसि तूंची ॥
तुझ्यावीण नाहीं जरी आणि भावो ॥ सदां सर्वदां तूंचि माझा स्वभावो ॥१॥
रमा दासि पायीं तुझी आस तीसी ॥ सदां सर्वदां तिष्ठते जें मनासी ॥
नसे प्रीत तीची दयाळा तुला रे ॥ समानी नसे ती कळा सज्जनीं रे ॥ २ ॥
तुला आवडी मानसीं सज्जनाची ॥ तसी ना दुजाची हरी सत्य साची ॥
निराभास चित्तीं तुला ठाव होतो ॥ जयाना जडे बोध तो सूखि होतो ॥३॥
मनाचा मवाळू दिनाठायिं हेतू ॥ दिना कष्ट होतां जया दुःख मातू ॥
जगामाजिं ज्याणें समावाचि केला ॥ जनीं संत तोची कथेचा भुकेला ॥ ४ ॥
सदां ध्यास ज्या आस तूझीच वागे ॥ मनीं मानसीं प्रेमभावानुरागें ॥
सदां संकटीं दास तूझे दयाळा ॥ अनूतापयोगें उदासीन भाळां ॥ ५ ॥

जया लागिं प्रेमा उदासीहि तेथें ॥ असे सागरापासिं वा हेंचि नातें ॥
जसा चंद्रमा पाहुनि ऊदयीं तो ॥ भरे जो जळें प्रेमयोगें स्फुरे तो ॥ ६ ॥
तसा अस्तमानीं विरे सोम भागीं ॥ भरे वीतरागी तया रूपभागीं ॥
असे याहुनी सज्जनीं भाव भारी ॥ भरे दीनयोगें सदां देहचारी ॥ ७ ॥
दिनाची प्रिती ज्या मनालागिं आहे ॥ वळे अंतरीं सागराचेनिभावें ॥
दिना दुःख होतां जया दुःख होतें ॥ जगीं तोचि साधू जया प्रेम नातें ॥ ८ ॥
बहू संत झाले तरी प्रेमि थोडा ॥ जयालागिं जोडा तयासी निवाडा ॥
किती साधनीं शोधुनी तत्व भेळे ॥ वरें आपणा बोधुनी घट्ट झाले ॥ ९ ॥
निवाळे खरे देहभागीं परी ते ॥ नसे चेहूले विश्वभागीं मनातें ॥
दया शांति थोडी असे अंतरीं ती ॥ असे द्वैतभागीं सतीलागिं नीती ॥ १० ॥
अभीमान योगे द्विधा चित्त होतें ॥ तुझें आणि माझें असे भावतें तें ॥
प्रिती आप्तभागीं असे सर्व लोकीं ॥ दया शांति तैसी तयाची विलोकीं ॥ ११ ॥
नसे साधु गेही असा हा जमावा ॥ सदां भावयोगें जया नाम बावां ॥
तया आप कैचें दुजें जेथ नाहीं ॥ परी भावयोगी समे दीन गेहीं ॥ १२ ॥
मनी सर्वभूतीं असे सार दृष्टी ॥ परि तो अभीमान हो ज्यास वेष्टीं
तयाहूनि दूरीं वरा भीउनीयां ॥ फणीं पन्नगाची सरीची परी या ॥ १३ ॥
बऱ्या वैष्णवी लाविल्या सांग मुद्रा ॥ बहू मंत्र दीक्षा जपे लक्ष रुद्रा ॥
तथापी दुरी देखणा अंतरींचा ॥ समाधान योगें वदे राम वाचा ॥ १४ ॥
जया शांति झाली तया राम बोली ॥ निवाली मती तेथ स्वानंद खोली ॥
नसे पंथ सोपा फुकांचा मुखानें ॥ बहू राम गाणें पवाडे तनानें ॥ १५ ॥
महंती मनीं मानुनी थोर झाले ॥ पुढें शिष्य त्यानीं बहू फुंकियेले ॥
पिढीजाद झाले भले रामदासी ॥ परी त्यामधीं थोडि ती रे उदासी ॥ १६ ॥
सदां अंतरीं काम खेळे विकारी ॥ वरी राम रे नाहिं तो अर्थकारी ॥
समाधानि शांती नये याजि पंथें ॥ विचाराविणें नाहिं ते येथ नातें ॥ १७ ॥
जसें शेतकारी सदां अर्थ इच्छू ॥ तसे संतही अर्थभागीं स्वइच्छू ॥
करी आरती कांकडा कार्तिकेचा ॥ मनीं अर्थ तो दीन गा संपण्याचा ॥ १८ ॥
जमाखर्च तेथें अखेरी दिनाची ॥ चला भोजना आवळे हेचि वाची ॥
जना थोर आमत्रंणें प्रीतिमानें ॥ करोनी समाप्तीसि त्या बोळवीणें ॥ १९ ॥

भली भोळटें भोंदिलीं शोधनीं हो ॥ विठोबा पुढें ताट तें मांडिलें हो ॥
जमाखर्चे चित्तीं तदां घोळतो तो ॥ असा पंथ देवा प्रिती नाहिं होतो ॥२०॥
असे व्याप हा एकदेशी मनाचा ॥ जना भोंदगें पंथ हारे मनाचा ॥
अशायोग पंथाहुनी कामधंदा ॥ करा शेतिभाती स्मरावें मुकुंदा ॥ २१ ॥
कशाला मशालीं हरिभक्तिसाठीं ॥ सदां प्रेमभावें वदे राम ओठीं ॥
अभीमानवीणा नसे कर्मकर्ता ॥ अभीमान जेथें हरी नाहिं भर्ता ॥ २२ ॥
तरी राजयोगी असे मानती ते ॥ बहू दूर आहे निती निष्ठकी ते ॥
जरी देहभागीं गुणातीत व्हावें ॥ मदादीक ज्याणीं मनानी वमावे ॥ २३ ॥
गुणातीत झाल्या पळे दृश्यभावो ॥ पुढें योग जाणे कोणता रे स्वभावो ॥
तयालागिं वारें भ्रमाचें नसे तें ॥ तया राजयोगी असें मान हो तें ॥ २४ ॥
तया अर्थ स्वार्थीं हरी एक दीसे ॥ तयालागिं का पूजयाचेंनि पीसे ॥
नसे येथ निंदा असे सत्य वाणी ॥ सदां संतभागीं मनाला सिराणी ॥ २५ ॥
करूं पाद सेवा करें संतदेहीं ॥ अशी आवडी माझिया हो मनीं ही ॥
सदां चित्त वांच्छी उचिष्टासि त्यांच्या ॥ फिरावें जगीं वाटतें अर्थी यांच्या ॥२६॥
दुजाची रिती बोलण्या काम नाहीं ॥ परी माजसा बोध येथेंचि पाही ॥
नसे केखकीं साक्षि ही मीपणाची ॥ असे आण बापा तया राघवाची ॥२७॥
जसें सूचवी मानसीं देवराणा ॥ तसें लीहिणें स्थूळ साक्षी प्रमाणा ॥
हरीभक्तिभागीं नसों ढोंग कांहीं ॥ तयाहूनि व्यापार कीजे सुखेंही ॥ २८ ॥
करी शेतधंदा किंवा नोकरी ती ॥ भरी पोट सूखें नसे कांहिं भीती ॥
नको ढोंग मांडूं पुढें येम जाची ॥ जसें आवडे तें करी तूंचि रूची ॥ २९ ॥
रघूनाथ येकांत काळीं भजावा ॥ मनोभावरूपें प्रितीनें स्मरावा ॥
सदां चिंतनीं चित्त वागों स्वभावें ॥ तरीं सार्थकीं काळ जाई स्वभावें ॥ ३० ॥
कवी भूतकाळीं बहू बोलियेले ॥ कसेंही वदों राम वाचे स्वलीले ॥
परी पाप जाळी तया मानवाचें ॥ खरें बोलणें साक्षि लागींच रूचे ॥ ३१ ॥
जसे अग्नि संगें तृणा नाश व्हावा ॥ तयाचे परी रामनामीं नवावा ॥
परी येथ खोली असे बोलि माजीं ॥ वदों आननें सत्वरें तेंचि आजीं ॥ ३२ ॥
भयानें किंवा द्वेषभावें करोनी ॥ स्वभावें कुणी प्रेमछंदें भरोनी ॥
हरीनाम गाता हरीरूप होतो ॥ परी द्वैत भावा नसे मान हो तो ॥ ३३ ॥

भयें द्वेषयोगें तदाकार होयी ॥ परी सांग साजीं नसे ही नवायी ॥
नटानें जरी कामिनी वेष केला ॥ तरी त्यास कोणी नसे भोगियेला ॥ २४ ॥
असे एक मार्गीं जया ध्यास अंगीं ॥ तया त्याच रंगीं मिळे देव जंगीं ॥
असे पोटिं तें नाच ये ओंठभागीं ॥ तया मानवा देव नाहीं स्वभागीं ॥ २५ ॥
वसों देह गेहीं प्रिती राघवाची ॥ तुटों वासना दुष्ट ती अंतरीची ॥
जमों बोध नाणें अनूमान मानें ॥ अनूताप दे देखणा सर्व गुणें ॥ २६ ॥
अलिला तूझि ही हीतकारी खरी गा ॥ मनालागिं शांती गमे याचि भागा ॥
अनंता दयाळा जडावा अनंतीं ॥ निती ऐक्य व्हावी स्थुळालागि संतीं ॥ २७ ॥

## २१ ॥ हरीगीत ॥

ॐनमो नरहरी जगदेक रंगा ॥ भेदभात्र नुरवी ममधी कुरंगा ॥
प्रेमसागर कथा गुण तूझ ॥ गावया सुख बहू गति वोजे ॥ १ ॥

( पृथ्वी. )

अभेद अगुणाकृती तव हरी नये वर्णितां ॥
नसोचि उपमा समान तुळणें अशी दृश्यता ॥
कळे इह परी गमे नच बरें दुजें हीत तें ॥
वदोंचि अशि वासना तुज धन्या उरी भाकि तें ॥ २ ॥

( इंद्रवज्रा. )

नामाविणें गति नसे कलिमाजि जीवा ॥
नीराविणें तृण कळे सुख ना रुजीवा ॥
ही पंच भूत अवनी गतिरंगमानें ॥
मेवोदकावत हरी विचरे गमानें ॥ ३ ॥

( शार्दूल. )

योगाभ्यासकळें तपें जपमखें स्वानंद हा नाकळे ॥
भावार्थाविण भोग ना किमपि हा अंधा रवी ना कळे ॥
भक्तीचे बहु गोड कोड सुजना लाधे विना साधना ॥
ठेवा सांपडतां सुखोद्भव भरे जैसा गती त्या धना ॥ ४ ॥
संताचा महिमा महीवर मली भ्रांती विनाशा असे ॥
ज्याना दृश्य समाज जाग्रतिभवो स्वप्नार्थसा वीलसे ॥

सप्रेमें भरले सबाह्य सम जे शांती सुखें पोसले ॥
सर्वार्थे वरिले अलक्ष गतिचे बोधान्वया पावले ॥ ५ ॥
कौतूकी हरि लाघवी भय भवीं नासी तनूमानिचा ॥
गातां नामसुधा सदोदित सुखें हेतू नुरे आधिचा ॥
वाराया भवसांकडे अभिमती योगें बहू वांकडें ॥
चर्चा वादविवाद फार करिती चेष्टाकृती माकडें ॥ ६ ॥
ज्याचा पार अपार शंकर विधी शेषादि सूरा दिका ॥
तेथें लेखक मानवीमति कसीं पावेल ही कौतुका ॥
ज्ञानानें नच साधनें वनवनें धुंडोनियां येकरा ॥
जैसा बालक भास्करा निरखुनी बोले तया ये करा ॥ ७ ॥

( मालिनी )

तव हरि पदप्राप्ती जाणिवे माजिं नाहीं ॥
अभिमति सकळीही विश्वमाया समोहीं ॥
विनय नय कळेचा ध्यास तूतें मुरारी ॥
सदयघन मनोधी संकटें त्या न सारीं ॥ ८ ॥

( भुजंग )

तुला आवडी भक्त भावीक यांची ॥ रमा ना पवे थोरवी ते तयांची ॥
सदां भक्तगेहीं तुझी वास्ति साजे ॥ प्रबोधीं कळा तेथुनीची विराजे ॥९॥
अगा तापनाशा सुखाब्धी विलासा ॥ अजाती अनंता अनामा अभासा ॥
असे दीन मीं मीनरूपीं जळीं या ॥ गुणाब्धीमधीं मीळवी प्रेमठाया ॥१०॥
नको काळ हातीं मला देउं देवा ॥ कृपा आपुली राहुं दे भक्तिठेवा ॥
नको सांकडें कर्मबंधान्वयाचें ॥ पडों देउं चित्ता असों दे सुखाचें ॥११॥
अभीमान ताठा कदांही उठों हा ॥ महामोह चित्तांतुनीया तुटों हा ॥
नको वासना वीषयीं राखुं बापा ॥ गती दे धन्या प्रेमभावा प्रतापा ॥१२॥

( शार्दूल. )

शांती दे मतिला सबाह्य समता वाणी वसों कीर्तनीं ॥
भूतीं सर्व अभेदता गति उठों इच्छा अशी गा मनीं ॥

वाणीवाद रसाळ गाळ कलिचा लोटावया पाठवी ॥
त्याचेनीं सुख भाविका प्रति असे पोटीं यया सांठवी ॥ १३ ॥

( भुजंग. )

उदासीनता ती सदांची असावी ॥ मना मोह गोंवीं कदांही नसावी ॥
मती आत्मबोधीं भरोनी ठसावी ॥ सदां दीन कार्यीं तनूही कसावी ॥१४॥
नसे शाश्वती ही तनू दुःखकारी ॥ असे अष्टधा भावनेनें विकारी ॥
अभीमान मानें रमोनी मरावें ॥ कसें तूजवीणा दिनानें तरावें ॥ १५ ॥
करावी न लागे स्तुती वासुदेवा ॥ तुवां जाणसी अंतरीच्या स्वभावा ॥
तुंची सर्व साक्षी नियंता जगाचा ॥ तुतें वर्णितां शीणते मूढ वाचा ॥१६॥

( शार्दूल. )

सारासार नको विचार मजसी वेई कुसी आपुलें ॥
प्रेमानंद सुबोध दृष्टि उगवों मागें हरी येतुलें ॥
आणी ना मम मागणें किमपिही भोगार्थ ते लौकिकीं ॥
भाजी भाकर खाउनी तुजगुणीं नांदूं जगीं या सुखी ॥ १७ ॥

( इंद्रवज्रा. )

देवा भुकेच्या समयीं मला दे ॥ वासी किंवा कोरडि ती असूं दे ॥
गोडी असों नामसुधेमधीं गा ॥ वार्ता न दूजी उभवूं मनीं गा ॥ १८ ॥

( शार्दूल. )

मुक्तीते नच मागणें मजप्रती भक्तीच देई धन्या ॥
देई जन्म अनेक तेथ वसणें नामामृता बोधण्या ॥
दीनाचे मधिं वागवी समपणें ना आवडे श्रेष्ठता ॥
सिद्धीभाग नको स्तुती रुचि नको जेणें जडे द्वैतता ॥ १९ ॥
तोडावी ममता विरोध सरिता आटो गमो ऐक्यता ॥
येकांता निविजा त्वरें करुनियां मातें तुं माता पिता ॥
भक्ताच्या भजका किती विनवुं गा तूतें दयासागरा ॥
कां गा आजुनि वेळ लाविसि वहू वीवेकरत्नागरा ॥ २० ॥

( इंद्रवज्रा. )

जन्मांतकाळवरि ताठपणा नसावा ॥ नामामृताविण मला नय वासुदेवा ॥
देऊं नको अजनता जन तूंचि भासों ॥ दूजेपणें कवणही गति ते अभासों ॥ २१ ॥

( शार्दूल. )

देवा लीनपणा पणा जिणुनियां वारी मती मीपणा ॥
देई हे अनुमोदना सहज ते गाई तुझ्या तूंपणा ॥
ना कोणा रुसणें चणें किंमपि ते जूने बरे जोंधळे ॥
आनंदें दिन जात कीर्तनिं तुझ्या हेची सुखा सोहळे ॥ २२ ॥
चित्तातें द्रव होत ज्या पर पिडे पासोनियां या जगीं ॥
दीनाचा बहु भाळला सदय तो पेरी सुखाची सुगी ॥
संसारांतर भेद भेदुनि मिठी विद्या अविद्यान्वया ॥
दावी जो सहजाकृती विनयता वंदू पदा त्याचिया ॥ २३ ॥

( पृथ्वी. )

प्रसाद फळला म्हणों जगतिं या न ज्या आपदा ॥
त्रिताप शमुनी मना अमनता अशी संपदा ॥
दयार्णव गुरूसदाशिव वळे तरी हें घडें ॥
अगाध गति हे सुदैव समयीं सुशीला जडे ॥ २४ ॥

( भुजंग. )

इतर ते उपदेश बिजाक्षरें ॥ श्रवणिचे श्रवणीं नच वावरे ॥
सुख तयांत कसें गति ही रडे ॥ क्षुधित या वनिं गोड न हीरडे ॥२५॥
अभिमती भवरी नच गेली ॥ गुरुकृपा घडली इह बोली ॥
करुं नये कवणें नच साधू ॥ धनलुटी जड हा भवभोंदू ॥ २६ ॥

( शार्दूल. )

दासाला हरिच्या सुखा नच उणें स्वानंद जेथें असे ॥
संसारीं मति भागली समुळ ती द्वैतार्थ तो ना दिसे ॥
वेळावेळ नसे कसे भजनिं जो नीशीदिनीं सारिखा ॥
साधू तो जगतींत सादर खरा नाहीं दुजा पारका ॥ २७ ॥

( पृथ्वी. )

जनार्दन जनीं दिसेल दिठिला म्हणूं लाभ तो ॥
समानशिलता दिनोघ लवला नितीला भितो ॥
न पक्ष सम ते समान भुवनीं सदां सारिखा ॥
पदाब्ज रज गांठवीं मन तुवां गमे हा सुखा ॥ २८ ॥

( शार्दूल. )

गावें जी निज भावनें नरहरी नामें तुझीं वाटतें ॥
गोविंदा मदुसूदना जगदिशा मोहांतकामापते ॥
आत्मानात्म विचार भाव सकळीं तूझाच तूं वर्णिसी ॥
साक्षी मात्र करोनि मानवगती भावार्थ तो पर्णिसी ॥२९॥

---

## द० पहिल समाप्त.

| प्रकर्णें. | ओव्या | श्लोक | एकूण |
|---|---|---|---|
| २१ | ४८ | ६१५ | ६६३ |

# श्रीअनंतमहाराजांचे समग्र ग्रंथ.

## दफ्तर दुसरें.

——: * :— —

## १ नौकाचरित्र.

( मालिनी. )

शुक मुनिवर वर्णी वाणिनें राष्ट्रपाळा ॥
फणि–भय–समर्थी त्या भावभक्ती स्वलीला ॥
हरिगुणकथनानें भ्रांति नाशी तमाची ॥
जनन मरण बंदी पासुनी सोडवीची ॥ १ ॥

( स्वागता. )

धेनु चारित वनी घननीळ ॥ गोकुळीं अवतरे जगपाळ ॥
सांवळा निजसखा व्रजवासी ॥ शूक भागवतिं भावविलासीं ॥ २ ॥

( शार्दूलवि० )

गोपी गोपसखा सकाम हरका नांका मुळीं कौतुका ॥
तो कां मायिक लौकिका गुणनिका ठावा गमे भ्रांतिका ॥
भावीके मतिचा स्वभाव सरळा ऐसी कळा गोकुळीं ॥
भक्तीनें वटला रमाधव तळा गोपी मना आकळी ॥ ३ ॥

( दिंडी. )

एक दीनीं कामिनी गोपकांता ॥ खेळवीती न्हेउनी रमाकांता ॥
नदीतीरा पोंचल्या हरीसंगें ॥ नीजरंगें रंगल्या आत्मरंगें ॥ ४ ॥
गोपि गोऱ्या सांवळा एकठायीं ॥ तिरीं आल्या भानुजे चपळ घायीं ॥
लोंकि सूना गौळणी गायिपाळा ॥ लागें वदती प्रीतिनें जगत्पाळा ॥ ५ ॥

( कामदा. )

वदति गोपिका माधवाप्रती ॥ जलक्रिडा करूं आजि नीगुती ॥
मतिजलामधीं बोध नाव ही ॥ त्वरित घालुनी ओलवूं मही ॥ ६ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

ऐकोनी सतिभाषणें मग हरी बोले वरी कौतुकें ॥
नारीनों नरकाम हें अवघडी कैसें तुमाला तुके ॥

नावाडी नसतां तिरा नच शिरे नौका कधीं बायका ॥
भ्रांती भाव नका करूं मज घरीं रागें भरे माय कां ॥ ७ ॥

( वसंतति० )

जाऊं घरा त्वरित गे मति माझि भीती ॥
नीती अशी कशि तरी अबरूं न भीती ॥
टाकोनियां घरिं पती नित कां अशी ही ॥
सूचे तुमां जिव हरी विपरीत गेहीं ॥ ८ ॥

( द्रुत वि० )

जल बहू नच पार अपार हें । सति करें वलवें किमपी नहें ॥
जलधिजापति हा नित सांगतो । जलमिसें मति भाव समावितो ॥ ९ ॥

( चामर० )

बोलिली तदां सती हरीप्रती दटावुनी ।
कां भिती तुला तरीं असी जडे मनांतुनी ॥
ठाउकी असे अम्हां प्रती निती निरामयीं
तारणीं क्रिडा कळे त्यजीं भिती मनामधीं ॥ १० ॥

( उपचित्र. )

हरि तूं बस ये तरणीमधीं । हरि रे भय हा भव बोधनीं ॥
करिसी न कळे असि भावना । सकळी कळते मनमोहना ॥ ११ ॥
तुजला भय ना अम्हां कळे । तव नाम स्मरे तया कळे ॥
अजितां सकळांमधीं तुला । असुनी भितिचा बरा ळळा ॥ १२ ॥

( कामदा. )

ऐकुनी असें कृष्ण बोलतो । भाविकांसि जो प्रेम पाजितो ॥
भक्ति भूलला वश्य जाहला । नाविकेमधीं बैसुं चालिला ॥ १३ ॥
सांवळा हरी गौर गोपिका । ऐक्य जाहलीं ठायिं नाविका ॥
नाव चालवी एक नावडी । बैसली धुरें गोपि कानडी ॥ १४ ॥

( शार्दूल. )

औलें मारित दोघि चौघि मिळुनी मध्यें हरी घेउनी ।
चाले ते तरणी तरूण सतिच्या बाहूबळा पासुनी ॥

गाती गीत सुबोध आननिं बरें उंचा स्वरें सर्वही ।
मध्यें पोंचत तेधवां हरि मनीं भावी कळा ऐक ही ॥ १५ ॥

( वसंतति० )

गोपी मनोघ दढते प्रति कोण रीती । पाहूं अजी अवसरीं कसि भाव नीती ॥
सर्वांतरात्मक हरी नच पार याचा । सत्तारुपें सकळिकें भवभास साचा ॥१६॥
भावें वळें सुलभ तें भजनीं गुणानें । सायास घोर तपना मतिया समानें ॥
भक्ती विधीविण कधीं हरि हा वळेना । सिद्धांत वेद वदती रुप हेंचि माना ॥१७॥
धैर्यास धारण किती मति या सतीची । पाहूं म्हणोन करि तो सरि लाघवाची ॥
आज्ञा करी समिर मेघ भुतांप्रती तो । जो गुण भूत धृतितें जगिं वागवी तो ॥१८॥

( दिंडी. )

मेघ आज्ञे करुनियां वळे तेथें । वायु आला चौदिसेहूनि पंथें ॥
वीज कडके गगनांत बहू हो ती । रवीकीर्णें झाकुळलि तेधवां तीं ॥ १९ ॥
गडद झाली काळुकी मार्ग दृष्टि । दिसेनाची तेधवां गोपि कष्टी ॥
म्हणति झालें काय हें एकायेकीं । अकाळींची वृष्टि ही होत लोकीं ॥२०॥

( मालिनी. )

बहुत जल पडे हो गोपिका भीजुनीयां ।
निथळत तनु ओल्या कांकडी होत वाह्यां ॥
थडि नच दिठि येई तेधवां घाइ झाली ।
डचकि बसत चित्तीं वाटली रात्र आली ॥ २१ ॥

( शार्दूल० )

नावेला घरके पडोनि जल तें येतें मधीं तेधवां ।
पाणी फार भरे बुडे तरणि ती बैसे तदां यादवा ॥
गोपी बोलति आननीं गडबडी कैसें अजी साधवा ।
होई हें नकळे गमे मरण हें आजी चुको या भवा ॥ २२ ॥

राखावें तुजला जळामधिं कसें आजी वदे आमुतें ।
सूचेना मनसा करूं तरि कसें आकांत सर्वांमतें ॥
नौसाला करिती सती जननि ती अंबेप्रती आननीं ।
वांचो या जलिं वासुदेव म्हणुनी देऊं बळी मोहिनी ॥ २३ ॥

( वसंतति० )

कोणी करी नवस तो तुळजा तुकाई । राखे सुखी हरिस या करुनी उपायीं ॥
देवी तुजा करिन गे सम गोंधळाला। मेंढा मदोद्भव दिला खचितेव तूला ॥२४॥

( द्रुतविलं० )

जल चढे गुढग्यावरि गोपिसी । घननिळाप्रति ये वरि नाभिसी ॥
उचलुनी हरिला कडियेवरी । सति धरी प्रितिनें मति बावरी ॥ २५ ॥

तंव हरी सतिला नित सांगतो । तरणुपाय रुपा रव भाव तो ॥
समय हा उभयां जन अर्थकां। मन धरी तरि ये भर लौकिकां ॥२६॥

( शार्दूल० )

फेडोनी चिरचोळिया जळप्रवारोधाकरापासुनी ।
छिद्रें बंद करा विरोध मतिनें राखा मला येथुनी ॥
आतां नाव तळाप्रती वसतही काळांत गे गांठला ।
मोहाचा खटला भला गुणिक हा लाभार्थता सांचला ॥ २७ ॥

मातें माय कशी दिसे यशुमती येथोनियां पूढतीं ।
नीती ही बुडवी भवीं तुमचि गे साक्षी गमे नीगुती ॥
गोपींनें लुगडीं त्यजूनि तनुचीं छिद्रें तदां रोधिलीं ।
इंद्रीयें विषयाकडोनि परतीं ज्ञानेंप्रती बोधिलीं ॥ २८ ॥

( मालिनी० )

कितिक कर करोनी अंजुली पाणि काढी ।
कितिक हृदयिं गेल्या भंगुनी भ्रांति ओढी ॥
समय कठिण आला चित्तवृत्ती उडाली ।
अभिमति तनु भावो भावना ती बुडाली ॥ २९ ॥

( दिंडी. )

नीर आलें नाभिका झांकुनियां । गोपि छातीला लहरि भार माया ॥
गुह्य काया झांकली अंबुमाजीं। तदां कृष्णा घेतला शिरामाजीं ॥ ३० ॥

कंठ बूडे जेथवां गोपिकांचा । अंत वाटे पोंचला सकळिकांचा ।
तदां मूखा पाहती हरीजीच्या । धांव म्हणती माधवा गौळियांच्या॥ ॥३१॥

( कामदा० )

धांव अच्युता धांव माधवा । धांव गोपती आजिं केशवा ॥
नाडलों अजीं तूज मूकलों । गोकुळाप्रती आजिं सूटलों ॥ ३२ ॥
घननिळा हरी तूजवीण ना । कवण रक्षिता वारि यातना ॥
भुमिवरी घरीं आजि न्हेयि रे । दिनमती सख्या गोपि आमि रे ॥३३॥

( स्रग्धरा. )

देवा देवी रुपाला प्रसविसि जगतीमाजिं तूं मूळ देवा ।
सत्तामात्रें जमावा विविधरुप भवा नाम तें वासुदेवा ॥
भावातीता गुणाला नच रिघस्वरुपानीरभावा मवाळा ।
नीराहारी हरी रे अजिं क्रुर दिठि दे सोडुनी गा दयाळा ॥ ३४ ॥

( शिखरिणी )

बहू आम्ही मूढा अबल मतिच्या नारि मुळच्या ॥
तशामध्यें गौळी पशुपवनिच्या कांतिधरच्या ॥
गती ना ज्ञानाची तमभर दिठीं जाण सखया ॥
परी भावो चित्तीं पदिंजडतसे साक्षि तुंचि या ॥ ३५ ॥

( भद्रिका. )

तळमळी तुरवा रमापती । मति निरामधिंही असे भिती ॥
अरि भिती टळवी यदूविरा । मुरहरा स्मरणीं हरी मला ॥ ३६ ॥
बळहिना अबला मुळच्या हरी । हरिगळा खळ हा अजिं रे हरी ॥
कवण ना तुजवीण रमापती । जगतिला नवरा मतिला पती ॥ ३७ ॥
मति जी रमली तव भावनीं । भव हा सरला तनुलागुनी ॥
मुनिसंततपोनिधि योगिही । पद–अंबुज सेविति या मही ॥ ३८ ॥

( उमा० )

दीनजनाप्रति पाळक नाम तुला हरि या जगतीवर तें ॥
नाकिं तसें फणिलोकिं वसे संत मुखें मुनियोगमतें ॥
ते सत दावि अनंतमती भव हा अरिभाव हरी सदया ॥
गोपि तुझ्या मरती तुज घेउनियां त्वरिताव जडों सदया ॥ ३९ ॥

( शार्दूल• )

या रीतीं प्रमदा जला मधिं स्तुती गाती मुखें आतुरा ॥
चिंतातूर मनामधीं अवकळा दीसे नची आसरा ॥
तेव्हां भाव मनोगती समजली नाहीं मली संसृती ॥
माझी प्रीतमती निती सतिप्रती तैसी नसे त्या पती ॥ ४० ॥

( मालिनी. )

सदय धन मुरारी तेधवां ओळलासे ॥
कळवळ दिनतेची आंगिं ज्याचे बहूसे ॥
घन अवगतिचा तो तेधवां बंद झाला ॥
समि रवि तळदीशा भ्रांतिचा वास गेला ॥ ४१ ॥
रवि किरण प्रभा ती फांकली गोपि दृष्टी ॥
तमभ्रमजल सूके कोरडी नाव कोष्टी ॥
तट दिठिमाधिं आला होडि लागे तिराला ॥
उपक्रम लय झाला बोधनीं भाव आला ॥ ४२ ॥

( वसंतति० )

आल्या तिरा उतरुनी नवती तरूणी ॥
गोपी हरी धरुनियां तरणी सुकाणी ॥
सायुज्यता प्रगटली कलिमाजिं माता ॥
गाथा शुकाचि नृपबोधरसोघहीता ॥ ४३ ॥

( स्रग्धरा. )

साऱ्या आल्या तिराला तदुपरि हरिला जोडुनी बद्धपाणी ॥
आनंदाची सुवाणी विखरत वदनीं प्रेमळा रोध ध्यानीं ॥
लाडें आल्या लबाडी मनिं धरि हरि हा जाणुनी चाळवीती ॥
गोडी कांता सतींची हरिवर भरती भावना ऐक्यतेची ॥ ४४ ॥

( द्रुतवि० )

हरि तुला अजिंरे अम्हिं रक्षिलें । जलसमूहमधीं तरणीं भले ॥
तरुनियां तरणी तनु संपती । तुजसही तरिं या अजिं ये क्षिती ॥ ४५ ॥

( कामदा, )

चल घरीं हरी गोप सुंदरा। जननि देह रे होइ घाबरा ॥
नच वदे घरीं गोष्टि माधवा। जळक्रिडा सख्या गोकुळीं तुवां ॥ ४६ ॥

( शार्दूल० )

भ्रांती भाव स्वभावता मति धृती स्वप्नीं जशी भूतता ॥
कंठीं धारणता गमें तव मता भीती भुतीं व्याप्यता ॥
शब्दा ठाव फुटेनची तमभरें धांपा बसे अंतरा ॥
येई जाग्रत भावने वरिवरी भावा मना साम्यता ॥ ४७ ॥

( वसंतति० )

गोपी भ्रमांतुनि घरीं सदनीं निजाचे ॥
आल्या हरी घरिं सती पति नंदजीचे ॥
दीला हरी जननितें बहु प्रेमभावें ॥
वीदेह ठाव वसणें मति ऐक्यभावें ॥ ४८ ॥

( कामदा. )

पाहुनी मुखा चालती घरीं। लौकिका रितीं बुद्धि ये बरी ॥
चिंत्ति माधवा धारणीं धृती। भक्ति गोपिका भावना कृती ॥ ४९ ॥

( शार्दूल० )

भोगी भावगती निती सकळही बोधान्वयें आकळे ॥
गोकूळीं सुखकारकीं सकळिकां नंदात्मयोगाबळें ॥
स्वानंदें सुलभी वसे सुजनते भक्तीरुपें आत्मनीं ॥
मायाभाव सरे हरी भजनिं या प्रेमा भरे हो मनीं ॥ ५० ॥

( वसंत० )

हें भाग्य भागवत भावगिरा शुकाची ॥
वर्णी नृपा प्रति तया प्रति नामचाची ॥
कौंतेयसूत–सुततो नृपती परिक्षी ॥
रक्षी क्षिती सकलही सदभाव दक्षी ॥ ५१ ॥
आत्मानुभाव मतिनें गति दे तराया ॥
व्यासोक्ति वास शुक हा भव हा सराया ॥

तोची यथामति अनंतमुखामधूनी ॥
वर्णी अनंत जगती ध्वनि लाघवानीं ॥ ५२ ॥

( शार्दूल० )

नौका भावसरे धरेवरि असा आहे मिळावा हरी ॥
गावें मानस भाव हा निजरुपें फेरी अनंतीं करी ॥
वारी संकट सर्व दृश्य मतिचें भक्तीरुपें वर्ततां ॥
भावी ठाव अनंतमायिकरुपें कर्तेपणा नामता ॥ ५३ ॥

## २. राधाप्रीति.

( शार्दूलवि० )

गोविंदे सदये तुला नमन गे माये करी वीजयो ॥
बोधाचा दिप लावुनी मम मती लागीं दिजे आश्रयो ॥
मोहाची तमसांजवेळ हरवी दावी चवी भावनीं ॥
प्रेमानंद वदो गिरा तव कृपें राधा–प्रिती आननीं ॥ १ ॥

( वसंतति० )

कैसी हरी करुं तुझी विधिभावपूजा ॥
भावार्थ हा अवगमे नच कोणदूजा ॥
व्यापोनि आपसमिरा अवनी खगाला ॥
गूणान्वयो प्रगटसी मति भाव काला ॥ २ ॥

( शार्दूल. )

गूणाला गमना भुतां उगम ना नामारुपा भावना ॥
साचें हें सकळी खरेंच परि हें रूपान्वया वासना ॥ ३ ॥

( उपचित्र. )

सगुणी करुनी तुजला हरी । मन हें रमवूं आजि लौकरी ॥
कलिला ढकलूं गितभावनीं । प्रित रे रचुं ही मनसावरी ॥ ४ ॥

( इंद्रवज्रा. )

राधाप्रितीची हरि भावमाळा । गातां गुणें ही करिते सुशीला ॥
रंगे मती यामधिं कौतुकानें । संपे भवो सार गमे सुखानें ॥ ५ ॥

( शार्दूलवि० )

कोणी एक दिनांतरीं यशुमती घेऊनियां माधवा ।
नीजे मंदिरिं त्या वसंत समयीं सांगे मुला वानवा ॥
बारे ऐक सख्या मुला घननिळा खोडी त्यजी नारिच्या ।
राधेच्या घरिं जाऊं तूं नच कदा लौकिक हारे निचा ॥ ६ ॥

( कामदा. )

सोड खोडि तूं कार पातला । छंद तुजसी हा नसे भला ॥
ऐकूं मी किती गोपिची रळी। नाहिं थार रे या भुमी तळीं ॥ ७ ॥

( मालिनी )

कुळ निति रिति लागीं रीत ना चांगली ही ।
बुडविसि रुप नामा वाटतें सत्य गेहीं ॥
गम नच तुज धामीं बाळ तूं तों तरा ह्या ।
नच दिसत पुढें रे अब्रुलागीं तरूंया ॥ ८ ॥

( शिखरिणी. )

अरे कृष्णा आतां निज मज कुसीं जाण सखया ।
त्यजोनीयां चाळे सकळिक तुवां आज तनया ॥
उनाची ही वेळा मुख अवकळा जाण करिते ।
तपे भूमी सारी तरणि किरणीं पाद जळते ॥ ९ ॥

( द्रुतवि० )

हरि म्हणे रमणी सति गोपिका । जननि गे धरती मज कौतुका ॥
कडिवरी धरुनी मजला घरीं । बिदिंतुनी उचली ठक माजुरी ॥ १० ॥
खुसि नसे मजला परि बाळ मी.। करूं कसें बळ ना भित फार मी ॥
रमणिचे कर गे मज रुतती । गुदगुल्या करिती बरी नारि ती ॥ ११ ॥
मिळुनियां सकळी मज एकल्या । गडणि त्या तनुचेवरि टेकल्या ॥
कसि धरूं कळती मति भीतसे । मुषक मार्जर पाहुनि भीतसे ॥ १२ ॥

( शालिनी. )

बारा सोळाच्या वयाच्या भरानें । एका ठायीं दांडग्या त्या मतानें ॥
गोऱ्या गोऱ्या घावऱ्या गाल आई । सालें आलों दाखवी गाल आई ॥ १३ ॥

तोची यथामति अनंतमुखामधूनी ॥
वर्णी अनंत जगती ध्वनि लाघवानीं ॥ ५२ ॥

( शार्दूल० )

नौका भावसरे धरेवरि असा आहे मिळावा हरी ॥
गावें मानस भाव हा निजरुपें फेरी अनंतीं करी ॥
वारी संकट सर्व दृश्य मतिचें भक्तीरुपें वर्ततां ॥
भावी ठाव अनंतमायिकरुपें कर्तेपणा नामता ॥ ५३ ॥

## २. राधाप्रीति.

( शार्दूलवि० )

गोविंदे सदये तुला नमन गे माये करी वीजयो ॥
बोधाचा दिप लावुनी मम मती लागीं दिजे आश्रयो ॥
मोहाची तमसांजवेळ हरवी दावी चवी भावनीं ॥
प्रेमानंद वदो गिरा तव कृपें राधा–प्रिती आननीं ॥ १ ॥

( वसंतति० )

कैसी हरी करुं तुझी विधिभावपूजा ॥
भावार्थ हा अवगमे नच कोणदूजा ॥
व्यापोनि आपसमिरा अवनी खगाला ॥
गूणान्वयो प्रगटसी मति भाव काला ॥ २ ॥

( शार्दूल. )

गूणाला गमना भुतां उगम ना नामारुपा भावना ॥
साचें हें सकळी खरेंच परि हें रूपान्वया वासिनां ॥ ३ ॥

( उपचित्र. )

सगुणी करुनी तुजला हरी । मन हें रमवूं आजि कौकरी ॥
कलिला ढकलूं गितभावनीं । प्रित रे रचुं ही मनसावरी ॥ ४ ॥

( इंद्रवज्रा. )

राधाप्रितीची हरि भावमाला । गातां गुणें ही करिते सुशीला ॥
रंगे मती यामधिं कौतुकानें । संपे भवो सार गमे सुखानें ॥ ५ ॥

( शार्दूलवि० )

कोणी एक दिनांतरीं यशुमती घेऊनियां माधवा ।
नीजे मंदिरिं त्या वसंत समयीं सांगे मुला वानवा ॥
वारे ऐक सख्या मुला घननिळा खोडी त्यजी नारिच्या ।
राधेच्या घरिं जाऊं तूं नच कदा कौकिक हारे निचा ॥ ६ ॥

( कामदा. )

सोड खोडि तूं कार पातला । छंद तुजसी हा नसे भला ॥
ऐकू मी किती गोपिची रळी । नाहिं थार रे या भुमी तळीं ॥ ७ ॥

( मालिनी )

कुळ निति रिति लागीं रीत ना चांगली ही ।
बुडविसि रुप नामा वाटतें सत्य गेहीं ॥
गम नच तुज धामीं बाळ तूं तों तरा ह्या ।
नच दिसत पुढें रे अब्रुलागीं तरूंया ॥ ८ ॥

( शिखरिणी. )

अरे कृष्णा आतां निज मज कुसीं जाण सखया ।
त्यजोनीयां चाळे सकळिक तुवां आज तनया ॥
उनाची ही वेळा मुख अवकळा जाण करिते ।
तपे भूमी सारी तरणि किरणी पाद जळते ॥ ९ ॥

( द्रुतवि० )

हरि म्हणे रमणी सति गोपिका । जननि गे धरती मज कौतुका ॥
कडिवरी धरुनी मजला घरीं । बिदिंतुनी उचली ठक माजुरी ॥ १० ॥
खुसि नसे मजला परि बाळ मी । करूं कसें बळ ना भित फार मी ॥
रमणिचे कर गे मज रुतती । गुदगुल्या करिती बरी नारि ती ॥ ११ ॥
मिळुनियां सकळी मज एकल्या । गडणि त्या तनुचेवरि टेकल्या ॥
कसि धरूं कळती मति भीतसे । मुषक मार्जर पाहुनि भीतसे ॥ १२ ॥

( शालिनी. )

बारा सोळाच्या वयाच्या भरानें । एका ठायीं दांडग्या त्या मतानें ॥
गोऱ्या गोऱ्या घावऱ्या गाल आई । सालें आलीं दाखवी गाल आई ॥ १३ ॥

द्वंद्वाकारा कातरा काम भारा । दारा सारासारतानाचि पारा ॥
वारायाला नामला अंगिं जोरा । तोरा थोरा बाप याना उभारा ॥ १४ ॥

( भुजंग. )

मनाच्या कठोरी पराच्या भराच्या । नराच्या धुरेच्या दृढा त्यागतीच्या ॥
कडेच्या ओसरी ओस त्या मंदिराच्या । नसे बाप या त्या घरीं मीळणीच्या ॥१५॥
कमानी कृती नागव्या होउनीयां । मला झोंबती ठेविती छाति पाया ॥
करानें करा माजिया चोळितातीं । उराच्या फुग्या आनना दाबितातीं ॥१६॥

( मालिनी. )

म्हणाति मज सती त्या बाळ कां आजुनी तूं ।
पति तनु मति मानी आमुची प्रीत ती तूं ॥
शशि कलिसम वाढे द्वीतिये पूर्णिमे ये ।
तव मति जल डोहीं कूमुदी ही तनू ये ॥ १७ ॥

तरणि किरणजानी नीज भावो प्रभावो ।
अवगत आजि भावो तेधवां ये सुवावो ॥
सकळहि तरुणि त्या या रितीं रोज मातें ।
जुलुम करुनि न्हेती आवरेनाचि मातें ॥ १८ ॥

( इंद्रवज्रा. )

राधा असीची उलटीच धारा । थारा नसे तीस दुजा न वारा ॥
वारा सत्याचार तरा करोनी । न्हे ते घराला बहु तें त्वरेनी ॥ १९ ॥

( शार्दूल )

माते मी लटिकें न बोल वदनीं बोले कधीं जाण गे ।
आई आण तुझी वदोनि कथितों चित्तीं खरें बाणगे ॥
झालों रोड तनू विलोक नयनीं मामी अजीच्यानिगे ।
जाईना किमपी घरांतुनि जरा बाहेर हें मानि गे ॥ २० ॥

( वसंत. )

ऐसें वदोनि निजला मग माय संगें ॥
रंगे मती गवळणी प्रित भाव संगें ॥

राधा वियोग मतिला झुरणीच लावी ॥
नाहीं च जाग्रति सरोनि सुषुप्ति भावी ॥ २१ ॥

राधे हुनी नच रुची अवनी वरीया ॥
याहून ती सद शते पट जाण माया ॥
कायापुनीत भविया करणें असे ज्या ॥
नामा स्मृतें सुलभता सारि नाच दूज्या ॥ २२ ॥

( भुजंग. )

प्रयागा हुनी यागहा स्वल्प योगें । वदे नाम राधा हरी प्रेमरागें ॥
मती प्रेम वाढे सदां ऐक्य भासे । तदां भासती हे जनाचे तमासे ॥२३॥

( शार्दूल. )

राधेनें प्रित ठेविली हरिवरी चित्तांतरीं प्रेमता ॥
ना कांतावरि तातमाय कुळिंही ऐसी जडे साम्यता ॥
वाणीनें नच संभवे रुपकता प्रीतीस हें आणणें ॥
राधेची कळ राजिवाक्ष समजे कृष्णा तिणें जाणणें ॥ २४ ॥

सोमानें उदधी भरे जळप्रभे स्वानंद भावे तया ॥
साक्षी कोण रसा वरी रुचिकते येई नची भावया ॥
सूर्याच्या किरणें कुमूदि विखरे अस्तांतरीं आवळे ॥
प्रेमाची जडणी जसी मति तसी ज्याची तया आकळे ॥ २५ ॥

( वसंतति० )

राधे मनीं हरि जरानच दूर व्हावा ।
साचें परी जगनिती प्रति भी स्वभावा ॥
जैसा अनूभवि जगीं जगरीति माजो ।
राहूनि पैल पटवी खुण आत्म काजीं ॥ २६ ॥

तैसी सती हि जन लौकिकिं वागता हे ॥
भावार्थ कृष्ण स्वरुपीं मति शांतनोहे ॥
सासू पती जपतसे दिन रात्र ईसी ॥
घालोनि काजळ दिठीं निजवी स्वकूसीं ॥ २७ ॥

सोसूनि जाच सकळी ते गेली घराला ॥
गोकूळ वासरमवी हरि ध्यास माला ॥
माहेर माधव गुणा कृति मानुनीयां ॥
चित्तां तरीं रमतसे विसरोनि काया ॥ २८ ॥

( मालिनी. )

मति तटि यमुनेच्या कृष्ण राधा मिलाफू ॥
खुणबरि उभयांच्या अंतरी ऐक्यमापू ॥
करुनि सकळि कर्मा संसृती पाक सिद्धी ॥
रवि प्रहर दुपारीं सासु कांता सुबुद्धी ॥ २९ ॥
अनुभव रुचि अन्नें वाढुनी जेववीली ॥
भुक समनित होतां भावना शांत आली ॥
वदत मग ति सासू राधिके जेविं तूंगे ॥
उरत सुरत जें कां देइजे गाइला गे ॥ ३० ॥

( भुजंग. )

असे मोडकी गाय दाव्यावरी ती ॥
वनीं जाइना शक्ति नाकाळ नीती ॥
कळी वृद्ध भांवो जडे गे तनूला ॥
करी देख रेखी तिची सांजवेळा ॥ ३१ ॥
नको जाउं कोठें उन्हाची उगोंची ।
नको प्रीत ठेवूं दुजाचे घराची ॥
नको नारिसंगें करूं बोलि दूज्या ।
वरी उन्नि गे पाहतां देव पूजा ॥ ३२ ॥

वयाचा भरावा जनाचे दिठोला । बहू व्यापि गे काम तो बुद्धि माळा ॥
नको नंद दारीं हरी घेउं जाऊं । जनीं बोलि खोटी तुझी रीत भाऊ ॥ ३३ ॥
अंगे चोर तो पोर नंदा वरींचा । फसीं पाडि गे मार्ग तोडी भवींचा ॥
घरीं राहणें मानसीं वागताहे । तरीं याच रीतींमधीं सूख आहे ॥३४॥
वराला त्यजूनी पराला रिजावें । असें मानसीं वागल्या आजि जावें ॥
द्विजे लग्न हुंडा अजी चार साक्षी । सुखें गे पुढां पारकी रोज लक्षी ॥३५॥

( कामदा. )

नच बरीं तुझी चाल राधिके । श्रवणिं ऐकिलीं सर्व कौतुकें ॥
जननिच्या कुळा दोष लाविला । नच कसा तुवां अर्थ पाहिला ॥ ३६ ॥

( उपचित्र. )

कसि गे घसिही कुळिं आमुच्या । जडवीत रिती तव चालिच्या ॥
मुल नंद तुला रुचला कसा । शिशु बाल स्वजार वसे कसा ॥ ३७ ॥
तिजप्रती नच दे प्रतिउत्तरा । मनिं असें समजे धड ना करा ॥
प्रतिजबाब करी नच ती बरें । नच दिसे मजला धनि ही बुरे ॥ ३८ ॥

( शार्दूल. )

शब्दें शब्द चढे नडे स्वहित तें बंदी घडे आजची ॥
उद्याचें कुणिं पाहिलें घडिभरें राहूं मुके हे शुची ॥
वांचे थेरडि काळ ही मजप्रती कर्मार्जितें आधल्या ॥
जाती एक दिनीं मरूनि सटवी होतें बरें आपुल्या ॥ ३९ ॥

( शिखरिणी. )

वदे चित्तीं राधा कितिकहि वदों डोइ फुटकी ॥
मला कृष्णावीणें रुचतचि नसे दृश्य नटकीं ॥
अजी जावें वाटे जलमिषरुपें भानुजतटीं ॥
सखा तेथें भेटे खचित मजसी भावत दिठीं ॥ ४० ॥

( पृथ्वी. )

असे स्मरुनियां घरीं वळतसे कडे रांजणा ॥
असे उदक रांजणीं परि तया त्यजी बोधना ॥
घरांतुनि निरा त्वरें वसरिला सती आणिते ॥
कळो नच दुजा दिलें पतिदिकां गपाचूपतें ॥ ४१ ॥
जसें निधडतें अनूभव मती जुने आधले ॥
स्मरोनि प्रथमीं स्वकर्म त्यजि ती उपाधी भले ॥
स्वबोध धरणी प्रती वसुनियां बरें ऐक्य तें ॥
मला रहित भावना जडत ते सती त्या मते ॥ ४२ ॥

( शार्दूल. )

वारी टांकित ओतुनी करि रिता कुंभासही रांजणा ॥
पात्रें सर्व करोनियां रिति तदां राखीत मध्यांगणा ॥
( चैत्राचे पुनवेकडोनि पुढचे मीतीतलें बोल हे )
उष्णाचे झळके करोनि तलखे ग्रीवा सुके सासुची ॥
पाणी पाहत मंदिरीं तंव नसे शब्दें सुने जाचिची ॥ ४३ ॥

( वसंतति० )

नाहीं च भान उदकीं कुठ गेलि राधा ॥
पात्रां तरिं लवनसे धर ईस बांधा ॥
आणीत पाणि सगळा दिन ही हरामा ॥
नाहींच कोण असली मन ओघरामा ॥ ४४ ॥

ऐकूनियां सुखमती गति होत राधा ॥
साधेल कामजिवना प्रति मार्ग सूधा ॥
सोसिन जाच सकळी हरि सख्य भावें ॥
जाचेंच माधव मिळे अशुभी सुभावें ॥ ४५ ॥

( शिखरिणी. )

सुने लागीं सासू वदत रवते टोंचि शरसें ॥
क्षतें छातीठायीं पडत परिं ती सोसि सुखसें ॥
घडा घेवोनीयां गमन करिते हंसगमना ॥
नसे सिंहाला कीं डुलत करिसीं भावित मना ॥ ४६ ॥

( द्रुत वि. )

आजिं मिळे मिळणीं हरिहा मला ॥ जलतटीं निकटी तरु छायिला ॥
चटचटां पद ते मग ऊचली ॥ समिप ये यमुने निट एकली ॥ ४७ ॥

( मालिनी. )

मुखकमळ सुकोनी नेत्र ते लाल झाले ॥
तळमळि हरिसाठीं योग–वीयोग तोले ॥
उतरुनि घट तेथें त्या तटां घेत वायू ॥
मति मदनशराची भाविते उष्ण वायू ॥ ४८ ॥

( द्रुतवि० )

दशदिशा नयनाकृति चंचळी ॥ नच थरे समते ममते वळीं ॥
गढि मनोघ रसीक दिसे नची ॥ गति तदां खचली नच अन्यची ॥ ४९ ॥

( उपचित्र. )

करिचे सरिचे सरळाकृती ॥ करते रमणी प्रति आकृती ॥
भुमिला ठकले डसले कृती ॥ पडली अवनीवर पूढतीं ॥ ५० ॥

( वसंतति० )

कोणी नसे समिप ते समर्थी तिपासीं ॥
येकांत वास बरवा परि त्या वनासी ॥
कृष्णाविणें रसिकता गम नाहिं भावा ॥
धांवे म्हणे जलधिजापति वासुदेवा ॥ ५१ ॥

( स्रग्धरा. )

भावायोगें रिघावा हरि गुणस्वरुपा भक्तिचा जोर भारी ॥
आला धावोनियां तो चपळ मनगती टांकुनी माय नारी ॥
छायेलागीं कदंबा वसत नरहरी एकला पैलपारीं ॥
बोधे रोधे समोघे जलमाधिं मतिचे ऐल ही कांति नारी ॥ ५२ ॥

( शार्दूल. )

बोधाचा तरु तो कदंब मुळचा छाया रुपें भावना ॥
भक्तीची भुमिका मती तळवटीं नीजार्थे ही भावना ॥
मध्यें अंतरवासना नदि असे दोघांमधीं अंतरा ॥
राधा पैल हरीहि पैल मिळना नेत्रांवरी अंतरां ॥ ५३ ॥

( वसंतति० )

राधा उरोजयुगुलीं चवदामधींची ॥
वर्षावकाळिं भरती उदकें नदीचीं ॥
कामोद्भवें तरुणिचा हरिसंग इच्छी ॥
जैसा चकोर शशिला प्रिति रंग इच्छी ॥ ५४ ॥

( भुजंग. )

तदां येत ध्याना वरी राधिका ती ॥ उठोनी बसे जेथवां आधिकाती ॥
म्हणे गोप कांता सख्या येइ कांता ॥ नको त्रास देऊं रमेच्या स्वकांता ॥ ५५॥

नको मोकळूं अच्युता प्रीत माझी ॥ बळाहीन मी आजि रे आंचिमाजीं ॥
वियोगें तुझ्या देह संतप्त झाला ॥ जसी अग्निसंगें रिती लोणियाला ॥ ५६ ॥
तुझ्या छंदगूणें जनीं निंद्य झालें ॥ प्रपंचामधीं नंदनंदा बुजालें ॥
नसे ग्राम्य व्यापीं हितातें कथाया ॥ किती आठवूं रे उदासी कथाया ॥ ५७ ॥
मनानें बुडी दीधली पायिं तुझ्या ॥ मदा शांतवाया कळा पायिं तूझ्या ॥
नसे गोडि अन्नीं प्रिती नाच अन्यीं ॥ रती सूख इच्छी वसे तापवन्ही ॥५८ ॥

( कामदा. )

सदय मानसा गोपसुंदरा ॥ वनानिळा हरी नंदकूमरा ॥
झडकरी अजीं पाय दाखवीं ॥ वदत कामदा फायदा कवी ॥ ५९ ॥

( उपचित्र. )

झट ये मनमोहन राजसा । घन ये अवनी त्वरा जसा ॥
भुमिरे तनु ही बहु तापली । कढई चुलिच्यावर तापली ॥ ६० ॥

( मालिनी. )

नरहरि व्रजनाथा थार दे अंतरीं रे ।
ममसमिप तुं राहे थोडक्या अंतरा रे ॥
दिठिमधिं नित येई माजिया मूर्त तूझी ।
कळ नच धरवे ही वीरहो मूर्त तूजी ॥ ६१ ॥

( शार्दूल. )

ये ये लौकर ये नये करूं असें मायेमधीं माधवा ।
दोघां संगम हा महा रसिक हा टांकोनियां मा धवा ॥
केला अंतर राजसा भरंवसा देवोनियां मानसा ।
दुःखानें दडपोनियां धरियलें माझ्या हरी मानसा ॥ ६२ ॥
देवा मी दुबळी बळी तव तनू देखोनियां सांवळी ।
संसारीं बहु तापलें भुमितळीं नाहीं मला सांवली ॥
विश्रांती मज शांति ती तव नितीमाजीं गमे नीगुती ।
दावी रे सखया दया करुनियां मूखांबुजा नीगुतीं ॥ ६३ ॥

( भुजंग. )

वदोनी असें पाहिलें पैलपारा । तदां पाहिलें लोचनीं त्या अपारा ॥
बहू हर्ष झाला तदां कंठ दाटे । करूनी सुभा भावना शद्ध वाटे ॥६४॥

( उपचित्र. )

यमुना उतरे हरि देखतां । निजरुपा अनुभा मति देखतां ।
पादिं नसे दिठि ती प्रित अच्युतीं । च्युत नसे म्हणुनी रव अच्युतीं ॥६५॥

( मालिनी. )

उतरलि सति थडीला ऐल ती पैल गेली ।
चिरजलसहवासें भीजली अर्ध ओली ॥
करि नच मुखिं शब्दा व्याप लज्जांश चित्ता ।
सुजनमनसुमोघा लाजवी व्याप्य चित्ता ॥ ६६ ॥

( भुजंग. )

उभी लाजिता मान घालोनि खालीं । रसामाजिं ओली मनीं जे निखालीं ॥
निजध्यास अंगीं पराठायिं राधे । हरी गोकुळा औतरे हेत राधे ॥ ६७ ॥

( वसंत. )

देखोनि सूर्य कमळी कळि हो प्रफुल्ला । तैसा मुखेंदु सतिचा दिसतो प्रफुल्ला ॥
ऐकोनि चोरदिठिला अवलोकिताहे । केव्हां गळां हरि धरी मनिं भाकिताहे ६८

( मालिनी. )

दिठिमाघिं धरि ध्याना त्या मृगांकाननातें । परपुरुषिं रते जी मानसा काननातें ॥
मति दरि मथनानें जाग्रती ते अनंगा । निजरुपहरिसंगें शांति ये या अनंगा ६९
मधुसुदन मनोघीं मन्मथू प्रेम भावो । मृगनयनि दिठीनें देखतां भक्तिभावो ॥
सहजचि हरि आला लोह कीं लोह चुंबूं । सतिमुखरस भावो गौर ते गाल चुंबूं ॥

( शार्दूलविक्रीडित. )

झाला षोडष–भाव मान मतिचा जानी तनू भावना ।
भावानें वळखी स्वरूप हरिचें भक्तीच संभावना ॥
झाला एकचि भाव सौख्य मतिचा त्याचा तिचा सारिखा ।
नाहीं सागरिं जो रमे अवगमें राधे प्रिती सारिखा ॥ ७१ ॥

( पृथ्वी. )

उरोज धरिले करीं हरिजिनें रजोभावते ।
मनोधृतिमथें पदा जिव शिवो बुधां भाव तें ॥

कटी तटस्फुरे करें घननिळा फिटे ग्रंथिका ।
गळोनि पडलें तदां वसन तें फिटे ग्रंथिका ॥ ७२ ॥
सुसंग समयो वियोग शमुनी तया ऊभयां ।
स्मरोनि पद हें भवांबुधि तरून भावूं भया ॥
हरी सतिउरावरी रमतसे रसाच्या भरा ॥
करोनि तिस संग नंग हरिला दिसांच्या भरा ॥ ७३ ॥

( मालिनी. )

बहुत चपल राधा संगयोगें हरीच्या ॥
मतिमधिं सुख मानी ना भयो त्या अरीच्या ॥
सितल मति मनाची राधिकेच्या तदां ती ॥
अधर सदढ देवें चाविले शुभ्र दांतीं ॥ ७४ ॥

( द्रुत वि. )

उभय तीं समता बरि पावलीं ॥ सुखकरी रसिं या स्वरूपावली ॥
हरि मिठी मधिं ते धरि राधिका ॥ दढपणा शिरजोर नराधिका ॥ ७५ ॥

( शिखरिणी. )

स्वसूखाच्या छंदें रमण रमणी एक मिळणी ॥
जसीं आत्मारामीं सुमति सम ते सारामिळणी ॥
म्हणे देवो राधे तुजविण मला ना च नवरी ॥
मती नाचे माझी तव गुण स्मरे साच चवरी ॥ ७६ ॥

( शार्दूल० )

टाकोनी जननी सखे निजसुरी आलों मिं गे धांवुनी ॥
भक्ती भाव तुझा असा कवतुकीं मूखांबुसूधावणी ॥
राधे काय करूं तुझ्याविण मला नाहीं गमे शांत गे ॥
आई कोंडित मंदिरीं तत्र गुणें आलों तशा आंतगे ॥ ७७ ॥

( वसंतति० )

ऐसें वदे हरि तिला मग बोलताहे ॥ राधा सख्या घननिळा समतोलता हे ॥
टाकूं नको मज दुरी मदुसूदना रे ॥तूझ्याविणें मज जगीं भवसूद नारे ॥ ७८॥

संतोषकारक मना रमणा मुरारी । वार्ता फुटे व्रजपुरीं उठली फुकारी ॥
कैसी घडे तवगडी उघडीक भावें । नांवें तुझ्या रडतसे नड हीच भावे ॥७९॥
सासू श्वसूर पतिही गठि येक त्यांची ॥ गोष्टी वदों नच रुचे मरणांत त्यांची ॥
वांचे हरी तंव वरी प्रित ठेवुनीयां ॥ बोले पदीं हरि जिच्या कर ठेउनी यां ॥८०॥
ऐशा रितीं जळतटीं सति कृष्णकुक्षीं ॥ संपोनि शुक्ल दिन ते नित कृष्णपक्षी ॥
वर्णीयले रतिसुखामाधिं आत्मतत्वा ॥ शृंगारभाग हरिचा मदनासमत्वा ॥८१॥

( भुजंग. )

निबंधा कृती लौकिकीं जारभावो ॥ गुरूबोधनीं शांतिचा हा प्रभावो ॥
कथा गोड भारी हरी राधिकेची ॥ असी नाहिं दूजी रुची हे सुधेची ॥ ८२ ॥
धरीं मानसा भावना माधवीं या ॥ मती वाग तूं राधिके साम्य माया ॥
नको भावना दूसरी तूजला ती ॥ करि नाशरे संसृती हाण लातीं ॥ ८३ ॥
रिती संग राधा रमाकांत याचा ॥ प्रिती भक्ति भावो जडे प्रेमवाचा ॥
अनंता गुणें गाउं या अच्युताला ॥ धरूं मानसीं याच कल्पद्रुमाला ॥ ८४ ॥

## ३ आत्मनिवेदन.

( शार्दूलविक्रीडित. )

प्रारंभीं नमि मीं गणाधिश गुणी हेरंब चिंतामणी ॥
दे गा बुद्धि मला कळा गुणलिळा वर्णावयाला ध्वनी ॥
प्रेमानंद मनीं भरों भवसरों आरामता आभरों ॥
नासो काम फिटों कलंक न नटों कामास गा अंतरों ॥ १ ॥
पायीं भाववसों मना निज दिसों हांसों रतानावसों ॥
गोडी पूर्ण असों गुरूघर दिसों सर्वांतरीं ऐक्यसो ॥
वीवेकान्वयसारसा धन असो तापों रवी अंतरीं ॥
नीजीं बाप तुं तापहारक खरा काळा भया मंतरीं ॥ २ ॥
ब्रह्मा मंद पदें वदे निजपदें हंसासनीं शारदे ॥
चत्वारीजननी मनीं नमिन मी दीनीनिसीं पायदे ॥
सेवेला बसला मुलासम तुला माते अजीं हा भला ॥
आनंदास अनंत मागत असे पूरा करी गे कळा ॥ ३ ॥

पूर्णानंदपदावधाम ममदा नाथा गुरू येक गा ॥
माथां हात धरा मथां निजकथा गाथा करा गोड गा ॥
तोडा हा भव नावडा हितनडा पीडा किडा हावडा ॥
जोडा बोध गडा धडा धड धडां सूचो नसो वावडा ॥ ४ ॥
ताता आज मता गिता मम कथा गातां खुसी वाटती ॥
धोका ना मदना मना समजना राखी प्रिती या रितीं ॥
ना विद्या धन गा उगां तगमगा ना गा गुणा ठावही ॥
आहे मात्र तुझी कृपा निज दिपा तापास नाशास ही ॥ ५ ॥
कालिंदीतटवासिया हरि भयालीलार्णवीं ठाव दे ॥
देगा आत्मनिवेदनीं निजध्वनी त्या नीगमींवाट दे ॥
गाया कीर्तिस या दया उदयिं या याया मना आंत या ॥
माया मोह कयां वयांतचि गया दे या मना बोध या ॥ ६ ॥
संसारांतुनि सोडवा दिन नवा दावा भवा हारवा ॥
ठेवा प्रीत मना जनांतिल दिना मानापदा चारवा ॥
गोपी–गोपलिला मला घननिळा काळा हराया बळा ॥
माळा घाल तुं गा गळां रव कळा टाळा स्थुलाच्या बळा ॥ ७ ॥
गाऊं गीत तुझें सुजे मन रिजे वोजें कुमारान्वयें ॥
गोपाळां बळ बायका सकळिकां बोलूं निजाचें सवें ॥
गोविंदासम दाखवा जग भवा धांवा अजी केशवा ॥
ठेवा नीगमवा नवा मम गिरा साक्षी अनंता जिवा ॥ ८ ॥

( मालिनी. )

निगमनरूपजाला संग ना गूणलीला ॥
परि सुजनस्वभावा पातला गोकुळाला ॥
मुळपण वय खासा बाळप्रेमा सुभाषा ॥
घननिळ कलिनाशा शामरंगा सुरेशा ॥ ९ ॥
सकळ वृजपुराच्या कामिनी त्या वयाच्या ॥
नवति नवभराच्या पातल्या हो परांच्या ॥
गजगति मृगनेत्री शोभवी हेचि धात्री ॥
विरहि पुरुप कात्री सूजना क्षेम गात्रीं ॥ १० ॥

अनुक्रम ...७८८९... वि: ...


रविउदय सकाळीं काळकाळीं सुकाळीं ॥
मिपण—मति मळी ती गूण धूते मवाळी ॥
मुख धुत हरिनामें प्रेमकुंकू कपाळा ॥
विणिफणि करुनीयां भ्रांति ना सूख मेळा ॥ ३ ॥
नगचिर नित ठायीं केउंनी त्यासमायीं ॥
सखि ठकि विठि गायी चीमणी माणकाई ॥
सगुणि उमणि काळी लाडकी तानि बाळी ॥
शशिवदननवाळी राधिका त्याच मेळीं ॥ ४ ॥
मिळुनि सकल एकाठायिं त्या हो सुखा ॥
करिति मसलतीला काननींच्या स्वसूखा ॥
दधि दुध घट माथां चालुंगे त्या सुपंथा ॥
बरिच सवड आजीं पाहुं त्या गूणवंता ॥ ५ ॥
चलुं सखि तिच वाटे सांवळा जेथ भेटे ॥
व्रज मुळ समुहीं तो कुंजरानींच भेटे ॥
वदन सकुमराचें अंतरीं फार रूचे ॥
मुळ सगुण गुणाचें सौख्य गे लोचनाचें ॥ ६ ॥
दधि दुध जरि मागे देउं ना आधिं तें गे ॥
चिडवुं बहुत त्या गे मानसीं नीजरागें ॥
झटपट बहुलावूं खेळण्या चित्त गोवूं ॥
मग सहजचि देऊं शांतऊं प्रेम लेऊं ॥ ७ ॥
सकळ मसलती ह्या अंतरीं शुद्ध व्हाया ॥
निजरुपिं नित गाया योजिल्या युक्ति गा या ॥
चपळ पण मनाचें जाउनी सौख्य वाचे ॥
कथन भवित्र हरीचें जाणती बूध साचें ॥ ८ ॥
बहु रुचिकर भेला गोड लागों जिभेला ॥
मनमुरवणमाला ही तरा ज्ञानमूळा ॥
मनसम दिठिसाठीं प्रेम ताटीं सुवाटी ॥
अजर तनु कराया दे अनंता कसोटी ॥ ९ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे ३९८ ग्रं. क्र.

( वसंततिलका. )

गोवास घेऊनि हरी यमुनातटाकीं ॥ शोभे मनोरम समे जगतीं न टाकी ॥
भानू जसा जधिं प्रभा XXX करितो ॥ तोही नसेच तुळणे XXX समे तो॥१०॥

( इंद्रवज्रा. )

याची कळा न वदवे मुखानें ॥ वाचा वदे समजुती रुपानें ॥
आहे परेहुनि दुरी खरा हा ॥ जाणे परां अशिवदे मुळींहा ॥ २ ॥
सारें जगांतर भरोनि राहे ॥ वायूख तेज जिवनी भुमी हे ॥
भूतांतरीं वसुनियां उरे हा ॥ भानूशशी त्रिजगतीं भरे हा ॥ ३ ॥
आत्मा सनाथ मुळचा बराहा ॥ गोपाळ नाम समुदाय गाहा ॥
साधू जनामधिं वसे असा हो ॥ जे मिळले स्वरुपिं ऐक्य तया हो ॥४॥
नौरामयीं शिरुनियां भके ते ॥ सांडूनियां गुण स्वबोध होते ॥
गेले मिळोन स्वरुपीं तशाला ॥ नाहींच बोलवत या रुपाला ॥ ५ ॥
तो हा हरी रुप धरीत येथें ॥ भावा बरोबर गमे जनातें ॥
ज्याच्या मनीं वसत भाव तसा हा ॥ देतो फळास बरवा मना हा ॥६॥
गायी वनांत चरवी निजाच्या ॥ गोपांसहीत वनिं शोधनीचा ॥
काळी बरी दिसत घोंगडी ती ॥ खांद्यावरी शिकिं सिदोरिचीं तीं ॥ ७ ॥
माळा गळा सुमन चंपकांची ॥ गुंजेमधीं तुळसि मंजुळीची ॥
आपाद शोभति तमाळनीळा ॥ माथां मयूरपिच्छ वेष्टणाला ॥ ८ ॥
पांवा करीं छडि बरी वसे गा ॥ चाले मधीं समुहगोप तो गा ॥
मांडोनियां गडि बरेच खेळा ॥ दों ठायिं होत बरवेच खेळां ॥ ९ ॥
चेंडू फळी हुमरि वीटिदांडू ॥ मांडोनि बाळक तदां निवाडूं ॥
आपापल्यामधिंच भांडताती ॥ चेष्टा अनेक रितिनें करीती ॥ १० ॥
ऐशामधीं स्त्रिसमुदाय आला ॥ देखूनियां वदति गोप त्याला ॥
कानू पहा गवळणी बहू रे ॥ घेवोनियां दधिदुधा अजीं रे ॥ ११ ॥
आला थवा निकट या हिं बारे ॥ शोभे भला नयनिं पाहि बारे ॥
बोलूनिया रितिं हरीस ऐसें ॥ पाहे अनंत मनिं नीज आसे ॥ १२ ॥

( स्वागतावृत्त. )

ते गडी निजरुपें हरिचे हो ॥ बोधनीं निपुण ते मननीं हो ॥
त्या रितीं वडज वाकुड पेंदा ॥ द्वीज जातिंत सुदाम सबोधा ॥ १ ॥

आणखी बहुपरी किति गाऊं ॥ फार तें न वदवें मित गाऊं ॥
देखुनी व्रज स्त्रियां हरिलागीं ॥ बोलतो वदनिं तो गुज भागीं ॥ २ ॥
बोलतां लुडबि बोलत पेंदा ॥ कानु ले लपुन ल्हाउनि नीदा ॥
घोंगली मद तुधी बदि देगा ॥ घेतमी लुप तुधें थमदा गा ॥ ३ ॥
गौलनीस फतवूं भालि लाधा ॥ आदले खुथि मला बहु लाधा ॥
बोलुनी हरिस त्या दडवीतो ॥ शोभतो निजिंच बोध तसा तो ॥ ४ ॥
पातला निकट कामिनिमेळा ॥ पाहती सकल ते जन बाळा ॥
घालुनी मयुरपीस मुकूटा ॥ घोंगडी धरुन बावळि नेटा ॥ ५ ॥
चालतो माधिच तो नट बोधा ॥ मोटका हरि तुकासम पेंधा ॥
ठेविला लपवुनी हरिलागीं ॥ वेष हा बहु बरा निजिभागीं ॥ ६ ॥
मानला सकळिकां निजदासा ॥ हाव भाव सम गा रववासा ॥
ध्यान हें धरुन मानस पोसी ॥ हा अनंत अजि गा बहुतोषी ॥ ७ ॥

( पंचचामर वृत्त. )

बरी झुटी कळागुणी उणी नसे कशानिची ॥
वयामधीं नव्या तधीं उमेदिच्या पराइची ॥
अरूण कांतिची तराच अंगिची दिठी मिनी ॥
तुकीसमे गळा पिकी दिसे दिठी विलोकुनी ॥

## ४ कुब्जा अन्योक्ति.

( सवाई वृत्त. )

व्रजपुरवासि निवास निजासनिं कामिनिमानस माधवजी ॥
गित वदनांतरिं गाति मनोहर अमृत ते रव गायिन जी ॥
निर्जर कारण हें वयवैभव गोड सुधा हरिनामरसीं ॥
पुनित रसामृत बोधक शोधक भव्य मतीबुध मायकुसीं ॥ १ ॥
सदपद उद्धव उद्धरि हा भव शांत सुभाविक बोधरुपें ॥
निज रित भक्तिहि मुक्ति नये सरि साक्षि बहू कवि गीतरुपें ॥
हरिसख जाणुनि कामिनि बोलति साधुसमागमिं ओघसुहा ॥
कलकल शद्ध निशद्ध सुखोद्भव संभ्रम हारित सत्य पहा ॥ २ ॥
विरह उदासिनि त्यागुनि मंदिर सर्वहि ऐक्यति शोभति त्या ॥

शशिवदनाकृत राधिक श्रेष्टिणि मध्यगणीं उभि मंडलिं त्या ॥
हरहर संगति निष्ठुर निर्मुह आजि कळे मानिया हरिची ॥
वळवळ लावुनि या पुरवासिनि आवडि रूचलि बटकुरिची ॥ ३ ॥
मळकट वाखळ मर्कटसी तनु गर्क मती कसि ती वरती ॥
बहु रमला तिशि ना।विट मानासें रांड हि दुष्टिण आपमती ॥
दिननिशि अंतरिं वरिह जाळित झूरणि लागलि पक्षगती ॥
कपटिच चंचल तर्क न आश्रित घट्ट मती मन पंथनिती ॥ ४ ॥
कसितरिं वांकडि अष्ट ठिकाणिं ति वीवसि भासत प्रेममुळा ॥
दृढ मिठि घट्ट ति नक्रसमागम मोहक अंजन चक्षुकळा ॥
किडकिडिता कृति चापसि वांकलि जाग्रति हांकलि गोकुळिला ॥
ठकडिच मानासें मोहियला हरि या व्रज संगतिं मोकळिला ॥ ५ ॥
चडफड स्वप्निंहि जाग्रतिं वीरह नांव सुखुसि ति साध्यमना ॥
विणि फणि आठव आठविना मति जोगसमाकृति वासघना ॥
सण दसऱ्यामधिं नाच समागम दुःखित हा सण भाविमती ॥
नच रुचि भोजानें आसनें आश्रित हा विरहानळ जाळि गती ॥ ६ ॥
तट यमुनेवर हा ठक आठवुं नेत्रजलोद्भव न्हाववुं तो ॥
धडधड छातींत घाव करांबुजिं निष्ठुर मानस हाणवितो ॥
कसितरिं गाइ ठका।हुनि ही ठक कापटि भेषज आकळिला ॥
तनमन–अर्पण चित्तसमर्पण इष्टपदाकृति आभरला ॥ ७ ॥
वन–वन हंबर पुच्छ उभारुनि धेनु हरिस्तव ओरडती ॥
तृण जल भक्षण निशेन सृष्टित ध्यास करेंहत त्या करिती ॥
निभिडगिडाकृति पक्षिकुलोद्भव आश्रम शोभत त्यावरता ॥
किलबिल गौरव कृष्ण हरी रव सदपद संभव आत्महिता ॥ ८ ॥
सुखकर हा हरि आश्रित यास्तव संगगती श्रम मानस हें ॥
सकळहि निष्फळ स्वल्प हि ना फळ दुःख दुणावत संत न हे ॥
गडबड पुष्कळ चंचळ सूनिळ संग। सोन्मद भूतदिनीं ॥
नच वदवे बरें भरतें मनहें किति रे कथुं मी वदनीं ॥ ९ ॥
घरघुसि रांडसमान न मान तमाम जमाव कमान कळी ॥
उघड बटीक नटीक कठीण कठींत नटीच घटींत वळी ॥

परि कृतपुण्य सपुण्य कपाळ तपास समान कमानहरी ॥
क्षिरक्षिर खोपट नम्र स्वभावित कृष्णाहि तृष्णित घेत दरी ॥ १० ॥
ठकमति झालि बुझालि सुलालि कळेंत मिळेल परे ॥
नवनव वास सुवास सुजाण सुभाव समान सुजाण खरे ॥
मम भरथाय मि गाय समायन मायक माय सताप तपे ॥
भळभळ नीर सुलोचनिं माधन राव स्वभाव मनोघ कृपें ॥ ११ ॥
चटकि लठीक नठीक नभांतन भीत न लाज जनांत तिला ॥
निमति तरी बरि ही जगली तगली जवळी असती भुलिला ॥
नरडि इची मुरडी करडी सरडी दडली घुडली सुटली ॥
करकर दंत अवाज सुमोद अमोद रसांश सुबोध भली ॥ १२ ॥
सकळहि या रिति आक्रोश कारक आगर वीरह हा मुळचा ॥
कुळदिप शामळ कोमल केवळ प्रेमळ मानस बोधलिचा ॥
सदपद शोधन अर्थ मनोरम सूक्षम मंथनिं सत्य दिसे ॥
सलगि अनंत स्वभाव सुवावन गांव न नांव निजेत सुसे ॥ १३ ॥

## ५ कुब्जानुवाद.

( शार्दूल. )

गोपी माधव वीरहो स्मरमना कुब्जान्वयें मानसा ॥
शांती भाव जडाव हा जडणिचा आहे निती मानसा ॥
साऱ्या गौळणी येक भार्गि जमती मध्यें बरी राधिका ॥
शोभे सोमकळा नभीं सति तसी नक्षत्र त्या आधिका ॥ १ ॥
स्वानंदें रमणी सदां घननिळा संगें रसीं रंगल्या ॥
त्याची नंतर वरिहो गति बळें बोलूं बऱ्या लागल्या ॥
स्नेहानें तुटल्या कळा तनुचिया ऊदासता आननीं ॥
बैसोनी हरि खेळणीं भुमितटीं वीचारता काननीं ॥ २ ॥
बाई काय करूं धरूं कितितरीं धीरू मिं हा अंतरीं ॥
वारीजाक्ष हरी कसा तरिं सये टांकूनि गेला दुरीं ॥
दावूनी घरभाव मानसगती कांपीयली मान गे ॥
नाहीं मानस शांत साजणि अजीं कांतावरी भान गे ॥ ३ ॥

छातीचा दगडाहुनी द्रढ कसा नंदात्मजो जाहला ॥
चित्तानें धातें बांधिला घनदया भावार्थ तो संपला ॥
कावोनी ममता गळा मुरडिला बेमान हा चोर गे ॥
आम्हीं मात्र फसोनियां रडत ह्या सूखांत तो गार गे ॥ ४ ॥
बट्कीला भुलला जडे समपणा तीचा हरीचा कसा ॥
रांडेची धनुसी कटी तिडतिडी कैचा इला आरसा ॥
पोटासाठिं दळी घरीं दुसरिया मोला मजूरें ठकी ॥
हाडाचे पिंजरे त्वचे बडविले मांसा नसे ठाव कीं ॥ ५ ॥
अष्टांगें सम नाचतीं तिडिविडीं सर्वांगिची वांकडी ॥
कैसी दाटलि फांकडी घननिळा अम्हां मती वांकडी ॥
रांडेची मुसकी करोनि बरवी टांकीयली आसती ॥
दैवें गांवि व्रजामधीं मग कशा आजूनिही आसती ॥ ६ ॥
मूखामाजिं न दंत गाल बसले भाळीं वळी दाटल्या ॥
नाहीं कांचहि ज्या करीं कवडिची कैंच्या तिथे पाटल्या ॥
वांती होत मना तिच्या करणिनें मूळींच ते बोजटा ॥
केशांचा वळया वळोनि जिवते नामेंच त्या हो जटा ॥ ७ ॥
लाळेचे वरंगाळ गाल हनुटे शेंबूड तो बुड्बुडे ॥
नाकाची गळती सदोदित वसे वांकोनि गेलें तिडें ॥
घोडें हें हरदास–वाहक गठीं त्याहूनही रोडकी ॥
बाई कोण इला सुचे मति तरी कंसांतका जोडकी ॥ ८ ॥
रांडेची सुघडी गडी हरिजडी वेडी कसी ती म्हणूं ॥
दैवानें दुबळ्या कड्यांत घसरू आम्ही उण्याची म्हणूं ॥
अंगानें सरळा वयामधिं बऱ्या गोऱ्या वरी देखण्या ॥
नाहीं त्या विधिच्या करीं दुजि सखी रेखावया रेखण्या ॥ ९ ॥
ऐशाही असुनी कळे अवदशें वक्रत्वता पावलों ॥
मोहाचा निधि अंबुजीं बुचकळूं अर्थांत झेंपावलों ॥
भोगाची गति नाडलो अडलि हे बुद्धी झुरे अंतरीं ॥
बाई चांगलि तेंचि गे बटकुरी कृष्णासि जे अंतुरी ॥ १० ॥

कैसी वांकळ मानली मळकटी तैलें उसी भीजली ॥
बाजेची थनु आकृती वरि कसा नीजे कुशीं ती भली ॥
गौळी हा मुळचा कुळी हिन असे ह्रीणामधीं रांड ती ॥
गांठीं एकचि बाणली घरघुसी आम्हां करी सांड ती ॥ ११ ॥
त्यागावी तनु वाटते मुळिं जडी खावोनियां कौकरीं ॥
कामाचा बडिमार सोसत नची आला कली कौकरीं ॥
कोणाला नवसा कुळामधिलवा बाहेरचा आसरा ॥
मोडावा बांळि मानता करुनियां दासीं कुशीं आसरा ॥ १२ ॥
माळाचे सटवाइला नवसतां नौसा जनां पावते ॥
कंसांता सुटण्या उपाव बरवा ह्याची मनीं भाव ते ॥
गोणायी पडसाळचे नजिकची मारेकरी नौसिची ॥
मारूं ठार तिला भला उगम हा या गे गडे नौसुची ॥ १३ ॥
चाळोबा खडकांतला सकळगे लोकापवादीं बरा ॥
देती बोकड कोंबडा बळि तया दायादता संहरा ॥
लोकांची बहु दाटणी दिनानिसीं पाहूं चला तेथ गे ॥
पुर्ती सर्वहि आमुचे भरंवसे चित्तोध्दती हेत गे ॥ १४ ॥
कृष्णानें त्यजिल्या तया दिनहुनी वेणीफणी नाकरूं ॥
कोणी पांथिक भेटतांचि मथुरे–माजील त्या आंकरूं ॥
सोडीलें मथुरापुरामधिंदधी वीकावया जाउं ना ॥
फूटे छाति हरीवियोगगतिनें त्रासाभरें जावना ॥ १५ ॥
भानूजा हतभागिहे हरिविणा पाणी विखी भासदे ॥
पक्षी वृक्ष उदासता अभरले तैसींच तीं सावदें ॥
डोळ्यानें नच पाहवे जगनिती वाटे कडू फार ती ॥
मंदीरीं तम भावना निजकळा चित्तीं करूं आरती ॥ १६ ॥
बूडालों उभया तटीं कटकटां गोकूल खातें मना ॥
प्रेताची सरि भासते घरघरीं उदास ती भावना ॥
पोरें खेळत ना झुरोनि अडलीं गायी वनातें त्यजी ॥
कैसें माधव आमुचें प्रितिपणामध्धील नातें त्यजी ॥ १७ ॥

दैवा प्रांगमुखा सुखात्यजुनियां शोका मधीं लोटसी ॥
काळा दे मरणा नकोच जगणें चिंता निशीं हो दिसी ॥
रंगाचें मधिं भंग हा गडणिनों कृष्णें दगा हा दिला ॥
वाराया दुसरा समे नच मती देहो अजीं तापला ॥ १८ ॥

येई रे मदुसूदना नरहरी गोविंद दामोदरा ॥
गोपा पाळक नामका घननिळा तोडोनियां आसरा ॥
तूझे काय तरी करोनि चुकिला गांजीयले रे तुला ॥
नाहीं आठव आमुतें सदघना तूवां नसे बोलिला ॥ १९ ॥

नंदाचें घर सोडिलें यशुमती बोले नची आमुतें ॥
नाहीं बाहिर देखिली तिजप्रती पारा न दुःखा तुतें ॥
म्हातारी असली असोनि जननी पीता कसा त्यागिला ॥
बेमाना रित ही नसे बरवि दे दायादता हा लिला ॥ २० ॥

दूजा लेंक कुसीं नसोनि जननी खोब्या तुवां टाकुनी ॥
कुब्जेला भुलकासि काय म्हणुनी लज्जा नसे रे मनीं ॥
गोपी या परकीं कशा असलिला लागे तुला रे लळा ॥
मूळींचाचि कठोर चोर लटिका रंगें तुवां कावळा ॥ २१ ॥

आम्हां भेट तरी तुवां दुरुनियां येई दिनीं एक रे ॥
घेवोनी सवती निरोप सखया येई बरा रे त्वरें ॥
नाहीं ठेवित बांधुनी तुजप्रती आम्हीं तुला माधवा ॥
पाहूं आनन एकदां निरखुनी जावें पुढां यादवा ॥ २२ ॥

कांता टाकुनि भाळलों तुजप्रती कैसें तुला नाठवे ॥
आम्हां मात्र न सोसवे विरह हा दुःखांतरीं सांठवें ॥
वाटेला अवलोकनीं दिन सरे तूझ्यामुळें माधवा ॥
वैरी मानुनि दादले मति मधीं प्रेतासरी वानवा ॥ २३ ॥

रूचे हें तरिं काय रे घननिळा टाकोनियां आमुतें ॥
दासीचे सगळे लळे पुरविसी हेंची मना खात तें ॥
भाग्याचा भर आज काळ सरला वक्रा असोनी तिचा ॥
नीतीचा पुर आमुचा सरळ हा वक्रा खरा दैविचा ॥ २४ ॥

अष्टांगें लव कीं असी असुनही दैवें नवी शेंगसी ॥
नेत्राला दिसली खरी हरि जिला आम्ही तयाला घसी ॥
कर्मांची गति मोटकी सतिचिया तीची खरी नेटकी ॥
तेथें माधव काय हा करिलगे सांगे तुवां गे ठकी ॥ २५ ॥
या रीतीं निति रोज गोपि हरिच्या ध्यानाप्रती गुंतुनी ॥
शोकार्ते करिती सती पतिरितीहूनी बऱ्या या गुणीं ॥
भावाची गति भक्ति ही बहुनिती गोपीरुपें बाणती ॥
साऱ्या सादर आपसांत मतिनें नीती तनू शोभती ॥ २६ ॥
गाऊं मानस माधवा बहुगुणी संसारसारान्वयें ॥
हारूं संसृति भावना इह रुपीं साक्षीरुपा अन्वयें ॥
गोपीवीरह गीत हें शुचिबहु गायी मना रोज तूं ॥
सांगे मान अनंत हा गुणनिधी दीना अनंताहि तू ॥ २७ ॥

## ६ राधा भुजंग.

( भुजंगप्रयात. )

हरी भावना राधिका भक्तिलीला ॥ वदे मानसा टाळ तूं या कलीला ॥
हरीच्या वियोगें झुरे अंतुरी ते ॥ वदे जो मुखेंया भवीं अंतरी तें ॥ १ ॥
मती राधिकेची मिळे कृष्णवासा ॥ दिनाहूनि दीनी दिसे हा नवासा ॥
बहू प्रेम जोडे दिठीं जारमुद्रा ॥ सरीता जसी धांवते ती समुद्रा ॥ २ ॥
जडे मोह तेथें वसे वीर हा हो ॥ अर्ती प्रेमता क्षोभ कामें नवाहो ॥
हरीकामयोगान्वयें राधिकाही ॥ बहू व्यापिली तापली अंतरा ही ॥ ३ ॥
सखी एक दूती असे तीजपासीं ॥ तिणें पाहिली बैसली हे जपासी ॥
उपासी असे नीजली नीजसेजें ॥ गती भूलभावो दिसे ती असी जे ॥ ४ ॥
वदे राधिकेसी दुती ते विचारी ॥ हुशारी बहू फीरली देश चारी ॥
अगे ऊठ राधे तुला काय झालें ॥ कसें तेज तूझें दिसे हें विझालें ॥ ५ ॥
उदासी मुखा कां तरी दीसतें ही ॥ मला सांग आधीं तुवां गे सती ही ॥
बहू शाहणी तूं पराच्या भराची ॥ तनू ही तुझी नौतिच्यांची भराची ॥ ६ ॥
वदे काय झालें खरें आण तूतें ॥ सख्या कृष्णजीची मना लाजवी तें ॥
उठोनी बसे ऊघडी नेत्र आतां ॥ धरूनी करा ऊठवी दोहिं हातां ॥ ७ ॥

पुसोनी मुखां दीधली जांभयींते ॥ तनू ऊमळे वास घर्मे भरेते ॥
मुखा कोरडी नेत्र आरक्त जालें ॥ कळा औदशा भावते सर्व आल्के ॥ ८ ॥
सखी पाहुनी बोलते दुःखीजेवीं ॥ ज्वरी तो जसा पोरवी आणि जेवी ॥
करा टेकुनी ऊभया भूमि भागा ॥ नगा भूष्णीं भानना वेणि भांगा ॥ ९ ॥
गडे बैस ऊभी किती वेळ तूंगे ॥ म्हणूनी तिला आपुलें वृत्त सांगे ॥
हरीनें दगा दीधला काल रात्रीं ॥ अजीं वाटतें संपला वास धात्री ॥ १० ॥
वदे ते दुती रोजगे रोगहाची ॥ गती नीतिची भावनाही सहाची ॥
गळां घोंगडें दाटुनीं बांधितेसी ॥ करावें तसें भोगणें जाणतेसी ॥ ११ ॥
फुका राग तुम्हां सुखाला मुकाया ॥ बयानो खरी आमुची नारिकाया ॥
गती वांकडी कूसडे शद्ब तोंडी ॥ नरा मानसाचें मती भान तोडी ॥ १२ ॥
पराची विवाही असोनी परला ॥ लळा वाढवीसी त्यजूनी वराला ॥
घरीं सूख नाहीं पुरे हौस तूझी ॥ म्हणोनी हरी जोडणी हौस तूझी ॥ १३ ॥
अजूनी किती अंतरीं वांकडें हें ॥ उरीं दुःख वाढे सह्याद्रीकडे हे ॥
अजीं मानसीं शांत होई जरा गे ॥ टिकेना तनू लागलीसे जरा गे ॥ १४ ॥
नसे वांकडें कृष्णनाथा कडे तें ॥ मुळीं गूण रूपा असें सांकडें तें ॥
तुझ्या कारणें वाढला राजहंसू ॥ मतीका कसीका मिकी तूचिवोसू ॥ १५ ॥
घडीदो दिनाची कमेना सुखाची ॥ फुका कार वाटे तुझा गे फुकाची ॥
नफा नाच तोटा गुणानें अशा गे ॥ सदां योगि ध्याती तुझा राग त्यागे॥ १६ ॥
रमादासि ज्यासी तुझा छंद त्यासी ॥ किती वांकडें राखिसी गे कुसीसी ॥
जरीं नाहिं आला तुझ्या तो घरींगे ॥ तुझें काय चाले वरी त्या बळा गे॥ १७ ॥
वदे राधिका नाचमी दोष कारी ॥ हरी बुद्धि फीरे दिसे ती त्रिकारी ॥
नकारी मतीची मती बाणलीसे ॥ मथी दांडगी रांडती भाळलीसे ॥ १८ ॥
असे प्रेमता माझि त्या फार मागें ॥ नसे त्या रितीनें रमे हार मागे ॥
अगे रात्र भागीं गुणाचे नवावें ॥ जसे ते गिरी कोसळूनी पडावे ॥ १९ ॥
तुजा छंद योगें मला टोंच बोली ॥ कसी सोसणें सांग तूं गे हि बोली ॥
असे खोलिमध्यें निजायाची खोली ॥ गितीं भावनास्वादही मोद खोली २०
वदे ती सखीगे हरी काय बोले ॥ मला सत्वरीं तेचि तूं सत्य बोले ॥
अगे काय सांगूं सुचेनाचि कांहीं ॥ मला वाटतें मी जगेनाचि कांहीं ॥ २१ ॥

चुकी झाली माझी मलातीच खास्ते ॥ जसें सावकारीं सुशीलासि खांत ॥
बहू तोडुनी बोलिलों लावुनीयां ॥ मती चंचली त्याचि ती भावुनीयां ॥ २२
न सांगोनि गेला निजे मार्जि मातें ॥ तुला सांगतों मानुनी आजि माते ॥
मनीं राग राहे खरा सांजगाचा ॥ उरी जाच होई अजीं सांजगाचा ॥ २३ ॥
दिनीं आजिचा नाहिं आला घराला । कसी क्रूर झाली मती भावलीला ॥
दिनांतूनि साळा करी येरझारा ॥ कळी लावणें दूरिया नाच थारा ॥ २४ ॥
तरी सर्वही भावने माजि योगें ॥ अजीं भावती भावने माझि योगें ॥
दुजा संगिं बोले कळाया मला तें ॥ मुखांतील गोष्टी फुके आनळातें ॥२५॥
हसावें रुसावें नसे कोण तऱ्हां ॥ मुखांतूनि काढी बहू लांब जिऱ्हां ॥
गमेनाचि त्याला अशा अंतराचा ॥ दिसे मोड हाके उता अंतराचा ॥ २६ ॥
नसे सूख आजीं गती रौरवीगे ॥ पडे साजणीं छातिही रारवींगे ॥
न येई जरीं आजिच्या रात्रि हो तो ॥ रमे प्राण देहीं अनूमान होतो ॥ २७॥
घडी एकही जातसे यूग मानें ॥ गती तान भूके वरीहीन माने ॥
करूं काय गे हाच दैवा असें कां ॥ हरी सूख हें आजच्यानें नसे कां ॥२८॥
अजीं रात्र वैरी मला येत आहे ॥ कसें दैव खोटें मतीला न साहे ॥
गडे जाउनी सांगत्या प्राणनाथा ॥ तुझी राधिका आज चित्तीं अनाथा ॥२९॥
अस कुंजवासी किंवा गोटणीला ॥ मतीनें असेहा गडीगे गणीला ॥
वनीं गाइ राखीतसे वाटताहे ॥ असीची असी चाळगे वाटतीहे ॥ ३० ॥
मती मोहुनी काननीं आननानें ॥ पळावेंचि त्यागे मृगांकाननानें ॥
तुला जें सुचे सांगतें येई ऐसें ॥ मला वांचवी देवि दर्शन रहस ॥ ३१ ॥
तुकायी भवानी तुला नौस हाची ॥ अहंभाव नाचा बळीमेष हाची ॥
हरी भेटवी मीटवी कामकंदा ॥ नको मायिकी भावना कामधंदा ॥ ३२ ॥
नसे अन्न आजीं मुखामाजिं पाणी ॥ सदां नेत्रवारी पुसे हेत पाणी ॥
तुझी वाट आतां बसोनी पहातें ॥ जसी चातकी मेघ ओघा पहाते ॥ ३३ ॥
तुझी भेटगे नेटकी येथ झाली ॥ मतीच्या तटीं टीकले आस जाळी ॥
असे आस आतां मलाती तुझीगे ॥ बराशद्ध भावें हरीला पुजीगे ॥ ३४ ॥
पती गाइ पाठीं सदां गोठणीला ॥ निशी माजिरानीं असे वास त्याला ॥
मुलीचे घरीं काल सासूहि गेली ॥ हरी वांचुनी संधिहे व्यर्थ गेली ॥ ३५ ॥

नको वेळ लावूं असी दीन थोडा ॥ गड्यालागिं सांगे ळळाहा न तोडा ॥
तुझ्या अस्तयोगें सुके राधिकाही ॥ जसा वारि जाती रवी सांज पाही ॥ ३६
बरेंगे असें बोलुनी वृति जाती ॥ मुळीं लाघवी या भवीं हीच जाती ॥
सकी पोचली माधवा भेटलीते ॥ जना कर्म वर्मी गती वीटलीते ॥ ३७ ॥
असे येथ भावो असा अंतराचा ॥ परावा नसे संसृती अंतराचा ॥
दुतीहीच भक्ति असे कुंटिणीहो ॥ मर्ता राधिका ती सतीही भवीं हो ॥
पराळागिं भूके परी मार्ग नाहीं ॥ तया योजिली कुंटीणी हे उपायीं ॥३८॥
बहु आगमीं वर्णे धर्मी मुरारी ॥ पूजिला असे भावनाते विकारी ॥
कधीं प्राप्ति नाहीं गमे ऊगमोतो ॥ पुढें भक्ति वेशी धनीं मानहोतो ॥ ३९ ॥
पराची कळा जाणती कुंटिणीते ॥ निजाची कळा जाणणें भक्ति नातें ॥
मुळीं ऐक्य भावो वरी द्वैततातो ॥ विधीची कळा ही नसे त्याचताती ॥४०
असों पोचली भावनेपासि भक्ती ॥ गडे राधिके हूनही प्रीत युक्ती ॥
वदे माधवा येकटा आज कां तूं ॥ मला पूसिलें नाहिंकां आज गातूं ॥ ४१॥
तुझी खिन्न मुद्रा असी काय आजीं ॥ वदेगा मला गुंतला कोण काजीं ॥
कळा नाच मूखीं उदासी रुपासी ॥ वरी सर्व सोंगें बरी दासि पासीं ॥ ४२
हरी सार साक्षी नियंता जगाचा ॥ मनीं जाणिला भाव तो सर्व तीचा ॥
म्हणे कृष्ण योगें मला त्रास झाला ॥ तृषा लागली प्रेम भावो विझाला ४३
अगे आज साऱ्या दिनीं मी वनाला ॥ असें राहिलों चूकुनी त्या गड्याला ॥
कशाळागिं तूंगे बरी येथ येसी ॥ निसी पातली भीतिना येचि तूसीं ॥ ४४
वनीं वाघ कोले गव्हे लांडगे गे ॥ जिवाला तुझ्या रात्रि होती दगे गे ॥
वदे ती सखी श्यामळा राजिवाक्षा ॥ कृपाहे तुझी मान सानाचि कांक्षा ४५
मला यावया एकटी काम हेंची ॥ तुवां जाणसीरे परी वार्णि तेंची ॥
मरे मंदिरीं राधिका वीरहानें ॥ तुझ्या माधवा गा वियोगा नळानें ॥ ४६
तिला पाहुनी माझिया नेत्रिं पाणी ॥ बहु येतसे आजुनी चक्रपाणी ॥
तुला आठवी आणिती आळवीगा ॥ गळा सूकलासे प्रभा माळवीगा ॥ ४७
नसे अन्नपाणी क्षुधा नाचि पोटीं ॥ भरे वीरहो आपला भाव पोटीं ॥
तिला टाकुनीयां असें कां करावें ॥ बरें लागुनी नादि त्याहो परावें ॥ ४८
स्त्रियांची घडी जाणसी अंतरीं तूं ॥ कसी राधिकेच्या नची अंतरा तूं ॥
नको टाकुं तीला मरेरे खरी ती ॥ मिनाला सड्या भावना तीच रीती ॥४९

अगा चाल आतां नको वेळ लावूं ॥ गुणा वावुग्या र्म्थेही माफि होऊं ॥
मिही हात जोडी तिच्या भावनेनें ॥ द्रवावें तुझ्या अंतरे रें मनानें ॥५०॥
तुझा ध्यास तीसी दिनीं आणि नीसीं ॥ रवी प्रेम तीचा तया आलि नीसी ॥
खुषीनें चला राग सोडा दयाळा ॥ तिला भेट तूं ऊठ आतां मवाळा ॥ ५१
तुझ्यावीण तीसी गमेना प्रपंचीं ॥ असे मानसीं तूजिये ती विवंची ॥
तुला फार आणी रमाया कुमारी ॥ बऱ्या मीळती तूज रे त्या मुरारी ॥ ५२
परी ना सरी राधिकेची तयासीं ॥ इच्या तूळणे दीसतोची तया छीं ॥
सरी पांच ठायीं कसी कांच येई ॥ इची तूळणा इतराला न येई ॥ ५३ ॥
अरे दृश्य भागीं जिला भास नाहीं ॥ कुशीला निमे जाग्रती वासना ही ॥
नसे भास दूजा तुझ्यावीण तीसी ॥ असेला कशी सांवळ्या त्याजितोसी ५४
तुझ्यावीण मेली जितीची असूनी ॥ बरी वाटते जीतितेही नसूनी ॥
अगा मोहनाला तिला घालुनीयां ॥ कसें काय वाटे तुझें हो मनीं या॥५५॥
वदे माधवो जाइ तूं मार्ग पंथें ॥ नको चाळवूं भावने या अनर्थें ॥
तुला चांगली ते मला गोड नाहीं ॥ वरी बोलणें प्रीतिची भावनाही ॥५६
बहू सोसियेले तिचे ते तमासे ॥ बहू मानसा तीचिया तो तमासे ॥
नये फार प्रीती बरी थोडकी गे ॥ मतीं मांजि ती भावना ताडकी गे ॥५७॥
वरी प्रेमताती असी धार पोटीं ॥ नसे मोह माया कठोरी खपोटी ॥
बहू फूगरी खोल बोली हटाची ॥ इला भूललों मी त्यजूनी पटाची ॥५८॥
असे बोल ते ऐकिले कृष्णजीचे ॥ कडे ऊडती दासिच्या मानसाचे ॥
मतीच्या तटाचे हरी वन्हि शब्दें ॥ सखीचे तडे ऊडती जोवि अब्दें ॥५९॥
पडे दासि भूमी म्हणे हाय कृष्णा ॥ कसी राधिका सोसी या भाव उष्णा ॥
अजीं जाउनी काय सांगूं सतीला ॥ असें सांगतां चित्त घेतें भितीला ॥६०॥
नको रे हरी राग हा राधिकेचा ॥ तिला नाच सोसे मती माझि किचा ॥
मला मार्ग नाहीं तिला भेटण्याचा ॥ नसे अर्थ हा तीचिया वांचण्याचा ६१
अगा लोभयोगें मती काम होई ॥ अपूर्णी क्रिया भासता क्रोध येई ॥
मुळीं क्रोध तो लोभवीणा नसे हो ॥ कळोनी कसें मान हा ना वळे हो ६२
दिनाहूनि दीनामधीं ही गणावी ॥ तुझी राधिका दीन ती हो म्हणावी ॥
तुला वश्य झाली तया दीनहूनी ॥ नसे गोष्टि गाणीं पवाडे भवानी ॥ ६३

भवाणी प्रितीची कळा तूटलीसे ॥ भवीं व्याप्य नाहीं कळा मीनलीसे ॥
तुला मीळली त्यागिसी ऐसीयेला ॥ तुझ्या थोर नांवा जगीं निंदियेला ६४
प्रितीची रिती थोर ती त्यां तरूची ॥ किती लालुची प्रीत त्या अंतराची ॥
तया वृक्ष ठायीं धरी आसरा ती ॥ बरी माधवीं वृष्टि काळीं भरे ती ॥६५॥
भली मीठि देवी वळोनी चढोनी ॥ जनीं आणि रानीं भरे ती समानी ॥
मरे पूढतीं उष्ण काळीं सखी ती ॥ न काढी तिला राखितो प्रेतरीतीं ॥६६॥
समाधानिं ऐसी तया स्नेह बोली ॥ तुवां जी तिची मान तूं कांपियेली ॥
अगा कृष्णराया दया येउं द्यावी ॥ तिची आपुली बोलि एकांत व्हावी ॥६७
मनाची सरी ज्या रितीं माधवाची ॥ तसें बोलणें कुंटिणीचें स्वकाजीं ॥
घनु हांसला मानसीं बोलताहे ॥ मला राधिके वांण शांती न होये ॥६८॥
म्हणे दासिलागीं तुवां चाल पूढें ॥ बरा येत मी मागुनी जाण वेडे ॥
नको काळजी बाळगूं सांग राधे ॥ नको मानसीं राखुं तूं हे अबाधें ॥६९॥
अगा कापटी पोटिं तूंवां अनंता ॥ नयेसी तुवां मागुनी चाल आतां ॥
पुढें घालुनीयां तुला आणण्याची ॥ गती बोधनी जाण ही राधिकेची ७०
खटाटोपे टाकी उठे ठेव प्रीती ॥ उगे चावटी वाउगीं काय नीती ॥
वदे सत्य तूतें सखी हेत माझा ॥ असे मार्ग लक्षी माउली मान माझा ७१
धरीं जाउनीयां तसा त्याच वाटे ॥ घडी दो घडी आंत येईन वाटे ॥
वदे राधिकेसी तुवां जाउनीयां ॥ नको खेद मानूं द्विधा मानुनीयां ॥७२॥
असें ऐकुनीयां दुती चाललीसे ॥ तिच्या मागुनी हाहि ये त्याच दीसें ॥
असें मंदिरीं राधिका वीरहानें ॥ प्रतीक्षा करी मागती हो रहानें ॥ ७३ ॥
सखी नाहिं आली लुब्धली वाटते तें ॥ खरें भूललें सौतिलागीं मतीतें ॥
कशाचें मला सूचलें कार्यचित्ता ॥ दुणावेंचि हें दुःखची मात्र चित्ता ॥७४
इमानाचि नाहीं खरी दूनिया ही ॥ बरी चाळिसी झालिसेही वयाही ॥
खरा कृष्ण माझा दिसे भाळलाई ॥ स्वताचींच बोटें दिठीं रूततांई ॥७५॥
मला वेड लागे पहातें तयातें ॥ रमा यावरी वेळही हो तयातें ॥
( नसे लोक कोणी निरंजीवनातें ) ॥
खरें काय खोटें कसें कोणजाणें ॥ स्वताचें उगां तेजिकें तेंथ जाणें ॥ ७६ ॥
मती मोहिनी मोहिनी वेणुपाणी ॥ गती चक्रपाणी जसें व्याघ्र पाणी ॥
विशाळा दिठीचा झपाटा मनाला ॥ खरा बैसला कामिनीला वनाला ॥७७

असा ध्यास लागे मती राधिकेला ॥ शकूनांनिं तेव्हां उभारा जि केला ॥
रथाआधिं भासे ध्वजाची पताका ॥ तयाभावनीं भाव हे येत तूका ॥७८॥
लवे नेत्र डावा स्फुरे वाम बाहू ॥ सुखावा मना नासुनीयां अभावूं ॥
म्हणे कार्य होई असें भासताहे ॥ तदां देखिली दासिते येत आहे ॥७९॥
मुखां टौटवी ते दिसे हास्यमूखी ॥ कळा जाणुनी होतसे फार सूखी ॥
बरी संन्निधानीं दुती पातली ते ॥ मना तांतडी प्रेमता दाटली तें ॥८०॥
गळां घालि मीठी म्हणे कृष्ण कोठें ॥ खरें सांग गे राहिलासेल कोठें ॥
वदे राधिकेला अगे यार तूझा ॥ मला भेटला सांगितीला हेत तूझा ॥८१॥
नकारा वदे तो प्रकारें पहीलया ॥ पुढें शांत आला वळे आपुल्याला ॥
अजीं येइ गे वेळ तासीं दुतासीं ॥ पुढें खेळणें मांडणें त्या दुतासी ॥८२॥
बरी साधि गे कार्य तूझें सुखानें ॥ नको कालवूं मानसाला विखानें ॥
रमे आरमे भार हारी हरीचा ॥ अजीं होइ गे संगमो मीळणीचा ॥ ८३ ॥
अली या रितीं ती वदोनी घराला ॥ चले तेधवां मागुनी कृष्ण आला ॥
वरी पाहि राधा तदां धांवुनीयां ॥ गळां घालि मीठि प्रिती भावुनीयां ८४
भरे अष्ट भावो स्फुरे कंठ तीचा ॥ फुटेनाची शब्दो तिचे वाणियेचा ॥
हरी भाव जाणे तदाकार झाला ॥ पुसी नेत्र तीचे करी भक्तिलीला ॥८५॥
स्फुरे अंतरीं काम दोघां समानी ॥ मिठी दिधली भावना त्याचि मानीं ॥
करानें धरी हा हरी ऊर तीचें ॥ मुखा चुंबि तो मोहनी मोहनाचें ॥ ८६ ॥
सती मीळली भीजली धर्मयोगें ॥ मुळीं कष्टली कर्मकांडीं स्वयोगें ॥
मती छंद तो प्राप्त संधी उसांडी ॥ उराहूनि ऊटे सुटे ते सुसाडी ॥ ८७
भवा अंबुमाजीं सती अंबुजा ही ॥ हरी श्याम हा भृंगरुंजी भुजांहीं ॥
सखा सेवि मोदा तदां हालती तें ॥ जशी वायुसंगें तरूची लतीते ॥८८॥
मुकुंदें कटीची निरी हीसकीली ॥ स्वरूपा स्थळा पाहण्या होच कीली ॥
गढी धांगडी नागडी एक ठायीं ॥ समी भावना साक्ष याला विठाई ॥ ८९
मिळे मूळपीठीं हरी मातृकेचा ॥ स्मरे मानसा शोधका मातृकेचा ॥
तरी हीच धारा असीची भरीला ॥ स्वबोधें पहा राधिका ही हरीला ॥९०॥
हरी सिंव्हभावो करी कामनाशा ॥ फिटे त्या दिनीं सर्वही हो मनाशा ॥
सतीही तदाकीं करी कृष्णक्रीडा ॥ धरी अंबुजीं रौंदळी स्नेहक्रीडा ॥ ९१ ॥

हरीला उरीं खेळवी चेंडुभावो ॥ कळे शक्ति जोरें प्रचंडु स्वभावो ॥
हरी भोगुनी ऊलटे काम कंदी ॥ दिठीला जडे लालिका त्यांत कंदी ॥ ९२
सुखाचे लळे पूरले हो बळें ते ॥ तदां ऊठती शब्द जे कोंवळे ते ॥
तरू जे फळानें दशें पक्क आले ॥ सुवासान्वयें भावने सर्व आले ॥ ९३ ॥
हरी येत कूशीं खुशी ऊभयांची ॥ तदां पारकी दृष्टि नाहीं भयाची ॥
वदे प्रेमळाला मराळा मनाची ॥ रुची काननाची विहारा वनाची ॥ ९४ ॥
प्रियेलागिं सांगे अगे प्रेम रंगे ॥ सदां वास माझा तुझा याच रंगे ॥
सती भंग नाहीं मती माझि झाली ॥ परी बुद्धि तूझी असी गे ब्रुजाली ९५
सदां भावनासारखी राख अंगीं ॥ उगां द्वैत भावो तुझा राख अंगीं ॥
जसी होसि तूं गे तसा मीहि होयी ॥ जसा रंगयोगें जला रंग होई ॥९६॥
असें ऐकुनी कृष्ण ऊरीं चढे ती ॥ तरूच्यावरी माधवी हो चढे ती ॥
करा भावना माधवी तागुराचे ॥ हरी वृक्ष हा वेष्टणीं राधिकेचे ॥ ९७ ॥
सती वास श्रृंगार परांगा पुरूषा ॥ रती वर्णिला कामिनी त्या पुरूषा ॥
पुरूषाहि वाचे वदे संगलीला ॥ प्रिती पद्मठायीं जसी ती अलीला ॥ ९८॥
जगाचे रितीनें कथा कौतुकाची ॥ मधीं अर्थलीला स्वबोधें सुखाची ॥
असे संग हा भाव भक्तीरुपानें ॥ जशाला तसा देखणा हा रसानें ॥९९॥
भवा हारवाया मनोभी अनंती ॥ मती मीनली सज्जनीं ते वसंती ॥
पिका पातली आत्मविद्या रसाळा ॥ सनाथार्पणीं प्रार्थनाभाव माळा १००

---

## ७ गोपीविनोद.

॥ सवाई० ॥

एक दिनीं वधु गोपनितंबिनि नंदघराप्रति येउनियां ॥
बोलति आननिं प्रेमभरें मनिं बाळक श्रीहरि जाणुनियां ॥
माय यशूमति घेउनियां हरि लोचनिं भाल विलोकितसे ॥
तीस म्हणे वधु द्याजि अजीं हरि खेळउं म्हेउनि मानतसे ॥ १ ॥
ऐकुनियां मग माय वदे सुत शब्द सुवाणित प्रेमभरें ॥
नंदमनोद्यतिकंदनिजाश्रित मंद सुहास्मित जो अब्ज रे ॥

जा हरि आजिं घरीं तुज गोपवधू प्रिति न्हेत बरें वदती ॥
खेळविती कवतूक निती प्रमदा मज प्रेमचि जाणविती ॥ २ ॥
जाय म्हणे व्रजपाळसती निजबालक जाणुनियां खुषिनें ॥
मी नव जाय म्हणे हरि कोंडिति मंदिरिं खोडिल या रितिनें ॥
गौरिहराप्रति घेउनियां उरिं नीजति कामिनि या मजला ॥
गूदगुल्या करिती बहु आनन चुंबित दाविति हेतकिला ॥ ३ ॥
शून्य घरीं मज कोंडुनियां सति बोलति आननिं हो नवरा ॥
नेणसि माय तुं साज साज घरिं मानसभाव स्वभाव बरा ॥
सर्व जमाजम ओस घरामधिं रोधमती मदभोगकळा ॥
फेडुनियां पट पोट सपाट न लाज मनामधिं या अबला ॥ ४ ॥
या ललना मज भागविती बहु चाळविती सदभाव निती ॥
कोणि कुचावरि घेउनियां मज पाणि करांबुजिं चोळविती ॥
नागडिया तनु पाहुनियां मग लोचन झांकित माय मि गे ॥
फार नढी रडि येत मि तेथचि जाणुनियां अजिं जात न गे ॥ ५ ॥
जाय न मी अजिचान दुजा घरिं साचपणें तुज सांगत आई ॥
कार नको करुं घालवि कामिनि थार वसों मज मानसिं आई ॥
फूगडि घालित ऊघडि होउनि लूगडिं खुंटिसि ठेउनियां ॥
ऊघडि ती तनु सूघडि केउति भूतनिती सम धांगडिया ॥ ६ ॥
कोण नसे घरिं कामिनिवैभव योजिति मानसिं मींच पती ॥
वाढ मला म्हणती सकळी मग लाजत मी सतिला निगुतीं ॥
कोणि दबाविति बाळरु जाणुनि नाशिकिं अंगुलि ठेवुनियां ॥
बोल म्हणे मज काय मुखें वदुं लाज नसे मुळिं गौळणिया ॥ ७ ॥
या तरुणी नवती मधल्या मदभावभरें रमती गमती ॥
बाळक मी परि थोरसरी समभाव स्वभाविक दाखविती ॥
कोणि वधू मज घालुनियां भुली हालविते बुलि नीजकरें ॥
तोडुनि मागति कातरि दावुनि कोण सुरी करिं घेत बरें ॥ ८ ॥
येत मि जी जरिं काकुळती बहु त्यापरि नासिरि सामपणीं ॥
माय मि आज न जाइच येथुनि सोडुनियां तुज सत्यपणीं ॥

बोलत या रिति सार निजार्थित तारक माधव भक्तिसखा ॥
ऐकुनि कामिनि मूखकरांबुजिं आकळिती हरि प्रेमसुखा ॥ ९ ॥
लाघव नाटकि कृष्ण मुरारि रमाधव अच्युत हंसरुपी ॥
बाह्य जना गम शोध गमे मग हीत बुडे नित ऐक्यरुपीं ॥
एक वदे हरिच्या जननीप्रति मामि बरा मुल हा तुमचा ॥
चंचळ चाळक चाळवितो उगिं शब्द पुरे नच हा अमुचा ॥ १० ॥
मोहन मानस सान वयें परि थोर सरी नच पावतिया ॥
बोल असे तरि कोण मतिमधिं तोल समेसम फावतिया ॥
वीटवि संसृति ऊठवि येथुनि भास अमां अजिं होत असे ॥
पोर कसें म्हणुं ये वदतो गुण बोलुं नये जनिं लाज नसे ॥ ११ ॥
गडबड अंत न संत अनंत मतीजल भावनिधि मुळचा ॥
लहरि नवाळि जमाव समोघ रितींसदसंगतिचा कुळचा ॥
सतिमति कामिनि भामिनि यामिनि टाकुनियां घर दृश्यगती ॥
सकळहि शांत मनोघपणामधिं भावति बाळचि आत्मनिती ॥ १२ ॥

## ८ दधिमंथन.

( वसंततिलका. )

आदी सनाथ नमुनी हरि गूणलीला ॥ गायीन मी निजरुपें गुणभावलोला ॥
गूणाकृती मुळिं नसे निगभावरूपा ॥ साचेंपरी गुणरुपें करणें स्वरूपा ॥ १ ॥
कर्मानुबंध तनु हे सगुणी नराची ॥ साक्षी नसे रुपविणा म्हणवोनि साची ॥
निर्गूण भाव सगुणी गितगाणिठावो । आत्मार्थ भाव जडणी सगुणप्रभावो ॥२॥

( द्रुतविलंबित. )

बहुत योग तपें तप जोडिलें ॥ अभिमती घसणींतुनि सूटले ॥
म्हणुनिया गवळी गडि गोप हे ॥ हरिकडे वसती प्रिति भाव हे ॥ ३ ॥
श्रुति जशा जडणी उपनीषदीं ॥ जडुनि राहत स्वभाव सुशोधनीं ॥
हरिकडे सतिया नित बायका ॥ नवकळा जडल्या सद्गोपिका ॥ ४ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

आनंदे सकळी गडे गवळि ते गोपी तशा धेनुही ॥
गोकूळीं अवतार धारण करी नीजार्थ दाता मही ॥

हा नंदात्मजनंद काननक्रिडा कुंजामधीं गोपिका ॥
संगें मांडित रास खेळ बरवा बोधार्थ हा कौतुका ॥ ५ ॥
त्याणें शोध गमे समे रतिपती प्रींती निती आकळे ॥
गाती गाणिं मनोघ ते मतिरुपें अच्यूत शोधावळें ॥
प्रातःकाळ सुखावभावमतिला बोधार्थता पातली ॥
गूणांची निशि संपली स्वरुपता दृष्टोत्पती पावली ॥ ६ ॥
झाली प्रेम सुगी मना अमनता जोडे वरी आजरीं ॥
भीतीना कळि काळ भाव मतिला आनंदता आभरी ॥
ऊठोनी प्रथमा मुखें धुति वधू गोविंद नामें जळें ॥
कर्में सारिति गेहकाज सकळी वीचारयोगें भले ॥ ७ ॥

( वसंततिलका. )

डेऱ्यांत घालुनि दधी रवि आगमाची ॥ पाळीत कामिनि करीं रित शोधनाची ॥
वाक्यार्थ अर्थ अनुमोद सबोध भावें । गाती मुखें रसिकता गितरंगभावें ॥८॥

( द्रुतविलंबित. )

नग चिरे करुनी तनु मांडणी ॥ गुण कळा सकळी कळ लावणी ॥
पर पुरूष मतीमाधिं घोंकणी ॥ घरपती विसरे रज कांचणी ॥ ९ ॥
अजित नाम मुखें वदती सती ॥ दुजि नसे मतिला घरिं त्या निती ॥
प्रतिदिनीं सदशोधन कौतुकें ॥ मधुर वाणिरसें अनुभाविकें ॥ १० ॥

( मालिनी. )

करुनि निगमभारा आत्मनी भाव डेरा ॥
दधि मधि श्रुति वाक्यें बोधनीं सत्वभारा ॥
रवि अनुभव भावो घालुनी त्या मधीं हो ॥
घुसळति सति सारा सारसंसार देहो ॥ ११ ॥
सदगति निति दोरें बोधनी धारणातें ॥
प्रथम सति करानें बांधिती आदरातें ॥
समरसि करि खासी चाळणी चाळितांना ॥
करयुग बहु हाले चंचले भावना ना ॥ १२ ॥

( शिखरिणि. )

मनोघाच्या ओघें सरळ सुमनें गाति गित हो ॥
सुवेळीं गोपीका घननिळ सखा प्रेमगति हो ॥
गती कृष्णा छंदें द्विविध त्यजुनी ऐक्य नितिनें ॥
हरी गाणीं गाती सगुण भवती नाशक मनें ॥ १३ ॥

( वसंततिलका. )

एकांत वेळ रमणा रमती मनोघें ॥ कांतान्वयें प्रितिरुपें हरि रंगयोगें ॥
अच्यूत चिंतन सदां मतिठायिं वागे ॥ गोविंद वामन हरी वदनांत रंगे ॥ १४

( तोटक. )

सदया करुणा कर वासुदेवा ॥ उदया प्रति ये हरि काम भावा ॥
व्रजत्रास कुमार वया हरी रे ॥ सदबोध उपासक अंतरीरे ॥ १५ ॥

( उपचित्र. )

अजिं ये हरि तूं मम मानसीं ॥ प्रित वाग तसाचचि मानसीं ॥
दुजिना आणखी सुख भवानीं ॥ हरिये हरिये नित शोधनीं ॥ १६ ॥

( द्रुतविलंबित. )

तनमनें करुनी तुजला हरी ॥ स्मरतसे नितमी रुपिं हांवरी ॥
मनतुटे घरदार निती सरे ॥ भर तिही भरली तव ओघिं रे ॥ १७ ॥
नरहरी मधुसूदन वामना ॥ मदअरी स्मरणा धरि आनना ॥
सति प्रती उपदेश करीतसे ॥ बिजरघूभवनाशक मानसें ॥ १८ ॥

( उपचित्र. )

सदया करि रे बरवी दया ॥ अरिभाव हरी जगदातया ॥
करुणा घनशामल मानसा ॥ अमला कमलांबुजवानसा ॥
सगुणा जगती निति दातया ॥ हरिरे हरि या अरिच्या भया ॥ १९ ॥

( द्रुतविलंबित. )

घननिळा करुणा कर लौकरीं ॥ पदिं मती जडवी दुर भी करी ॥
ततुकडे मतिमान नसो अजीं ॥ अजित तूं जडणी जड सांच जी ॥२०॥

( शिखरिणी. )

अगा दीना नाथा बलहिन अमीं कामिनि हरी ॥
पराच्या छंदानें अवनितलिंया आभर भरी ॥

नसे बुद्धि गेहीं स्वपण मतिची कामिक कळा ॥
भरे अंगीं साचा म्हणवुनि स्मरों आजिं विकळा ॥ २१ ॥
अजीं येरे द्वारीं हरि झडकरी नंदतनया ॥
मुखातें दावावें उठ घननिळा येई उदया ॥
गड्या गोपाचीया कमलनयना श्यामळ हरी ॥
पदांबूजीं लावी त्वरित सदया टाळिं भंवरी ॥ २२ ॥

( मालिनी. )

दिन उदय प्रभातीं प्राप्त झाली हरी रे ॥
अजुनि नच कसा तूं द्वारि येसी मुरारे ॥
तन मन धन सारें चिंतिते चैतना रे ॥
शिण हरी नयनाचा मानसा शांतवीरे ॥ २३ ॥
दिनाहिन करुणेच्या सागरा वासुदेवा ॥
नरहरि रमणा रे राधिका आत्मभावा ॥
शिण मज बहु झाला पाव रे देवदेवा ॥
अजितगुणस्वभावा ठाव दे वासुदेवा ॥ २४ ॥

( शिखरिणी. )

रमा कांता शांता पयनिधिमधीं ठाव करि त्या ॥
सुसंता संतापांतुनि निवटसी भाव भरत्या ॥
सख्या भक्तीचीया सदय मनसा गोपगडिया ॥
मुखा दावी मातें नच रुचि दुजी साच भवियां ॥ २५ ॥

( द्रुतविलंबित. )

गित असें रसभावगतीरुपें ॥ घरघरीं रित भागवती रुपें ॥
सति सकाळिं मतीमाधिं यारितीं अनुभवो भवभाव झुकावती ॥ २६ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

प्रेमाचें सदनीं हरी भजन हें गोपी गितीं भावती ॥
भावें यादवनाथ भाव घुसळी भक्तीरुपें रीजती ॥
कोणी शोधक सारसाक्ष जगतीं भावें मनें पाहणी ॥
गोपी गीत रसायणें नित असे बोधार्थ ही काहणी ॥ २७ ॥

( वसंततिलका. )

काढीत लोणि सखि त्या सकळीक सारा ॥ वेदांत सार उपनीषद आत्मसारा ॥
पाणी करोनि अनुभावमतीरुपानें ॥ तक्रांतुनी निवटिती भवशोधमानें ॥२८॥

( भद्रिका. )

तव हरी प्रगटे विदीमधीं ॥ गडि सखे गडि हा नरामधीं ॥
शिशु कुमाररुपें रमापती ॥ शिशुमध्यें रमतो दयानिती ॥ २९ ॥
तनु कळा घन सांवळि हरी ॥ करि कृपा निज भाविकांवरी ॥
कमलमूख सुहास चांगलें ॥ अनुभवें मुनिभाव संपले ॥ ३० ॥

( वसंततिलका. )

राजीव लोचन कळा सुविशाळ भाळीं ॥
माळी जगा रचविता सुतजा सुकाळीं ॥
ज्यासी शिवादि सकळी सुर वंदिताती ॥
तोची रमे गवळियांमाधिं भाव नीती ॥ ३१ ॥

( द्रुतविलंबित. )

करपुटीं नवनीत नितंबिनी ॥ कवळुनी हरि आठविती मनीं ॥
तव दिसे नयनीं सकुमार तो ॥ निशिवरी उदया रवि येत तो ॥३२ ॥

( उपचित्र. )

करिच्याकरिं तें नवनीत हो ॥ धरुनी सरल्या घरबाह्य हो ॥
सदशोधक वेद सबाह्य शोधुनीं ॥ मतिकर्म त्यजी नित आगमीं ॥३३॥

( द्रुतविलंबित. )

विदिमधीं सकळी सति पातल्या ॥ गुणभुतांतुनि ज्या मतिं वीटल्या ॥
नयन तें श्रवणें विसरोनिया ॥ जडणिला जडले नच भान या ॥३४ ॥
किति करें कुरवाळिति त्या मुखा ॥ सगुण भाव हरे रव ज्या मुखा ॥
निगमसाच सिकास गुणी हरी ॥ प्रित बहू मनिं ज्या सतिच्या वरी ३५

( मालिनी. )

गडिहरि मधिं गोपी मीळणी एक झाली ॥
नवनित कर ठायीं दाटणी ओट आली ॥

वितळुनि किति गेले ऊरलें सार्थकासी ॥
हरि मुखिं सति देती देहभानामिषासी ॥ २६ ॥
किति धरित करानें पोटभागीं हरीला ॥
कितिक मिनति ओठीं आदरें चुंबनाला ॥
दिन तंव बहु आला ताप लागे तनूला ॥
दिन उदित वसंता माजिली सर्व लीला ॥ २७ ॥
सदय पण जडे ही वर्णितां बाल लीला ॥
अभय मति प्रभाते प्रासही गोपिलीला ॥
प्रतिदिनिं मुखिं गायी तेथ हा कृष्ण येई ॥
सकळ दुरित भावो टाळुनी येश देई ॥ २८ ॥
करित मति सबोधा बोधनीं एकनाथी ॥
गति न रूप कळाही चालली नीजपंथीं ॥
सदय घन अनंतीं नीति ही भाविता हे ॥
स्थुळ गुण मति भावो हा अनंतीं वसा हे ॥ २९ ॥

## ९ गोपीगाराणी.

( वसंततिलका. )

नंदात्मजाप्रति नमी नमिं प्रेमयोगें ॥ सर्वांतरात्मक प्रभू जगतीं तरंगे ॥
भावागुणें प्रगटला निजलोकभानू ॥ वेदांत अर्थ इतुका सरिज्या न मानूं ॥१॥

( शार्दूलविक्रीडित. )

ऐकावें रसिकें सुबोध गितहें गोपी कळीच्या मिषें ॥
गायीलें बहुतें शुकादिकमतें त्यांतून हा लेशसें ॥
वाक्यांचीं मधुरोत्तरें मति रमे रामेहुनी या गितीं ॥
नीतीची भरती मुमुक्षु मतिला बाकी जनाची निती ॥ २ ॥

( भद्रिका. )

हरि वृजीं शिशु खेळ खेळतो ॥ करितसे नवनीत चोरितो ॥
दुध दधी सकळीं घरोंघरीं ॥ नित उठोनि पितो मुलें हरी ॥ ३ ॥
नच पदा समता विधीहरा ॥ पद रमे भुतितें भुतीं नरा ॥
नव विधी सति या प्रबोधती ॥ नवनितीं उगमो गती भुतीं ॥ ४ ॥

॥ दिंडी० ॥

धन्य भाग्यें भाग्यि हे गौळि सारे ॥ धराभागीं माधवो गुणाकारें ॥
शेषशाई क्षीरजा निधीमाजीं ॥ योगनिद्रे वसतसे तोचि हा जी ॥ ५ ॥
राजि झाला भक्तिला भावयोगें ॥ भावरूपी गोपीच्या अनूरागें ॥
मूल जाती मूळची सूखकारी ॥ बाल्यभाषा बोबडी वरी प्यारी ॥ ६ ॥

( वसंततिलका. )

एके दिनीं यशुमती सुत वासुदेवा ॥ घेवोनि अंकें बसली सदनीं स्वभावा ॥
पाणी करोनि निज भाळ सुढाळ भावी ॥ भावीक रंग कुरवाळित कुंतभावी ७

( शार्दूलविक्रीडित. )

पांचाचें उमरींमधीं हरिरळी दीसी मनीं भाविता ॥
तोची भागवतीं सुबोध लिहिला पद्यांतरीं अच्युता ॥
वेदांनीं रुपिं मानिलें भुमितळीं योगी शुका वामना ॥
त्याणीं वर्णियलें स्वबोध मथनीं बोलूं तयाच्या गुणा ॥ ८ ॥

( शिखरिणि. )

मिळोनीयां गोपी सकळिक बऱ्या एक सदनीं ॥
मतीमाजीं प्रीती घननिळ रिती त्याहि मधुनी ॥
कळीच्या मीषानें गुणचि वदनें सांगुं सतिसी ॥
मुरारीला पाहूं रुचिकर बहू बेत मनसीं ॥ ९ ॥

॥ पृथ्वीवृत्त ॥

करीत सकळी मुखें अनुमतें घरीं बेत तो ॥
उठोनि चलती तदां हरिघरीं बरा भाव तो ॥
मना बुडि अर्जी दिजे श्रवणि हे कथा गोड ही ॥
तुवां रित धरी प्रिती करुनियां गिता गोपि ही ॥ १० ॥

( कामदा० )

त्वरित सुंदरीं नंदमंदिरीं ॥ उदय बाल्यता वेळ भास्करीं ॥
नयन चंचली चंचलाकृती ॥ मृगगती सती येति नीगुती ॥ ११ ॥

( विबुधप्रिया. )

प्रेमळा मनिची बहू मुळिं लाडकी मथुरी ठकी ॥
ठेंगणी बहु गोरटी सगुणा निकी विठि कौतुकी ॥
पातल्या निज अंगणीं हरिमंदिरीं रसिं गुंतुनी ॥
बोलती रस भाव तो उपनीषदीं रुप मंथनी ॥ १२ ॥

॥ सवाई० ॥

देखुनियां प्रमदा मनमोहन लोचन झांकुनियां उगला ॥
मूळ खरा परि भाव परेवरि राव जगांतरिं साव भला ॥
गोपि मनोगति सर्व हरी उरिं पुर्वितसे निज भाव गती ॥
चाळक जो भव जाग्रति चाळवि अंश रवीसरि आत्मगती ॥ १३ ॥

( मालिनी. )

दडत जननि मागें पाहुनी कृष्ण गोपी ॥
शिशु यशुमातिचा हा दीन, ना, थान, जो,पी ॥
समजालि जननी ते भावना मोहनाची ॥
चपळ पण अनंती सूत्रमूळी जगा ती ॥
बिज पण मुळ ठावो सांचला या न नीती ॥ १४ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

गोपी गोरस चोरुनी कळि घरीं घेवोनि यां पातला ॥
यांचें आंतिल अर्थ हा समतसे वृत्ती भवो हारिला ॥
बोले जाणुनि माउली घननिळा कांरे तुवां पाठिसी ॥
आलासी भिउनी सतीप्रति गमे खोडी मुखाला घसी ॥ १५ ॥

( शिखरिणी. )

तदां गोपी साऱ्या कळि कळविती कृष्णजननी ॥
अगे माते तान्हा बहु अवगुणी थार न मनीं ॥
विटोनीयां गेला अभिमातिंभवा भाव तनुचा ॥
दिनावाणी झालों रस नच वटीं तत्वमसिचा ॥ १६ ॥

( द्रुतविलंबित. )

नच घरीं जननी नवनीतगे ॥ उरतसें मुल हा सदिं खातगे ॥
कुलिनता बुडवी बडवी मुलें ॥ बिदबिदीं फिरतो गडि घे मुलें ॥१७ ॥
कसि तरी गवसे रस पाळती ॥ चपळ गे पळना स्थिर ती गती ॥
सति तुझा शिशुला अरि ना भिती ॥ पति टपे धरणीं परि नाघ्रती ॥१८॥
पुरुष ते वसतां घरिं हा नये ॥ मति रिपू षडभाव रिपूच हे ॥
बहुत ते धरती हरि वांकडें ॥ परि हरी नच येत तयांकडे ॥ १९ ॥
बरि गे अबलामधिं दाटणी ॥ सतिंची रित हा बुडवी गुणी ॥
ठकिची सगुणी अशि बोलली ॥ चिमणी पुढतीं मग घूडली ॥ २० ॥

( भ्रमरविलसित. )

ऐके मामी मुल तव सगुणी ॥ आम्हां आणि विट भव धरणी ॥
आला बाई नच रवि किरणीं ॥ तेव्हां आला मम पति सदनीं ॥ २१ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

गाई दोहनकाजि कांत मतिचे वत्सें मनें घेउनी ॥
गेले गोठणी धेनुच्या तृणघरा संचीत हें चिंतनीं ॥
आला गे सदरे बरा हरि तुझा दारावरी पूढच्या ॥
होते एकलि घालुनी अरगळा जाणूं सुता मूळचा ॥ २२ ॥

( कामदा. )

चोर पाळती घेउनी हरी ॥ हात मारितो द्वारिं सुंदरी ॥
काढ गे कडी शीत वाजते ॥ वेई मंदिरीं फार पीडते ॥ २३ ॥
भिति नको धरूं चोरि ना करी ॥ गुण बरे मला येति सुंदरि ॥
सति अजीं तुवां मासला बंधी ॥ दिन मता असी बोलणीं सुगी ॥ २४

( द्रुतविलंबित. )

मुलरवें वळलें मनिं मामि मी ॥ अरगळा कलीं ढकलि भाव मीं ॥
ढकलुनी शिरला मग आंत हा ॥ हंसुनियां फसवी मतिभाव हा ॥२५॥

( विबुधप्रिया. )

काय गे करणी पुढें करि माजुरी बरि ऐक ती ॥
कोकिला मज एकटी मनिं जाणुनी नच येतती ॥

लाजतें मति सांगण्या नच ही धण्या खुण ठाउकी ॥
लावुनी मज बोलिला अजिं मान गे करि लाज कीं ॥ २६ ॥

( वसंततिलका. )

लाडेंच लाड जडवी प्रित भावना ते ॥ माते म्हणे पति कुठें घरि नाच कांते ॥
तूवां कसी रमसि गे कडि घालुनीयां ॥ शून्यामधीं मुरकुटी दडि देउनीयां २७

( शार्दूलविक्रीडित. )

गोरी तूं तरुणी धणी नसुनियां कांगे फुका वागसी ॥
भीतीनें उगिं शीणसी मतिमधें ऐसी कसी गे खुसी ॥
कांताच्या पदिं मानसी मज धरा आहे बरा नोवरा ॥
सारा गोंधळ आवरा असि घडीं कां नासुनीया मरा ॥ २८ ॥
बाजारीं मरतां कशास सतिनों कोणी दधी द्या मला ॥
चोरीचें मग कामना करिन मी भावार्थ हा बोलिला ॥
ऐसें बोलुनि झोंबला पटतळा झोला दिला गांठिला ॥
फेडीला पट हांसडी उघडि गे तेंव्हां मदो तापला ॥ २९ ॥

( शिखरिणी. )

अगे मामी नष्टा मुळ तव असा आननिं वदे ॥
अनूरागा आलें मतिमधिं सधें भाव विट दे ॥
बरी काठी हातीं धरुनि उठलें तेथ पळला ॥
फिरोनीयां आला भिति नच मुला शोध धरिला ॥ ३० ॥

( भद्रिका. )

सडकेवरची धुळ गे मुठीं ॥ धरुनी शिरला वरिं हा हटी ॥
नयनावरि मारुनि मामि गे ॥ पडलें ताळें मीं तधिं मामि गे ॥ ३१ ॥
असला कसला गुण हा मुला ॥ सकळी नवनीत हरी मुळां ॥
भय ना वसुसा हरि मातला ॥ भव लौकिक गे कुळिं आटला ॥३२ ॥

( वसंततिलका. )

बोले असी तव तिजी सरसावुनीयां ॥ सांगे कळी घननिळीं दिठि लावुनीयां ॥
कारे अजीं दडासि तूं अगुणी अनंता ॥ नंदात्मजा तव कळा वदते वदंता ॥३३॥

( दिंडीवृत्त. )

माय मोठा खोडिचा पोर तूझा ॥ अंत पुरला आमुचा येथ साचा ॥
काय सांगूं वीटलों ऊठलों गे ॥ जगामधुनी कामिनी आम्हिं या गे ॥ ३४ ॥

( शार्दूलविक्रिडित. )

साळूची मुलगी सगी ठकि सखू बैसोनियां आंगणीं ॥
वेणी घालित तास दीनसमयीं तेथें शिरे हा गुणी ॥
मागोनी चपला करीं धरितसे नेत्रीं तिला जाउनी ॥
सूटे पेड करांतुनी कीरं धरी पाणी मती बोधनीं ॥ ३५ ॥

मूते मूल शिरीं तिच्या निळतनू वेणीवरी वेणिच्या ॥
नेत्रीं तें उतरे तदां उठलि ते रागें वदे रे निचा ॥
जोडीचा नवसा कसा उगम हा झाला असे नंदजी ॥
लागीं नंदन चोरटा मुळपिठा खोटा कसा भावजी ॥ ३६ ॥

( वसंततिलका. ) .

गेला घरांत पळुनी दडला कसोटी ॥ सोटी करीं धरुनियां करि लाग पाठी ॥
झोटिंग हा हरि अरी दडला तमानें ॥ अंधार फार कुडितेमधिं दीपज्ञानें ॥ ३७

( द्रुतविलंबित. )

चपळ हा परि सांपडला भला ॥ वळचणीमधिं ते धरि भीतिला ॥
करिं तदां धरिला घननीळ हा ॥ नितदिना वणि गे करितो महा ॥३८

( रथोद्धता. )

रमणिचा करिं हा रमापती ॥ वसतसे गरिबावरी निती ॥
'सति दहावितसे बहु क्रुरा ॥ मुरहरा प्रति त्या मनिं आसुरा ३९

( पृथ्वीवृत्त. )

वदे मुल तुझा ठकी प्रति तदां लिंपी बोबडी ॥
गंळी गाळिव मी थती गवथलों तुद्या गे तडीं ॥
मदा अजि नतो तुवां धदुकली घला जाउं दे ॥
नगे मि अजिंपासुनी खत कली कली कामदे ॥ ४० ॥

( मालिनी. )

सुटुनि निसटलासे कामिनीचे करीचा ॥
चपळ पळत तेंव्हां कामिनीपाठिं त्याचा ॥
तरुणि तरुण भावो संपला धांवतांना ॥
हरि नच गवसे हा शोधितां यत्न नाना ॥ ४१ ॥

( उपचित्र )

ठकली बसली ठकि लौकिकीं ॥ हरि हा स्थिरला जगलौकिकीं ॥
प्रमदा म्हणते घर चावटा ॥ द्विरदावरि भार कुरा तटा ॥ ४२ ॥

( कामदा )

करित केउल्या बाउल्या तरा ॥ नयन मोडि हा प्रेम अंतरा ॥
दमाकि ती बसे पोर ती पुढें ॥ करित रंग हे वृत्ति, ना तुडे, ॥ ४३

( मालिनी )

कटकट चवथी ती बोलिली गोप बाळी ॥
भिति कुळ निति अंगीं मारुनी सांख्य टाळी ॥
आजिं मम घरिं चोरी हा करीती वदे मी ॥
सकळ परिसुनीघे भाव हा शोध नामीं ॥ ४४ ॥

( हरिणीप्लुता )

घुसळितां दधि हा रविकाळीं ॥ रविश्रमें श्रमले तंव काळीं ॥
पय मुखीं धरुनी हरि मागुनी ॥ अवचिता प्रगटे मम भावनीं ॥ ४५ ॥

( द्रुतवि० )

स्थुळ दिठी वरि मारि चुळास त्या ॥ वदनिं जे रुचिनं स्थिरलेंच त्या ॥
कर तदां रविचा कळि सूटला ॥ जिव गमे बहु हा मज वीटला ॥ ४६ ॥

( शार्दूलविक्रीडित )

लोणी काढुनि आयतें घृतिकडे होतें मिं गे ठेविलें ॥
वाटे लाधियलें करूं आजिं कसें सासूरवासी भले ॥
दूधामाजिं दधी करी मिळवणी खाई उरें तें भुमी ॥
भागीं टाकित घांसुनी निज करीं कैसें करूं मामि मी ॥ ४७ ॥

( स्रग्धरा. )

जावें वाटे त्यजूनी व्रजपुर अवनी कार आला अमाला ॥
तोटा सारा प्रपंची गत कसि करणें शोभतें कां तुमांला ॥
कूसीमाजीं कसा हा स्थिरपणिं रमला मास वीथी नवाची ॥
भाग्यें मोठी सुदैवी यशुमति सखये बाप हागे विरंची ॥ ४८ ॥
कूळीं आला मुळीं हा करिल अमुळ गे गोकुळीं ग्राम सारा ॥
आरामाचा सुवायू व्रजपुर वनिं हा आभरे शून्य सारा ॥
दीसे ऐसें आम्हाला करि तजविजि गे माउली ठाव देई ॥
सोडूं याला नको गे दृढपणिं मतिनें बांध गे धारणाई ॥ ४९ ॥

( कामदा )

उठलि पांचवी येतसे पुढें ॥ म्हणत माउले पोर हें तिडें ॥
धरुनि मार्ग गे उंच टेकडी ॥ टपत पाळती एकटा गडी ॥ ५० ॥

( शार्दूलविक्रीडित )

बाई लेंकुरवाळि लेंक पतिच्या आली घरापासुनी ॥
सासूनें खुसिनेंचि माहेरघरीं दीली असे लावुनी ॥
आहे पोटासि आवडी रवतिला साधी मती माउले ॥
गेलीसे यमुनेप्रती जलमिसें तीला असे गांठिलें ॥ ५१ ॥

( वसंततिलका )

बोली करी तिजप्रती घरिं येत तेव्हां ॥ वाटेमधीं जल घडा भरलाच तेव्हां ॥
कां गे तुझें उदर हें बहु थोर दीसे ॥ रोगें स्वभाविक कसें वदतें रवांसें ॥५२॥

( चामर )

आवडी वदे तया अरे हरी तुला मती ॥
लागली असी कसी तरी धरी जरा मनीं भिती ॥
चावटा तुला कसा रळा असा गळां जडे ॥
लाजेनाच काज हेंचि लाज खोडि आवडे ॥ ५३ ॥
काम नाच धामिं तूज नारि खोडि काढिली ॥
पार तोंचि थोर काज थोर होसि गांजिसी ॥
कासयासि पोट पूस तूज माधवा अरे ॥
जा उठूनि येथुनी जि देसि कां तुं कार रे ॥ ५४ ॥

( मालिनी )

वदत हरि तिला हा काय गे वांकडें यां ॥
मधिं तुज गवसे तें बोल तूं आननीं या ॥
तव उदरिं स्थुळावा वाटला लौकिकीं यां ॥
म्हणुनि पुसत त्यासी राग आला कसा या ॥ ५५ ॥

( शिखरिणी )

कसाया ऐसी कां करिसि मति गे नेत्रि क्रुरता ॥
अगे माहेरीची रित अवगमे स्पष्ट पणता ॥
फुकाच्या तोंडानें सरळ वचनें येत न बरी ॥
कशी दूजालागीं घरिं वसविसी नीत न बरीं ॥ ५६ ॥

( शार्दूलविक्रीडित )

जानीचे दिन हे बरे सरति गे तोरा झडे अंगिचा ॥
डोळयाची चमकी जिरेल सकळी तेंव्हां कळे वृद्धिचा ॥
सांगे गे अजुनी मला सकळही फेडी मनाची रळी ॥
बुध्धी कोंवाळिं माझि गे म्हणुनियां केली असे ही कळी ॥ ५७ ॥

( वसंततिलका )

कामामर्षीं चुर गमे मतिमान तूझा ॥ बोलें कसें स्वरुप हें नच येथ दूजा ॥
वागूं नको अडिरुपें मजपासिं नारी ॥ सांगे कळा सकळही कळवीच नारी ॥५८

( उपचित्र )

वदली मुलगी मग यावरी ॥ हरि रे मज नाम गरोदरी ॥
समजे उठ तूं चल लौकरीं ॥ जड ही शिरिं घागर निर्भरी ॥ ५९ ॥

( पृथ्वी )

अगे कशि तुवां गरोदर सखे मला सांग गे ॥
खरें कळवि तूं नको कडसगी मनीं राखुं गे ॥
अजीं मज बहू गमे नवल हें गडे सांकडे ॥
पडे अति अभावता अनुभवो म्हणूनी नडे ॥ ६० ॥

( भुजंगप्रयात )

वदे तेथवां लेक लेंकास तूझ्या ॥ अरे पुससी जाणुनी कोण काजा ॥
तुझा जन्मरे जाहला माय पोटीं ॥ गरोदी असे आय ती माय पोटीं ॥६१ ॥

तसा गर्भ रे आजिं वाढे मला हा ॥ नको चावटा आठवूं गोष्टि दाहा ॥
म्हणे वाढला कोण रूपें कसा गे ॥ मुळीं बीज हें कोण ठायीं वसे गे॥६२॥
अरे नंदनंदा तुला हाचि धंदा ॥ तूझें बीज रे कामना भाव नंदा ॥
यशोदेपती नंद हा नंदना रे ॥ तसा हा पती पासुनी होत बा रे ॥६३ ॥

( शिखरिणी )

असी बोली केली मम तनु कळेपासुनि भली ॥
असे झाली लेकी कुळ नितिपणा माजिं तगली ॥
तिला तूझा लाला करित सलगी लाड लटकी ॥
म्हणे दूखे कीं गे समपण गर्भे पोट मडकीं ॥ ६४ ॥

( शार्दूलविक्रीडित )

फूकां गे नवरा करोनि प्रमदे केली असी ही दशा ॥
आहे काय स्थुळामधीं कळत ना आली तुला औदशा ॥
गायी जे जगदीश ईशपुरुषा पाशांतुनी सूट या
गोरे योग बरा नसे पति असा लागा पदीं माजिया ॥ ६५ ॥

( वसंततिलका )

कांते कळा मम अशी तुज सांगतों हे ॥ ऐके तुवां मन दिजे बहु हीत आहे ॥
सांगूं नको दुसरिया गुजवाणि माझी ॥ मानीं मला तनुपती रत गे स्वकाजीं६६

( मालिनी )

राजी असे पतिपणा मति माझि साची ॥
राजी नसे मजविखीं सति कोण साची ॥
खोटे धनी करुनियां मजला त्यजीलें ॥
तूं गे तरी नवरी हो वर नाम बोले ॥ ६७ ॥

( पांक्ति )

नवरा त्यजुनी उरीं मला ॥ धरणें सतिनों बरी तरा ॥
किति गे धरितां गुमान हें ॥ वद गे रमणी वदनींच हें ॥ ६८ ॥

( द्रुतवि. )

जगनगाप्रति मी धनि साजणी ॥ वळखि गे जगिं ना मति जारिणी ॥
रिणिधणी अभिमान करूनियां ॥ जग रमे असुरीमधिं साच या ॥ ६९ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

दासे मी शिशु बाळसी परि बळें काळा दरारा असे ॥
साक्षी घे पटवोनियां जगनिती बाळाविषीं राजसे ॥
वैरानें तरणें रणासम घरीं वैराकृती सोबती ॥
साचें तें परि बाळका वरि नसे मोहें द्रवे लाल ती ॥ ७० ॥

( त्रिष्टुप् )

निति असी शिशुचे वयसेची ॥ म्हणवुनी रमतो सदसाची ॥
गुण कळा भरती भरनाची ॥ अरुपता मजला सम साची ॥ ७१ ॥

( द्रुतविलंबित. )

सदकथा समता सम भावनीं ॥ नरशिरीं हरि मी जग साधनीं ॥
मदकरी वरि मी अरि गे हरी ॥ हरिभया परि या मन नोवरी ॥७२॥
वरि असे प्रित गे मम मानसीं ॥ परि बरी नच ती मजला खुसी ॥
खुषि कुशीं शयनीं मजला असे ॥ कुशिं धरी जगिंना सति मानसें ७३

( शार्दूलविक्रीडित )

भाग्यानें कवणें तपें अमुप तें योगान्वयें व्यापिलें ॥
दृश्याचे चुटके टके मति तटें सोडीयले कावले ॥
( ऐसे जे मतिचे स्वभाव सरळे तेची मला फांवलें ) ॥ ७४ ॥
झाली रमा मम पदीं सखये सुदासी ॥ पादोद्भवीं उपजली जल ओघ त्यासी॥
भागीरथी भुमितळीं प्रगटे भवानी ॥ वैकुंठवास जगतीं मधिं मोक्षदानीं ७५

( शार्दूलविक्रीडित )

भक्तीनें वळलों परंतु तुमची बुध्धी असी नावडी ॥
पाणी वाहत आवडी जननिचा दासी जसी सावडी ॥
सूखें बैस घरीं नको हुरहुरी ऊरीं धरूं साजणी ॥
सूरी साच अहंमती इजत ही जाणे बरी तूं मनीं ॥ ७६ ॥
कांगे बोल त्यजूनि राहसि उगी माने किंवा ना मने ॥
माझें हें मुख बोलणें तुजप्रती आतां त्वरें सांगणें ॥
ऐसें ऐकुनि हांसली चमकली बैसे तदां तेथची ॥
मंदीरा विसरे असें शिशु कसें व्यालीस तूं चोरची ॥ ७७ ॥

( शिखरिणी )

इचें संपे तोंची गडबड करी वृद्ध तनुची ॥
धरूनीयां काठी ढकलत उठी येत किळची ॥
द्विजाचें वाटोळें मुखचि मुकलें पोंगट कंटी ॥
मळीना वस्त्राची दिनें गति दिसे नासिक दिठी ॥ ७८ ॥

( विबुधप्रिया. )

साक्ष ही निजनिर्गुणी रूप उन्मनी, गम येथुनी ॥
दाविली सगुणावरी अनुभावनी रुपदायिनी ॥
ऐक्य ते हरि आणिला गित मंथनीं मति शांत ये ॥
कानडें परि प्राकृती रुप भावना समजावुं यें ॥ ७९ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

साठीची मति नाडली भ्रमभुली बोली तदां कांवरी ॥
गूणाची सरळी सबाग जडली ओढी नसे अंतरी ॥
स्वेदादी सकळी स्वभाव घुडले कंपे असे व्यापिलें ॥
बा, रे येथुनि शांतिचे भरंवसे साक्षी रुपा पातले ॥ ८० ॥

( इंद्रवज्रा )

गोपी तदां त्या सकळीक स्तब्धा ॥ होवोनियां पाहति त्यास लुब्धा ॥
मौना कृतीला मुखवाणि गेली ॥ बोधान्वया भावित त्या मराळी ॥ ८१ ॥

( मालिनी. )

मिळ नच जन अर्थी स्वार्थ भावो सतीचा ॥
चळ भ्रमकृत भासे शोध हा नेणिवेचा ॥
सरळ गति निजाची ऊलटी दृश्य भासा ॥
सगुण सुख अनंतीं रंगली तीच वाचा ॥ ८२ ॥

( त्रिष्टुप् )

कलिमला हरवी सुबोधनीं ॥ असि कथा वदते रसायणी ॥
कथन तें परिसा सुखामधीं ॥ वटवटी त्यजुनी जनामधीं ॥ ८३ ॥

( शिखरिणी. )

यशोदे माजोरी मम मुल खरा लेक तुझि गे ॥
वनीं गाई राखी पति घोर असे साज कथि गे ॥
सगूणी गेलीसे घट शिरिं नसे वारि भरण्या ॥
मथूरेची साळू निजत कुसिला घेउनि सुन्या ॥ ८४ ॥

( शार्दूलविक्रिडित. )

माळ्याची सुन साळि काळि करटी देती शिप्या नापिका ॥
बोक्यानें प्रितिनें घरीं वसविलें लोणी कथा आयका ॥
खावोनी मडकें शिकें भुमिवरी वारी भरी बां पया ॥
रायाच्या दरबारिं पेरणि घडे जाऊं सये कांपुया ॥ ८५ ॥

( भुजंग. )

हरदास घोडे चढे श्वान अंगीं ॥ रमेची सिता कांवली अंतरंगीं ॥
उगींच्या उगी कानडी काळ आली ॥ मराठीण आल्या करी तीस बोली ॥८६॥

( शार्दूलविक्रीडित. )

वाण्याची रडकी कुमार वयसा कुंभार भाळे तिसी ॥
साळीचा पति माळणीप्रति धरी मूकी रुपें ती घसी ॥
माझी गाय करोनि लग्न दिधली काल्याप्रती द्वादशी ॥
व्याही जेवण घातलें घरशिखीं एकादशीचे दिसीं ॥ ८७ ॥

( वसंततिलका. )

माझ्या सुता भम मुली भुलुनी मिळाली ॥
झाली गरोदर उमा पडसूत व्याली ॥
आजीच भोळि मुळची घरिं सासु आली ॥
तीसी दटाविलि सुने म्हसि खात केळीं ॥ ८८ ॥

( इंद्रवज्रा )

मूलाम, नीजे, सति सावकारी ॥ गादी नृपाची वरि शेळि चारी ॥
प्यारी मनाला जडली मलागे ॥ वागे पतीचा रत भाव अंगें ॥ ८९ ॥
देई पती गे तव नंद माते ॥ माते सुताला सुचवीच नातें ॥
खातें सरापा घरचें नसावें ॥ बुरूड तो रांजण थोर भावें ॥ ९० ॥

माळावरी पेरुनियां सुसाळी ॥ केली मनोघें वरचे शिवाळी ॥
पाणी भरी मोट तळें रिकामें ॥ कांटे घरीं ते सुळसे हरामे ॥ ९१ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

वाघाची नरडी धरी मुरडुनी शेळी बरी कोयळी ॥
हेमाची सुगि पातली दरवसें शेरासनीं पावली ॥
झाल्या वेरंडी म्हाग पेठ दर त्या तोळयावरी शेंकडा ॥
कोंड्याची भरती करोनि नृपती आणी नफेचा धडा ॥ ९२ ॥
बोलाला नच मेळ माप रुप हें जाणीव भावीं मिळे ॥
काळें बोध सुबोधता जडलिया भावान्वयें आकळे ॥
बोधाचे सुगंड रसीक उघडे गोडी जडे त्याकडे ॥
वाढे प्रेम समानता मन वसे भक्तीरुपें ऊघडें ॥ ९३ ॥

पृथ्वीवृ०

पुरेल सकळी रळी मतिचिया गितामाजि या ॥
दयाघन रमापती अवगमे करी रे दया ॥
रसीक मनसामर्थी भरतीचा जमावा जमे ॥
रमे कवतुकें धरा धर भजे पदीं ज्या रमे ॥ ९४ ॥

( वसंततिलका. )

झालें असे सतिमुखें सकळीक भावें ॥ रंगात्मजाप्रातिवसे विविधाव नांवें ॥
भावार्थता पिकतसे गित गायि वाचे ॥ गोविंद माधव हरी मदुसूदनाचे ९५

( इंद्रवज्रा )

ईती गतीनें निति ऐक्य भावा ॥ पावे सख्यानों मधिं या विसावा ॥
ठावा रमेचा पति होय जीवा ॥ सीवा जिवाला समता नवावा ॥ ९६ ॥

पृथ्वीवृ०

अनंत मतिच्या अनंत रितिया अनंगावरी ॥
समोघ धृति धारणा स्वरुपता मना आवरी ॥
विणा चिपुळि ना सुरार्थ भरिणा मती ताळ ना ॥
सुबोध मथनीं मती धरियला सुखें गायना ॥ ९७ ॥

## १० निजभक्ती.

( इंद्रवज्रा )

नित्यान्यानें निज भाव भेटी ॥ भेटी अभेटी करि जन्म तूटी ॥
तूटी अभावा समता प्रभावे ॥ भावे अनंता व्यतिरेक व्हावें ॥ १ ॥
आदी अनादी जगदेकराया ॥ वाढे स्वभावो समता कराया ॥
माया जयाला मृगभास वाटे ॥ अज्ञान ज्ञानें नच जाय वाटे ॥ २ ॥
जो दास भावें हरिदास त्याचा ॥ विश्वास प्राशीस्तव वेद वाचा ॥
जेथें अहंता समुळें निमाली ॥ तेथेंचि शांती सहजीक आली ॥ ३ ॥
ज्यासी असे ही निज सूख शांती ॥ जी कां अजातीय गती स्वभाती ॥
ना वर्ण दीक्षा रुप गूण तेथें ॥ भावे अनंतीं सकळीक जेतें ॥ ४ ॥
वेदांत सिद्धांत स्वरूप साक्षी ॥ वाचीकभावो सगुणेक पक्षीं ॥
पक्षी अलक्षी सदचीद पक्षें ॥ पक्षाविणा तो निज लक्ष लक्षे ॥ ५ ॥

( भुजंग )

बहू शोधितां ग्रंथ ग्रंथीं फिटेना ॥ अहंभावना मानसाचीविटेना ॥
बरा निश्चयो एकही तो असेना ॥ सदां बोलण्यासारिखें चालवेना ॥ ६ ॥
जरीं अंतरीं सौख्य व्हावें सदांचें ॥ असें वाटतें तेथ युक्ती मनाचे ॥
मनाचेंचि दर्शे मनातीत व्हावें ॥ असा भक्ति योगू अतूळ प्रभावें ॥ ७ ॥
तया नाम स्वानूभुती नीजभक्ती ॥ दुजावीण जी कां स्वकार्यार्थ युक्ती ॥
इये प्राप्तिलागीं विधी संत कीजे ॥ तया संत भावा अजीं कान दीजे ॥८॥

## ११ रुक्मिणीविलास.

॥ स्वागता ॥

तो नमी नमि विनायक आजीं ॥ जो गुणा इश असे सुर गाजी ॥
मूख तें गजरितीं दिसताहे ॥ स्थूळ तें नच बरें निज पाहे ॥ १ ॥
सोंड ती सरळगा कलिनाशा ॥ नीगमा कृति बरी सित आशा ॥
बोध तो जडित मोदक भासे ॥ ऊदरात्वरि रुळे धन खासें ॥ २ ॥
नागफांश कटिला मिटला तो ॥ जो अनूभव भवीं समर्ग तो ॥
फांश जो करपुटीं मदनाशा ॥ अंकुशीं धरितसे भिपगाशा ॥ ३ ॥

आसनीं विलसती सहजाच्या ॥ चार ते पुरुषगा कमळाच्या ॥
पांकळ्या बहु बऱ्या चहुंदीसे ॥ अंतरीं गणपती गति खासे ॥ ४ ॥
पायगा धरितसें निजरीतीं ॥ बोलवी सुरसभाव कथा ती ॥
आत्मगूण भरवी रवि तापों ॥ ताप हा भव सरों अरि कांपों ॥ ५ ॥
शारदे वरददायिनि अंबे ॥ हंसवाहनिं बसे जगदंबे ॥
आननीं गित वदे मम आतां ॥ तारिगे भवपुरी तुंचि माता ॥ ६ ॥
नाथजी गुरु तुंगा इह रूपीं ॥ साचची मज गमे कृति मापीं ॥
गूण हे सकळगा तुझि लीला ॥ लावितो मज बरा निज टीला ॥ ७ ॥
सूरुची कथनहें भव नाशा ॥ शोभवी रस भरीं हर फांशा ॥
पद्धती निजरुपीं मन लागों ॥ या अनंत भुवनीं प्रित वागो ॥ ८ ॥

॥ भद्रिकावृत्त. ॥

निगम हरिच हा जना रिती ॥ धरि समरूप तें मना कृती ॥
करित बरविती लिला असी ॥ दिसत जनित साक्ष ते नसी ॥ १ ॥
सकळ सुख दाति ही खरी ॥ म्हणुनि वदत तेहि वैखरी ॥
मुळ रस चवी गिता मधीं ॥ भरतपुर असे नित यामधीं ॥ २ ॥
मदुसुदनिं नर एक दीनि हो ॥ भिमक भुपतनये घरींचहो ॥
सति सुख मननांत घेततें ॥ सलगि जुनि अती दिनाचितें ॥ ३ ॥
वदत ति हरिला वहू बरी ॥ रुचिकर गुणते हरी वरी ॥
उठुनि उभि असेच लाजते ॥ नयन चळविते नितींत ते ॥ ४ ॥
रजनि माधिं गुणांत तो भरे ॥ घर सगुण तिचें मधीं सिरे ॥
निज निति वदला कळी मिषें ॥ मन निट धर गा सुधा असे ॥ ५ ॥

शार्दूलविक्रीडित.

रुक्मीणी सदनाप्रती हरि बरा आला असे रात्रित ॥
देखोनी भिमकात्मजा वदतसे स्वामीसची हास्मित ॥
यावें जी बहुता दिनीं मजवरी दृष्टी कशी फीरली ॥
भाग्या काय वदूं अजीं दिन नवा प्रेमामधें पीकली ॥ १ ॥
स्वामी तूमि बरे मला अजिं मुखा दावोनियां तोषवी ॥
दीनाच्यापरिं मी घरीं वसुनियां होतीं खरी या भवीं ॥

आतां सूख बहू मना भरत गा गाऊं किती ते गुणी ॥
चंद्रा पाहुनि चातका रस गमे ती रीतही ठेंगणी ॥ २ ॥
यासी कारण हेंचकीं शशिकळी वाढे तुटें तें रुप ॥
पौर्णीमे दिनिं पूर्णची तिस दिसीं ना साम हें गा रुप ॥
तूझें मूख सदोदिनीं उदित तें सोळा कळीं वाटत ॥
नाहीं तो क्षयगा कदां निजमुखां भ्रांती भुली तोडित ॥ ३ ॥
सोमी अंग कळंक वर्ण दिसतें तेंची असे लांछन ॥
तुम्हां ब्रीद बहू बरें भृगुमुनी श्रीवत्स दे लांछन ॥
शांताकांत तुमी बरी गुणवती ठेवा प्रिती अंतरीं ॥
ओघा मूख करा बरे मम घरा तापा करा गा दुरी ॥ ४ ॥
बोलूनी मग या रितीं यदुपती संगें बसे मंचकीं ॥
जंघींपाय धरोनियां चुरि करें वीनोद एकांत कीं ॥
हांसे तो हरि तेधवां तिजकडे पाहोनियां कौतुकें ॥
बोले नंतर सुंदरीस प्रितिनें सूखामधीं जीतुकें ॥ ५ ॥
हे प्रीये मज गोडि गे तव रुपीं वाटे बहू मानसीं ॥
नाहीं त्यासरि दूसरी जगनगीं वर्णू तरीं ती कसी ॥
तूझा संग गमे रमे बहु बरा ऊरामधीं रोज गे ॥
थारे शांति असे सुखें मन निवे बोलूं तरी काय गे ॥ ६ ॥
भूलोनी तुजला मि गे गुणत्रयीं वागे रूपाच्यान्वयीं ॥
कांते कां उगिं बोलसी डसउनी प्रीतो दया अन्वयीं ॥
ऐकोनी सति ते वदे मग तया कंसांतका आननीं ॥
गोडी घेत अनंत हा निजमुळीं अद्वैत मत्ताननीं ॥ ७ ॥

॥ पंचचामर वृ० ॥

वदे बरी सखी तदां पतीस त खुषीमधीं ॥
उगेंच ती वंदू नका कळे मला मनामधीं ॥
बहू तुमा घरीं स्त्रिया नसे मिती कसी प्रिती ॥
नटा नव्हे झुटी मिगा ळळा कसा जुने निती ॥ १ ॥
नव्या उमेदिच्या बऱ्या तरामधीं गुणी कळा ॥
वरी तया प्रिती खरी मला हरी उगा ळळा ॥

मुखावरी प्रिती करी रवांमधीं असे दिसे ॥
उरीं कसें असें असो मला पिसें नसे तसें ॥ २ ॥

वरी बरें मनीं कडू घडी उरीं दिसे बरी ॥
मला रुची नसे इची खरी तरामती वरी ॥
जुनी मिगा वयें कळा जिरे खरी चुके सुगी
कसी तुमां प्रिती गमे मला कळे म्हणे उगीं ॥ ३ ॥

नको अगा फटी मला नसे खुळी भुळी फसे ॥
तुम्हां रुचे तसें करा कृपा असो पुरे दिसे ॥
जरी पदीं असे दिठी खरी मनी मला हरी ॥
तरी दया वसे तुझ्या उरीं पुरी भवा हरी ॥ ४ ॥

विनोद हा वरी दिसे निजींहि तीं फळां असे ॥
अनूभवी गमे सवी धनी भवीं हरी दिसे ॥
पदोपदीं विवेक तो भरोनिया असे रसीं ॥
सबोधनीं जनां गमे सुधेहुनी रुची इसी ॥ ५ ॥

जरी धरी इहीं सवी कुणी भवीं तरे बरा ॥
रमावरा दया भरे तयावरी रिजे खरा ॥
गितामधीं रमूनियां बहू भले तिरास रे ॥
अनंतगा मनामधीं निशीदिनीं मुळीं परे ॥ २६ ॥

॥ मालिनीवृ० ॥

सकळ हरि तिचें तें ऐकुनी भाषणातें ॥ दुखवितं वरि तीला अंतरीं प्रेमनातें ॥
हळुच वदत आहे ते सती काय तेव्हां ॥ समुळ वदनीं गातो होउ संतोष जिव्हा १
म्हणत भिमकबाळी तो हरी सारसाक्षी । तुज नच बरवा गे मी पती जाण लक्षीं ॥
मृगनयन सुकांती गौरवर्णे सुजाणी ॥ भुलविस मज फूकां नेणती साक्ष वाणीं २

मुलपणिं वनिं गायी राखिल्या फार त्यागे ॥
गवळिमत मला तें शोभतें या भवीं गे ॥
नवरस विटवोनी माळ ती घातलीसी ॥
फसलि मसलती तें तूझि गे जाणलेंसी ॥ ३ ॥

घननिळ बहुकाळा रंग माझा दिसे गे ॥
नच नृपपण तेंही आमच्या या कुळीं गे ॥
कुळशिळ तव तोला जोग तें नाहिं गे तें ॥
जनन जन व्रजामाजीं असे जाण मातें ॥ ४ ॥
परघरिं वसतों गे दिनराती न थारा ॥
गुण नच बरवे ते सुंदरी यास दारा ॥
सम नच वधु गे तूं चांगली राखण्याला ॥
तुजसम मज माजीं रंगना देखण्याला ॥ ५ ॥
उगिंच लिखित लग्नासाठितें पाठवीलें ॥
नकळत भुपतीला कूळ ते बाटवीलें ॥
असिकासि भुलगेही तेधवां तूज लागीं ॥
कटकट अजि वाटे पाहुनी अंतरंगीं ॥ ६ ॥
धुत हय मि नराचे सारथी त्या रथीं गे ॥
नृपमख समुदायीं काढिली उष्टि ती गे ॥ ६ ॥
मम सख दुबळ्यांची प्रीत गे वागते ती ॥
म्हणुनि पर घरीं हो राहतों चोर—नीतीं ॥ ७ ॥
नृप सुत बहु ते गे सैंवरीं तूझिया हो ॥
कुळ शिळ रुप खासें तोल तूला समे हो ॥
अजुनि जरिं मनातें आवडे रीत त्यांची ॥
चल मज जवळूनी आजची गे सुखाची ॥ ८ ॥
तव मनिं वसतें तें तूं करी आजचानीं ॥
उगिं नच पडुं गे तूं कानवीं आमुच्यानी ॥
रवरिति आशि हे ती ऐकुनी कांचली हो ॥
निजरुपिंच अनंता जी असे माउली हो ॥ ९ ॥

॥ शिखरिणी. ॥

हरी शब्दें भेदें हृदय सतिचें फारचि तदां ॥
वधाहूनी भारी दुषण रव तें झोंबति हृदा ॥
पडे भूमी भागीं मृतवत सती छाति फुटती ॥
नसे देहाठायीं तनु गळित ते ना स्थिर गती ॥ १ ॥

खरी सूशीला ही प्रतिवचन बाणें विरगळे ॥
गळे कांती शांती नच उरिं तिच्या मीपण गळे ॥
कळा लोपोनीयां मुखकमळ तेंही सुकतसे ॥
पडे नेत्रालागीं ढवळपण तें झांपडि असे ॥ २ ॥
न हाले डोळेंगा तिस हरि तदां पाहुनि तसी ॥
भरे प्रेमामध्यें सदगद उठे अंतर कुसीं ॥
पंलगाखालीं ये उतरुनि तदां श्यामळ हरी ॥
बसे कांतेपासीं उठावित तदां चाळवि हरी ॥ ३ ॥
म्हणे कांगे ऊगें सहज वदलों हास्यवदनें ॥
निजाचे रीतीनें नच समजलें स्थूळ मतिनें ॥
उठे आतां तूं गे समजुत पडेसें कथिन तें ॥
नको शोकालागीं त्वरित सुट दे ऐक निति ते ॥ ४ ॥
करें डोळे पूसी हरि सगुणीचे पीत पदरीं ॥
बरी घे मांडीये उचलुनि शिरा लाघव परी ॥
निरालागें सिंपी सुपरि मळ तें कर्पुरमिषें ॥
बहू वेळे झाली सितळ मति ते ऊठुन बसे ॥ ५ ॥
भला रंगामध्यें हरि वदनिं वदे आत्महित गा ॥
अगा गाऊं यासी सुटुं खटपटी पासुनचि गा ॥
गुणापासूनीयां भवभय उठे अंतर गती ॥
अनंताची इच्छा पुरवित असे लक्षुमिपती ॥ ६ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

ऐके सुंदरि बोलते तुजप्रती ठावी नसे रीतगे ॥
ऊगां राग कशास गे करिसि हा दुःखा बहू सांग गे ॥
बोली ना कळली निजास भिचि ती ऊगां कसा राग तो ॥
शांतीहो मन ऐक सांगत असें आत्मीं भला लाभ तो ॥ १ ॥
तूला चीड कशास गे भरलि हे वीनोद ठावा नसे ॥
तूझ्यापासुन रूप गे मज बरें गूणास साक्षी असे ॥
नाहीं रूप मला अगूण मुळचा बोली असे सत्य ही ॥
कूळीं नाहिं खरी रमे अकुळतें नीरामयी निर्मही ॥ २ ॥

नाहीं देश बरा स्थिती नच मला निर्मोह मायापुरी ॥
सत्ता मात्र वसे जगीं नगपदीं काळारुपे सांवरी ॥
तूं नोहे भिमकात्मजा ममप्रभा नीजासनीं ऐक्य ती ॥
कांती तूं सम शांत मी हरि असे जोडे मुळीं हे निती ॥ ३ ॥
गौळी ऐक कसा असे वदत हें पूरें धरीं अंतरीं ॥
इंद्रीयें नव हीच गोकुळपुरी गाई रुपें सुंदरी ॥
राखीं काळ सदां भुमी निजवनीं गोपाळ ते बोधनीं ॥
सद्भावें मज नंद तो निज पिता माता विदेही जनीं ॥ ४ ॥
कांते आणिक ऐक गे मिपण तें नाहीं नृपा आसना ॥
प्रेमाच्या सदनीं सदां परघरीं भावावरी आस ना ॥
निभ्रांता मननीं बसे अनुदिनीं बोधा सरोजावरी ॥
तूं गे सुंदर तेथही सुनिति ते साक्षी स्वरूपावरी ॥ ५ ॥
भूता पंचसमुह तो वट असे होतो गुणाच्यान्वयें ॥
यासी कारण तूंच गे जगभवीं संबोधना संभवे ॥
( बुद्धी तूं बरि चैतनीं गति मि गे चित्तास चाली तसे )
तूझी प्रीत मला अनादिचि कळा घालीत माळा बरी ॥
तेचीं हें जग शोभतें तिन गुणीं काळासरी संहरी ॥ ६ ॥
नेत्रीं द्वादशगे कळा रजगुणें तापे रवी साक्षप ॥
हीची जाग्रतिची असे सरितुझी भानूस तेंची रुप ॥
सोमाभी वदनें सखे मन तुं गें सोळा कळी कोमळा ॥
आहे वास निशीं गुणामधिं बरा चत्वारि वाचा बळा ॥ ७ ॥
कार्याकारण नांदसी भुतभवीं लीलान्वयें शोभत ॥
यासाठीं प्रकृती कळा तुज म्हणे आहें मधीं मीं सत ॥
जोडे हेंच खरें समे निज तुकीं ठेवी बरी ओळख ॥
कां गें दुःखित होउनी न वदसी देखे बरें कोतुक ॥ ८ ॥
भूतें स्थूळ जमाव हा घर बरें केलें असें राहण्या ॥
घेवोनी मजला सदां वससि गे भीती नसे देखण्या ॥
यासाठीं वदलों तुला बरि असे माझ्याहुनी देखणी ॥
खोटें वाटत कांय गे तुज सखे मी कांत तूझा गुणी ॥ ९ ॥

तूझ्यानें मज नाम हें सगुण तें फावे बरें साक्षिस ॥
नामा ठाव नसोनियां दिसतसे लक्षीं असें घे बस ॥
नाहीं प्रीत दुजेवरी म्हणुनियां सांगीतलें तूजला ॥
तेची हें आजिं ऐक गे मम सखे बोलास झेला भला ॥ १० ॥
दूजी ती द्वित छंद सौभरगुणी कामींच रंगे मन ॥
गुंगे जी विपयामधीं मति ति गे वांछी सदां जी धन ॥
ऐसी जी मति गे मला न रुचिते नाहीं लळा ते सतीं ॥
सूचेना मजला सखे किति मुखें नाहींच तीशीं प्रिती ॥ ११ ॥
सोडीलें घर गे तिचें बहु निचें जाणूनियां सुंदरी ॥
प्रेमानंद नसे तिसी खुसमुसी त्या नांच मी मंदिरीं ॥
आहे वास खरा मला तिस भला नाहीं परी ओळखी ॥
अंगीं मीपण वागतें निज न तें संसार माखे सुखी ॥ १२ ॥
कीतीं बोलुं तुला सखे निजमुखें सूखें रिजे जाणुनी ॥
घेई बोध तुं गे मनीं समजुनी ध्यानीं बरा आणुनी ॥
आत्मा मी रवि तूं प्रभा मनसुभा ऊभा अनादी असे ॥
नाहीं द्वैत तुं गे गमे मज रमे साम्यें खरें हें असे ॥ १३ ॥
भावाच्या प्रितिनें वसे रुप तसे हौसे धरी प्रेम तो ॥
छंदें वागत कौतुकें निज तुकें भूके मना नेमतो ॥
पीता भीमक तो तुझा मज भजा भावीक गे मूळचा ॥
सत्वाचा पुतळा मळा रजगळा नाहींच त्या कूळिचा ॥ १४ ॥
श्रद्धा कामिनि ते तुझी जननि जी नामें मती शुद्ध जी ॥
तीच्या ऊदरसंपुटींच उमठी भक्तीच तूं गे निजी ॥
माझी ओळख तूजसी तुजि मसीं होसी कसी वेडि तूं ॥
सोडी रोष वदे मसी बहु खुशीं रोषास या तोड तूं ॥ १५ ॥
ऐसा बोध करी हरी तिजवरी प्रीत ते अंतरीं ॥
झाली शांत बरी खरी निज उरीं नूरी कळा घूसरी ॥
आनंदा मिळतें मतें न ममते चित्ते खुशी रीजते ॥
झाली एकचिते सवी जिव शिवीं नाहींच भ्रांती तितें ॥ १६ ॥

गाथी तूं मन हें धरी समपुरा शीरीं उरीं अंतरीं ॥
संसारीं बरवा दिसे हरि असें कंसारी जो संहरी ॥
हे नारायण माधवा गितरवां प्रेमा करी केशवा ॥
बापा आजि अनंत हा पदिं पहा आहेच या तोषवा ॥ ५८ ॥

( पृथ्वीवृत्त. )

अगाध महिमा तुझी गुणनिधी तुझी गा खरी ॥
भुमीधर शिणे गिरा चिरलि गा तया नासरी ॥
विधी रजगुणें रची जन बरें नसे त्या कळे ॥
अहं बळ बरें उरीं धरुनियां तुं गा ना कळे ॥ १ ॥

चढे चतुर ते वदे निशिदिनीं मुखीं वेद ते ॥
भुले कुमरिला फुके मदन तो जडे शाप ते ॥
अपूज्य जगतीं असे ठरविला अशाही गती ॥
कळे न महिमा तुझा हरि खरा कसी गा मती ॥ २ ॥

जया उरिं असें सदोदित पिसें अभीमान तो ॥
तयावरि खरा तुं गा क्रुर बरा बरा छेदितो ॥
दिनावरि दया रमेश सदया वया नेणसी ॥
ध्रुवां अढळ तें दिलें पद तुंतें करीसी खुसी ॥ ३ ॥

तुझ्या भजनिं जे सदां रिजति गा तया आपदा ॥
न ऐकिलि कधीं तिहीं जगमधीं दिलें सूपदा ॥
बहू तरति ते चहूं दिशिं बरे किती ते वदूं ॥
सिमा नच तया कसें गणित तें मुखें या वदूं ॥ ४ ॥

अजामिळ अधीं मळे बहुदिनीं द्विजा जातिचा ॥
रमे परघरीं अमंगळ कुळिं स्त्रियेला निचा ॥
नसे स्मरण त्या कदां हरि तुझें अशाला गती ॥
स्मरे मुलरुपें मरे तव बरें हरे या रितीं ॥ ५ ॥

तया गति बरी दिली नरहरी जगीं गाति ते ॥
असा सदय तूं सदा सशमना मना मानते ॥

दुजी गणिक तीं कुटीण कुळिची तिलाही बरी ॥
दिली गति तुवां दयाळु पण हें बरें गा उरीं ॥ ६ ॥
मला भरंवसा बहू हृदयिं गा रमेचा पती ॥
असे सतत तो खरा मजसि वाटतो पूढतीं ॥
अगा मलिन मी मती निजपुरी असें पापि गा ॥
परी वदतसे तुझें गित मुखें पदा लावि गा ॥ ७ ॥
झडों कलि मला मला भव नको खरें गा हरी ॥
पदीं रमवि थार दे कळवळा उरीं गा धरी ॥
नसे बहुत मागणें अणिक तें पुरूषोत्तमा ॥
बरा सकळ जाणता निपुण तूं अगा सत्तमा ॥ ८ ॥
सुसंग बरवा रुचीकर असो निजा भीतरीं ॥
अगाध गुण दे कळा निपुण ती मलाला हरी ॥
भवास ढळवावया कवि निती बरी फार दे ॥
नको मज तुझी न मुक्ति बरवी सदा प्रेम दे ॥ ९ ॥
जनास भित ना वना वचत ना मना नाम तें ॥
धनास वतनास नाथ तुं दिनाघना मान तें ॥
हरी जिवपुरीं जरी मळ हरी बरी रीत दे ॥
उरीं नच सुरी भरी भुळ बुरी घरीं प्रीत दे ॥ १० ॥
बरा पर खरा तरा नर शिरा खरा रावजी ॥
तरा किति उरा तरा सद घरा बरा सावजी ॥
सभाधिट नभा सुभा तळिं उभा जिभा भांडती ॥
गभाळ नच भाव बाळक स्वभाव भांबावती ॥ ११ ॥
तुला दिन भला मला समजला खुला लाभ हा ॥
न लागत मला कला निजशिला भला लाग हा ॥
टवाळ भव वाळवा किंवच जिरवा वासवा ॥
नवामधि गिरा धवा धर रमा जिवा आठवा ॥ १२ ॥
सवीनच भवीं नवी रसचवी कवी वीटले ॥
रवी अनुभवी चवी घुसळवी रवीं रीजले ॥

फुलेंच कमलें मलें विणभलें दिलें लेंकरा ॥
तुळे नच बळे फळे नच कळे तळे तें परा ॥ १३ ॥

हरा तुंचि वरा खरा उरिं धरा परा राम हा ॥
शिरावरि निरा धरा पुरिं बरा सखाराम हा ॥
उभा उपशमा तुम्हा माधिं रमा शमा मी मती ॥
गमा रिपुतमा समा उरिं गमा जमा मागती ॥ १४ ॥

जळों विषटळों गळों मदवळों रमेचा पती ॥
कळोनित वळों चळों नच मळों हिची मागती ॥
जरा चुर करा तरा निजतिरा करा चाकरा ॥
शिरावरि धरा करा हरिहरा जरा आसरा ॥ १५ ॥

न मागत तुमा जमा विप यमा तमा मारि गा ॥
वमाचि अधमा नमा गतसमा दया मायगा ॥
पदींच चवदी नदी भवसुधी मती धीटदी ॥
नदी सदपदीं मिळों उदधिंते सखा भावदी ॥ १६ ॥

तुमाहुनि रमा न मानत समान माया बरी ॥
अमां तुंचि रमा जमा निजगमा सिमा अंतरीं ॥
बरा ठकितसा असे अज दिनीं ध्वनी खुंटते ॥
त्वरा कर बरी अगा नरहरी मना सूचतें ॥ १७ ॥

अगा कळवळा तुला मनिं असों स्वदासांवरी ॥
धरी सदपदीं करा हित अजीं सदा आंवरी ॥
मदूसुदन वासुदेव बरवा भवा माजिं तूं ॥
अनंतरळि मारतो उतर गा सती रात तूं ॥ १८ ॥

---

# दफतर ३ रें.

—:०:—

## १ योगेश्वर निजलीला.

( शिखरिणि. )

अगा सिद्धानाथा अभयपग दे विघ्नहरणा ॥
अजातां पंथाची सुरसमहिमा भावभरणा ॥
जनाची या ध्याना बहुविधपणा तूज निपुणा ॥
अखंडा यानंतीं उभवसि मती गूण अगुणा ॥ १ ॥

मनानंदा भावा विपरित भवापासुनि सुटे ॥
उठे वेगीं वेगीं सकळिक मतें टाक विकुटें ॥
वरी संतांगीच्या सतत उभवांतील किरणा ॥
घनानंदी होसी स्वसुख नयनीं सार निपुणा ॥ २ ॥

नको जाऊं रानीं हटमठ खटाटोप हरवी ॥
असे तैसा राहे सहजपण हे युक्ति बरवी ॥
सदा घेई गोडी सगुणच रितीं निर्गुणपणीं ॥
धरी भक्ती भावो अजित विभवो होय तरणी ॥ ३ ॥

भजे आत्मारामा विमळ चरितें सादरपणें ॥
जिणें याणें होणें जननमरणातीत करणें ॥
जया ध्यावें तैसें मनतद वसें होत सहजीं ॥
निजध्यासीं प्राप्ती भ्रमरअळिचा न्याय तुकजी ॥ ४ ॥

जिवाध्यासें शीवा अजप जपवा जाप्य विवरा ॥
वरा भावार्थाला सुजनपथिं या भाव विवरा ॥
भराया दुर्वासांतुनि झडकरी दूर असणें ॥
घनें ना याहूनी स्वसुख वळखी नित्य वसणें ॥ ५ ॥

( मालिनी. )

सकळहि जग नीती भावना ना तमासे ॥
गुणनिधिमधिं होती चिंतिल्या ध्यान ध्यासें ॥
अवगत सहसा ही नाच कोणा स्वभावा ॥
सुजन विरळ ऐसा मीळला स्वात्मभावा ॥ ६ ॥
श्रवण मनन ध्यासें नीजविश्राम साक्षी ॥
अनुभव सद्चीदीं चिन्मयीं नित्य लक्षीं ॥
विजयपण तयाचें भाग्य गोविंदगीतीं ॥
वदत सगुण मूखें सारती स्वात्मनीती ॥ ७ ॥

( इंद्रवज्रा. )

श्रीकांत वाणी कुल उद्धराया ॥ सांगे कथा ती निपुणाख्य राया ॥
काया कराया अमलाख्य वाणी ॥ श्रीशूक ही भागवतांत वाणी ॥ ८ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

वाणीलें निज आत्मभाव मतिनें स्वानंद योगेश्वरें ॥
हंसाचें निज हंस मत्त कथिलें विज्ञान ज्ञानेश्वरें ॥
एकानें बहुतेक छंद गतिचे स्वाध्याय वाणी सिपें ॥
दावीलें विलयाकृति प्रकृति हे सद्भाव ध्यासा वसें ॥ ९ ॥

( इंद्रवज्रा. )

श्रीनाथ पायीं नमुनी पहीलें ॥ वर्णीन योगेश्वर नीजलीलें ॥
ज्याणें करोनी समता भरा ये ॥ भावार्थमत्तें करुनी करा ये ॥ १० ॥

( भुजंगप्रयात )

अगा संतलीला वसे मानसासी ॥ बहू मोहिलें वीसरे हे भवासी ॥
असा लाभ दूजा मनाला न रूचे ॥ रुचे आरुची या भवीं सर्व साचें ॥ ११ ॥
सदा संतलीला वसें काळ लोटे ॥ घडीनें घडी सार्थकीं भाव दाटे ॥
कदा ना वसे जन्म नाशाकृतीनें ॥ सुयोगू दुजा ना असा कोण माने ॥ १२ ॥
जया पाहतां पाहतां पाहवेना ॥ जया लक्षितां लक्षणीं लक्षवेना ॥
जया संगतीं संग भंगे गुणाचा ॥ जगीं धन्य तो भाव सर्वोत्तमाचा ॥ १३ ॥

पु. नगा... [illegible]



ग्रंथालय... पुणे.

मनाचा विचारी जनाचा दयाळू ॥ भवा नाशकू बोधभावार्थ पाळू ॥
कृपाळू सदां दीन भावा कृतीला ॥ मना सज्जनानंत योगार्थ लीला ॥ १४ ॥

अभीमान अंगीं जयाचि असेना ॥ नसोनी असे तो जगीं ऊमजेना ॥
कदां ना गमे देखणा नीज ठावो ॥ तया आठवीतां हरे देह भावो ॥ १५ ॥

म्हणोनी स्मरावें सदां सज्जनासीं ॥ कली दुर्भरा नाममात्रेंचि नासी ॥
मिळे आगळा लीन भावो स्वअंगा ॥ रमाकांत तेव्हां वळे नीजरंगा ॥ १६ ॥

( शिखरिणी. )

हरी नामें गातां हरति सकळी प्राकृत गती ॥
जगतीं लाधे जे कां सकळ वळखी नीज निगुती ॥
हरी दीसे अंगीं जनिं वनिं बरा गूण अगुणी ॥
दुजा कोणी नाहीं प्रणवकरणी आत्मतरणी ॥ १७ ॥

( इंद्रवज्रा. )

भासेल सारा हरिचा पसारा ॥ हारेल सिंधू भवभ्रांति वारा ॥
संताप शांती सुजनाब्द मानी ॥ वेदांत सिद्धांत जयास मानी ॥ १८ ॥

( भुजंग. )

जयाचे वसे काळ घाडी न घाली ॥ मना धांव वेगीं उडी तेथ घाली ॥
नसे आवधी सावधानी करावी ॥ घडीनें घडी सांड जीवीं करावी ॥ १९ ॥

( शार्दूल० )

मानावीं सकळीं बळी भव वळीं काळा घरीं जाचणी ॥
अंतीं मोह फणी बहु फणफणी तोडावयाची फणी ॥
कामाची नरडी नडी रगडितो क्रोधास जीणी मनीं ॥
मानी ना अभिमान मानसगमी ग्रामीं वसे उन्मनी ॥ २० ॥

वाणी वाणिल काय भाव नगरीं माजील चारी पणीं ॥
खाणी नीगम नीजबोध अवनी विज्ञान चिंतामणी ॥
स्वात्मा जो अवनीं समान वदनीं नित्यान्वया दाविती ॥
गोंवीतो गुणसाधनीं करुनियां कंठीं धरी भाव तो ॥ २१ ॥

वि: ...काव्य... १५१
...६४२... ३१२-९

( इंद्रवज्रा. )

गोविंदनामें मन गोंवबावें । गोइंद्रियातें सधि सूजवावें ॥
गोविंद गोविंद हरे अहंता । ऐसा असावा निजभाव संता ॥ २२ ॥
अविंदाख्य साक्षी स्वरूपा मुरारी । गोविंदविंदें समता करावा ॥
स्वात्मानुभावें भव हा तरावा । ना साक्ष याजी अतुल प्रभावा ॥२३॥
वर्णीन मार्गाकृतिच्या विचारा । सिद्धाकृती पासुनि शांति थारा ॥
पूर्णांक अंकें नवरंगलेला । मानी महा भागवताख्य लीला ॥ २४ ॥

( शिखरिणि. )

समाधानीसाठीं अमित सुघटीं भाव उठती ॥
सदा संतोषाची सुगम जडणी कार विनती ॥
न जी शास्त्राभ्यासें अवगत महीं वेद वदतां ॥
तदाकारालागीं लगबग करी भाव पुरता ॥ २५ ॥
अगा शांती कांताप्रति भुवनिं या मानसिं धरी ॥
तरी तारीतो कीं करुणघनसा तसभुवरीं ॥
तया भक्तीपंथांतिल वसविणें ठाय मनसा ॥
वरा लक्षीं साची अनुभवपणें मानसिं ठसा ॥ २६ ॥

( भुजंग प्रयात. )

असे सिद्ध साधूवरी संततीजा । मुनी ब्रह्मनिष्ठादिकी वाणिकाजा ॥
वरी ब्रह्मज्ञानी तया श्रेष्ठ संतीं । रणा भुक्तिते शांति आंत्यर्थ वांती ॥ २७ ॥

( मालिनी. )

नवविध पदमाला पावनाख्यार्थ लीला ।
करित सगुणठायीं तोचि तो सर्व बोला ॥
तनमन अमनानें बोध वाजी प्रतापी ।
बसुनि सुमनसेजे सांधला आपआपीं ॥ २८ ॥
भजन विनयवार्णा पोसली नित्य लीला ।
प्रसवत निज बोधें ज्याचि तो हे स्वलीला ॥
उभयपण समाजापासुनी निर्मलाहे ।
उभय तट भरांगीं मध्य गंगा विराजे ॥ २९ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

भक्तीभाव उभा करोनि सुजवा भावार्थ भक्तीमधीं ।
स्वानंदाकृति मेळणी निजपणीं आत्मान्वयीं साम्यधी ॥
संताचे चरणां सदां शरण मी मी हा बहू अर्थ मी ।
स्वार्थी साधक संत सज्जन भला ठायीं दिनानंत मी ॥ ३० ॥

( इंद्रवज्रा. )

मी मात्र नाहीं त्रिविधाप्रकारें । एकान्वयाच्या मतिच्या विकारें ॥
स्वानंद तृप्त्यर्थ अनंत वाणी । वाणी सदांची समभाव खाणी ॥ ३१ ॥

## सिद्धभाव.

( इंद्रवज्रा. )

सिद्धास वर्णोन अजीत ठाया ॥ जाया जयाचा मतिला उपाया ॥
शोधीत संता पथ आक्रमाया ॥ माया भ्रमाचा अनुताप ठाया ॥ १ ॥

( भुजंगप्रयात. )

जया मानसीं सार निर्धार झाला ॥ सुपंथाक्रमी नित्य योजी वशाला ॥
कसें काय होतें नसे दृश्य मानीं ॥ मनां चिंतनीं ध्यास ज्या नीज मानीं ॥ २ ॥
सदांचा उदासी गृहा सक्ति ठायीं ॥ करी भावनाभाव नाना उपायीं ॥
जडे ध्यास तो त्या सदाचार पंथी ॥ तदां गात राहे करूणार्थ संती ॥ ३ ॥
हरी सर्वसाक्षी पूर्ण लक्षीं भरावा ॥ कसा कोण तो देव दृष्टीं पडावा ॥
मनीं संशयो तीळमात्रीं नसावा ॥ असा आवडे वेळ तो सिद्ध भावा ॥ ४ ॥
जनाची न गोडी अनूताप अंगीं ॥ मनाचें वसें शोधितो जो प्रसंगीं ॥
करूं जात यात्रा तदां सत्वभावें ॥ वसे तेथ शोधी सदां संतभावें ॥ ५ ॥
बहू माजला नीज ध्यासू स्वसूखा ॥ तया बोलती मोक्ष इच्छू विवेका ॥
रमाकांत चित्तीं सदांचा जयाचें ॥ गडे ओळखी बाणण्या अर्थ ज्याचे ॥ ६ ॥
जया भाव जैसा तया देव तैसा ॥ जहाला स्वयें मार्ग दाता भजेसा ॥
परी येथ बाधा जडे साधकासी ॥ निरापेक्षता सिद्धिच्या आक्षपासी ७ ॥
परी नाच मानो सदां मौन्यमुद्रा ॥ असे सात्विकू योग हा राजमुद्रा ॥
सदां संत संगें बरा काळ गेला ॥ तया संगमीं नित्य भावार्थ ठेला ॥ ८ ॥

मना गूज तेचीं जरी प्राप्त झालें ॥ परी आकळेना क्रमावीण पोलें ॥
जशा क्षुधिताळागीं पक्वान्न गोष्टी ॥ रुची दाविती ना गमे भाव तुष्टी ॥ ९
परी पाक पोटीं स्वयें ज्या कराया ॥ गमो पाहिजे या महा भागिं जाया ॥
कळे भाव तो सार सारार्थ हेतू ॥ क्रमें चालिला पंथ दीक्षा प्रतापू ॥ १० ॥

( शार्दूलविक्रीडित. )

संताचा सहवास होउनि बरा योगान्वयीं जोडला ॥
साधू तो पथयोगकर्मजडणीलागीं बहू लागला ॥
नित्यानित्य विचार सार क्रमिचा पादाकृती चालिला ॥
साधू तो निजबोध शोध करितां आद्यांतरीं चेतला ॥ ११ ॥

( इंद्रवज्रा. )

अनंतमार्गीं निजबोध लीला ॥ वीचार साक्षी प्रकृती उदेला ॥
वाणींत साधूपथ लक्षणासी ॥ नित्यार्थ इच्छू म्हणती तयासी ॥ १२ ॥

## साधूभाव.

( शार्दूलविक्रीडित. )

साधावें निजसार साधन वसें याकारणें मानसीं ॥
वागे ध्यानधृती गुणार्थ कसणी भावार्थ स्थूळा वसीं ॥
नित्यानित्य विचार सार गतिचा पांथस्थ पंथा क्रमी ॥
साधो शोध करा हरीमाधिं धरा संवाद त्रीविक्रमीं ॥ १ ॥

( द्रुतविलंबित. )

गति तधीं बहुते रणभैरवी ॥ समर धी उदधी क्रम संभवी ॥
भगवती निगुती करि भाव तो ॥ नच जनीं विजनीं क्रम ठाव तो ॥ २ ॥

( इंद्रवज्रा. )

जासूद जैसा नृप चाकरीचा ॥ घेवोनि मुद्रा वरि जात साचा ॥
नेमीत ठाया पथ आक्रमोनी ॥ तैसा मुमुक्षू गुरुगम्य मानी ॥ ३ ॥
तेव्हां न मानी इतरांप्रती तो ॥ दीसे जनासी बहु क्रूर होतो ॥
वाणी तयाची जग नष्ट भावें ॥ वैराग्यतापें प्रतिती प्रभावें ॥ ४ ॥

नित्यान्वयाचा थिर मानसासी ॥ अनित्यदृष्टी जड भावनासी ॥
जैसा सिपायी नृपनाथयाचा ॥ कोणा न मोजी जगतींत साचा ॥ ५ ॥
मत्ताभिमानी समता न मानी ॥ मार्गांत नाना कृति मान मानी ॥
नानातरेच्या जनवाद वार्दी ॥ गुंतीं तधीं ते विपदाच वादीं ॥ ६ ॥
हा आडफांटा तम अंधदेशा ॥ लागोनि गेला गम ना सुदेशा ॥
याकारणें येथ बरा विचारी ॥ योजील मौन्यातरिं सारसारी ॥ ७ ॥
सूलीन भावो मुळचा जयासी ॥ तो नाहिं पंथी निजवास त्यासी ॥
सात्वीक गूणाकृति शुद्ध झाली ॥ भावार्थ वल्ली तधिं हो उदेली ॥८॥

( भुजंगप्रयात. )

असों पांथिकाला वदों भाव मानें ॥ असावें सदा मार्ग नीतीप्रमाणें ॥
जनालागिं वाणी बहू नम्र वाणी ॥ हरीभाव प्राप्तीप्रती हेंचि वाणी ॥९॥

( शार्दूलविक्रीडित. )

कार्यार्थी चतुरा नरा वच धरा भाराहरी दुर्भरा ॥
सारासार जथी मथी सुपथिच्या मार्गा करीं बा पुरा ॥
लौकिकाक्रम सांडुनी घडिघडीं साधी घडीनें घडी ॥
पोंचे जाउनि तुय देश भुवनीं तूझा तुंची होउनी ॥ १० ॥
आदी अंतवरी तुझा तुंचि गड्या कोणी नसे दूसरा ॥
सारा संसृति भेद भ्रांति पसरा यांतोनियां ओसरा ॥
अध्यात्मीक कथा विचार सुपथा भावार्थ आत्मान्वयो ॥
साधी साधक सांख्य तो बहुभला वेदार्थिचा निर्णयो ॥ ११ ॥
येथें फार जपे पटे अवघडे मेटे बहू टेकड्या ॥
मोहाच्या दरड्या कड्या मद थड्या वाड्या कुड्या वांकड्या ॥
भाड्याचा तटु जाण मानस गड्या अंगें वरी आरुढे ॥
नेटें चाल अकाल काल मिळणीं नित्यार्थ तो आंतुडे ॥ १२ ॥

( पृथिका )

पंथ ते बहुत लोक गर्तामधें ॥ वेष धारण गती नच त्यामधें ॥
सार रे निजगती जन साधनीं ॥ निघडे क्वचित ते निजबोधनीं ॥१३॥

( त्रिष्टुप्. )

अनेक योगें जनोघ दीक्षा ॥ विनोद जाणे महतींत शिक्षा ॥
सकास साधूनच शांतिभावा ॥ प्रती वश ये सकळी अभावा ॥ १४ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

कीर्ति सांगुनि आपुली बहुरुपी बांधे ब्रिदें पाउलीं ॥
तैसें संसृतिभाव व्यापकमती नानारितीं चालली ॥
भस्मांगीं बहु माखलें शिरिं जटा ताठा मनाचा हटीं ॥
पोटीं कामनला कळा खवळली ना सावधू धूर्जटी ॥ १५ ॥

( भुजंगप्रयात. )

मठाचे हटानें करी काम अंगीं ॥ करी बागबागायती त्या प्रसंगीं ॥
बहू भोंदिलीं भोळटें सत्वरंगीं ॥ असी शिष्यशाखा बहू माजलेली ॥ १६
अगा तो नव्हे मार्ग लक्षी सुलक्षी ॥ असे दंभवादी निजीं हीन लक्षीं ॥
बहू बोलका ज्ञान अध्यात्म गोष्टी ॥ परी पांगला लौकिकी अर्थ नष्टी ॥
नसे याजला नाम मात्रा प्रभावो ॥ असे फार ह्याची मना हा न शीवो १७
सदाचार मार्गें सदां चाल बापा ॥ नको आणिकाठायिं गाऊं प्रतापा ॥
वसे दीन भावीं उदासी कृतीनें ॥ हरी नाम पोटीं महा योग्यतेनें ॥
कळों नेदिता दुजियालागिं अंगीं ॥ बरा होऊनी वाग पूढें अभंगा ॥ १८ ॥

( द्रुतविलंबित. )

मनसुभा परमार्थ गती निकी ॥ धरिला वेष कशास्तव कौतुकी ॥
निढळ तें अढळे नच साधनीं ॥ विपरिताकृतिच्या नितिबोधनी ॥ १९ ॥

( स्वागता. )

स्थूळभाव जिणला नव साधू ॥ पावला मनपुरीं निज सिन्धू ॥
तेथिंचा उगमतो निगमानें ॥ योजिला सहजोद्भव भावने ॥ २० ॥

( शार्दूलविक्रीडित. )

साधीला निजयोग पंथ मग तो सूसंत झाला भला ॥
वंदोनी सदपाउला विरभ्रतीपासोनि वीसावला ॥
त्याची जी महिमा कथीन सगुणी स्वानंदवाणीं वसें ॥
आदी अंत न पार पार भुवनीं तो माधवो सौरसें ॥ २१ ॥

( इंद्रवज्रा )

लाभे स्वभावा विसरोनि भ्रांती ॥ तुर्या प्रभा ती निरबोध ज्योती ॥
ख्याती तयाची अजिता अनंतीं ॥ संतीं प्रभावे मळवो वसंतीं ॥ २२ ॥

## संतभाव.

( इंद्रवज्रा )

संतोष झाला मुळ रंग ठाया ॥ येवोनि पोंचे बहुतीं उपाया ॥
माया भ्रमाचा तधिं नाश झाला ॥ सोहंपणाचा प्रभवो उदेला ॥ १ ॥
मी जीव ऐसी जगकार्य लीला ॥ ती भेदियेली शिव भाव झाला ॥
सिद्धाश्रमाचा गम येथुनीया ॥ झाला पुरावा चलण्या उपाया ॥ २ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

साधूनें निज साधिलें तदपुरी तुर्यार्थ साक्षी भला ॥
आला जिंकुनि कौतुकीं गुणगती विश्वार्थ विश्वासला ॥
कर्ता नाचि म्हणे असें विनय मीं माझा मसीं भाव हा ॥
भावार्थें पिकला भला सवकला लीलागती हे महा ॥ ३ ॥
नाहीं नाश कदां मला जननही मी नाहिं देहावसें ॥
माझेंनी सकळो घडे मज यथापासोनि साक्षी असे ॥
नाहीं काम अकाम भाव मजला लीलाचि माझी खरी ॥
ऐसे भाव करी अनेक परिचे तुर्या क्रमाचे वरी ॥
ज्ञानाज्ञानपणीं भणी फिरुनिया विज्ञान प्राप्ती करी ॥
तुर्या तेचि उभी असे सकळही जाळोनि भ्रांती बळी ॥ ४ ॥

( इंद्रवज्रा. )

मोहादिकाचे सकळीक सूभे ॥ भंगोनि गेले नच कोण ऊभे ॥
भ्रांतीवनातें जाधिं शुष्कता ये ॥ तेव्हांचि तेथें सकळी कळा हे ॥
गेलीं जळोनी गुणवंश बेटें ॥ येकांत येकीं मिळले प्रफाटे ॥ ५ ॥
सज्ञान वायू करि लागतानां ॥ झाली बहूघर्षणि नित्य माना ॥
वन्ही नगाचे कृति चेतला हो ॥ विज्ञान तुर्या म्हणती तया हो ॥ ६ ॥
जाळोनि टांकी गुणवंश जाळी ॥ तृष्णा मुळीं वास भ्रमास मेळीं ॥
चेते बहू तो भ्रमकाननासी ॥ जाळोनि झाला स्वप्रकाशि वासी ॥ ७ ॥

( द्रुतविलंबित. )

समरसें समता नच ज्वाळता ॥ प्रभवतो भवतोडित होडता ॥
सतत तो अजरामरसंगमीं ॥ अमितबोध निजाश्रमआश्रमीं ॥ ८ ॥

( इंद्रवज्रा. )

तेथोनि वाणी निजभावलीला ॥ ते हो कवीतापद बोधनीला ॥
पद्यार्थ गद्यार्थ समर्थ वाणी ॥ भेदा हरोनी गतिची सिराणी ॥ ९ ॥
साक्षी स्वभावें जगिं वागताहे ॥ भोगी न त्यागी समभाव लाहे ॥
आहे असा हा गम तेजसाचा ॥ मीकार बाकी समरंगणीचा ॥ १० ॥
विश्वाभिमानी परिपाकसिद्धी ॥ सिद्धी तदाच्या दश लक्षणा धी ॥
धीरावती सौभरहर्षरंगीं ॥ रंगे रमांगें निज ते प्रसंगीं ॥ ११ ॥
येथोनी वाढी स्वसुखार्थ सारी ॥ वारीज नेत्राकृति सार भारी ॥
भारू भरावे सम संगमाचा ॥ निष्ठा स्वभावी मिळणी अवाचा ॥ १२ ॥
वाचाळता जाय गळे अहंता ॥ निष्ठा अशी हे गमणें वरिष्ठा ॥
ते ब्रह्मनिष्ठा म्हणती विवेकी ॥ विज्ञान ज्ञाले समभाव लोकीं ॥ १३ ॥
महामौन्य मुद्रा प्रभवे समुद्रा ॥ तद्रूपता हे मननीं सुभद्रा ॥
रुद्रावती ही युवती अवस्था ॥ मानापमानीं नच मान मस्ता ॥ १४ ॥

( शिखरिणी. )

मुनींद्राची ख्याती करुनि निगुतीं येकवटली ॥
सबाह्यीं ऐक्यत्वाप्रति करि तदां भाव विमली ॥
लिला हे सूखाची अचलपणिची पूर्ण धरणी ॥
अनंती विश्रांती नवल सुलभीं नीज तरणी ॥ १५ ॥

( इंद्रवज्रा. )

गायी नमूनी मतिचा पसारा ॥ सारार्थ सारा कृतिचा उभारा ॥
भारा हरोनी जगदुर्भरा या ॥ माया अनंतीं नच संगमीं या ॥ १६ ॥

## मुनीभाव.

( द्रुतविलंबित. )

मननसील रसाल रसाकृती ॥ कथिन सज्जनसंग सुखावती ॥
ध्वनिताहुनि हे मृदु भाषणी ॥ लिनपणें विचरे मननीं ध्वनी ॥ १ ॥

परम पावन भाव स्वभाव हा ॥ रमर नला निगमाकृति हे महा ॥
कलिमलांतक ही निजभाषणी ॥ विजय हो सकळी सुखसेवनीं ॥ २ ॥

( मालिनी. )

गुण गति सकळी हे चिन्मयीं मातलीसे ॥
प्रणव जिणुनि छंदें ऐक्यता सांचलीसे ॥
मनन वरि तयाचें ऐक्यतानेक छंदा ॥
अगुण गति सगूणी येथ ना लाग येदां ॥ ३ ॥

( इंद्रवज्रा. )

वेदांत तो मूळिंच सिद्धमार्गी ॥ साधुत्व तेंही तदनुप्रसंगीं ॥
हा सर्व भावो स्थुळ सूक्ष्माचा ॥ कैवल्ययोग् क्रम संगतीचा ॥ ४ ॥

( द्रुतविलंबित. )

मनन तें पहिलें विवरी बरें ॥ सकळही खळसंग अभाव रे ॥
परि वरी अगुणाकृति हे लिला ॥ करित माधव जे महिला भला ॥५॥

( इंद्रवज्रा. )

सर्वार्थ सिद्धी मति आकळोनी ॥ भावार्थ शोधी पर पार ध्यानीं ॥
केवीं जनीं तो उगमासि येई ॥ ना ठाउका हा सकळीक ठायीं ॥ ६ ॥
ज्याची समानी विघडे न मुद्रा ॥ कोणा न बोले विपरीत निद्रा ॥
नामें अनेकीं हरिभाव लीला ॥ चालीत बोधें सम तें स्वलीला ॥ ७ ॥
ब्रह्मांडपिंडीं समवीत सारें ॥ मुनींद्र ऐसें म्हणती तया रे ॥
येथें निमाला अभिमान सारा ॥ सोहंपणाचा हरला उभारा ॥ ८ ॥
अग्नी जसा तो स्वरुपीं मुराला ॥ विज्ञानरुही म्हणती तयाला ॥
कोठें न जागा म्हणण्यास मी हा ॥ झाला तदाकर मुनींद्र गेहा ॥ ९ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

निष्टासार गतीप्रती प्रभवली जे ब्रह्मनिष्टा असी ॥
बोलीली हरिनें स्वभाव वळली जैसी मुखां आरसी ॥
जाणे जो सकळा गती अनुभवी भावार्थ शब्दांतला ॥
लाभाचा निजलाभ भाग गति हे सिद्धांत वेडावला ॥ १० ॥

( हरिणीप्लुता. )

परतणें भ्रमणीं नच आश्रितां ॥ समरसीं मिळणी सम साम्यता ॥
विजय तो सुजनाख्य कृपानिधी ॥ पतितपावन ब्रीद्र जया वधी ॥ ११ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

झाला सर्वहि संसृती क्रम बरा आभारला लाभतो ॥
स्वानंदीं मिळणी मिळोन वळणी वाणी न वाणीन तो ॥
जाणीवा कृति आटली भवनदी नीदा न सूदान ही ॥
वाणी लाभ अनंतभाव घसणी मार्जी करी लोभही ॥ १२ ॥
शब्दांची रचना जनार्दन घना वांचोनि कैसी घडे ॥
कर्ता कोण म्हणे पणें अभिमती नीती निजार्थे अडे ॥
जाणे जाणीव नेणिवांतुनि भला झाला मनीं मोकळा ॥
भोळा ना खळ चोर भ्याड सकळी भावो अनंतीं भला ॥ १३ ॥

( इंद्रवज्रा. )

ब्रह्मांड पोटीं समलें जयाचा ॥ तो काय दुजा करि भेद वाचा ॥
वाचातिताचा नव रंग लाहे ॥ हा जी अनंतीं मिळ हा प्रवाहे ॥ १४ ॥

## ब्रह्मनिष्ठभाव.

( स्वागता. )

देखणेंपणविणा निज सेजे ॥ शोभला विमळ भाविक तेजें ॥
नात त्या अवसरीं नच रीजे ॥ रीजलें पण भले रिज रीजे ॥ १ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

जैसी सागरसंगमीं लावण तें जाई विरोनी भलें ॥
तेव्हां सागरिं भिन्नता किमपिही ना सैंधवीं ऐकिलें ॥
योगी भावभरे महामति निधी स्वानंद तो ऊभरे ॥
आनंदें सम साम्य ते करुनियां येथें न देही स्मरे ॥ २ ॥

( इंद्रवज्रा. )

जैसा निधीला लहरी प्रभावो ॥ तैसाच योगी अतुला प्रभावो ॥
ना कारणीं हा नच कर्म भावो ॥ ना कार्य वार्ता निजगी स्वभावो ॥ ३ ॥

( मालिनी. )

जड नच गति झाली मौन्य मुद्रा मुराली ॥
अमल जग समोहीं चिद्‌प्रभा ते जिराली ॥
सकळ वळखि होतां जाहला दृश्य द्रष्टा ॥
विचरत अवनीला तेथ ना कर्मचेष्टा ॥ ४ ॥

( इंद्रवज्रा. )

ना देह लोभी निजभाव रंगीं ॥ नीधी तरंगीं नच भाव अंगीं ॥
भिन्नार्थ कांहीं जलरूप सारे ॥ योगार्थ सिद्धी वरितात सारे ॥ ५ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

संसारीं विरळा कळा विमल हा पावे हरी संगमीं ॥
तोची एक जनार्दनीं मिळणिला मीळोनी मिळे समीं ॥
नित्यानित्य गती हरोनि वरतां संतोष शांती स्थळीं ॥
पावोनी पद निर्भयीं हरि भजे ज्याचाचि तो न्याहळी ॥ ६ ॥
निष्ठा ब्रह्म असी समत्व सहजीं राजी सदां सर्वधी ॥
साक्षीभूत विभो मनोघविभुती शंभो सदां ज्यामधीं ॥
लोळे रात्रदिनीं असंग भवनीं किंवा हरी शोधनीं ॥
दोनी एकचि संगमीं मिळुनियां आले रुपा या जनीं ॥ ७ ॥
बापा हे तनु मानवी घडिं घडीं जोडे नची साधनीं ॥
ईचेनी सकळी कळोनि वळणें इच्छा जसी ज्या मनीं ॥
सर्वांमाजिं अजीत हे परवडी लाधे तया लाधणें ॥
जैसे सर्वहि लोक रंक नृपती स्थाना नची शीवणें ॥ ८ ॥
खेळे आपण आपणामधिं भला स्वानंद तो भूपती ॥
ज्यासि कोणिहि भूमि शत्रुवळि ना विश्रांति हे निश्चितीं ॥
जैसा तो विर शत्रुला जिणुनिया झाला असे वीजयी ॥
निर्धारें मग पातला निकट गा उब्दोध तो वीळयीं ॥ ९ ॥

( शिखरिणी.)

खरें खोटें नाहीं गम उगम त्या तेथ भजणें ॥
परी जाणें सारें जागें नच वदीं येत मिपणें ॥

उभी राहेनाची अभिमति तया योग सुगमीं ॥
कळे देहो मिथ्या वरि वदुं कसा भेद मति मी ॥ १० ॥

( इंद्रवज्रा. )

बोले तरीं तें नुमजे दुजाला ॥ ज्याचीच तोही उमजेल लीला ॥
वेडा दिसे तो परिभाव होतो ॥ संतास शांती भरिणा अहो तो ११
येथें कशाची तुळणा करावी ॥ वादापवादीं मति नाचि गोवी ॥
जैसा जयाला दिसला असे तो ॥ तैसाचि त्यातें प्रभवो हरी तो ॥१२॥
संगीं न भंगीं नच लोक रंगीं ॥ अंगीं न कांहीं अजरा प्रसंगीं ॥
शत्रू न मित्रादिक रंक राजा ॥ सर्वांभुतीं जो सम साम्य काजा १३

( शार्दूलविक्रीडित. )

ऐसा ब्रह्म निवोट बोध भुवनीं कांहीं वसें राहिला ॥
जैसा पुष्पकळींत गंध बरवा अंगांतची व्यापिला ॥
प्राप्ती काळगती अमोघ भरती फांके दिशा सर्वही ॥
ब्रह्मज्ञान अनाम धाम सकळी विश्वात्म ज्याचे सही ॥ १४ ॥

( पृथ्वी )

सदास विमलाननीं निगम तो रमूं पातला ॥
रमाधव हरी असा सदय जी अभेदीं भला ॥
विलास सहजीं उमाप भरिणा घनासारिखा ॥
जसा अवनिला सुतसपण ये तधीं सारिखा ॥ १५ ॥

( इंद्रवज्रा. )

खाणींत खाणी निजबोध वाणी ॥ वाणी अवाणी कशि कोण वाणी ॥
बाणी न बाणा गति ते अनंतीं ॥ एकाकृतीचा वरि येत संतीं ॥ १६ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

शांतीची निजशांति होउन मनीं वाणी वसे संचरे ॥
तेव्हांची स्थिति गम्यतागमजनीं सर्वांतरीं संचरे ॥
कोणा ना गमला गमोनि कवणा ऊणा नची भासला ॥
जैसा भाव जया तयासि तसा ना रुसला तोषला ॥ १७ ॥

( इंद्रवज्रा. )

सांगों न जायी नच मौन्य होई ॥ होई न होई नच तेथ गोवी ॥
ना दीन तोषी नच दुःख हर्षी ॥ ऐसा म्हणावा नच कर्मकर्षी ॥ १८ ॥
बोले हरीहा भजन प्रवाहें ॥ देहीविदेहीपण ज्यास लाहे ॥
हेतू अनंतीं नच कार्य कर्मीं ॥ ना देह धर्मी नच देहवर्मीं ॥ १९ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

संतोषात्मक आत्मभाव प्रगटे या मानवाचे पुरीं ॥
संसारीं बहु भाग्य हें निजरुपीं स्वानंदलीला करी ॥
भारी तेजपणीं अरी न जगतीं कोणी न पाहे तया ॥
काळाचा निजकाळ कृष्ण प्रभु हा हारी भवाच्या भया ॥ २० ॥

( इंद्रवज्रा. )

एकार्थ ठायाहुनि बोधवंतू ॥ व्यापोनि सर्वांमधिं हा अनंतू ॥
अंतू न याचा नच जन्मधारी ॥ भावार्थ अर्थी कृतिचा विचारी ॥ २१ ॥

---

## ब्रह्मज्ञानभाव.

( शार्दूल. )

ब्रह्मज्ञान वसंत संत महिना शांती क्षमा विक्रमा ॥
भावे आत्मगमा मना अमनता होण्यार्थ त्रीविक्रमा ॥
नामाचा निज सोलिवार्थ वळणी तेथें क्षमा सूगमा ॥
चाले ओघ अरोग हा, भवतिचा हारोनिया संभ्रमा ॥ १ ॥

( इंद्रवज्रा. )

ब्रह्मा न विष्णु शिव भेद भावो ॥ येकार्थ तीघे विलसे स्वभावो ॥
सर्वार्थ साक्षी प्रतिती जयांगीं ॥ तो ब्रह्म जाणे बरी हातवागी ॥ २ ॥
ना आग्रहो कोणहि ज्या प्रसंगीं ॥ संगी असोनी नच देह संगी ॥
ताठा कदांही नच जेथ येई ॥ गोविंद गतीं प्रचिताथ देई ॥ ३ ॥
बोले बहू जो परोचि बोले ॥ ऐसा प्रभावो निजरंग लीले ॥
माझें न तूझें सहजार्थ साजें ॥ वागे तयार्थे कवणू न साजे ॥ ४ ॥

( भुजंगप्रयात. )

जसा कोण भेटे तसा त्यास दिसे ॥ असा भाव ह्या आत्मवीणा न दिसे
जया पारखीतां कदां पार नाहीं ॥ नसे ज्ञान अज्ञान मूळींच कांहीं ॥५॥

( शार्दूलविक्रीडित. )

साक्षी या मुरली बळें वळिलसी वाचाहि मौनावली ॥
तेथें कोण गणी गणीत सगुणीं विज्ञान ज्ञानावली ॥
आत्मानंद गती अभेद मतिलें नित्यान्वयें मातली ॥
स्वानंदीं सततीं सती गुणवती श्री माधवी पातली ॥ ६

( भुजंगप्रयात. )

अखंडाकृति नामलीलेंत झाली ॥ सबाह्यीं जया पूर्णता ते मिळाली ॥
समाधी अशी वागिली शीरभागीं ॥ जया कल्पना ना शिवे काळ भंगीं ७

( शालिनी. )

सहजपण जयाचें लोकमेळीं मळेना ॥
अभिमति नच अंगा कर्मभावें सिवेना ॥
निजगति परिवारा दावि जो नीजकीर्णी ॥
समभर विजयाचा नाचि तो वर्ण वर्णी ॥ ८ ॥
अभयपण ययानें होउनी हो बसावें ॥
तळमळ नच राहे संगती ज्या प्रभावें ॥
सुजन विमलवाणी भक्तिभावा प्रसंगें ॥
दुरित तृण जळोनी आत्म विश्वास रंगे ॥ ९ ॥

( इंद्रवज्रा. )

संतोषकारी जगिं प्राण जैसा ॥ तेसा मिळे तो मिळणींत तैसा ॥
भावार्थ नीधि निगमो पुराणा ॥ प्रेमोद्भवानें करुणेक राणा ॥ १० ॥

( भुजंगप्रयात )

नसे पक्षपाती नसे लक्ष लक्षीं ॥ सदाचार ठायीं दिसे जो सुरक्षी ॥
जया देहभावो सिवेना कदांचा ॥ जगीं तोचि तो जाणता सर्व साचा ॥११॥
मना उन्मनी होउनी नीजगेहीं ॥ गळाली कळा दुर्मती सर्व तेही ॥
तया अंगिं चेष्टा निजानंद कारी ॥ महाभूत साक्षी असे निर्विकारी ॥१२॥

कळेना कदां लोकमेळी मिळोनी ॥ जसें नीर अंगें मिळे सर्व मानीं ॥
निराकार चेष्टा सदाचार ठायीं ॥ दिसो लागती लोकलीला प्रवाहीं ॥१३॥
जया रंगभागीं निरा मेळवीलें ॥ तया सारिखें तेथ तात्काळ झालें ॥
परी ते वरी येत रंगा जिणोनी ॥ दिसें रंगस्थानीं जयाचें मधोनी ॥१४॥
तसा सज्जनूसार साक्षी निजांगीं ॥ वसे निर्मळू लोक भागीं सभागी ॥
जसा कोण मीळे तयाचे विचारें ॥ दिसे आगमीं तो तया सत्य सारें ॥१५॥
अभीमानियासी अभीमानि दीसे ॥ परी देखतां देखतांची न दीसे ॥
सदां संगतीचा असे सत्य वादू ॥ परी ना मदू दुर्भरू खेद बाधू ॥ १६ ॥

( पृथ्वी. )

असा हरिरसीं रसाळ गतिचा असे मातला ॥
न आस कवणी गुणी अगुणि जो दिसे भासला ॥
बहूत जन वागती बहुमती न याचे सरी ॥
सुसंत बरवा भवामधिं वसे बहूतां परी ॥ १७ ॥

( इंद्रवज्रा. )

विघ्नें न जेथें किमपी असावीं ॥ ऐसी जनाची मिळगी स्वभावीं ॥
भावींत लोकीं अनुमान मानें ॥ दिसे नची हा कवणा क्रमानें ॥ १८ ॥

( भुजंग प्रयात. )

दिनाचा दयाळू अभीमान टाळू ॥ असत्यार्थ ना वाणिला तो विटाळू ॥
जनीं बोलणें ते रितीं चालताहे ॥ असा धन्य भागी कृतार्थ पाहे॥१९॥

( शार्दूलविक्रीडित. )

ब्रह्मज्ञान अनाम भावगति हे नामें बहू शोभलें ॥
आलें ना दुसरें बरें वहनियां जेथील तेथें भलें ॥
अंगीची भ्रमभावना निवटली तेथें प्रभा फांकली ॥
स्वप्नाचेवरि जाग्रती जासि गमे मिथ्याकृती भावली ॥२० ॥
ज्ञानाज्ञान हरोनि जाणिव सरे त्यांतेच रे फांवलें ॥
नेणीवें नच मावळें उभयहीं जेथेंचि संभावलें ॥
[illegible] संतोष भावें भलें ॥

झालें तद्रुप मानवो निज गडे भावीक मेळांतळे ॥
ज्याचें भाग्य अपार मानव वळी माजीं बळी जन्मला ॥
याहूनी नच लाभतो म्हणुं बळी सर्वार्थ तेजें भला ॥ २१ ॥
आत्माआत्मपर्णी नसे समपर्णी ही सर्व लीला वसे ॥
भासे तोचि वसे असोनि न दिसे गूणाकृतीचे वसें ॥
जाई मानव भावने करुनियां विश्रांति देहावसें ॥
भोगीं योग वियोग रोग हरल्या स्वानंदवाणी वसें ॥ २२ ॥

( स्रग्धरा. )

संतीं भुक्ती समा नी स्वरुप अवनिचें सच्चिदानंदकारी ॥
भक्ती मुक्ती विरक्ती अनुभव मतिला सर्वदां सर्वकारी ॥
ऐसी हे भावसिद्धी जनन मरण हो बंध तोडी निदानीं ॥
स्वानंदानें सदांची सुभर उभवणी नित्य रंगीं मिळोनी ॥ २३ ॥

( इंद्रवज्रा. )

वाचातिताची सगुणार्थ लीला ॥ संतीं असे या पद भावनेला ॥
भावार्थसिंधु दिननाथ गावा ॥ सारार्थ सारा स्वरुपार्थ भावा ॥ २४ ॥

( भुजंगप्रयात. )

समाधानि जेथें सदांची उदेली ॥ तयाचीं नमूं पाउलें देहमेळीं ॥
जया संगतीनें कलीकाळ नासे ॥ भवभ्रांतिचें हारवी सर्व पीसें ॥२५॥
जया संगतीनें कुसंगासि तोडी ॥ जया संगतीनें मती धीर जोडी ॥
जया संगतीनें अलक्षासि लक्षी ॥ तया संगतीचा हरी वास लक्षी ॥२६॥

( शार्दूलविक्रीडित. )

गायीलें गित सद्गुरू गुणवसें श्री एकनाथा मिसें ॥
लेणें हें मुळचें अजात घरिचें मुद्रीत चिन्हां वसें ॥
नामाधार असे विराम भुवनीं याहूनि कांहीं नसे ॥
वाणीलें बहु वाणणें अवगमें संता मनीचें पिसें ॥ २७ ॥

( इंद्रवज्रा. )

स्वानंद प्राप्तीवरि भेद नाहीं ॥ सायुज्यसिद्धी वदताति पाही ॥
त्याहोनि भक्ति वरि नित्य लाहे ॥ सोन्या सुगंधीपण शोभताहे ॥२८॥

( शालिनी. )

बहुविध स्वरुपाचा भाव मानी स्वमानी ॥
सहज उभवला हे नीजभक्ती समानी ॥
अमन करुनि संती शांति हे भाववीली ॥
विजय हरि गुणाची जोडणी जी उदेली ॥ २९ ॥

( भुजंगप्रयात. )

अनंती समाधी नसे ताठ मुद्रा ॥ सदां संगमेळीं निजानंद मुद्रा ॥
समुद्रावरी ज्या रिती त्या तरंगी ॥ तसे स्वात्मभावीं हरी रंग रंगीं ३०
असे नित्य हे जी नवी निर्मळांगा ॥ स्वओघे भली मातली भावगंगा ॥
मिळे सागराला सहस्रामुखानें ॥ अनंती वदे नाम एकात्मतेनें ॥ ३१ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

खंडेना गति हे अखंडपणिची ना अंत आदी असे ॥
प्रारंभू नच शेवटु वरुनची देहांत भावे नसे ॥
मोक्षाचे नच मावळें मति पिसें बंदी नसें संगमीं ॥
बंदा मीपणभाव देह उगमीं स्वामीहि माझाचि मी ॥ ३२ ॥

( इंद्रवज्रा. )

ना लोक कोणी मजवांचुनिया ॥ मी लोकवीणा नच कोण ठाया ॥
भेदार्थ भावा हरुनी अनंता ॥ वंदीन माथां गुरु येकनाथा ॥ १४९ ॥

---

## “ समाधि रंग. ”

( वसंततिलका. )

वंदोनियां गुरुवरा निज भावनातें ॥ दावीन त्या समसुखा स्थिति भावना ते ॥
मायाभ्रमें जिवशिवादिक द्वैतभावो ॥ वाटे तया शमविण्या सुलभी उपावो १
भाग्यें बहू तनु नरा तुज मानवाची ॥ प्राप्ती घडे परि तुला भ्रमणा भवाची ॥
गुंतोनि मोहमदिं या मरसी फुका रे ॥ मी कोण हा समज ना असला तुंकां रे २
नाहीं प्रमाण पुढचें कळणें कसें तें ॥ पेरीयलें बिज जसें पिकतील सेतें ॥
अंधार हा गुणनिशी रुप याच भावें ॥ स्वमार्थता सकळही भ्रमणाचि भावें ३

दारासुतादिक सगे म्हणशील माझे ॥ माझें म्हणे इतुकियांतचि मृत्यु माजे ॥
अंतीं न पावति कुणीं तुंचि एकला रे ॥ वा व्यर्थ ह्या सकळही भवती कळा रे ४
शास्त्रें अनेक असती निति देशमानें ॥ सिद्धांत भाव नच या अनुमान माने ॥
वेदादि ते भुमितळीं रित काय देहो ॥ व्यव्हार मार्ग गम हा मनु आदि देहो ५
जैसा नृपाधिश भुमीवरि रैत लोकां ॥ जो कायदा करितसे रुप तें विलोका ॥
व्यापार शेत कुणबाव जनांकरीतां ॥ दंडार्थ भेद गुण दोष जमे करीता ॥६॥
व्यवहारकर्म नसल्या नृप कायदा ना ॥ ना दंड ना कर असा रुपयादि नाना ॥
कर्तेपणावरि नृपें कर बैसवीला ॥ अन्यायकारक तया रासिं बांधियेला ॥ ७ ॥
याचीं रुपें हरि घरीं रित वेद मानीं ॥ कर्मानुबंध नर तो भव सत्य मानी ॥
सत्यार्थ ज्या अवगमे मग तो गुमानी ॥ नाहींच लौकिक मतीं अपमान मानी ८
कर्मे करूनि मति ही जरि शांत होती ॥ कर्मांतरें बहु दुरी करितां न होती ।
वेदोक्त मार्ग सरळा पण होत नाहीं ॥ होतें ति तू किं समजे श्रम यातना ही ९
कर्मार्थ तो नच कळे मग कर्म केवीं ॥ केवीं गमे अनयना परकीय ठेवी ॥
भुक्तींत सक्त असुनी करि मुक्ति कर्में ॥ कांते धनाविण कधीं मातिला न कर्में १०
वाचोनि भागवत जनां बहु अर्थ सांगे ॥ वागे भवोकाशिं मधीं जनहुनि सांगे॥
ज्ञानोपदेश असला कसला कळेना ॥ भानूप्रभे निशिकळा कसि वीतळे ना ११
मायाभ्रमो म्हणुनियां भव सत्य नाहीं ॥ भ्रांती अशी कळुनियां वळलीच नाहीं॥
वक्ता जपे श्रवणि कां धन अर्थ मानें ॥ ज्ञानोपदेश करण्या मति केंवि माने १२
दंभार्थ ज्ञान धनिकें श्रवणीं धरावें ॥ विश्वास देउनि कथा भ्रमणीं वरावें ॥
कर्तेपणा नचि सुटे गुण ते न जाती ॥ भावीकता नच उरे भर केंधि जाती १३
शास्त्रार्थ वाचुनि जरी बहु ज्ञान झालें ॥ तेंची बहू अभि मती मधिं अंध झालें ॥
आत्मानुभाव सगळामतिचा गळाला ॥ माया बडीश मिन हा जडला गळाला १४
जाणोनि सांग न चले अधमा मुकूटीं ॥ मुर्दाल धर्म धरुनी क्रुर मूरकूटी ॥
रोगावरी तनु मधीं जरि औषधी घे ॥ पथ्याविणा मरणची ज्वरि तो दधी घे १५
रोगें तनू बहू जरीं क्षिण झालि आहे ॥ ना औषधी ग्रहणता बहु हीत आहे ॥
दैवावरी भरंवसा धरुनी बसे जो ॥ येकांग गृहा बहु बरा दुसरा कसे जो १६
स्वनूभवाविण नसे भव दूर कर्ता ॥ स्वानूभवो उगमता नच भाव कर्ता ॥
स्वानूभवारहित हे सकळीक वार्ता ॥ मायेप्रती मग कसा नर हा निवार्ता १७

दीपू जसा समुळिं तो दिपपात्र ठार्यी ॥ अंधारकारक कळा दिवली दिठार्यी ॥
सारा प्रकाश दिठिला दुजियास होतो ॥ शास्त्रार्थ ही इहरुपी मति भाव देतो १९
आत्मप्रकाश रविसा निशि गूणहारी ॥ कामादि ते सकिरणें त्यजिले महारी ॥
वेदांत वेद्यरुप हें निजभावयोगें ॥ द्राष्टांत मत्त नच बा सुजना प्रयोगें २०

( भुजंगप्रयात. )

स्वबोधें मना शांतवी जो स्वभावें ॥ तया द्वैत ते कल्पना नाच भावे ॥
दिसें जें दिठीला तया ब्रह्म वाटे ॥ विचारान्वयें भिन्नता नाच वाटे ॥ २१ ॥
नसे काम ज्या नाम त्या काय कीजे ॥ मुक्त साक्षि ते न्हेउनी काय कीजे ॥
नसे लोभ ज्या तो मुक्त या प्रपंचा ॥ नये हा कधीं जाग्रतीतें प्रपंचा ॥२२॥
अशाची जरीं संगती दैवयोगें ॥ घडे ज्याप्रती भक्तिप्रेमानुरागें ॥
तया भाग्य ठावा नसे शब्द वाचे ॥ जगीं कल्प अंता पुढें हाचि वांचे ॥२३॥
दिपानें दिपू लावणें जेविं येथें ॥ तसें मान या साधकांमाजिं येतें ॥
खरें हें परी प्राज्ञता साधकांगीं ॥ मुळीं पाहिजे लीनता भाव अंगीं ॥ २४ ॥
वसत जो दृक्ष लक्ष जडणें रुप आत्मभावी ॥ तो मानवामधिं हरी तरणार्थ भावी
होवोनियां अमल आपण तारि दूजा ॥ हाची परंपरि जडे नच अन्य दूजा २५
संसारसार मनिं मानुनि जो रमे हो ॥ वैरी दिसे मातिमधीं पति जो रमे हो ॥
मोहाब्धिचा पुर भरे मतिढोलिमाजीं ॥ तूफानता रव उठे पडरीपुमाजीं ॥२६॥
दुःखांत सूख समजे मुढ हाचि देहो ॥ व्याली फुकांच रति ती शिणलीच देहो ॥
मी कोण हा विसरला रतला रतीला ॥ नाहींच जन्ममरणां कसि घे भितीला २७
पीता मरोनि सुत हा जगिं वांचलासे ॥ याच्या गुणें पितर ते खदिरागि लासे ॥
वैरीच हा ताधिं पिता सुत ना म्हणेची ॥ जाऊं लया त्वरित हा नित हें म्हणेची२८
जो आपणा वळखितो सुत तो नराचा ॥ बापें तपें करुनियां वर हा हराचा ॥
साचाच भाव सम हा नच भाव दूजा ॥ बेचालिसि हरिपदीं मिळवी न दूजा २९
रांडे म्हणे जननिला पितयास मेल्या ॥ कांतेप्रति बहु ळळे असलाहि मेल्या ॥
बांधोनिं एमदुत न्हेत तदां न सोसे ॥ लोहाग्निचे बीर उभा करती न सोसें ॥ ३०
जन्मोनि काय तनुही पशुहुनि ज्यादा ॥ मायंमधीं रतलिया पशुचाचि दादा ॥
बांधीत जो समपणें हितकारि तो बा ॥ बाकी नकार लिपिहीं सकळीक तोबा ३१

होताति ढोल हलग्या मळघ्या नगारे ॥ मणींतिं चर्म पशुचें नरहा उगा रे ॥
काळांत होत तनु ही मग कोण कामा ॥ मूळें सती रंडविण्या फुकटी रिकामा ३२
खावोनि गोड मलिदा शयनी सुंदरा ॥ बैसेनची किमापिही गडि ऊज दारा ॥
दारा सुताहुनी दुजा मनिं न्याप नाहीं ॥ याची जमा शुमधीं सम होत नाहीं ३३

( इंद्रवज्रा. )

संसार धंदा करि वेळ सारा ॥ फांवे तधीं खेळत जूग सारा ॥
बारा वदे कीळचि मारुनीयां ॥ लज्जा हरीच्या भजनीं मनीं या ३४

( वसंततिलका. )

माळेंत पाणि धरुनी किति ते जपाला ॥ लावोनि तेत्र बसले किति खाति माला ॥
फांसोनि राखकिति येक जटा धरोनी ॥ भोंदीयले दिन भुतें भुलती भरोनी ३५
ऐसे कलीमधील संत परोपकारी ॥ सारेचि संत असले फिरती भिकारी ॥
येथें नसे भजन तें मग पूजनाचा ॥ चाले मची विधि बरा स्मरि राम वाचा ३६
ऐशास काय करणें वदणें भल्याला ॥ जे अंतरीं घुवटसे वदु मासल्याला ॥
आधींच सावध बरे घरिं राहुनीयां ॥ वीचारकारक मती करिती उपाया ३७
वाचे कडोनि हरिचें रुप गूण गाती ॥ नाहींच या प्रति कधीं घडणें दगां तीं ॥
माया भ्रमा निरसती सति मान बुद्धी ॥ वीचारवंत तरती समजे प्रबुद्धी ३८
ना आळसी मालिन ना अभिमान नाहीं ॥ बोली मधूर रसिकी दिन भाव नाहीं ॥
मानी समान सकळा सम एक भावें ॥ ना आप्त आणि परकी सरले अभावें ३९
संसारसागर तरोनि मनोघ योगें ॥ जाणें असे सहजता निजरंग भोगें ॥
शांतीप्रती मिळणि ये गुणभाव जातां ॥ जातील गूण गुरुभक्ति सुबोध होता ४०
बोधाविणा अनुभवो नच येई अंगीं ॥ याकारणें रम तुं बा सदसंतरंगीं ॥
बोधास योग्य असल्या सुलभी गुरू तो ॥ बापाहुनि प्रिति करी जनिं सद्गुरू तो ४१
आहेत बाप बहुते परि तापकारी ॥ माता तसी रमविती नच हीतकारी ॥
वीर्यें करोनि निपजे तनु तो स्व पीता ॥ जो पालना करितसे जगिं तोहि पीता ४२
राखीत संकटिं बरा तनुलागिं पीता ॥ शास्त्रार्थता परि खरा गुरु एक पीता ॥
मातेकुशीहुनि निघे मग मूल बोले ॥ ठेवीत नाम बरवें शिकवीत झोले ॥४३॥
वाढे तदा पढविती घरदार नीती ॥ माझें तुझें परकि भाव द्विवीध नीती ॥
मायेंत गुंतुनि जरीं घरिं मूल राहे ॥ तो शाहणा बहु प्रितीवरि त्याच राहे ॥४४॥

झाला जरीं अव गुणी मग त्या छळीती ॥ ऐशास बाप पण तें नच होत रीती ॥
जों पोटिं येई दिनता करि शांत चित्त ॥ कैसा असो परि प्रिती न तसी जिवित्ता ४५.

( भुजंगप्रयात. )

पिता सद्गुरु माय तेची खरी हो ॥ सदां सूखवी शांति दे भावनीं हो ॥
करीं बोध तो शोध दावी तनूचा ॥ समाधान बाणें खुणें अंतरींचा ॥ ४६ ॥
तया संग योगें मती शांत येई ॥ अभीमान तूटे जडे लीनताही ॥
परी शोधुनी सद्गुरू ओळखावा ॥ परिक्षेविणा नाहिं हा हो सुखावा ४७ ॥

( वसंततिलका. )

याहो भवीं गुरु घरोंघरिं राबताती ॥ शिष्या नसे गणितते बहु बोडिताती ॥
नाहीं अशांत गति गा उलटी फजीती ॥ संसार सांडुनि फुका जनिं हीन होती४८

( भुजंगप्रयात. )

गुरूबापतोची जनीं राम दावी ॥ विसावा जडे या भवीं हाच भावी ॥
जयाच्या गुणें भ्रांतिचा नाश होणें ॥ तयाहूनि ईशा नसे थोर होणें ॥ ४९ ॥

( वसंततिलका. )

अंतीं सुखा भरंसा सजणें समाधी ॥ हीची जना कळत ना निजबोध बांधी ॥
संताप शांत करि रे मनिं तूं अनंता ॥ ठेवूं नको किमपि तूं भवपाश चींता ॥५०॥

---

## ३ मनो बोध.

( वसंततिलका. )

संतोषकारक मना गित राम गायीं ॥ स्त्रानंद भाव उपजे सहजें उपायीं ॥
माया भ्रमें भ्रमुनियां बुडसी उगा तूं ॥ पाहे तुझें तुचि बरें सकळीक हेतू ॥ १ ॥
रामाविणें नच दुजा तुज कोण तारी ॥ संसारसागरिं मती बहु दुःख कारी ॥
कांतासुतादि पर गा नच देहसंगीं ॥ अंती न येति कवणी मरणाप्रसंगीं २
मायाभ्रमें भ्रमु नको नरदेह संगें ॥ मोहाब्धि हा नच उतार कदां न भंगे ॥
जाणोनि प्रेम प्रितिनें हरि बोलवाचे ॥ निंदा नको स्तुति तसी नर भाव वाचे ३
काया पुरी रचिलिसे विधिनें सुकाळीं ॥ साचीच दुर्लभ भुमीवरि ही नवाळी ॥
कार्यार्थ हा अवगमे सकळीक योगें ॥ येथोनि जन्म मरणें चुकणेचि बाणें ४

ज्ञानोपदेश तनुसा नर भाव मानें ॥ सर्वार्थ साह्य असती करि त्यास जाणे ॥
अर्थांत अर्थ परमार्थ स्वकीय काजीं ॥ भोवें करूनि रघुला मुखि नित्य गाजी ५
निद्रा अहार सुरतादिक सर्व भावो ॥ सर्वांतरीं वसतिगा चर रंग ठावो ॥
सर्वास ज्ञानविषयीं स्वपर्णीच साजे ॥ सूटे नची किमपि हें भवभ्रांति वोझें ६
कां व्यर्थ काळ असला फुकटे बसाचा ॥ वायां गमाविसि मना वद राम वाचा ॥
कामारि राम जपतां समभाव झाला ॥ वेदांत वाक्य मतही रघुवीर बोला ७
भक्ती धरी मन तुवां हरिनामठायीं ॥ जोडे बरी सदनिती उरें ये उपायीं ॥
आनंदकार स्वरुपाव समोघ ओघीं ॥ जीवा शिवा समपणा मग ऐक्यरंगीं ८
झालीच पावन तनू सकळीक कर्में ॥ भक्ती घडे नवविधी समभाव वर्में ॥
जीरे अभीमति पदीं लिन भाव भूती ॥ कर्में तदां न घडती द्विविधा विभूती ९
गूणावभावस्वरुपीं सकळीक ठायीं ॥ वागे मती गुणगतीं अधिकाव भावी ॥
कर्में करी मन तसीं गति आद्य रूपें ॥ जीरे नची मिपण हें कवण्याहि रूपें १०

( इंद्रवज्रा. )

कर्में टळाया कलिमाजिं भावों ॥ भक्तीच या राघवनामिं भावो ॥
शांती रूनाला जडते प्रसंगीं ॥ गीतार्थ ध्यानीं जडतां निजांगीं ॥ ११ ॥

( वसंततिलका. )

वन्हीच रामरुप हें अवभाव जाळी ॥ ज्ञानोदयें उदित हा लिनतावकाळीं ॥
जैसी तृणें सकळही वनिं दग्ध होतीं ॥ उष्णवकाळ समयीं सकळीक जाती १२
उष्णावकाळ स्वरुपीं समज्ञान भावो ॥ वन्ही हरी गुणालिला नववीध ठावो ॥
चेतेल लिंगवदन स्थुळ काननातें ॥ होईल भस्म सकळी गुणग्राम नातें १३
जाणोन हें सकाळि घे मन आत्म ठायीं ॥ वागे सतीरुप तुवा हरिगुण गायीं ॥
प्रेमें करोनि जगतां मधिं सौख्य घेई ॥ सर्वांतरि हरि असे धरि भाव गेहीं १४
नाना तरा करुनियां मतिलें रमाया ॥ गीतार्थ गाणिं कविता हरिभाव माया ॥
काया पुनीत स्मरतां नित ही अनंती ॥ वीनति ही जग हरी प्रति मानुनी ती १५

## ४ बोध.

( भुजंगप्रयात. )

अगा देवराया दयाळा महंता ॥ नसे पार तो जाणणें ती अहंता ॥
गुणातीत तूं नीत ना प्रीत कांहीं ॥ रुपा अग्निच्या बाधते शीत कांहीं १

तुला रूपता आणणें काय वाचे ॥ उगां खेळ हे गूण भावीं भवाचे ॥
परी सत्य येथें असे एक नातें ॥ तुझा भाव तो जाणणें त्या अनाथें ॥ २ ॥
अनाथाविणा नाथ तूं नाच येसी ॥ विना मोहता पारकी ना दयेसी ॥
सनाथा अनाथीं अनर्था चुकाया ॥ स्वबोधान्वयें त्यास देसी सुखाया ॥३॥

( इंद्रवज्रा. )

संताप हारे मग संत होई ॥ संताप हारे दिन तान होही ॥
संताप आहे तव संत नाहीं ॥ संतापता कारण यांत नाहीं ॥ ४ ॥
कर्में गुणाच्या रिति मानिं होती ॥ येथें अहं आकृति ठाव देती ॥
जेथें अभीमान मनास आहे ॥ दुःखासि हें कारण सत्य आहे ॥ ५ ॥

( भुजंगप्रयात. )

जनीं कर्म योगें वडे यातनाते ॥ तनू प्राप्त हें सत्यची कर्म नातें ॥
जनीं कर्म वीणा घडेना तनू ही ॥ असें भोग व्यापीं मुळीं तो मनूही ॥६॥
गुणातीत तो मीत ठावो स्वदेवो ॥ वदे अंतरीं व्यापुनी तोचि देवो ॥
परि हा अहंकार कारास ठावो ॥ करी जन्म मृत्यू नसे साम्य ठावो ॥७
तनू ठाव सूखा स्वरूपान्वयानें ॥ परि नासिलें काम्यतेच्या वयानें ॥
अहंभाव स्फूरे कळेनाच मी हा ॥ अभीमान तापे रुपाळाच मी हा ॥ ८ ॥
अभीमान अंगीं जया मानवाच्या ॥ असोनी फुका या जगीं व्यर्थ वाचा ॥
पशूहूनि हाची अधिका गुणानें ॥ तमानें तपे हो रजाच्या मनानें ॥ ९ ॥
नरा मानवाची तनू फार भाग्यें ॥ मिळे सत्यची नाडली या अभाग्ये ॥
भुलोनी मदा नाडला लोक सारा ॥ मनीं मानुनी वीपर्यी सूखसारा ॥ १० ॥
सदां द्वैत भावो सखे आणि दूजें ॥ अशा मानसाला मतीला वदू जे ॥
सदां ऐक्य भावा जया आप दूजें ॥ नसे त्याचि भावा वदू नाचि दूजें ॥ ११

( इंद्रवज्रा. )

झाला समाधान मनामधीं जो ॥ ओढी नसे त्या सम ऊर्ध्वी जो ॥
योगी असे भावत नामयाचें ॥ नाहीं अशाला भय त्या यमाचें ॥ १२ ॥

( भुजंगप्रयात. )

नसे व्याप माया जया मानसाला ॥ तया वीषयाषा कशाला मसाला ॥
स्मरेना कधीं दूसरा ईश आहे ॥ मती ज्याचि मानी जनीं ईश आहे ॥ १३ ॥

गुणातीत जो गूण व्यापीं असोनी ॥ जसा अग्नि राखेंत झाके असोनी ॥
अशाला विलोकावया देव येई ॥ परी या जनीं दृष्टिला तो न येई ॥ १४ ॥
बहु कर्मकांडीं जडे भावना ती ॥ पुढें जन्म घेण्या खरीं हींच नातीं ॥
गुणावीण ना वाढ या कर्मधर्मा ॥ घडे कर्म तें जातसे हो अधर्मा ॥ १५ ॥
अभीमानरूपा उठे ज्ञाति भावें ॥ तयामाजिं आणी दुजें सख्य भावें ॥
करी कर्म तें लौकिका वाढवाया ॥ म्हणोंही नथे येथ हो गाढवा या ॥ १६ ॥
अभीमान त्या गाढवाला न साहे ॥ जगाकारणें कष्ट तें सर्व साहे ॥
नसे चंदिचारा सदां पाठिं भारा ॥ चरे माळ भूमीं नसे तो उभारा ॥ १७ ॥
परासाठिं देहो कसे गाढवाचा ॥ मती भाव या व्यर्थ रे गाढवाचा ॥
मरावें खरें जाणुनीं भूलतो हा ॥ पतंगू दिपीं पोळतो भाव तो हा ॥ १८ ॥
नराचें जिणें येथ तें काय जादा ॥ सदा दंभ ताठा वसे हाचि जादा ॥
अभीमान जाई तरी देह जादा ॥ तयाहूनि ना देव तो सत्य जादा ॥ १९ ॥
अभीमान गेला तया लीनता ये ॥ सखा भाव भावोनियां ईशता ये ॥
सदां संत शांतीप्रती भाविताती ॥ निती वैदिकी जे अभीमानता ती ॥ २० ॥
पडे वेद चारी चढे थोर मानीं ॥ कळेना कसें बोलिलें वेदमानीं ॥
जसी कन्यका पीतये पाळीयेली ॥ वरा हस्तकीं ना दिली वाढियेली ॥ २१ ॥
तदां शाप देयी सभोगाकरीतां ॥ तसा अर्थ वीणा नफा ना करीतां ॥
जरी वेदवाणी अनूभाव भावी ॥ पुढें ना पडे या भवीं हो अभावीं ॥ २२ ॥
वदे वेद कर्मा तसें ज्ञान योगा ॥ घडेना कलीमाजि हा सांग योगा ॥
रुपा अंत ना पार या माधवाच्या ॥ असें वेद बोले मुखानें स्ववाचा ॥ २३ ॥
क्षरा पासुनी अक्षरा ठाव झाला ॥ असे जाणि त्यांचा सकामू विझाला ॥
रुपा पासुनी शब्द वाणी रुपानें ॥ जसीं वृक्ष लत्ते ऋतूमानिं पानें ॥ २४ ॥
तरू पल्लवाच्या रुपें शांत राहे ॥ मुळीं तापता त्याजला अंत राहे ॥
मुखानें जरी कोवळी येई वाणी ॥ तया शांतिची ती मिळे हो नवाणी ॥ २५ ॥
सदां प्रेम भावो जडाया उपावो ॥ गुरुभक्तिचा सर्व हाजी प्रभावो ॥
गुरू साच आहे परी नेत्र नाहीं ॥ भुलोनी मदें भोगितो यातना ही ॥ २६ ॥
मुळीं मूढ खासा परी ज्ञानि थोडा ॥ अशाच्या रुपा लेख्यता अर्थ थोडा ॥
जदा मानना [illegible] शोध व्हावा ॥ तयाचा अजी [illegible] भाव व्हावा ॥ २७ ॥

समाधानिसाठीं जडे संतवासा ॥ मळीना कृती त्याग हो भ्रांतिवासा ॥
तुला मार्ग दावी बरा सांधुरावो ॥ जरी त्यागिसी अंतरीचा धुरावो ॥ २८ ॥
मळोत्सर्गयोगें समाधानि बाणे ॥ तसी भ्रांति संपे गुरूबोध बाणे ॥
मळोत्सर्ग वीणा नसे देह शुद्धि ॥ स्वसूखा तसी पाहिजे गूणशुद्धि ॥ २९ ॥

( इंद्रवज्रा. )

थोडें असें हें परि भारि मोठें ॥ कल्पादिकांना करी हे हि मोठें ॥
माया आवोरी नच पार ईचा ॥ जिंकोनि घेता शुक लेख ईचा ॥ ३० ॥
बोधार्थता भागवतावतारी ॥ बाकी पुराणें समती व सारी ॥
जैसी फळें एक तरू वरी तीं ॥ कांहीं तयांती परिपक्क होतीं ॥ ३१ ॥
काहीं तसीं कोवळिंहि भराचीं ॥ टोंचीत रावो शुक पक्वतेची ॥
सर्वांवरी व्यास सुजाण योगें ॥ गुरूकृपेच्या रुपनामयोगें ॥ ३२ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

केली भागवतांतरी रुपकता त्या उत्तमाच्या रुपा ॥
शांतीचा पुतळा गुणातित असा पावे हरीच्या रुपा ॥
बाकी प्राकृत लौकिकीं सकळिकीं कर्मानुमानें जमा ॥
योगी तापसि सिद्ध म्हंत सकळी कर्तेपणा हो जमा ॥ ३३ ॥

( इंद्रवज्रा. )

जन्मोनियां मानव मायकूसीं ॥ मयिमधीं भाव तुझाच कूसीं ॥
माया परावी नच भास देयी ॥ हीची अनर्थीं बुडवी प्रवाहीं ॥ ३४ ॥

( भुजंगप्रयात )

नसे सूख कांहीं परी मानितोसी ॥ कसा नागशय्येवरी डोलतोसी ॥
फुका रे तुवां आपुला घात केला ॥ बडीशामुळें मीन तो हो भुकेला ॥ ३५ ॥
जडे रामनामीं प्रिती मात्र योगें ॥ तुझे ताप नाशारुपें याचि योगें ॥
दुजा ना नफा या तनुमाजि बापा ॥ उगां सोसिसी कां तुवां व्यर्थ तापा ३६
स्वधर्मांचि राहीं नको आणि ढोंगा ॥ सदा प्रेमवाणी मतीला जडोंगा ॥
हरीकीर्तनीं मीळणी होत बोधा ॥ मिळे मानसा सार आत्मस्वबोधा ॥ ३७ ॥
घडीनें घडीं सार्थकींही जडावी ॥ त्वरें भ्रांति बापा रुपाची उडावी ॥
बरी बुद्धि यावीषयीं ते अडावी ॥ अहंभावना यातना ते दडावी ॥ ३८ ॥

धरी बोध हा अंतरीं आदरानें ॥ नको जाउं तूं हिंडुं रूं आड रानें ॥
अनंतीं मती मानि संगा सुसंता ॥ तरापाहुनी व स्ववेदांत संता ॥३९ ॥

## हितबोध.

( वसंततिलका. )

आधीं नमी नमि गणाधिप वक्रतुंडा ॥ गौरीसुता सकिरणा सम मारतंडा ॥
देई मती हरिपदीं गुणवर्णनाला ॥ प्रेमाभरीं सदपदीं हरि दुःख काळा ॥ १ ॥
गायीं मना रघुविरा रणरंगधीरा । कोदंडपाणि शरधारीं सुखासि थारा ॥
नाहीं दुजें सुखमहीं दुसरें असें हें ॥ हेमीं सुगंध सम तें रघुनाम बा हें ॥२॥
गेले तरोनि बहु ते मुनि संत साधू ॥ बोधामृता पिउनियां नच भ्रांति बाधू ॥
जाणूनि आज परते भवभ्रांति धूनी ॥ साधीं मना तुज तुंचो धरिं हेंचि ध्यानीं ॥३॥
आत्मासमागम तनू भववासनेनें ॥ निर्माण होत सहजें बिज हेत मानें ॥
जें मानिलें मतिबळें स्थुळ देह हेतू ॥ साजें म्हणोनि जगतीत सुतादि नातू॥४॥
मोहामधीं बुडि दिली मनिवासनेनें ॥ कामादिकें दडपिलो गुणदोषमानें ॥
नाहींच आठव तदां स्वरूपात्मभावीं ॥ भावो भ्रमें जगति हे आपुली परावी ५
संसार स्वप्नवत हा गुणरूप घोरे ॥ घोरेंच जाग्रतिमधीं स्वपणा नवारें ॥
वारें भरें जगति दृश्य स्वभाव मानें ॥ मानें तसें विचरतें गुण हेतुमानें ॥६॥
कोणास कोण धणि ना गुरु नाच चेला ॥ आला तसाच वचतो पुढतीं अकेला ॥
पोटास कारण धनी गुरु तेहि पोटा ॥ शिष्यास काळाज बहु धनहतु मोठा ७
ढोंगे करूनि बहुतीं धनशोधनाला ॥ त्यागोनि देश फिरती जग भोंदण्याला ॥
पोटांत द्वैत भरलें हरि तथ कैंचा ॥ ढोंगाच सत्य बगळा तुक तोच न्हैंचा॥८॥
शास्त्रें पुराण पठणें पढलेंचि वेदा ॥ तत्रापि मान न सुटे नच देह खेदा ॥
भेदास कारण पहा मिपणा मतीचें ॥ जागोत्र मतिमधीं तव सूख कैंचे॥९॥
ज्याची गती नच कळे कवणा प्रकारें ॥ सिद्धांत मान न त्र हा गुण ज्ञानवारें ॥
शद्वें करोनि वळखी नच होई याची ॥ शद्वास ठाव रसना गुणमेव साची ॥१०॥
तोहीति य दिनिं शशी नभि दावितांना ॥ शाखा समागम खुणा अनुमान माना॥
वृक्षाहुनी बहु वरी शशिवास आहे ॥ ज्ञानेहि या रितीं जगीं अनुमान पाहे ११
आदीच नाहिं मग अंत अनंतिं कैंचा ॥ ध्यानास गोचर नसे सगुणैक वाचा ॥
व्यापार कारण गमे सकळीक खातें ॥ मूळावरी दिठिं नसे भवभ्रांती वाते १२

अंधासमोर बरवा जरि हत्ति उभा ॥ मीळे तदां जवळि तो जन अंध सूभा ॥
कोणी करें करुनियां धरितींच सोंडों ॥ आहे म्हणे मुसळ हें दुजि नाच जोडी १३
कानास हात बरवा धरुनी दुजा तो ॥ बोलेच सूप म्हणुनी मग तीसरा तो ॥
पोटास चांचपितसे मुखिं ढोल बोले ॥ पायास स्तंभ म्हणुनी चवथाहि बोले १४
हत्ती असे परि तया दिठि भाग नाहीं ॥ साक्षीरुपें अनुमतें वदतींच पाहीं ॥
याचे परी निजरितीं जग अंध आहे ॥ दृश्यावरी अनुभवें सकळीक पाहे १५
दृष्टी असेचि उलटी जग देखण्याची ॥ दूजेपणाविण प्रिती नच देहिं साची ॥
सूखास कारण दुजा मनिं मानुनीयां ॥ गेलेच वीसरुनियां स्वपणास वायां १६
मी कोण हा नकळतां भ्रमणाचि बारे ॥ वारें भरे श्रवणिं रे द्विविधा प्रकारें ॥
थारा नसे किमपि तो घरदारकारीं ॥ विद्याधनादिक कळा उदरार्थ सारीं १७
नव्हेस तूं स्थुळ वो नच लिंग देहीं ॥ तूं कारणांत नससी सद दक्ष पाहीं ॥
सर्वांस जाणत तुंचो समजूत योगें ॥ जाणीव तूंचि म्हणतां अनुमान वागे १८
आत्मा चराचरिं असे सकळीक ठायीं ॥ नाहीं दुजेंपणिं बरा सम ऐक्य ठायीं ॥
भानू जसा जगतिला नभिं एक आहे ॥ दृष्टीरुपा प्रसवितो तिच जाग्रति हे १९
भ्रांतीस मूळ गमतें गुण जाग्रती हे ॥ शांती उडे मन घुडे भ्रमकारणीं हे ॥
द्वैतास ठाव रज हा मिपणा मतींचे ॥ कर्तेपणा धरुनियां फसते फुकाचे २०
जन्मास कारण असे मुळ याचि भागीं ॥ जन्मांतरीं मति भ्रमें मग देह भोगी ॥
मणें असे स्थुळ जडा नच वासनेला॥ पुष्पासनास परि तेथ सुवास ठेला २१
स्वासासमान मन मान जनांत आहे ॥ नाशास साज जगतीं नच वासना हे ॥
बीजारुपीं जगतिला मनलिंग देहो ॥ इच्छारुपें भविं असे अनुमान तें हो २२
साक्षीस या तनुमधीं बरि पाहि बापा ॥ स्वप्नामधीं मन भ्रमें उठवीत तापा ॥
स्थूळाविणें मति भ्रमें मुळ हेतु मानें ॥ दीसे तसें परि नसे जड जाग्रतीनें २३
कंदास कारण निवास सुषुप्ति पाही ॥ तेथें मुरे पुनरपी रज जाग्रती ही ॥
दीनांतरीं मन जसें भुतदीन कर्मे ॥ केलींच मागुतिं करी समधाम वर्मे २४
याचे परी तनु धरी पुनरेव पाही ॥ देहांतरीं गमनतां भ्रम हेतु पाही ॥
भिन्नाकृती भुतघटी परपंचकाची ॥ येकत्र होत सकळी नित वासनेची २५
आत्मा समागम असे सकळीच भागीं ॥ भूतामधीं जगनगीं गुण कर्मभागीं ॥
सकळीत [illegible] जे [illegible] ॥ दृश्यांत मूळ [illegible]डळी नच आर्तिम पाही २६

जारीण जैसि पतिला घरिं टाकूनीयां ॥ जारासमागमिं क्रिडा सुख मानुनीयां ॥
शांती न होय किमपी तसि बुद्धिमाया ॥ २७ ॥
आत्मा स्वकांत विसरे भवभूलिं भूले ॥ शांति नसे द्विविध तें मदकामिं फूले ॥
जारास ठाव अभिमान मनास पाहीं ॥ लुब्धे घुडे अधिं पडेनिच वासना ही॥२८॥
मूळींच द्वीगुण नटी नटली जगाला ॥ भ्रांती भेरें भ्रमतसे नच सूख भेला ॥
याचेंच नाम म्हणती बुध ते अविद्या॥ विद्या दुजी नितअसे तिनिं लोक वंद्या २९
पातिव्रतासम असे निज आत्मभागीं ॥ आत्मासमागमिं रमे अनुमोदयोगी ॥
प्रीती नसे जगनिति अभिमान गेहीं ॥ सूशील जैशि विटते परदृष्टि पाहीं॥३०॥
कांतासमान धन ना जिस आणि दूजें ॥ नाहींच जात कधिंही कुळदेव पूजे ॥
प्रीतीच एक पतिची सतिची रिती ही॥ भाग्यें करोनि मिळणी असली जगी ही३१
ईचेपरी सुजनि ही निजबुद्धि कांता ॥ शांती करीत वनितेहुनिही कवीता ॥
गीतांतरी नित असे पतिसंगमाची ॥ आत्मा अनुभव जया प्रिति योग्य त्याची३२
कीर्ती पतीची सति ऐकुनि सूख मानी ॥ ध्यानीं मनीं पतिविणा दुसरा न मानी
गोष्टी रुचे नच दुजी पतिवीण आणी ॥ कानीं पडे रव इचा अघनाश खाणी॥३३
तारी पती पितरही उभया तटींचे ॥ कांता जरी शुचि असे इहवर्णनाचें ॥
संसारसार सकळी मग त्या अतारा ॥ तारापती धर भला वरदानिं थारा ॥३४॥
बाकी स्त्रिया अघपुरीं पति घालण्याला ॥ द्वेषामुळें फणि धृती कुटणी भवाला॥
बोली रुचीकर भली परि आंत खोली॥कात्रीचधात्रिवरि हे घरभंगबोली ॥३५॥
हांसे बहु घडिघडीं पर पाहुनीयां ॥ मोडीत नेत्र बरवे चळ झांकि काया ॥
तोऱ्यांत चाल चलते चहूंभागिदृष्टी ॥ सृष्टींत नाड गमते हिचि पापिदृष्टी ॥३६
नीजे परा घरिं सदां जगप्रीत मोठी ॥ कांतास खंतिकरवी शरशद्ब ओंठी ॥
कोठो हरीचि बरवी अघखाणि हेची॥भोगास कारण प्रपंच विघडी विधीची॥३७
सीनाल तीच पतिला बहु गोड बोले ॥ चाले छळे करि बळें तनुभागिंलोले ॥
सारें वरी उरि परीं रत झालि आहे ॥ बा हेचि लाव समजे कधि सूख नोहे॥३८
लंडास भंड मिळतां मग दंड कैंचा ॥ जैशास तैसि रचिली मतिहीच नीचा ॥
शास्त्रें बहू पढुनियां जरि द्वैत बुद्धी ॥ आत्मा नसे मग तया पुनरेव सिद्धी ॥३९
भ्रांतीच सार सकळी जननीतिवासा ॥ स्वासास नाश करितो सद्बोधवासा ॥
त्रासासमीट सम हो तनुमाजि आतां ॥ गायी कथा वदनिं तूं हरिगूणगीता ॥४०

रामासमान नच मान जगांत कोणी ॥ रामासमान मन तूं रम गीत वाणीं ॥
खाणी निजाचि तुजला बरि दाखवी हा ॥ भावावरी रिज असे नववीध गेहा ४१
बुद्धी जडों रघुवरी पति जेवि कांता ॥ प्रीती असों भवभुती सुतिं जेविं माता ॥
ताता सरी जगभुतें सकळीक मानी ॥ नीती वसों सद बरी हित बोध ध्यानीं ४२
आत्मा जगास रघुराज सितापती हा ॥ संताप शांत शमतो वरि दे निती हा ॥
संतास जा शरण तूं गुज दाविती ते ॥ चित्तीं धरी प्रिति मनीं निज सेवनातें ॥ ४३ ॥
साधूस बोध समता नुरुनीच ठेला ॥ कापूर जेविं जळुनी स्वपणीं मुराला ॥
भ्रांती फिटे खट नसे सकळीक जाती ॥ द्वैतास नाश करिती उजळोनि ज्योती ४४
या रीतीनें मन मनाप्रति बोधिताहे ॥ शांतीपुरीं गितमिषें मिळवीत आहे ॥
नामें अनंत सदपंथ सनाथ वाणी ॥ वाणी मना सहजची मुखसिंधु कांणी ॥ ४५

---

## नीतीबोध

(भुजंगप्रयात.)

धरीं तूं मना मानसी बोध कांहीं ॥ फुका कासया यातना नाश देहीं ॥
नको कोळसा सारवूं आननाला ॥ मना नाशका कामना नाममाला ॥ १ ॥
दया यावया या युगीं गीत गायीं ॥ तया यादवा वाणि तूं तुतें भायी ॥
भरे रे गड्या डाव तो तोलमानें ॥ तुवां वास घे घेतला लाभ मानें ॥ २ ॥
नको वीषयीं गुंतुनी देह नासू ॥ नको संगती वाउगीं तोंड वासूं ॥
करी काम धामें जमाबंदि पाहे ॥ मना त्यांतुनी मानसी राम राहे ॥ ३ ॥
बरी युक्ति ही सांगतों तूजलागीं ॥ धरी पोटिं ही आदरें आत्मभागीं ॥
नको जाऊं राना जपाला तपाला ॥ सुखें राहि बापा जपे राममाला ॥ ४ ॥
कली मार्जि रे कीर्तनीं सार आहे ॥ मुखें राम गायी तरी सूख आहे ॥
बहू शोधितां शोध नाहीं कदांपी ॥ अभीमान बापा उगा देहधांपी ॥ ५ ॥
धनालागिं सारे जनाचे तमासे ॥ जसें ज्यासि भासे करीं तोचि तैसें ॥
अभीमान हा मानसा खेदकारी ॥ नसे सार्थकीं हा सदां लोकचारी ॥ ६ ॥
मना दृश्य हें नष्ट होणार आहे ॥ बहू दाखले प्रत्यहीं घेई वा हे ॥
दिसे तेंचि नासे नसे शाश्वतीनें ॥ फुका मोहबंधीं नसे सूख त्यानें ॥ ७ ॥
जसी इंगळ्याची बरी सेज केली ॥ नसे झोंप ती ताप अंगासि जाळी ॥
सदा काम जागा दगा देत आहे ॥ मदामार्जि घोळे शुची वास नोहे ॥ ८ ॥

तनू पोसि सूखें करी काम धंदे ॥ धना मीळवी संसृती शोध बोधें ॥
सदां आननीं राम वाणी वदावी ॥ प्रिती भाव ठेवी तुटो दुःख गोवी ॥ ९ ॥
कसा काळ हा नेणवे अंतकाळीं ॥ लिहीलें असें वीधिनें जेंचि भाळीं ॥
बरें यासि टाळी असा कोणि नाहीं ॥ अनूमान सारा भ्रमे स्थूळ देहीं ॥ १० ॥
नसे चीरकाळीं जिवा वास येथें ॥ घडे तोंचि मोडे कसें यासिनातें ॥
परी मोहजाळें मना गोंवुनीयां ॥ भ्रमाला मिळे वासना हेचि माया ॥ ११ ॥
सिताकांत एकांतवासीं स्मरावा ॥ सदां शांति पोटीं जडों देहभावा ॥
बरी संगती सज्जनाची रुचों दे ॥ नको दुर्जनीं वास मत्तां घडूं दें ॥ १२ ॥
जसी संगती जोडते साचि खोटी ॥ जडे देहिं ती आवडीचेनि गोठीं ॥
जनीं वागतो देह हा याचि मानें ॥ बरें शोधि तूं मानसा सत्यमानें ॥ १३ ॥
नसे सिद्धिमानें नसे रिद्धिमानें ॥ नसे योगमानें नसे भोगमानें ॥
जपें कर्म सांगें समाधान नाहीं ॥ समाधानिला वास संतींच पाही ॥ १४ ॥
खऱ्या बोलण्यासारिखें पुण्य नाहीं ॥ मुखीं वाणि खोटी घडे पाप देहीं ॥
नको द्वेष निंदा कदां दूसऱ्याची ॥ निचाहून वाणी बहू नीच हीची ॥ १५ ॥
बरा कामधंद्यामधीं वेळ सारा ॥ गमावूनि फूका नसे शांति वारा ॥
समाधानि नाहीं कदां देहभागीं ॥ सदां गुंतलें चित्त हें भोगभागीं ॥ १६ ॥
दिसे भोग तो रोग होतो पुढें रे ॥ तनूलागि ग्रासी सदां क्रोध वा रे ॥
तनूमाजिं हा काम अग्नीरुपानें ॥ वरी क्रोध हाही असे वायुमानें ॥ १७ ॥
कदां काष्टभारें नसे शांत वन्ही ॥ करी राख तो जाळुनी सर्व धूनी ॥
असे वायु साह्यीं बरा चेतवीतो ॥ तयाचे रितीं कामि गा क्रोध येतो ॥ १८ ॥
बरें काम ऊठे मनालागिं जेव्हां ॥ परीपूर्ण होतां सुखा वास तेव्हां ॥
जरी पूर्ण नाहीं पुढें दुःख वाटे ॥ अभीमान योगें घरीं क्रोध दाटे ॥ १९ ॥
नको ढोंग मांडू नको सोंग कांहीं ॥ सुखें काळ घाली वदे राम गेहीं ॥
हटाच्या तटा कां जटा वाढवीसी ॥ निशीमाजिं स्वप्नी बहू ओसणेसी ॥२०॥
जनीं सूख तें शोधिल्यावीण नाहीं ॥ विचारी मती शोध घे याच देहीं ॥
विचाराविणें सार तें आणि नाहीं ॥ जगीं धुंडितां धुंडितां शीण गेहीं ॥ २१ ॥
विचाराकरें चित्त हें वोळवावें ॥ जसें दुग्ध अग्नीसवें ओळवावें ॥
मना आळितां आळितां बोध होतो ॥ पयापासुनी होतसेची खवा तो ॥२२॥

जनीं शोधितां सार तें नाम आहे ॥ मुखें वर्णितां कष्ट कांहींच नोहे ॥
जयापासुनी पूरती सर्व कोडें ॥ परी नाहिं रे येत हें वाच्य तोंडें ॥ २३ ॥
जयाच्यानियोगें पदीं सिद्धि दासी ॥ बऱ्या बोलती ह्या कळेना जनासी ॥
फुकां जोडते ती घरीं कामधेनू ॥ अजा पाळठी घेतली हाचि मानू ॥ २४ ॥
बरी राघवीं लाघवी वागवावी ॥ प्रिती आदरें रामवाणी वदावी ॥
जनीं लीनमानें असों वागणूकी ॥ घरीं संगती सज्जनीं होय सूखी ॥ २५ ॥
नको यातना मानसीं येऊं देऊं ॥ तुला नाडि रे अंध हा घात घेऊं ॥
तमानें गमेना तुला तो विसावा ॥ जसा अंधकारीं नसे दृश्य ठेवा ॥ २६ ॥
उरीं वासना नांदते सौभरानें ॥ शिरीं जाळिते द्वैतरूपानुमानें ॥
धनें गोधनें शोधनी काळ गेला ॥ परी रीत ही रीजली ना तनूला ॥ २७ ॥
सखा खास नाना प्रकारी दुजा तो ॥ तुला वाटतो प्रीतिचा आप्त जो तो ॥
दुजा सूख देई असें जें वदावें ॥ भ्रमा मध्यभागीं तयाला गणावें ॥ २८ ॥
अभीमान सोडी तुवां बोध जोडी ॥ गडी दीननाथा करी प्रेम गोडी ॥
नरी हीच जोडी तनूमाजिं जोडे ॥ घडे तोचि आनंद भोगीत पुढें ॥ २९ ॥
नसे ज्ञाति गोडीं रघुराजयाला ॥ अजाती असे वास याचा मुक्काला ॥
दिनाचा सखा सोयरा सज्जनाचा ॥ प्रितीं आठवी मंत्र हा शंकराचा ॥ ३० ॥
सदाचार रीतीं जगीं वाग बापा ॥ स्वधर्मेंचि राहें हरी देह तापा ॥
नफा नाच तोटा नसे सान मोठा ॥ नभांमाजिं भूतीं असे एक वाटा ॥ ३१ ॥
करी निश्चयो शाश्वताचा बरा तो ॥ कसा काळ हा जाणणें शोधनीं तो ॥
मदामाजिं राजी कशी बुद्धि झाली ॥ कळेना तुला आपुली ठेव भूली ॥ ३२ ॥
करूणास्वरानें हरी आठवावा ॥ मनीं प्रेम छंदें गितीं नित्य गावा ॥
जनाचें उणें काढणें काम नाहीं ॥ तुझें तूंचि पाहे भवीं शोध घेई ॥ ३३ ॥
उगीं चावडीं बाळटीं माजवूनी ॥ नको तूं बसूं निंदका संन्निधानीं ॥
बहू आळसी ना रुचे कामधंदा ॥ उगां चावुटी वाउगी द्वेष निंदा ॥ ३४ ॥
पराचं बरें देखुनी दुःख होतें ॥ दुजा क्लेश तें पाहुनी सूख मोठें ॥
न जाणें कदा कीर्तना कीं पुराणा ॥ बरा डाव मांडी हंसे खेळतांना ॥ ३५ ॥
गमावूं नको ही जमा पूर्व ठेवी ॥ तनू मानवी भक्तिभावांत गोवी ॥
कुल्दाचार हा कायदा संसृतीचा ॥ जमा वाढली वासना नाश ईचा ॥ ३६ ॥

मना जाग्रती वीषया चाळवीती ॥ असे ही मती द्वैतमानें जगांतीं ॥
धनाच्या भरानें सदां लाल डोळे ॥ बळें दुःख देई दीना अन्न मीळे ॥३७॥
पळारे पळा काळ हा आवळी गा ॥ कळा कूसरी जाणता नाहिं तो गा ॥
दगा कां उगा वावुगा सोसितोसी ॥ जपे राममंत्रा मनीं येम तोषी ॥ ३८ ॥
कळोनी वळेना जरीं बुद्धि देहीं ॥ तयासारिखा अंधळा कोणि नाहीं ॥
नसे ज्ञान ज्याला भला एक मार्गी ॥ गती ना चळे स्थूळ देहींच वर्गी ॥३९॥
हरीसारिखा थोर तो नाहीं दूजा ॥ परी राम नामावरी मान साजा ॥
अरी काम तो जाळिलासे जयानें ॥ प्रतापी असा राम हा योग्यमानें ॥ ४० ॥
गिरींवास केला उमानाथयाणें ॥ जगापासुनी राहिले दूर मानें ॥
असे साधिला पूर्ण बोधू जयानें ॥ असा ना दुजा थोर गा भक्तिमानें ॥४१ ॥
उमेलागिं जोगी कथा सांगताहे ॥ महीमा मुखें वर्णितां तोषताहे ॥
जयालागिं स्वानंद आनंद पोटीं ॥ तयापासुनी राम हा येत ओठीं ॥ ४२ ॥
बहू झोंप घेतां तमालागिं मीळे ॥ तसे व्यापिल्या नास्तिकीं चित्त घोळे ॥
मळीमानसी द्वैत भावें भरे ती ॥ तनूची फुकां केलिसे याणिं माती ॥ ४३ ॥
जगीं सूख देता दुजा कोण नाहीं ॥ रघूराज यावांचुनी आणि पाहीं ॥
दिनाचा दयाळू असे रामराणा ॥ सुखानें मुखें याजला कां न गानां ॥ ४४ ।
प्रभातें उठोनी मुखें रामवाणी ॥ अती आदरें प्रेमभावें करोनी ॥
पदें छंद गीतीं बहू आळवावा ॥ मनीं शोधनीं हेत अर्थीं धरावा ॥ ४५ ॥
करीतां घरीं कामधंदे करानें ॥ हरी बोल बापा बरा तूं मुखानें ॥
मनानें कदां वाउगें तें नसावें ॥ अनूभावनी चित्त गोंवीत जावें ॥ ४६ ॥
रिकामी मना राखितां फार धंदे ॥ करी आपसा माजिं ते छंद वादे ॥
असें फार तें पार नाहीं तयाला ॥ भुताचे कृती वासने वास झाला ॥ ४७ ॥
म्हणोनी हरी पायिं ही प्रीत ठेवी ॥ प्रिती भावनेपासुनी ऐक्य भावी ॥
दुजें जें दिसे तें पिसे सोड बापा ॥ चुको यातना संसृती दुःखतापा ॥ ४८ ॥
असो ध्यास विश्वास हा राम नामीं ॥ जसें गुंततें चित्त हें दृश्यकामीं ॥
जरीं राघवीं आदरानें जडे हें ॥ पुढें सूखसिंधूच ओघीं बुडे हें ॥ ४९ ॥
हरे राम हा मंत्र वाचे कडोनी ॥ मना गायि तूं बोध भागीं घडोनी ॥
नडी तोडि साऱ्या अरीकूळ नासी ॥ घरीं वैस सूखें नको जाउं काशी ५०

नफा कोणता कोण मार्गे करावा ॥ बरा शोध याचा मनीं लाववावा ॥
मना अंतकाळीं सुखा ठाव होतो ॥ तयाला नभा बोलणें मान हो तो ५१
मदें गोंवुनीं मोहजाळीं पडावें ॥ सदां द्वैतभावा मनीं ऊठवावें ॥
बहू वार घाली अरी कामअंगीं ॥ बहू दुःख मोठें घडे देहभागीं ॥ ५२ ॥
असो वास देहीं सुखाचाचि पाहीं ॥ मना मानणें दुःख हें व्यर्थ देहीं ॥
जसें मानणें भोगणें त्याच रूपीं ॥ म्हणोनी सुखा मानणें आत्मरूपीं ५३
नको बोलि ती चावटी सोडि पाहे ॥ नसे कांहीं तेथें तुला सूख पाहे ॥
बहू हांसणें सांगतां गोष्टि मूखें ॥ करी गोष्टि त्या लोक निंदाचि सूखें ५४
टवाळीविणा चैन ना ज्यास गेहीं ॥ तया सूख कैचें मनीं बोध नाहीं ॥
दिसेना कदां कोण मी काय आहे ॥ नसे बुद्धि देहीं सदां बाह्य पाहे ५५
अजीं शोध लावीं मना आपुला तूं ॥ नको दुःखरूपें उगां येथ कुंथूं ॥
नसे ताई काका तुला मामि मामा ॥ उगा मोह हा लागलासे रिकामा ५६
करी हीचि संध्या बरी साधी संधी ॥ घडी तोडवी संसृती पाश बंदी ॥
नको नंदिसा या तनूमाजिं राहूं ॥ मना सार्थकीं काय तें आजि पाहूं ५७
जगीं पाहतां देव तो ग्रामग्रामीं ॥ बहू देउळें पूजिलें राजकामीं ॥
सदां दर्शनें घेउनी जन्म गेला ॥ परी चित्तिचा ताप तो नाहिं गेला ५८
मुलाकारणें देव तो आंगवीला ॥ परी दादला पाहिजे आधीं केला ॥
भ्रमानें भ्रमें चित्त फूका रिकामें ॥ विधी लेख मीठी असीं नाहिं कामें ५९
जसा भाव पोटीं तसा देव होतो ॥ म्हणोनी तुला भाव हा पाहिजे तो ॥
जरी भाव योगें वसें भक्ति पोटीं ॥ नसे कांहिं तोटा वदे राम ओठीं ॥ ६० ॥
हरीदास आशा वरी पूरवीता ॥ बरा संकटीं सेवका साह्य होता ॥
असा ना दुजा मानसा आठवे तो ॥ म्हणोनी वदावा मुखें राम गातो ॥६१॥
नको मानसा बोलिंया वीट मानू ॥ अती आदरें साधि तूं राम ध्यानू ॥
मनाला मवाळी रवांची नवाळी ॥ हरा कंठिचें वीष तें नाम टाळी ॥ ६२ ॥
सदां दास भागीं सितानाथ वागे ॥ कनूवाळता अंगि ज्या फार वागे ॥
बरा दास गेहीं करी सर्व कामें ॥ बहू गोडिं ती दास दास्यत्व कामें ॥ ६३ ॥
धनानें सुतानें बरा तोपवी हा ॥ परी भाव येथें बरा पाहिजे हा ॥
एकभावें हरीभक्ति होयी ॥ तया नाहिं ऊणें कदां देहगेहीं ॥ ६४ ॥

अजी साव होयी धरी राम पायीं ॥ असे शांति ते याच पायीं नवाई ॥
परी लीनता पाहिजे मूळ अंगीं ॥ वसे त्या वरी नम्रता देहभागीं ॥ ६५ ॥
जगीं नम्र झाला तई देव भेटी ॥ खरी झालि रे पूर्व योगेंसुगाठी ॥
जमा संति झाली तमा टाळितांना ॥ वमा काम मामा हरा क्रोध नाना ॥६६
सखाराम झाला जया देह अंगीं ॥ तयालागिं झाली सुखाचाचि सूगी ॥
बरा मानसी शांत होतो जनी रे ॥ बहू दाखले या युगीं ऐंकिले रे ॥ ६७ ॥
मना आमना कारणी राम वाणी ॥ गमे मुक्ति देहीं सुखाला न वाणी ॥
जडा देह भागीं नराची कमायी ॥ तरा या उपावो असे राम पाहीं ॥ ६८ ॥
करावें बरें आजि हें हीत भूमी ॥ तरी स्वार्थ झाला खरा देहग्रामीं ॥
पराला धरावे दिनीं रात्र पोटीं ॥ करा तांतडी फंद कामासि तूटी ॥ ६९ ॥
असा साम धामीं मनीं प्रेम ठेवी ॥ जगीं सर्व लोकीं समीं बुद्धि गोवी ॥
नको गर्व अंगीं दगा हाचि जाणें ॥ सडा राहिवा चूकवी दुःख पेणें ॥ ७० ॥
घरीं सूख आहे अशा हो रितीनें ॥ वनीं कांहीं नाहीं जरी बुद्धि सूने ॥
असें कारणीं बुद्धि आधीं बरी हे ॥ जरी भक्ति लाहे तरी सौख्य पाहे ॥७१ ॥
करी काम सारें घराचें सुखानें ॥ कुटुंबासि पोसी बहू शांत मानें ॥
परी मानि चित्ती धनी राम हा हे ॥ तयाचेनि सत्ते मला काम आहे ॥ ७२ ॥
नको मी पणा मानु तूं माणसाला ॥ तुला घातकी हेंचि होतें सुखाला ॥
कशाला फुगा वाउगा संसृतीचा ॥ नसे शाश्वती वास याहो तनूचा ॥ ७३ ॥
मदाचानियोगें सदा तांठ डोळें ॥ दमा मांजि गा रात्र दीनी मवाळे ॥
भला गर्वयोगें जगीं वागतोसी ॥ परी कोण मी हा मनी नेणतोसी ॥ ७४ ॥
अमोली तनू तोलसी का धनाला ॥ तनू सारिखे थोर ना द्रव्यमोला ॥
जयाचे नियोगें रघूराज जोडे ॥ तयालागिं कां तोलसी धेनु घोडे ॥ ७५ ॥
घरी शेति ऐशा रितीनें करावी ॥ बरी सोय जीवें मनीं वागवावीं ॥
हरीनाम धंदा बरा सौख्य दाता ॥ दुजा या पुढें साम्यते नाहीं येतां ॥ ७६ ॥
पराही भुमी देहग्रामी असे हो ॥ पिके सर्व येती बिजाचें रुपें हो ॥
परी पीक खासा बरें एक होतें ॥ समाधानि शांती घडे वासनेतें ॥ ७७ ।
भुमी पाहिजे आधिं ही शुद्ध केली ॥ मदाची असें बिंबली येथ ओली ॥
अभीमान धोंडी असें थोर मोठी ॥ तशा कामझाली मुळें वाट आटी ॥ ७८ ।

असे मालकी वासनेचीच शेती ॥ तिचे संगति चौधुरी अन्य जाती ॥
धनी बायको बुद्धिची जाण पिसी ॥ पराधीन वागे सदांची उदासी ॥ ७९ ॥
तुला तोषवाया विवेकासि गांठीं ॥ तयाचेनि योगें बरी होय गांठी ॥
बरा वास नेला असे हाचि मंत्री ॥ तुला बोधुनी साधि ही येथ धात्री ॥८०॥
बरा फाळ जुंपी भुमी फोडि सारी ॥ पुरुषार्थ योगें करावीं तयारी ॥
गडी बोध हा राहु द्यावा घरीं हो ॥ इमानी असे आत्म सख्यत्व या हो ॥ ८१ ॥
मदादीक सारे दुरी ठेवि चित्ता ॥ भुमीभागिं कांहीं नको यांचि सत्ता ॥
असी शुद्ध झाल्यापुढें बीज पेरी ॥ गुरूसाक्षिनें रामनामें उदारीं ॥ ८२ ॥
पुढे मेघ स्वानंद आनंद योगें ॥ पडे बीजभागीं सुवाचानुरागें ॥
अनूमान भावें तदां शेत वाढे ॥ वरी भक्तिचा घालि माळा पवाडे ॥ ८३ ॥
कुतर्कास हांकी त्वरा येथ राखी ॥ उठाठेव पक्षी तनू वृक्ष सीखीं ॥
विकल्पासि कल्पीत संकल्प योगें ॥ कुटुंबी बहू वाढला भ्रांतिभोगें ॥ ८४ ॥
खराबी करी शेत नासी दुधाचें ॥ सबोधामृतामाजि रे शांति साचे ॥
बसे शेतभागीं हरीभाव धान्या ॥ तुला नागवी हा वसें लोकमान्या ॥८५॥
म्हणोनी असो सावधानी मतीला ॥ बरा भक्तिठायीं असो वास तूला ॥
असे जाग्रतीमाजि हें काम गेहीं ॥ करीसी तरी सूख येथेंचि पाही ॥ ८६ ॥
पुढें पीक पीकें भराची सुगी रे ॥ घरीं आणि सारे सुखाचे पुरी रे ॥
समाधानि बाणे मिळे बोध नाणें ॥ सुखी इष्टमित्रा करी भोजनानें ॥ ८७ ॥
करी शेति ऐसी तरी थोर होसी ॥ समोरा समोरी वदे देव तूंसी ॥
असें मालकी सर्व भूमीश देवो ॥ धन्याला कुळें रूचती जीवभावें ॥ ८८ ॥
जसीं खोत लोका कुळें आपुलीसी ॥ वरी वाटती जी तयालागिं पोसी ॥
तयाचे परी रामदासां मधीं तो ॥ बरे शेतकरी समीं वागवितो ॥ ८९ ॥
असे भाव भागीं खरा कुळंबि येथें ॥ कसा भाव पाहे जयालागिं शेतें ॥
घरीं साळिपीकां बरा काढिताहे ॥ परी त्या धन्याचें घरीं देत आहे ॥ ९० ॥
कदान्नासि भक्षी असे तुष्ट देहीं ॥ कुळां दंड नाहीं कदां राजगेहीं ॥
कदा किर्द खातें नसे तें हुजूरीं ॥ कुळा खोत मोठा कसे कष्टचारी ॥९१॥
हरीदासही याच रीतीं हरीला ॥ बरा खोत हा जी जपे भक्तिकूळा ॥
कदां येम बाकी हरी दासि नाहीं ॥ असा वेदसूभा वदेचत्वगेहीं ॥ ९२ ॥

नडी सोसितो दास गेहीं हरी तो ॥ हरी काम मोहा मतीग्रामि येतो ॥
कमावीत शेती अनूभाव युक्ती ॥ बहू मूखमार्गें वदे नित्य मुक्ती ॥९३॥
असा खास हा दास भार्गीं विभार्गीं ॥ तनू मानवी यास येथें विभागी ॥
सुगी साधितो देहकार्जीं खरा रे॥ बहू ईश इच्छी अशाला बघूं रे ॥९४॥
धुरेचे खरे भक्त हे या तरेचे ॥ परेचे भुमीं पोसले जाणिवेचे ॥
नसे थोर योगी भले संत भोगी ॥ जयालागिं सूगीं असे शांति भार्गीं ॥९५॥
वरा भाव भार्गीं हंसे भक्ति जोरा ॥ नरा संसृती तोडि हा रे अघोरा ॥
अनूभावनें तोषला देवं आधीं ॥ पुढें म्होर केली दिली ती समाधी ॥९६॥
करीसील शिका स्वबोधानुभावें ॥ मती बोध खातें रघू योग नांवें ॥
वदे संत मूखांतुनि रे हरी हा ॥ कवित्वागती चेतवी अंतरीं हा ॥९७॥
हरी गीत वाणी सुखाची नवाणी ॥ कलीच्या मळाला समूळींच धूणी ॥
गणी रे गणीता कळा दृश्य यंत्रा ॥ वदे पाद तो रे खुणे राम मंत्रा ॥९८॥
नको तूं पडूं चक्र शोधार्थ गेहीं ॥ नको योग रे जोग तो भक्तिधाहीं ॥
करी तांतडी तूं घडी साधि आधीं ॥ नको ही मना व्यर्थ माया उपाधी ॥९९॥
मना बोध हाची जया देहिं बाणे ॥ तयालागिं कांहीं नसे येथ ऊणें ॥
सदां दास हा ईश होई घरीचा ॥ सुखें दोंद वाढे सुखें आत्मनीचा ॥१००॥
असे दासभावें गती ती अनंती ॥ अनंती मती मीनलीसे अनंतीं ॥
अनंतास वाणीं अनंतानुभावें ॥ नसे अंत याहो अनंतासि ठावें ॥ १०१ ॥

## ७ मनोबोध.

( वसंततिलका वृत्त. )

ऐकें मना अमन तापद दावितों हें ॥ भ्रांती जिरों भव सरों निज कानडें हें ॥
घेई भरोनि वदनीं सुखशांति लाभो ॥ धावूं नको स्थुळमतें गुणकंद थांबो १
भांबावसी फससि तूं नच कोण तूंतें ॥ मोहाब्धिला मिळणि हे सकळीक नातें॥
स्नेहीं कशास गुतसी नच सूख कांहीं ॥ पाही मना तुज तूंचि सदुपाय गेहीं २
दूजा तुला हित करी जरिं वाटला तो ॥ दुःखासि कारण पुढां मग तोचि होतो
कामीक मानसगती बरि आवरी ही ॥ पाही मना ० ॥ ३ ॥
कर्मांवरी भरंवसा वसवी मना तूं ॥ मानूं नको सुखदुखें भ्रमणाच हेतू ॥
भोगी सुखी जड बरें धनवास नाहीं ॥ पाही ० ॥ ४ ॥

कामीक मानस नसो वनवास ह्याची ॥ कर्तेपणा बुडवितें रित सोड हेंची ॥
धांपी तुलाहि फुकटेव भ्रमांत पाही ॥ पाही ० ॥ ५ ॥
थाटे हटा नट मठा तट वाउगे ते ॥ पोटा धठा खटपटा हटयोग हीतें ॥
अंतीं जटा न सुभटा तुज तारितींही ॥ पाही ० ॥ ६ ॥
गर्वें करोनि फुगसी फससील येथें ॥ गर्वासनीं अरि असे षडरीपु खातें ॥
जातां लया असुसया मग दुःख होयी ॥ पाही ० ॥ ७ ॥
पोटांत एक वरि एक वदण्यास वाचे ॥ नाचे मनोरथ सदा अघनाम याचें ॥
साचेंपणा सरळता सदसाह्य होयी ॥ पाही ० ॥ ८ ॥
सत्पाद मार्ग बसवी सदनांत रंगीं ॥ रंगीं रमे हरिरवां मृतसंत संगीं ॥
नाहीं दया अरिस ध्या समजून पाही ॥ पाही ० ॥ ९ ॥
लोकांत वास बरवा जग रीति राहे ॥ रीतींत फेर नच तो करुं ढोंग बाहे ॥
रामास मानत नही निच बुद्धि पाही ॥ पाही० ॥१०॥
वागों रितीं जग निती जगकारणीं हो ॥ पाहों मती अडखते अरि भाग साहो॥
मोहांतुनी दुरि वसे समरंग देहीं ॥ पाही०॥११॥
संतापकारक गमे अरि मोह ह्याची ॥ ह्याची अरीस जनिता भ्रमणा फुकाची ॥
दुःखांत काळ सरता नच स्वार्थ कांहीं ॥ पाही० ॥१२॥
नाहीं पुन्हां नरतनू घडि जोडण्याची ॥ स्वानंद ना इजविणें नित देखण्याची ॥
साधीं स्वकाज अपुलें समभागिं येई ॥ पाही० ॥१३॥
ध्यानांत राम वदनांत मनांत रामा ॥ रामाविणें घडिभरी न बसूं रिकामा ॥
कामांत काम दुसरें असलें न पाहीं ॥ पाही० ॥१४॥
संताप शांत शमता ममता दुजाची ॥ दूजेपणा हरविता ममता मरेची ॥
गीतांतरी हरि मिळे तुज याच गेहीं ॥ पाही० ॥१५॥
गंडांतरा चुकविता नच सिद्ध कोणी ॥ सिद्धांमधीं अभिमती भुल हीच घाणी॥
ढोंगेंच हीं सकळिकीं भव भ्रांति पाही ॥ पाही० ॥१६॥
हातास टांकुनि फुका नच दुःख भोगूं ॥ जोगामधीं नच मरे अरिकाम भागूं॥
विचार येथ बरवा हरिनाम गेहीं ॥ पाही० ॥१७॥
संतास ठाव पुसणें बरवा वसंता ॥ संतांत संत गमतो निजबोध पंता ॥
संसार सार न रुचे तव संत नाहीं ॥ पाही० ॥१८॥

संताप हा समतुकें समभाग योगें ॥ योगांत योग कलि ते हरिनाम वागे ॥
सांगों किती तुज हितीं नड काम पाही ॥ पाही ० ॥ १९ ॥
माळा नको चिपुळिया करताल वीणा ॥ प्रेमाविणें फुकट हे रसभक्ति वीणा ॥
भावाविणें सुख नसे नरदेहिं पाहीं ॥ पाही ० ॥ २० ॥
प्रेमास भाव उठवी सदभाव भेटे ॥ भेटे हरी मग वरी मतिबंध खुंटे ॥
तंटा मिटे मिठ पडे रुचि वास देहीं ॥ पाही ० ॥ २१ ॥
गातां कथा अनुभवें हरिचे पवाडे ॥ जोडे मना अमनता सुखसिंधु वाढे ॥
भ्रांती बुडे सुख घुडे समताच गेहीं ॥ पाही ० ॥ २२ ॥
प्रेमाघरीं धनसुती तदनूरुपानें ॥ राहों हरीवरि प्रिती सदभावनेनें ॥
अंतीं सुखास समता सम आत्मगेहीं ॥ पाही ० ॥ २३ ॥
कौतूक तूक तुकतें भ्रमभूत जातें ॥ गाथेंत अर्थ मथितां सुजनाव खातें ॥
अर्कास अर्क निजतर्क सुमार्ग पाहीं ॥ पाही ० ॥ २४ ॥
निंदा नको स्तुति नको जग लाघवाची ॥ लीलाच ही हरिजिची सकळांत साची
भ्रांती भुले द्विविध तूं तनुमाजिं पाही ॥ पाही ० ॥ २५ ॥
मी थोर वाटत जया अवघाणि तेथें ॥ जो मीरवी मिपण तें मुळ दुःख खातें ॥
नातें अशावरि कशास नकोच पाहीं ॥ पाही ० ॥ २६ ॥
पूसे गुरूसि घर हें सदसंगतीचें ॥ दावी तुला सुजन तो सकळींच साचें ॥
आधीं मनीं लिनपणा धरि याच गेहीं ॥ पाही ० ॥ २७ ॥
हाटास आटिव भटासम धीट होई ॥ ताठा फिटों मन वटों समयोग पाहीं ॥
धार्यींच देहिं रमुनी शमुनीं मनाहीं ॥ पाही ० ॥ २८ ॥
सर्वांभुतीं सदयता तम ऐक्य रूपीं ॥ होई तरी हरि मिळे अतुल प्रतापी ॥
इच्छा पुरे मन निवे यमभील पाहीं ॥ पाही ० ॥ २९ ॥
पाही जगांत सुख तें कवणा प्रकारें ॥ दृश्यांत दुःख सकळी भ्रमणा न वारे ॥
शांती नये किमपि ती जगनीत गेहीं ॥ पाही ० ॥ ३० ॥
माझें म्हणोनि रमतां जडदृश्य भागीं ॥ भागींविभागीं जडते सुखदुःखभोगी ॥
नष्टांत कष्ट सकळी समजूनि राही ॥ पाही० ॥३१॥
याहो रितीं मन मनाप्रति बोधिताना ॥ बोधामृतास भरती भरपूर माना ॥
आजी अनंत बहु तोषत याच गेहीं ॥ पा० ॥३२॥

# सारविचार.

( विबुधप्रिया )

हे मना निच कामना खल संगती नच गोड ती ॥
जोड ही नर जन्मिची सद्वासना मुळ जाण ती ॥
बोधनी नित शोधनीं सद् घोंकि तूं पदिं पावसी ॥
भ्रांति ही धन कामिनी सुत आप्त रें नच मावसी ॥१॥

नाहिं हा तुज तारिता तुजवांचुनि बहु आगळा ॥
हा गळा अरि हस्तकीं नच गोववूं चपळा पळा ॥
सांगणें किति सांगु हे दिठिं देख तूं मन मोहिसी ॥ भ्रां० ॥२॥

मुक्तिची सद्युक्ति ही निज शक्तिनें हित शोधणें ॥
संगती धरि सज्जनीं मति भक्तिनें भव आटणें ॥
सिद्धिची सुद सोडुनी सम बुद्धिनें जगिं हो खुषी ॥ भ्रां० ॥३॥

जोग हा नच वाढवूं मति ढोंगिचा सुख नाहिं रे ॥
वाउग्या निच कल्पना जग भोंदण्या हितिं फांस रे ॥
जाळती मग माळ गा जरि काम हा मनिं पोसिसी ॥ भ्रां० ॥४॥

साक्षिला नच शोभला जगती मधीं तुज जोगता ॥
शोधितां भ्रम वाढती सिपणाकृति तनु जाणता ॥
वेगळें तनु सोडुनि नच राहसी कवणा मिषीं ॥ भ्रां० ॥५॥

सांगणें तुज कारणें इह हेतुनें समजे बरें ॥
आवरे भव भान हें सदुपायनें हित साजिरें ॥
रात्र ही गुण जाग्रती त्रिविधाकृती कसि नेणसी ॥ भ्रां० ॥६॥

सुख तें हरिनामची मन आमनी करि सोडितें ॥
जाणुनि आजि ध्यायिजे नच आळसीं मन जोडुं तें ॥
सांगणें आजि खुंटलें भज राम तूं अरि ताडिसी ॥ भ्रां० ॥७॥

दुर्लभी तनु लाभली सद साडली करिं यावरी ॥
व्यर्थ रे नच काळ हा निच सेवनीं उरिं का सुरी ॥
दाखले बहु शोभले भव आंतुलें सम साक्षिसी ॥ भ्रां० ॥ ८ ॥

पाहिंपां जगदांतरीं समदृश्य ते स्थिर ते उरे ॥
नासतें उपजेल तें भवभानिचें समचातुरें ॥
दंडची तनु खंडणीं मति बंडही उगी घुडसी ॥ ऑं० ॥ ९ ॥
उदधी पय पानियां पद आत्म तें सदसाक्षिचें ॥
पक्षिचें नच कुक्षिचें निजलक्षिचें बुध दाक्षिचें ॥
शांत हो सदपंथिं या सुखसोहळयामधिं बूडसी ॥ ऑं० ॥ १० ॥
वर्गहा निज मार्गिंचा भव स्वर्गिंचा नच वास या ॥
सज्जनीं अवलोकुनी रस सेवणें करुनी दया ॥
जाति भावि अनंत हा बहु तोषला अजि मानसीं ॥ ऑं० ॥ ११ ॥

---

## मानसबोध.

॥ विबुधप्रिया. ॥

मानसा जड आदरें सदपाउलीं जड तूं बरें ॥
सोयिला तुज लावितों करुणानिधी बहु आदरें ॥
काय हे हकनाक गा वय टाळिसी नय सार्थकीं ॥
शांतिचें नच धाम तें जन लाघवी विधि द्वैत कीं ॥ १ ॥
ठाव ना उगें नांव हें भवभ्रांतिचें जड देखणें ॥
बावुलें नव आभ्रिचें उगें कौतुकें तुक आटणें ॥
वेगडेचि ही बाहुली नच साउली सुखशांतिची ॥
चंचळे मति संश्रुती िति आगमीं तव दीक्षिची ॥ २ ॥
दो दिसीं तनु नासुनी फुकटाव ही अजि जाइरे ॥
नाहिंरे मग सांपडे पुनरूपि हें सद्भाइ रे ॥
काम हा अधमाकृति अरिकूळिचा नृप माजला ॥
ग्राम हा तनुक्षेत्रिचा बळकाविला स्मर याजला ॥ ३ ॥
भीड कां नड खोठितां तुज वाटतें सम पाहि तूं ॥
साधुनी हितबोध घे बरि धारणा वरि ठेविं तूं ॥
मावही जडभाव दे मन मोहुनी हित नाडते ॥
ना कधीं सुख मानसीं धन कामिनी वरि ओढितें ॥ ४ ॥

या जगीं तनुमानवी बहु देखणी हित कारणीं ॥
लाधली तरिं पाहिजे मति साधनीं हरि घोंकणीं ॥
काय ते पशु थोडके तनु धारणीं जगिं जन्मले ॥
जन्मले हत पावले इह रीतिनें मनु आटलें ॥५॥
कोण मी गति काय ही हित कोणतें जनिं पाहि रे ॥
नाहिं रे वरतेवरी असीहि घडी तनु जोडि रे ॥
वासना भ्रम भावना धन साधना वरि गुंतते ॥
दे म्हणे मज देवजी नवसादिकी बहु मागते ॥६॥
साधनें सकळीक हीं धनवासने करुनीं वरीं ॥
बांधितीं बहु देवळें दिप माळिया आजिं सौभरें ॥
देव हा दगडावरी बहु सेंदुरीं पट काढिले ॥
ग्रामनाथ सडेश्वरी किति भैरि ही जनिं पूजिले ॥७॥
कोंबडीं बळि मेंढरीं नवसामिषें बहु कापिती ॥
घालिती दुसऱ्यावरी उचलूनियां चटकी मती
ढोंग हें सकळीक गा सुख येथ ना मज वाटतें ॥
भ्रांतिचें भुत बावरें जड साधनीं भविं धांवतें ॥८॥
पावतें नवसा खरें परि नाहिंरे तुजवीण तें ॥
भाव हा तुजपासिला फळ या रितीं अजि मीळतें ॥
भूत ना तूंचि भूतरे भ्रमभूत हें तुज लागलें ॥
भासतें तव मानसा तदनूरुपें दिसुं लागलें ॥९॥
देख गा अजपाजपीं कळिकाळ तो नच पाहता ॥
तेथ ही भुतभावना जडुनी मना उगिं नाचतां ॥
आपुली करअंगुली नयनामधीं जरिं घातली ॥
येकची परि दोनसीं अनुमोदनी दिसुं लागलीं ॥ १० ॥
द्वैत हें हित नासतें भ्रम ऊठवी कळि गांठवी ॥
आठवी आजिं आपणा सदभावनामधिं सांठवी ॥
मानणें सुख दुःख हें फळ जूवलें भ्रम वृक्षिचें ॥
मादलीं नभिं साउली तिच मापिली खुण साक्षिनें ॥ ११ ॥

गोड ते कडु होतसे कडु गोडिला बहु वाढलें ॥
वीषयावरि दाखले बहु लौकिकीं दिठीं देखिले ॥
अन्न हें परब्रह्मसे भुक भोजनीं घरिं जेविलें ॥
पाक तें जठराग्निनें उदरामधीं रसिं सोसिलें ॥ १२ ॥
जाहला मळ पूढतां पळ सूटली मयदानि रे ॥
सोंवळें परि जेवितां मळ त्यागितां मग भ्रष्ट रे ॥
मूळ हें उदरामधीं बरवें पहा आजें शोधुनी ॥
नर्क हा जड देहगा बहु ओंवळा नितबोधनीं ॥ १३ ॥
दामहा तव गांठिला जरि जाहला मग सोयरीं ॥
शोभती तुजभोंवतीं बहु गोडिनें मन सावरी ॥
बायको मुल मावशी सखि म्हेवणी घरजांवई ॥
सासुही बहु मानिते तुज लाभली प्रित जांवई ॥ १४ ॥
फारसी लवते भली नयनाकृती बहु मोडिते ॥
साधनीं सकळीकहीं नच अंतिचीं तुज मानतें ॥
सोडि तूं अजिं आस ही तुज खासची बुडवीति हीं ॥
साव हो सम राहि तूं मुल सोड ही करि रे सही ॥ १५ ॥
पाहणें निजकौतुकें गुरुपाद हे नित सेवणें ॥
दान दे दिन मानवी नच ज्ञात ती तव शोधणें ॥
आननीं हरिनाम गा गिति कान:दे नयनीं बघी ॥
राघवा सगुणाकृती बहु प्रीतिनें निज घे सुधी ॥ १६ ॥
बोध हा तव मानसा बहु चांगला निजकारणीं ॥
शोधुनी निगमागमी तुज ओपिला सदसाधनीं ॥
पीउनी श्रवणा मुखें रुचि घेइ ही आजें कौतुकी ॥
शांतिच्या सदनांतरीं सुख सज्जनीं गित बोऊ कीं ॥ १७ ॥
हे मना नच जाउ तूं दुजिया घरीं सुख मानुनी ॥
मान नाच परीचयीं नच पूसती बहु हो दिनीं ॥
भानुच्या घरि सोम हा जंव चालतो तंव त्या कळा ॥
तूटती दिनदीनिं त्या मग नाहिंसा अनुमानिका ॥ १८ ॥

सूर्य हा जगकारणीं अवतारला सकळां दिसें ॥
रोज ये उदयाचलीं पर कोणि ना जन त्या पूसे ॥
द्वीतिये शशिखंड तें जगिं वेदिलें प्रित मानुनी ॥
पौर्णिमे नच पूसती रित ही अशी त्वरि शोधुनी ॥ १९ ॥

पाहुणा तिन दीनिचा मग राखणा बहु दीनि तो ॥
गूण हा सहवासिचा समजूनि घे तुकिं बाणतो
प्रेम हा रघुनाथजी वरि ठेवि तूं बरवा मना ॥
साधना नच याहुनी भव सागरीं सम बोधना ॥ २० ॥

गायि तूं हित मानुनी नित दाविली निज आथली ॥
बोधिली तनु शोधिली तरि गाभली हितिं मानिली ॥
प्रार्थना तुजपासिंही अजि मांडिली मनिं मानसा ॥
या रितीं जरि राहसी मग ना उणें सुखसारसा ॥ २१ ॥

दीसतें बरवें खरें परि नासतें नच राहिलें ॥
जाणुनी हिति मानलें नच मानसीं गिरिं ओविलें ॥
मानलें तरिं घेई गा तुजला रुचे करितें तसें ॥
बोलिलों म्हणुनी नको मनिं राग तो धरं मानसे ॥ २२ ॥

पावना पतिता जना मनमोहना रघुरावजी ॥
सावजी मम मानसा करिं आजिं तूं दिन नाथजी ॥
आसरा तव पायिंचा मज राघवा प्रिति देइरे ॥
नाम हें मुखिंमानसीं सुख मानुनी नित गाइ रे ॥ २३ ॥

पूरवी ममहेत हा मनिं ऊठला तुज बोलिलों ॥
दास मी तव आस जी धनि मानुनी मुखिं वाणिलों ॥
सांगणें तुज लागतें नच आधलें परि हांव ही ॥
थांवली बहु हांवरी तुजपासिं गा सद्भावही ॥ २४ ॥

शांतिचा मजगांव दे सदभाव दे तव नाम दे ॥
बोध हा निज ठाव दे अनुभाव दे पदआत्म दे ॥
सज्जनीं सदसंगती प्रिति लीनता संवशोधनीं ॥
हे धणी तुज मागणी हिच मागतों दिठि देखणी ॥ २५ ॥

राग तो नच येउं दे दिन अर्भकीं मज मापि गा ॥
आवडी पुरवावि ही मज बाळका तुंचि बाप गा ॥
माय तूं मज बाप तूं भव ताप हा दुर पाठवीं ॥
प्रेमळा सुजनाचि ही मज संगती अजि गांठवी ॥ २६ ॥
बापरीं मन बोधिलें तुज अर्पिलें सुख लाधलें ॥
चांगलें अजि वाटलें मुख देखिलें निज कोंवळें ॥
मासि ही मिति तूजला म्हणुनी मला रुच दीधली ॥
बापपायिं अनंत हा करि मीळणी बहु चांगली ॥ २७ ॥

## ९ नीतिबोध.

॥ वसंततिलका. ॥

पाहे मना जनवनीं सकळीक देसीं ॥ स्थूळासनीं तुंच बरें तिनलोकवासी ॥
नाहीं तुला तुजविणें सदबोध वाणी ॥ शोधी बरें मिपण तें सुखदुःखखाणी ॥१॥
दारासुतीं मतिरुपें सुखमानितेसी ॥ नाहीं तुला कवण तें सुख आत्मदेशीं ॥
मोहामधीं गुतुनियां पडलासि घाणीं ॥ शो० ॥ २ ॥
मायाच ही हरिजिची सकळीक येथें ॥ नातें तुला दिसततें पुनरेव सातें ॥
सोडी मदा लिनपणें हरि गूण वाणी ॥ शो० ॥ ३ ॥
ध्यानीं वसे तदनुतें दिसतें स्वदेहीं ॥ गूणाकृती मति असे सुख येथ नाहीं ॥
ऊरामधीं तळमळी दिन रात्र घाणी ॥ शो० ॥ ४ ॥
दृश्यासवें भुलुनिया बहुरूप होसी ॥ भ्रांती हिची पडलिसे बुडवी सुखासी ॥
दाही दीशा मृगजळावतहेत पाणी ॥ शो० ॥ ५ ॥
कांता तुझी दुजि नसे तुझी तूंच कांता ॥ माथां असे द्विविध तें उठवीत मत्ता ॥
सत्तामुळीं तुझी तुला प्रकृती न वाणी ॥ शो० ॥ ६ ॥
कायापुरी रचुनियां जगतूंचि होसी ॥ फांसी पडोनि ममते बहु क्लेशी होसि ॥
साक्षी तुतें असिसमे सुचते जि वाणी ॥ शो० ॥ ७ ॥
भानूतपें पडतसे मृगनेत्रिं भ्रांती ॥ वाटे जळावत नसे परि धांवताती ॥
शीणे उगां फिरुनियां मग दीनवाणी ॥ शो० ॥ ८ ॥
वाटे तुला भुत जसें रजनींत वाटे ॥ खुंटास देखुनि बरें भ्रमणेसि भेटे ॥
आवी तदां तसतसें तव देह वाणी ॥ शो० ॥ ९ ॥

आदेस तूं गुणरूपीं द्विविधा मतानें ॥ संकल्प कल्पित सदां द्विविधाचि मानें ॥
वीकल्प ऊठत असे मग दीनवाणी ॥ शो० ॥ १० ॥

वाटे तुला गमति हे घरदार कोडें ॥ झाडें मिरास वतनें गज दासि घोडे ॥
अंती नम्रे तुजविणें तुज आणि कोणी ॥ शो० ॥ ११ ॥

रूचे तसें करिसि तूं स्थुळ हेतुरूपें ॥ बैसी अहंकृतिशिरीं प्रकृती न मापे ॥
पोटांत तें वदनिं ये रुपरंग वाणी ॥ शो० ॥ १२ ॥

नाहीं दिसे तुजविणें जगतींत कोणी ॥ देवीतुंची मंसिगमें मुळगूण खाणी ॥
वाणी तुझी निजसखी सुचवीत कोणी ॥ शो० ॥ १३ ॥

मायामती जगतिही विनयार्थ केली ॥ कोळी जसा घरकरी वरि झेंप घाली ॥
तंतूवसें फिरतसे मरगेंहि त्याणीं ॥ शो० ॥ १४ ॥

भृंगीजसी किटकतो वदनीं धरूनीं ॥ ठेवी घरांत वरि टोंचित कंटकोनीं ॥
प्राणांत होत किटका निजध्यास वाणी ॥ शो० ॥ १५ ॥

ध्यासासध्यांत असतां ध्येयरूप झाला ॥ हा कीटकांत सदुपाय अनुमानिं आला
भृंगीच होत किटकी तवरूप काणीं ॥ शो० ॥ १६ ॥

सारेंच तूं परि तुला निज दादलातो ॥ जो जाणतो मन असें नवलाव होतो ॥
तेथें जरीं रिजसि तूं सदगूण खाणी ॥ शो० ॥ १७ ॥

दूजेपणीं रिजतुला पर मैत्रिकेची ॥ दूजाचि तो तुज वरा नच देई रूची ॥
या कारणें सम मना निज आत्म हेतू ॥ शोधी तुवां जगनगीं सुखकार हेतू १८

कामादि हे अरि बरे तनु दुःख दाते ॥ शांती नसे किमपिती अगुणीच खाते ॥
नातें कशास असल्या वरि ठेविशी तूं ॥ शो० ॥ १९ ॥

गर्वें करोनि फुगसी मिपणा कृतीनें ॥ दूजा न मानसि कधीं बरवे रितीनें ॥
ऊठा ऊठी करि बरी सम ठेवि हेतू ॥ शो० ॥ २० ॥

माळा नको टिळकही सकळीक सोंगें ॥ कामामुळें सुचतिहीं तनु रंग भोगें ॥
ज्ञातेपणा मनिंधरी अरिगेह बेतू ॥ शो० ॥ २१ ॥

रामीं रमे गुणनिमे सम होइ आतां ॥ ताताकडे मुल जसा धरितोच हेता ॥
मानी अनंत पदहें चिद्गूग मातू ॥ शोधी तुवां जगनगीं सुखकार हेतू ॥ २२

## मानसबोध

॥ विबुधप्रिया ॥

हे मना मदनाशना करिं शोधना सद काय तें ॥
नासतें नच राहतें जगिं दीसतें चिद्पाद तें ॥
कोण तूं तुज कोण हीं निजसोयरीं पुस आपणा ॥
देखणा गुरु पाहुणा पदिं धारणा हित कारणा ॥ १ ॥
नाहिं तें दिसुं लागतें झुट गोड तें बहु वाटतें ॥
वासने करिं घासणें भव पोसणें भ्रम या मतें ॥
दाखला बहु हा भला रिज बुद्धिला करण्या खुणा ॥ दे० २ ॥
वास हा बहु चांगला नरजान्मिचा भवसागरीं ॥
दृश्य तें नच पालवूं निजदीप हा मति आंवरी ॥
शांत हो सम पाहि हो हरिचिंतनीं जडि वासना ॥ दे० ३ ॥
बायका भुल कौतुका अरिकाम हा चळवी तुला ॥
पाश रे करिं घेउनी अरि लक्षितो जग हे तुला ॥
गीळिता नच सोडता बहु क्रूरता असु ओढणा ॥ दे० ४ ॥
बावरा नच घांबरा रित आभरा उठ सत्वरा ॥
हो वरा तुज आसरा नर पामरा सदमंदिरा ॥
जावया गित हें गया शुचि पाविया निज धारणा ॥ दे० ५ ॥
श्रीमदें किति अंधसा बहु गर्व तूं मनिं मानसी ॥
सज्जनीं बहु लाजसी नच हालसी हिन मानसीं ॥
नाहिंसा सम तूळणीं दिठिं देखसी नच धारणा ॥ दे० ६ ॥
दंडणें मति खंडणें स्थुळ दृश्यती वदि आंतुले ॥
कोण मीं मज नाम हें जग कामिचें सुख घे भलें ॥
सांगतों तुज दुसरा नच आसरा शशिकाळगा ॥ दे० ७ ॥
काय हे शिण वावुगे किति सोसिसी भव आंतुले ॥
नाशिले शिळ आपुलें फळ संभवी अरि मातले ॥
जाणतें तुंचि नेणतें भव भ्रांतिनें जड देखणा ॥ दे० ८ ॥

ज्या रितीं मति भासतें तुज हे तुते समजावितें ॥
मानिलें मग आपुलें विषया बळें धन सूत ते ॥
सार्थकीं नच कोण कीं धन जोड कीं बगि आपणा ॥ दे० ९ ॥
बंधु ते नच साहिते धनलोभि ते दिनकाळिं ना ॥
वासना बहु भोगिते नच त्यांतुनी दुस अंशना ॥
ही नदी भव भ्रांतिची मृग नीररसें तम टेकणा ॥ दे० १० ॥
आळसी नित नीजसी नयनावरी तम संचरे ॥
झाकिया सवडी बरी सुख खेळणी मति ताजिरे ॥
सोडि तूं तुजवीण ती अनंती रितीजुमंज घणा ॥ दे० ११ ॥

## बोधरूप

॥ भुजंगप्रयात ॥

करावी दया रामराया दिनाची ॥ असों दे प्रिती दातया पामराची ॥
नसे मागणें आणि दूजें मला तें ॥ पदा दाखवी हारवी आपदाते ॥ १ ॥
नको घालुं या संसृती बंधमूळा ॥ मला थार दे प्रेमछंदें कृपाळा ॥
नको फंद तो वीषयाचा मला रे ॥ सदां आननीं नाम तूझें वसों रे ॥ २ ॥
बहु काळ गेला पशू अन्य याती ॥ असे भोगिली फार ती गा फजीती ॥
निती नाम ती तेथगा मूढ ठाणें ॥ बहु क्लेश बापा किहुं तेचि नेणें ॥३॥
बरी मानवी ही तनू प्राप्त आतां ॥ गमावूं कशी राघवा सांग आतां ॥
विषाचे परीं वीषयीं भास होतो ॥ बहु त्रास वाटे जगा ठायिं गा तो ॥४॥
नसे सोयिरा दूसरा तुजवीणें ॥ सखा कूळ गोतीं तुंची एक जाणें ॥
सुखालागिं पायीं मना ध्यास लागो ॥ सदां मीपणा तोडुनी देह वागों ॥ ५ ॥
बहू पोंचले पैलपारीं समर्था ॥ तुझें नाम गा चूकवी या अनर्था ॥
मुनी सिद्ध साधू जपी तापसी ते ॥ तुला पाहती आपुलाल्या गतीं ते ॥६॥
उरी ना सरी भाविकांची तयासी ॥ नसे साक्षि गा या भुमीभागिं यासी ॥
सदां तूजला पाहती अंतरीं जे ॥ अहं या पदा टांकुनी सार हो जें ॥ ७ ॥
दयाशांति अंगीं तया कार नाहीं ॥ भरा संसृतीला कदां भीत नाहीं ॥
तयाच्या उरीं वास तूझा हरी रे ॥ मदा माझिया आज तूं गा हरी रे ॥८॥
जळों काम खोटा टळों वासना ही ॥ झडों दंभ ताठा मिटों कल्पनाही ॥
असों भावभक्ती तुझ्या नामगीती ॥ नसे याविणा मागणें या अनंतीं ॥९॥

खरें नाम तें नेणते कोणिही गा ॥ उगां चावटी काम भागीं दगा गा ॥
हिशोबांत रूका जसा शोधिती हो ॥ तसा हा ठसे राम त्याला असे हो ॥१०॥
गळा बांधि जो हा मनीं रामराणा ॥ सदां चिंतितें मानसीं गा पुराणा ॥
कलीच्या भयापासुनी सूटतो तो ॥ तरोनी स्वतां तारितो हो जनां तो ॥११॥
असे सार सोपें परी पारखी ना ॥ धना साधना गुंतुनी काळ दीना ॥
मनीं मानितों कामिनी आपुलीसी ॥ तयासाठिं फीरे सदां देशदेशीं ॥ १२ ॥
जसा बैल तो बांधितीं पानराटीं ॥ पटा नेत्रभागीं दिठीलागिं तूटी ॥
असे दीनसारा नसे थार तेव्हां ॥ तयाहूनी कामी असे वेळ तेव्हां ॥१३॥
अगा सारसाक्षी दिनाच्या दयाळा ॥ कृपाळा उदारा भयालागिं टाळा ॥
नको शास्त्रविद्या अभीमान ताठा ॥ सदां वादभागीं जडे दुःख वांटा ॥ १४ ॥
कळा वीकळा काळ न्हेईल तेव्हां ॥ नसे कोण तो सोयरा आप्त तेव्हां ॥
दिसें दृश्य तें तें नसे सत्य बापा ॥ खेरं पाहतां संसृती दुःख तापा ॥ १५ ॥
उगांही तनू साजिरी भासती रे ॥ असे पंचभूतीं कृती गूण वारें ॥
नसे ठाव तूला सख्या मीपणा तो ॥ अभीमान ताठा सवे व्यर्थ बा तो ॥ १६ ॥
जनीं सूख तें शोधितां सांपडेना ॥ मना मोहमाया कदापी सुटेना ॥
सदां कामताठा अभीमान अंगीं ॥ जडे क्रोधपाठीं समाधानि भंगी ॥१७॥
खरें दूर राहे झुटें आकळीती ॥ धना देउनी वीष तें भक्षिताती ॥
घरीं कामधेनू जगीं भीक मागे ॥ अभाग्या नरा क्षीर हातीं न लागे ॥१८॥
बरा कामधंदा करूनी रुकातो ॥ जमा खर्च राखी नसे चूकतो तो ॥
अभीमान मोठा जडे देहभागीं ॥ म्हणे जाणता थोर रे अंतरंगीं ॥ १९ ॥
असों झोंक कानीं जळों भीकबाळी ॥ कळेना करें काळ तो अंतकाळीं ॥
बरी सूत कांता भिती सर्व तेथें ॥ मदें मातला नेणतो सार होतें ॥ २० ॥
बळें संसृती घेसि कां बांधुनीयां ॥ अहं या पदा अंतरीं मानुनीयां ॥
वरे पाहिं बा रे न काळा दयाती॥ भया पालवी मोह हा गा प्रभातीं॥२१॥
मना यातना या भवीं थोर आहे ॥ नको तूं भुलूं कोणिही सख्य नोहे ॥
दिसे तें नसे काळ तोडी तडाडां ॥ घटे तो चढे बोध पाडीं धडाडां ॥२२॥
नटे तो विटे शोक हो अंतकाळीं ॥ कळे तो वळे शांति सूखीं सुकाळीं ॥
चळे तो फळे भोगितो यातना रे ॥ गळे तो ढळे मोह मायेंतुनी रें ॥ २३ ॥

घडों मानसीं पाठ हा बोधनीचा ॥ सुटो त्रास रे अंतरीं संगतीचा ॥
मना तूं जना मोह लावू नको तो ॥ पुढे घातकीं होइ गा कारणीं तो ॥२४॥
बरा जन्म हा कष्ट सोसी तया रे ॥ करी आमरी ही तनू याच धूरे ॥
रमाकांत गा भाव साधी निका तो ॥ पुसे सज्जनीं टांकुनी मीपणा तो ॥२५॥
सदां आळसी तामसी क्रोध भारीं ॥ नसे ती दया अंतरीं दंभ भारी ॥
मनालागिं ताठा स्थुळाचा करी तो ॥ मदा मोहुनी वांछि गांजो धना तो ॥२६॥
सिताकांत एकांत वासीं भजावा ॥ सदां आननीं गर्ज घोषें म्हणावा ॥
नको काळ हा घालवूं तूं रिकामी ॥ रमे तूं मना सौख्य घे बोध धार्मी ॥२७॥
धरीं ध्यान तें अंतरीं राघवाचें ॥ नसें जें स्थुळामाजिं तें आजरेचें ॥
निराभासि पाहे निरालंबि राहे ॥ निराकारस्थानीं असें सौख्य बा हें ॥२८॥
गुरूलागिं गांठीं भवाकार मीठी ॥ तुटो यातना मानसीं कारमीठी ॥
वसों संगती सज्जनाची सदां ती ॥ भरों भाव रे प्रेमरंगीं गितांती ॥ २९ ॥
रसाभक्तिच्या धारणा पाहिजे ती ॥ उगां चावटी ना चले व्यर्थ बा ती ॥
नको येथ टीळा गळां माळ हो ती ॥ सदां भावनीं चिंति तूं गा अयाती ॥३०॥
नको ढोंग कांहीं करूं रूप दूजें ॥ जटाभार शिरीं उगीं व्यर्थ ओझें ॥
नसे मुंडणी दंड हातीं धरीतां ॥ गमे गा विचारें मनीं शोध घेतां ३१
घरामाजिं राहे नको त्याग वा रे ॥ वनामाजिं जाऊं जनीं सौख्य घे रे ॥
धरी अंतरीं जानकीच्या धवातें ॥ मना तूं भजे नित्य वाचे हितातें ३२
बहू ते गुरू संसृती लोक भोंदू ॥ मनीं वासना त्या धनालागिं रोधूं ॥
महंतीमधीं गुंग झाला असे रे ॥ कळेना कसें कोण मी या पदा रे ३३
बरे शिष्य ते संपतीचे फुकी गा ॥ तया गोड तैसें वदे आननीं गा ॥
हरामी खरा नाहि रे राम येथें ॥ जरी वाचिली ती गिता सौख्य तेथें ३४
असे मानसीं राम तेथें दया रे ॥ समीभाव भूतीं नसे काम तो रें ॥
मनाचा मवाळू दयाळू दिनाचा ॥ कळा जाणता तो गळाले मतीचा ३५
असे जाणता नेणता दीसतो रे ॥ मळा ना तळे संसृती बोधनी रे ॥
सदां अंतरीं चिंतनीं गुंतला जो ॥ रमाकांतिं भावें असे मीळला जो ३६
असे भोग त्यागी नसे काम अंगीं ॥ नसे शोक तो धामभागीं दुभागीं ॥
असे चिंतनीं प्रेम तो राघवीं हो ॥ दिसे तेधवां अंतरीं ऐक्यभावो ३७

कशाला तया माळ टोपी टिळा तो ॥ नसे देह भागीं अहं या पदीं तो ॥
मुरोनी बरा बोधतो पक्क झाला ॥ गळाले रिपू वैरि त्या हो पुराला ॥ ३८
अशाची बहू आस हो या अनंता ॥ वसे अंतरीं आद्य जन्मींच सत्ता ॥
असे मी मिनाच्या परी या भवीं रे ॥ जळाचा निधी सार साक्षी हरी रे ॥ ३९

## रामजन्म.

आर्या.

मधु मासशुक्ल वसंतीं संतति संती नृपा अयोध्येच्या ॥
नववीधी नवमीचा दिनमध्यानेस जन्म रामाचा ॥ १ ॥

द्रुतविलंबित.

प्रगटला धरणीं स्थळिं राम गा ॥ सुजन ते निजभाव स्वभावगा ॥
जनन काळ कथा आजि लौकिकीं ॥ नच दुजी इज साक्ष कळौ तुकीं ॥२

( शार्दूलविक्रीडित. )

यांनीं सूर नभांतरीं सतिसही गंधर्व देवांगना ॥
आनंदें जयकारती सकळही होते तधीं गर्जना ॥
पुष्पांचा घन ओतला धरणिला पूरी अयोध्येंत ते ॥
देखों येत सुशोध नारदमुनी वाल्मीक सायूज्यते ॥ ३ ॥

( आर्या )

दाटी झाली नगरीं नारीनर वृद्ध सान येताती ॥
आनंदित चित्तानें केला आदर यथार्थ नयताती ॥ ४ ॥

## १३ साधनतत्व. ( सवाई )

रामसमागम काम त्यजी तरिं धाम गमे सदपाय धरा ॥
भाव बरा तरिं साव घरीं हरि नाम जपे पर येई नरा ॥
कामरिपू प्रिय शांम सिताधव नाम वदां नित आननिं धा ॥
मीळेल बोधनिं आत्मसुखामधिं नीत मनीं धरिं हीच बुधा ॥ १ ॥
आधिं मनामधिं शोध करा निट वीट असों विषयावरता ॥
ज्या रितिं आप्तचि दैन्य उदे तधिं सोडुनियां मग हो परता ॥
कोण नसे गणगोत सखा भविं जाण खरें मनिं भावुं नको ॥
शाश्वत ना तनु जाणुनिया मग हां वरि कां मति शांति पिको २

नामरसायण गूण वधास्तव हाचि कषाय सुधा समजा ॥
रोग भवामधिं काम उठे उरिं शांति धरा मनिं हीच मजा ॥
जाग्रति चेतवि हीच भुली भविं मानसिं आठवि या विषया ॥
नाहिं सुषुप्तित कोणतिही रित साक्षिवरी बरि बाणुनियां ॥ ३ ॥
आइहि बाप खरे परि तापचिदायक मोहुनि पोळति गा ॥
कामिनिचे करिं गोंवुनि वेसनिं बांधिति थोरणि तो सिमगा ॥
आत्मसमागम दुर्गम दुर्लभ मोहबळावरि ना गमला ॥
हा गमला मज लाभ भला अजि बोध निजासनिं हो जडला ४
नाम मुखामधिं धारणिं जो धरि काय तया अरि बाधति गा ॥
अग्निमुखें तृण शाश्वत केउत नाम न देखत या भुजगा ॥
सिंव्ह गजासम एक धरी नच नाम हरी अरि हा गज गा ॥
बोधनिं पूर्ण मना समजे तरि काम न राहिल हा उरिं गा ॥ ५ ॥
बालट जोडिव हींवचि मीपण तूं पण ऊठवि हें परगा ॥
नासि रजोगुण त्या तमिं मीळुनि सत्व हि गीळुनि भंगित गा ॥
द्वैतचि लक्षण चाल विलक्षण नाचति तिक्षण यामधिं ते ॥
पाहि अनूभव कोणति ही सत्र प्रेमचि बांधव गा गित तें ॥ ६ ॥
काय मना तुज वाद कशास्तव आस नको धरुं थोरपणिं ॥
फांसचि हा समजे पुरता मनिं कामिनि आस न आत्मधणी ॥
थोरपणामधिं गोंवुनियां मति ही तनु फूकट नासुं नको ॥
पार नसे आदिं अंत कसा मग नीत धरीं उरिं चूकुं नको ॥ ७ ॥
काय दयानिधि आवधि ना तुज हांवरि ही मति भाकित गा ॥
दास जनाप्रति त्रास नसो हरि आस तुझी बहु मोहन गा ॥
माय तुं मानुनि गात असे मनिं ध्यानिं निशीदिनिं पाय तुझे ॥
काय दया सदया सरली तुझि वाटुनि भूंजत चित मुझे ॥ ८ ॥
मागत हें हरि मोहन सोंडरिं काम सुरो दुरि ही कर गा ॥
ना धन वांछित अर्थ बरा परमार्थ मला सम शांतवि गा ॥
रंग नसे जगिं ढोंगचि हें उगिं सोंग खरें मज भासत हो ॥
आस कशी मग वागळ मानसिं ना मन हें खुपि जाणसि हो ॥ ९ ॥

अनुक्रम ०८८७ ....... वि: ...१०२५
 क्रो. वि: २०२-१३-२ २०२२

वेद करी नित तो सिमगा सण भाटरितीं धिट तो ठकला ॥
तेथ नसे मन शांत कदापिहि मीपण ऊठवी हा खटला ॥
सागर पोहुनि पैलथडी वीर बाहुबळें कुणि पोंचत ना ॥
अंतचि ना मग पंथ कशास्तव रामचि गायित राहि मना ॥ १० ॥
ध्यान तुझें हरि कोण रितीं करूं ना गति मानसिं आण तुझी ॥
बाळ कसा मनिं भाव उठे नित जाणसि अंतर साक्षी तुझी ॥ ११ ॥
शास्त्रनिती विधि आगम बंधन नीगमिं ना दिठि देखत गा ॥
भ्रांति निशीमधिं बोधन जाग्रति गूणभरें रव घोरत गा ॥
जाग्रत जो नर जोरभरें उर चेड्डलिया मग काय उणें ॥
जाणिल त्यासचि फावतही सव शांति धरीं उरिं सांवपणें ॥ १२ ॥
रंग शिळानिज रंगरसामधिं दंग असो मन रात्रदिनीं ॥
आननिं गाउनि गूण तुझे हरि प्रेम बळें कस शोधधनीं
भक्तिच दुर्लभ या भुवनामधि साचपणें हरि गा तुमची ॥
ध्यासचि साधन हें परि दूर वसे नच अंत अजीं समची ॥ १३ ॥
कोण रमापति तारिल दासजि आणिक थोरपणीं तुमचें ॥
कांत श्रिमान जिच्या शिरिं ती ललना भिक मागत नासविचे ॥
बुद्धि मनामधिं या रिति भाविस तीपण हो पति आत्म तुमी ॥
साच रमापति साक्षि पदीं तव जाणसि भावजि दासचि मी ॥ १४ ॥
नाहीं मला गुण शास्त्रसुधीरित वाक्य न जाणत साच हरी ॥
नाहिं रुचि मनिं त्रासचि भासत पंथिं नसे मत ईहपरीं ॥
शाश्वत ना तनु आयुर ऊमज ना कळती सुद कोण कसी ॥
भंगुर संगति गूणत्रयावरि पंच भुताकृति याश्च मिषीं ॥ १५ ॥
मोहनिधी मधिं बूचकळ्या बहु काम अरि उरिं जागत गा ॥
क्रोध मदादिक जाग्रत होउनि देतिल साचचि पूर्ण दगा ॥
ही ममता उरिं घावरि होउनि आस मनीं बहु वागविते ॥
वीषय गोडिहि वाढवि मुद्गल वेचिल नीज हितापुरतें ॥ १६ ॥
या अरिला अरि तूंचि सख्या हरि वदे बिचारिच काय करी ॥
भासत हें भय आभयं दे मज संसृतिनाशक हात शिरीं ॥
हे सदया तुज प्रार्थु कितीतरिं गा ठकलों बहु मानसिं मीं ॥
पार करा भव ना दुजि गा सव सांडिन वैभवआगम मी ॥ १७ ॥

रंग मला गितिं दे नित चांगलि प्रेम मिळो सत्रि राघवि या ॥
याजि अजी मति मांजि पुरे तुमि वेळ नको बहु लावुचि या ॥
या भवकाननिं झांपडलों बहु त्रास स्थळोंस्थळिं भोगुं किती ॥
ना सख कोणहि आस तुमाविण आणखि जाणत ना मन ती ॥ १८ ॥
स्नेह कसा म्हणुं मायिक या जगिं कार्य हितावरि लोक सदां ॥
वीषयिं लुब्धचि या जगनीतिंत लोक तमामचि आस पदा ॥
थार नसे मज वाटत मानसिं या रितिं गा हरि जाण बरें ॥
जाणुनिया रित घेत प्रचीतचि पूर्णपणीं जगिं साच खरें ॥ १९ ॥
काय हरी तुज काकुळती नच वाटत मानसिं साचपणीं ॥
भाट रितीसम हाक मि फोडित नाहिं दया कसि प्रेमपणीं ॥
सोडि ब्रिदावळि दीनदयापण निष्ठुरतापण हा कर गा ॥
काय उपेक्षिसि हा दिन दुर्बळ भावपणीं निज चाकर गा ॥ २० ॥
प्रेमळ कोमळ सावध साधक शोधित शामळ गोपसखा ॥
आठवुनी मनिं आननिं वर्णिति कीर्ति अगाधहि ऐक्य सुखा ॥
वीषय विकृति सोडुनि मानस भाव बळावरि जो जडला ॥
ना अडला मग संसृति छेदनि भेदक बाणचि हा सुटला ॥ २१ ॥
दीनपणाविण प्रेम नसे तुज थोरपणीं रिज मानत ना ॥
गर्व जया बहु पर्वचि दूषण सर्व समागम दुःख जना ॥
अर्थ गमे न अनर्थचि दीसत वर्तत जी रित मायिक ही ॥
शोधक शोधित बोध बळावरि रोधुनि मानस संसृति ही ॥ २२ ॥
नंदवनामधिं संगरहीतचि दंगुनि रंगत भंगमती ॥
संग हरी पुर वंग नसे भंविं जंगि मती सदपायरिती ॥
हाचि रमावर वासक हें उर कर्दळिं कर्पुर जेंवि दिसे ॥
शोधनिं सत्वचि आत्म रसायण रोधक औषधि ओषमिषें ॥ २३ ॥
नाक धरी करिं नेत्रहि झांकित गोमुखिं माळ जि ढोंग फुका ॥
दांभिकता मनि ओढि हि ऊठत गोउनि सोडित प्रेमसखा ॥
कारण कर्मजि आधिं भुतान्वयिं शोभत तो गुण थोरपणीं ॥
बुद्धिस चेतन चैतन चेतवि चौकस हा रवि एक धणी ॥ २४ ॥

गोड बहू उंस काठिणता वरि प्रेम रसेंमधिं गौरविला ॥
तेविं विचारहि प्रेमरसायण मोह बळामधिं हो दडला ॥
ज्ञान समागम साधन उत्तम मोह जि गाळक बोल निका ॥
हाचि सिका सरकार हरी उरिं कार मिटों हुरहूर नका ॥ २५ ॥
जाउं नको पर मंदिरिं रोज तुं मान नसे मग रंग फिका ॥
चंद्र जसा रवि मंडाळिं चालत होति कळा क्षिण साक्ष तुका ॥
हें मन चंचळ सोमकळासम वीषय हे पर मंदिर हो ॥
काम उठे उरिं नीजकळा हरि गोंधळ हा मग सौख्य न हो ॥ २६ ॥

## १३ प्रार्थना.

( विव्वंकमाला. )

थारा मला द्या निराभासि देवा ॥ सेवा घडों गा तुझी वासुदेवा ॥
केंव्हां मला तूं रघु भेटसी रे ॥ शांती सुखाच्या घरिं ठेवसी रे ॥ १ ॥
रामा तुम्हा मागतों ठाव पायीं ॥ बोधामृताला असे ठाव पायीं ॥
अज्ञान माझें अर्जी हें हरावें ॥ कामादिकांला दुरी बोळवावें ॥ २ ॥
संसार सारा परावा पसारा ॥ थारा निवारा नसे येथ सारा ॥
माया मनाला भ्रमानें जडे ती ॥ नीती बुडे गा नसे ज्ञान ज्योती ॥ ३ ॥
फूकां श्रमावें मरावें पुढें तें ॥ मोहामधीं या नसे सार गा तें ॥
माझीं परावीं करावीं गतीनें ॥ संकल्प वीकल्प संयोगमानें ॥ ४ ॥
तंटा बखेडा घडामोडि सांडा ॥ वाडा कशाचा मतीलागि खोडा ॥
क्रोधा जमावा मदा इच्छितांना ॥ मानापमाना फुकां रे तनाना ॥ ५ ॥
गोडी मनाही तुला लागली कां ॥ रात्रींत भ्रांती थरी तूं विवेका ॥
आका न काका नसे माभि मामा ॥ रामा जपावें तुला न्हेइ धामा ॥ ६ ॥
गेली भली ही तनूची पराई ॥ काळास त्या ना दया जाण भाई ॥
जाणोनिया या रितीला मनानें ॥ संताप तापा त्यजावें सुखानें ॥ ७ ॥
गावा मुखानें रघुराजराणा ॥ दीनांतुनी त्यास भावे करूणा ॥
तोपेल तो जानकिकांत साचा ॥ साधी मनासाच हाची सुखाचा ॥ ८ ॥
ध्यानांत रामा जमावा करोनी ॥ ऐक्यान्वयाचा सदूपायमानी ॥
वीवेकज्ञाना जमावा जमावें ॥ बोधास तेथें बहूते जमावे ॥ ९ ॥

घोरास तोडा तुम्ही ज्ञान जोडा ॥ संदेह मीटा नका राखुं द्वाडा ॥
पाडी मठावास कां रे फुकां तो ॥ रानात कामा दुणावे चढे तो ॥ १० ॥
सिद्धी भरानें मनानें भरावें ॥ जोरामधीं खास बापा मरावें ॥
साधोनियां ही भवीं भ्रांतिमार्ने ॥ नसे तूज दीसे स्थुला हेतध्यानें ॥११॥
पाहे मना सार तें दूर आहे ॥ भाग्याविणा येत ना ध्यानिं पाहे ॥
सूखास देतो मना नीववीतो ॥ संताप शांतीस संता पहातो ॥ १२ ॥
वाचोनि पोथी बहू ज्ञानि झाला ॥ नाहींच तो गा अभीमान गेला ॥
शास्त्रें पढोनी सदाचारिं वागे ॥ कर्मानुबंधें अभीमान लागे ॥ १३ ॥
संताप शांती जरी संतमीळे ॥ मीळेल बोधीं तदीं चित्त वोळे ॥
कां रे धनाची जिवा आस तूला ॥ आजा पिता तो तुझा कोठ गेला॥१४॥
सीताप्रिया रे हिता दाखवावें ॥ नीती मनाला मला दे बरी रे ॥
ठेवी दया बाळकाचे परीची ॥ पीता तुं जीवा हितालागिं शूची ॥ १५ ॥

## १४ नाम सारविचार.

( स्वागता. )

ओंनमो जगनगांतर वासा ॥ देविदेव ग तिच्या मुळ ईशा ॥
निर्गुणा गुणगती सहजाची ॥ भ्रांतिभावमतिला बहुजाची ॥ १ ॥
नामसार म्हणती कवि जाणते ॥ सारची परि तया विण जाण तें ॥
अर्थ भाव लपला तळिं ना वरी ॥ काय ऐकुन फुकां गति कांवरी ॥ २

( द्रुतविलंबित. )

नाम फार दुरचें गुण संपती ॥ आटल्या उमगणें सहजाकृती ॥
कारणा विसरुनी उगमे पुढें ॥ मुक्ति भुक्ति विसरे बहु कुडें ॥ ३ ॥

( इंद्रवज्रा. )

माया भ्रमाचेमधिं नाम वाचे ॥ पापार्थ नासी परि प्रेमियाचें ॥
प्रेमाविणें टाळ कुटोनि फूकां ॥ लावोनि भाळीं नच सूख बूका ॥ ४ ॥
शांतीसुखा दे हरिभक्त यासी ॥ मानापमानीं समता तयासी ॥
मानापमानीं मति खेद पावे ॥ दुःखार्थ वांटा दुसरा न भावे ॥ ५ ॥
जासील वायां तनू त्यागुनीयां ॥ गायी सुखानें रघुरामराया ॥
माया नको बा धरूं संगतीची ॥ येणेंचि तूझें गतीलागिं जाची ॥ ६ ॥

ना कोण कोणा भव भ्रांति सारी ॥ नाना कृतीची गति कर्मकारी ॥
माझें दुजाचें करूनी सरावें ॥ तेथें मनानें बहुहो झुरावें ॥ ७ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

अंतीचें बहु दुःखहो नर मुवा कार्गी गमे सांकडे ॥
आतां सोडुनि देह ग्राम उघडें माया मदीं भ्रांतुडे ॥
गाढे वारकरी खरी मति पुढें पक्षा तसा कौकिकीं ॥
नीकी सांगड घालुनी वळविला बाकी झुरेवे पिकीं ॥ ८ ॥

## १५ कृष्ण गोपीलीला.

( भुजंगप्रयात. )

विना वासुदेवा परा वासुदेवा ॥ पिता ज्येष्ट भावा समान स्वभावा ॥
मनाचा विसावा भजेचा विसावा ॥ त्यजे बत्तिसावा पथें चौतिसावा ॥ १ ॥
भवा हा नवा वानवा आत्म भावा ॥ दिवा रात्र ध्यावा सुखाचा विसावा ॥
असे शांतिठावा मधीं हो रिघावा ॥ उमानाथ ध्यावा गुरू ऐक्य भावा ॥ २ ॥
सदां सौख्य जीवा गमे हा परावा ॥ नसे वाच्यठावा गुणाचा नवावा ॥
नवा मानवा बोध हा सत्स्वभावा ॥ सितेच्या धवा मेळवी ऐक्य भावा ॥ ३ ॥

( इंद्रवज्रा. )

नमो मोरया यातना नास सारी ॥ भया हारवी बुद्धि दे निर्विकारी ॥
असो प्रेमवाणी सदां आननीं या ॥ हरी कीर्तनीं मोडि देई रमाया ॥ ४ ॥
मना आवडी वागवी राघवीं या ॥ नको दृश्य भार्गी रमों गुंतुनीया
मदालागि आटावया गीत गाणीं ॥ विचारान्वयें गायि तूं गूण वाणी ॥ ५ ॥
नको आणि शोधूं तपाला जपाला ॥ नका नाहिं कांहीं हितीं या कलीला ॥
नको योगयागा नको जोगरोगा ॥ भजे तूं सदां प्रेम भावें हरी गा ॥ ६ ॥
लिला गाउं आतां सुखाची स्वलीला ॥ हरीमीष योगें तया नीगमाला ॥
कथा कौतुकाची जनाचे रितीनें ॥ हिता भाविता आत्मभावानुमानें ॥ ७ ॥
स्मरोनी पदां नाथ राया गुरूला ॥ वदों आननीं ऐक्यता भक्तिलीला ॥
कथा कृष्णराधा प्रिती मानभावो ॥ जडे येथ शृंगार दुजा प्रेमभावो ॥ ८ ॥
नसे मान ना ग्राम ज्या निर्विकारी ॥ परी भक्तिभावें दिसे हा विकारी ॥
रमाकांत एकांत गाऊं सदां हा ॥ अनंता मनीं गोडि येथें स्वभावा ॥ ९ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

वाढे गोकुळग्रामिं तो यदुपती नंदाघरीं भक्तिनें ॥
ये तीनें उपदेशिला म्हणुनिया झालें तसें माननें ॥
राणी नंदजिची सुबोध जननी शांती दया उन्मनी ॥
तेथें नीगम माटका करितसे भक्तीस त्या जाणुनी ॥ १ ॥
सात्वीकि मतिचा स्वभाव पहिला भावीक हा नंदजी ॥
कांताही मतिशोधनी यशुमती कृष्णा म्हणे नंदजी ॥
गोपी त्या श्रुतिशा जमाव सकळी गोपाळ ते हो गडी ॥
प्रेमाचे पुतळे सदैव बरवे झाले जमा ते थडी ॥ २ ॥
वेडीवांकडिं शेमडीं बहु मुलें गायी वनीं घेउनी ॥
संगें माधव शाम तो वसतसे हीरा जसा कोंदणीं ॥
खांदीं कामळि वेत्रकाठि करि ती शिंकीं शिदोरी वरीं ॥
वारी जाक्ष हरी तमभवो खेळान्वयें कूसरी ॥ ३ ॥
नाना भाव अभाव ठाव हरवी जेवीं रवी तो निशी ॥
खेळाचें मिप काननांसरितिची बोधार्थ वाणी खुषी ॥
नाना शास्त्र विचार योग सकळी वेदांतरीं वागती ॥
खेळाचें मिष भ्रांति तें हरविण्या बोधार्थहीहो निती ॥ ४ ॥
नीजाचें सदनीं गडे हरि जिचे तीघे बरे प्रीतिचे ॥
सूदामा वडजा तसाच तिसरा पेंदा हरी मानिचे ॥
भावाचा पुतळा सुदाम बरवा पेंदासमें बोधतो ॥
विचारान्वय वांकडा हरि गडी त्याची कथा वाणितों ॥ ५ ॥
भावें मानस लावुनीं कथन हें आजीं करा आदरें ॥
ध्यावें जी श्रवणीं अनूभव मंती अंगीं हरी आभरे ॥
व्याधी रोग पळे गळे अभिमती शांती वळे मानसीं ॥
गायी साज अनंत भाव मतिनें स्थूलोद्भवाचे कुशीं ॥ ६ ॥

( वसंततिलका. )

काळीं वसंत रुतुच्या यमुना तिरीं हो ॥ खेळे हरी गडिसही नवभाव ते हो ॥
गायी वनांत चरती सद शोधनीच्या ॥ गोपाळ बाल रमले गुण खेळणीच्या॥१॥

दांडू विटू डुमरि द्रश्य पदार्थ जोडी ॥ चेंडू फळी शिरकुंडी बहु भाव गोडी ॥
झाले गडी दुथडिते सदचीद मार्गीं ॥ वाक्यार्थ शोध न रुपें रुप खेळ मार्गीं ॥२॥
आनंद कंद हरिहा गडि गोपयांचा ॥ साचा परी जगरितीं नच शोध त्याचा ॥
सांगे गड्यांस बरवी रित खेळण्याची ॥ वाणी अनंत गतिची बहु लाघवाची ॥३॥
खेळामधीं रडिकदां मजला न रुचे ॥ सत्यार्थ भाव असणें सकळीक वाचे ॥
सांडोनि द्वैत मतिला निजभाव खेळा ॥ हेला अभिमती मनीं प्रथमेव वेळा ॥४॥
व्हावें समानमनसा अजि दोहिं पक्षीं ॥ लक्षांत खेळ धरणें सद्पंथदक्षीं ॥
बोलोनियां मग करीं हरि घेइ चेंडू ॥ बोधार्थ अर्थ उपनीषध तत्व झेंडू ॥५॥
झेलीत अंतर गती वरच्यावरी तो ॥ आधार धारणा धृती मतिशोधनीं तो ॥
गोपाळ ते वरचिया वरि झेलताती ॥ भूमीवरी नच पडे बहु खोल नीती ॥६॥
दावी हरी रुपिं तया गडि खेळती हो ॥ आनंद भाव मतिनें यमुने तटीं हो ॥
झाली तदां रविजिची बरिती दुपारीं ॥ छायापदीं समतसे गमहा विचारी॥७॥
ज्ञानार्थ साक्षिपटतां भवभ्रांतिजेवीं ॥ जायी निमोनी अवघी गति हेहि तेवीं ॥
खेळोनियां शिणबहू गडियांसि झाला ॥ छायेस बैसति तदां श्रमहारण्याला ॥८
अध्यात्म अर्थ गमतां सद्संगतीनें ॥ इंद्रिय बुद्धि वळते मग ऐक्यतेनें ॥
गायी तशा वळुनियां रवितापयोगें ॥ आल्या सुगोठणिवरी हरिभाव मार्गें ॥९॥
सोडोनियां मग हरीतटिं त्या सिदोरी ॥ गोपासही सकळिकीं करिवट्टसारी ॥
काला करोनि बरवा समयेक भार्गीं ॥ स्वानंद सूखकरिं दे क्षुधिताव भार्गीं॥१०

(द्रुतवि०)

कवळ हा हरिचे करिंचा बरा ॥ मिळत गोपसख्यां न सुरांनरा ॥
सकळ ते वळले लवले मती ॥ गति पदीं रमली सतिसी पती ॥ १ ॥
निजमती गतिचे गडि शोभले ॥ बहु विनोद रितीं करिती भले ॥
सकळ देव नभातुनि पाहती ॥ मतिमाधिं कवळी प्रिति मानिती ॥ २ ॥
वदति भाग्य बहू हरिसौंगढी ॥ रितअमा असली नच सौंगडी ॥
सतिसही सुरते मग येतिहो ॥ मिनरुपें यमुनाजळिं तेथहो ॥ ३ ॥
मनिं असें स्मरती प्रित भाऊनी ॥ करधुतीं जळिं या गडि येऊनी ॥
रसमिळे हरिमूख कणांशुतो ॥ सकळ दोष हरी हरिभावतो ॥ ४ ॥

समजला मनिं तो यदुनाथ गा ॥ मग म्हणे गडियांसि दिसे दुगा ॥
चिवासि आज जलीं यमुनेचिया ॥ जपतसें गडिमक्षण भावया ॥ ५ ॥
अजिं जला सिवणें नच कोणि तें ॥ करपुसा दगडासि बरोवितें ॥
नच गडी यमुना जळ स्पर्शती ॥ सुरतदां मनिते चुरचुरती ॥ ६ ॥
हरिपणें हरिहा बहु कापटी ॥ कपट भाव असा यमुने तटीं ॥
करितसे सुर जाणुनि माणसीं ॥ अभिमती गति त्या नितघाणसी ॥ ७ ॥
अभिमती वसते हरि तेथना ॥ अभिमती वसते हरिते थना ॥
हरिपणा दिनता तनभावना ॥ हरिपणा दिनतात नभावना ॥ ८ ॥
सहयता उदयता रवि हा हरी ॥ तमपणा हरवी निशि सारवी ॥
हरिबळें घनसा दिनमानसा ॥ दिनजनीं प्रितिया सतिबाळसा ॥ ९ ॥
हरिकथा गित गोडमती जया ॥ हरितया म्हणतो मति भाजया ॥
सतिप्रति पतिजसा मतिभाळतो ॥ क्रुरमता नसता परा भावतो ॥ १० ॥
हरिघरीं परहा अभिमान हो ॥ हरिपणा पसरल्या मति काननीं हो ॥
हरिघरीं परहा अभिमान हो ॥ करि कसा मदये रिपु जाणुनी हो ॥ ११ ॥
करि अरी समना मनमोहना ॥ हरिहरा नच हा स्वशोधना ॥
गुणकळा भवभान तमामता ॥ मम मता तमता भवमानता ॥ १२ ॥
गित असें रिजलें हरिचें मतो ॥ रिती गुरुपद भाव समागती ॥
कळ गुणें मन हें समजावितों ॥ भव भया प्रति साधन जाणतों ॥ १३ ॥
गित वरें घननीळ हरी जिचें ॥ रुचति ज्या प्रितिनें मति मार्जि जें
वदनिं ते वदले अन भावनीं ॥ भव मती सतिंहो रित भावनी ॥ १४ ॥
सदय भाव मनोनत जेथहो ॥ हरी असे बरवा सम तेथहो ॥
सुजन ते समते गमतें असें ॥ घर खरें हरिचें जगतीं असे ॥ १५ ॥
अजिं मना धरि बोध बरा तुवां ॥ हरि मिळे सप्रते निति शोधना ॥
अजिं अनंत मनोभवभाव हा ॥ भरतसे भरती निजभाव हा ॥ १६ ॥

## १६ मुरली.

कोणी एक दिनीं वनीं हरिगडी गायी बऱ्या घेउनी ॥
जाती तेथ स्वतोष खेळ करिती नीजार्थ तो भावुनी ॥

गोविंदें मुरली करीं धरलिसे चित्तान्वया बोधनीं ॥
वाजे निगम सुस्वरें अनुभवें भ्रांती हरे शोधनीं ॥ १ ॥
गोपी गोपगडी सुबोध सकळी कूळी मुळीं गोकुळीं ॥
माळी माधव जीवनीं सकळिकां दावी निजीं साउली ॥
बोधाची सुघडी असे घडिही भक्ति प्रभा फांकली ॥
झाली एकचि चावडी मतिथडी भानुनुजेच्या जळीं ॥ २ ॥

( द्रुतविलंबित )

बहु गुणें भरती निति बायका ॥ करित कौतुक माधव लौकिका ॥
हरि कळौमल लौकर गायनीं ॥ सुरसंगीत सुबोध सुशोधनीं ॥ ३ ॥
मधुर भाषणें कामिनि गोरट्या ॥ नवरसें भरल्या चिवळया कट्या ॥
नग चिरे भरती तनु मांडणी ॥ सदन सोडुनि जाग्रति आंचणी ॥ ४ ॥

( वसंततिलका. )

गोविंद गोप सखया प्रति भूलतो हो॥ वत्सें जशी स्मरति तीं नित धेनुला हो॥
आर्थींच जाति अबला मति मोहनाची ॥ माजी घडेप्रति बहू मनमोहनाची ॥५॥
लोहास चुंबक जसा जडणी कळेचि ॥ किंवा रवी उदयिं ती कुमुदी फुलेची ॥
जाती तिची समपणा रित गोपिकांची॥ भक्तिस भाव मिळणी गति ऐक्यतेची ६

( स्रग्धरा. )

टांकोनीया घरातें तमरजममते कांत सासू दिरातें ॥
जाती सान्द्रा वनातें भुलुनि मुरलितें देहभानी न नातें ॥
भाळी घेती घड्याला निरसिष रितितें दाविती त्या जनाला ॥
चित्तीं लीला हरीची मधुरस अलिची प्रेम खाणी नवाळा ॥ ७ ॥

( मालिनी. )

गडबडि बहु झाली वेळ ती आर्तभूती ॥
मति अमन कराया कामिनी योजिताती ॥
गतिमाधिं चवताळी चंचळी भाव भाळीं ॥
नच मग स्मरती ती हांव भावीं नवाळी ॥ ८ ॥

( शुद्धकामदा. )

सगुणि धाकटी चीमणी हटीं ॥ बहुत लाडकी भावना नटी ॥
त्रिठिवरी कडू अंतरी बरी ॥ मतिंत कूसकी साळुकांदरी ॥ ९ ॥

( कामदा. )

मीतभाषणी नीत लाघवी ॥ गोरटी सखी प्रेमता नवी ॥
नीजपारखी नारि राधिका ॥ कृष्ण येथुनी प्राप्त कौतुका ॥ १० ॥

( द्रुतविलंबित. )

घटितही सकळा हरि मीळणी ॥ चळतसे घनसा मति वोकणी ॥
किति कानडि कोंकणी गूजरी ॥ किति व्रजामधल्या पर अंतुरी ॥ ११ ॥

( उपचित्र. )

जवळी हरिच्या सकळीक त्या ॥ जमती गमती मतिमान त्या ॥
भिति ना जगती मधिं बायका ॥ परभावमति निति नायका ॥ १२ ॥

( शिखरिणि. )

गड्याठायीं होता हरी मुरलितें ओंठिं धरुनी ॥
कदंबाचे छाये घननिळतनू मंजुळ ध्वनी ॥
डुडा धाठीं पायीं कटिंत धनुसा वागत हरी ॥
गळां शोभे माळा वनसुमन तें स्वासिक बरी ॥ १३ ॥

( पृथ्वी )

पदाब्ज बहु कोंवळें सितमती वदे भाव तो ॥
मनोघ जडणी जडे सति प्रति बहू प्रेम तो ॥
नदी निरभरे निधीप्रति तशा हरि गोपिका ॥
हरी गुणनिधी प्रती मिळती ह्या बऱ्या बायका ॥ १४ ॥

( भुजंगप्रयात. )

प्रभा कांचनाचीं कळा कोंदणाची ॥ समे गोपिकांची मधें या हरीची ॥
निती हो निळाची जडे जात्मदीसी॥पदा मीळणी झालि ते ऐक्यदीसी॥१५॥

( दिंडी )

गडी तेंव्हां बोलती कृष्णनाथा ॥ थवा आला धांगड्या गोपि आतां ॥
तुझी झाली सूगि ही मना ऐसी ॥ अम्ही आंता जाउंरे धेनुपासी ॥ १६ ॥
गडी खोडी काढिती बहू रीतीं ॥ हरी हांसे नाटकी वानगीतीं ॥
जमा सारी येक ती भागि झाली ॥ स्वादभावो आभरे चित्त मेली ॥१७॥

( शार्दूलविक्रीडित. )

राधेनें मिठि दीधली बहु घटी कंठी करा घालुनी ॥

चुंबी आनन आननी घननिळा प्रेमा मती मानुनी ॥
झाली सद्गद तेथवां उभयतीं चित्तान्वया मीळणी ॥
प्रेमाचें भरपूर नेत्र स्रवती पादांबुजी भेळणी ॥ १८ ॥
गोपी ईतर पाहती हरिकडे कोणीं मनीं रूसती ॥
कोणी मानचि मोडिती किति घसी रूपे सुखें साजती ॥
राधेची प्रित फार या हरि जिला जाणोनि त्या नागिणी ॥
ऐसें आननिं बोलती तिजप्रती तूंची वरी गे धणी ॥ १९ ॥

( सवाई. )

काय गे नित राधिके तुज लागली बहु खोटिही ॥
मानले तरि हें कसें तुज अंतरी सवती मही ॥
संगती सगळींकही हरिपासिं या अमि पातलों ॥
सोडुनी आजिं आमुतें नित काय ही अमि तावलों ॥ २० ॥

( द्रुतविलंबित. )

सगुणि झोंबलिसे करिं वेणुला ॥ घसणिचें मधिं घे हरवी लिला ॥
हरि भरे मतिनें माधिं राधिके ॥ कळलि ना कळही दडवी निकें ॥ २१ ॥

( भद्रिका. )

कटि पटींवरि खोवुनी तदां ॥ उभि असे सहजें दिठी पदा ॥
यदुपती मति ये तदां स्मरे ॥ मुरलि भाव भरें मनीं झुरे ॥ २२ ॥
मुरली सतिनों कुणिं घेतली ॥ मजला कळवा कळिं मातली ॥
करुणा मतिला अजिं येउं द्या ॥ सखये जलदी मज लागिं द्या ॥ २३ ॥

( दिंडी. )

आजिं द्या गे मूरली रंजयंती ॥ नीति निगमीं बोधनीं गूणवंती ॥
मती माझी सर्व ही तींज ठायीं ॥तिच्या योगें आल्याति याग ठायीं ॥२४॥
नये कामा तूमच्या बायकानों ॥ खोडि टांका आजि ह्या अनूमानों ॥
प्राण माझा गोपिनो सर्व तेथें ॥ भाळलें मी मानसीं सती नातें ॥ २५ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

वंशीं लिंग कळाविधी नवरुपें छिद्रें बरी पाडुनी ॥
बोधाची कळ घातली माधिं असे शोधामृता दायिनी ॥

मातें मोहनि नाम हें जगनितीमाजी गुणें मूरली ॥
चोरीली कशि कोणि गे कळत ना कैसी मती भावळी ॥ २६ ॥

( मालिनी. )

वदति सति तदां त्या क्रोधभावें मुरारी॥ समजलि नित तूझी चोर तूं लोकचारी॥
घरघर दधि खासी दूध लोणी हरी रे॥नच तुज कळ वाहे अंतरीं आमुची रे॥२७॥
तव रुपिं सकळाला मोजिसी भाव बुद्धि॥ अजवरि नच येऊं तूझिये शोधशुद्धी॥
नच गरज अमाला तूझिये मूरलीची॥नच अगुणपणाचा भाव बोलूं न रूची॥२८॥

( पृथ्वी. )

वदे दूजी चाटा रित बरि तुझी आजिं कळली ॥
नसे तूझ्याठायीं अमल मति ती लाघवि भली ॥
तुझ्यासाठीं आलों तनमनपणें टांकुनि पती ॥
तयां आम्हांलागीं हिन वचन हें चोरटि निती ॥ २९ ॥

( सवाई )

संगती तुझि आमुतें आजिं माधवा बहु जाहली ॥
राधिका तुज चांगली वरि घेउनी बस साउलीं ॥
जादुची दिठिकापटी मति राधिका तुं हि नाटकी ॥
हे ठकी धरि नेटकी चल जाऊं गे अमिं लौकिकीं ॥ ३० ॥

( द्रुतविलंबित )

चल सखी आजिं जाउं घराकडे ॥ वदतसे हरि हा बहु वांकडें ॥
रुचि नसे मतिला अमुची तया ॥ उगिंच कां गलबा करणें तया ॥ ३१ ॥

( उपचित्र. )

असली कसली प्रित वांकडी ॥ ठकडी गतिची हृदयीं कडी ॥
कपटी लटकीप्रति भाळला ॥ आजिं हा हरि राधि कीं वांकला ॥ ३२ ॥

( शुद्ध कामदा वृत्त )

सगुणि बोलते ऐक माधवा ॥ मुरलि राधिका अंतरे भवा ॥
रिजालि मानसीं तूजलागुनी ॥ अधरिं हे धरी प्रीत मानुनी ॥ ३३ ॥
बहुत लाडकी राधिकेवरी ॥ आजिं कशास ती वंशबासुरी ॥
उगिं कशास रे चोरि लाविसी ॥ बटकुरी मिसें गोपिमानसीं ॥ ३४ ॥

नाहीं तूला इजहुनि दुसरी ॥ गोडी कृष्णा कळलिच उजरी ॥
गोपीठायीं नच मळ असली ॥ चोरांची ती रित कशि रुचली ॥ ३५ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

कोण्या रे दिवशीं तुवां धरियलें हातीं हरी आमुतें ॥
खोटा नाट नसोनियां वदत तूं खोटें कसें भावतें ॥
जातों रे अजि राधिका धरुनियां बैसे तुवां येकला ॥
आसों आठव मात्र ही मुखरसें जो कां रवो झोंकिला ॥ ३६ ॥
आलों लौकिक टाकुनी तवकडे घेसी असें वांकडें ॥
झालें मानस भंग हें सकळिकीं चित्तीं अमां नावडे ॥
द्वाराला कुलुपें करोनि गडणी नीरामिषें पातल्या ॥
छंदें तेरव माधवा शपत ही आजी मती आटल्या ॥ ३७ ॥

( दिंडी )

ऐसि बोले सगुणि ती हरीलागिं ॥ भाव क्रुरी राधिका डौंश अंगीं
मत्सराचें बोलणें लाड प्रेमें ॥ गोपि साऱ्या बोलती द्वेष रामें ॥ ३८ ॥
समजलासें अंतरीं देवराणा ॥ वरी बोले लाघवी शब्द राणा ॥
उगीं कां गे राग हा गोपिकानों ॥ कोण कार्यें पातला अभीमानो ॥ ३९ ॥

( मालिनी. )

अभिमति नच खासी त्रास हाची भवाचा ॥
त्यजि त्यजि मतिचा हा संग खोटा हिनाचा ॥
द्विविध मन करी हा अंतरीं कां तरी गे ॥
नच मज रुचि याची जीभली भागली गे ॥ ४० ॥

( शिखरिणी. )

उगी कां गे क्रोधा करित बहु हा घेउनि हटा ॥
रसा प्रेमाचिया मधिं अवगमे भावचि तुटा ॥
मला राधे ठायां प्रित बहु असे मानुनि मनीं ॥
असें हे घाणेरें रव वदतसां साज मथुनी ॥ ४१ ॥
जसा जीचा भावो तदनुरुप मी शामळ हरी ॥
मती माझी मातें सकळहि समे ऐक्य लहरी ॥

कळीलागी येतां वरचडपणें काय नित हीं ॥
विधीनें ही कैसी घडविली घडी नाहि धड ही ॥ ४२ ॥

( पृथ्वी. )

स्त्रियाच मुळच्या तुमी भुलमती जनी कातरा ॥
तरा नच दुजी भवांबुमधीं या भवा आसरा ॥
मती कपटही निती सरळ नाहि ती वूढ गे ॥
कितीक करिता अशी अवकळा प्रिती भंग गे ॥ ४३ ॥

( वसंततिलका. )

आल्याति कां मजकडे मुळ कोणि केलें॥ कां वाकडे धरितसां मति भाव झालें॥
टाकोनियां पति घरांदिक या वनी गे ॥ यात्रें नची परपणें रित बायकांगें॥४४॥

( शार्दूलविक्रीडित. )

आहे मी पर गे सती परतुनी भीती तुमां नां कसी ॥
नासी कां वर दांवितां कवतुका कोण्या रुपें ही खुषी ॥
राधा ही मति लाघवी सति तुमी गोपि तिच्या सौंगडों ॥
सारा एकचि मासला भवगुणी नाहीं तुमां मी गडी ॥ ४५ ॥

( द्रुतविलंबित. )

भुक मला मति ते भलि राधिके ॥ भरुनियां हरिली मुरली निकें ॥
मरुलती करुनी मधि आपणा ॥ करुनियां सदशोधन त्या पणा ॥
निगम गे अधरी गुज बोधनीं ॥ मम मती मुरली मुरलीध्वनीं ॥
असि लिला हरवी असि ना भवीं ॥ सति तुमाविण गे मज आठवी ॥४६॥

( उपचित्र. )

मजला कळही करिवीकळा ॥ भवि या रमणी निजही कळा ॥
दळलां तुमिं ही मुरलीस गे ॥ म्हणुनी वदलों नच राग गे ॥ ४७ ॥

॥ सवाई० ॥

ऐकुनियां मग त्यास ति बोलति लाघवी माधव जाणुनियां ॥
काय तुला भुल फार जडे उरिं कां उगिं बोलसि ठासुनियां ॥
चोर तूं नाटकि काय तरा तरिं अंतरिं या भरल्या असती ॥
गोड वरी परि आंत कठोर मति वचनें तुजिं भाषवितीं ॥ ४८ ॥

( उमा. )

आजि वनीं आमिं भावु न मुरली पोंचत येउनि नादगुणें ॥
कां जि उणें मनिं भावुनियां हरिं ठेवियली तिस दूरपणें ॥
झोंक अजी त्यजि प्रेम भरें मति मानुनियां हरि गा मुरली ॥
वाजवि लौकरि हा भव हारवी भूळ हरो मति जी मिनली ॥ ४९ ॥

( द्रुतविलंबित )

गडि तदां हरिचे रित सांगती ॥ घननिळा सति या नच बाटती ॥
अजिं पटा झटफेड सगूणिच्या ॥ जबरिच्या वदती निति घाणिच्या ॥५०॥

( उपचित्र. )

दडविली मुरली सगूणिनें ॥ नयनिं पाहिली रे स्वतांपणें ॥
वदुनियां गडे ते हरीकडे ॥ सकळ धांवति फार वांकडे ॥ ५१ ॥

( मालिनी. )

गडि हरि चुचकारी घालि डोळा पुढा रे ॥
कळवित पट फेडा आंसिचा हा भवी रे ॥
तवं गडि डसले ते धेनुला गोचडीसे ॥
हरविती अनितीनें लोह माया भ्रमासें ॥ ५२ ॥
किति पटहिसकावी कंचुकीला किती हो ॥
धरि कर जवरीनें वेणिला झोंभती हो ॥
अरळि बहुत झाली गाळि शिव्या करीती ॥
मुख घासि सम मेल्या काळ रे अंतनीती ॥ ५३ ॥

कामदा.

सगुणिला तदां झोंबला गडी ॥ कटित हीसडी फार तांतडीं ॥
पटा फिटें तदां फार वांकली ॥ गळित संसृती हेत हाकली ॥ ५४ ॥

( शिखरिणी. )

धरा भागीं वेणू पडत सगुणी पासुनि बरा ॥
वरा गोपी साऱ्या नयनीं भरती लाघवि वरा ॥
म्हणे तेंव्हां तीसी यदुपति तदां काय सगुणी ॥
गुणी ऐसी कैशी अवघड खणी नास्तिक गुणी ॥ ५५ ॥

(द्रुतविलंबित.)

सगुणि ते म्हणते यदुवीरा ॥ सलगिनें सकळी करूं तरा ॥
भ्रित ळळे पुरवूं सगूण हे ॥ सकळ जाणतसे मतींत हे ॥ ५६ ॥

(वसंततिलका.)

गोविंद गोप सखया मधुकैट भारे ॥ तूझ्या रुपाप्रति अम्हीं बहू भूललों रे ॥
चोरी नसे मभ मता ममताच मानी॥संवाद वाद घसणी रुपयाच मानीं ॥५७॥
तूझ्या रवें करुनियां पुनिताव मातें ॥ नातें मनोवृति असे समजे मनातें ॥
आनंदकंद सदया गुणसागरा रे ॥ ऐसेंचि रोज वडणें रित पुंगवा रे ॥५८॥
ऐशा रितीं स्तवुनियां मग गोपिका त्या ॥ वंदोनियां पद हरी चलती पुढें त्या
आनंदयोग सकळां नवभक्तिभावें ॥ देई रमापति गडी सति आत्मभावें ॥५९॥

(मालिनी.)

सकळहि घरिं जाती आत्मकांता स्वतोषी ॥ सिण उतरत अंगीं ना अभीमान कूसीं
सुख बहु हरि कीले गायकां याच रीतीं॥सदनघन अनंता देतसे भाव रीतीं॥६०॥

## प्रेमसुधा.

(इंद्रवज्रा.)

संसारसिंधू विपरीत अर्थी ॥ स्वार्थी निजाचे बहु येत अर्थी ॥
भावार्थ येथें बहु पाहिजे तो ॥ मोहाब्धिपासोनि तिरा सरे तो ॥ १ ॥
गोपाल गोपी प्रिय धाम धामीं ॥ त्यागोनिया तें भुलुं कामदा मीं ॥
टाकोनि दुग्धा नच कांजि घेती ॥ घेतील ते होय सुखा त्यजीती ॥ २ ॥

(पुष्पिताग्रा.)

वामनाच्युत हरी जगदेक वासा ॥ पावना पतित पावन्नि हा निवासा ॥
तोडोनि बंधा गमवी अनंता ॥ दुःखादि जेथें नसणें अहंता ॥ ३ ॥

(इंद्रवज्रा.)

वार्ता नसावी स्थुळलिंग याची ॥ चित्तांतरीं जोडणि आत्मयाची ॥
आणीक कांहीं नच मागता मीं ॥ माजें मला दे निजधाम रामीं ॥४॥
काया कृतांती जडकारणाची ॥ बुद्धी भ्रमाची गति लिंग साची ॥
माया तुजी हे जग भावनेला ॥ शेषादि येथें ठकले मतीला ॥ ५ ॥
कारणची हा मुळ शोध कोणा ॥ सोहं अभावो विधि वाक्य जाणा ॥

नाहीं चतूराननं तूज जाणे ॥ तेथें कशीहीं इतरीं प्रमाणें ॥ ६ ॥
माया हराया हरिनाम जोडी ॥ नामामृतानें अमनार्थ जोडी ॥
भावें करोनी जपतां रमेशा ॥ तोडील बंधा भवदुःखपाशा ॥ ७ ॥
अभीमान नासे तधीं आत्मभावें ॥ तया सौख्यकारा दुजें नाचि भावें ॥
भुतीं सर्व दृष्टी समानीच दावी ॥ पुढें द्वैतबुद्धी चवी नाचि दावी ॥ ८ ॥

( भुजंगप्रयात. )

बहू सूखशांती नवा नित्य प्रेमा ॥ असी नामलीला करी अंतकामा ॥
बहू याच पंथें रमोनी विराले ॥ करोनी न ते संसृती माखियेलें ॥ ९ ॥
नको शोध आणी असावें स्वभावें ॥ हरी सर्व कर्ता अशा योगभावें ॥
वळे लौकरी ना कलीमाजि वेळू ॥ अगा भक्ति हेची नको टाळुं वेळू ॥ १० ॥

( द्रुतविलंबित. )

नयन पद्मपदा रज आवडी ॥ वसलियां किमपी नच सांकडीं ॥
विनयता उभवे भवसूख हें ॥ समजुनी वरणें प्रितमान हें ॥ ११ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

कंसारी मनिं आणुनी विनय ते केले अनेकीं भले ॥
संसारीं नचकार वाटत मना दीसे बहू चांगलें ॥
झालें कार्य न कर्मभाव उरला पाहूनियां यादवा ॥
आतां हे गति प्रेमरंग कवळी ना योग ऐसा भवा ॥ १२ ॥

( इंद्रवज्रा. )

वैराग्य गेलें नच वैर कोणा ॥ ठायीं स्मरावें समजूं न कोणा ॥
कांतासुतादी धन रंग मातें ॥ नारायणाचें पदपद्म नातें ॥ १३ ॥
अज्ञानबंधांतुनि सोडवीलें ॥ प्रेमानुबोधें बहु सूखवीलें ॥
ना आप्त तेथें मग कोण दूजा ॥ ऐक्यान्वयानें स्मरुं आत्मराजा ॥१४॥
तुझें तुंची हें मिपणें न साहे ॥ मी कोण दूजा तुजवीण पाहें ॥
सर्वाभुतीं तूं असुनी न जाणें ॥ तोची मि ऐसा अभिमान बाणे ॥ १५ ॥
माता अनाथा पयपान पाजी ॥ नामामृताचें नच जे सुराजी ॥
वाढे मतीं अंतर आत्मबोधें ॥ तारुण्य तें कारण ना विरोधें ॥ १६ ॥

( वसंततिलका. )

अज्ञान कारण असे प्रकृतीविलासा ॥ मोहांधकार गुण रात्रि वदे दुजासा ॥
भ्रांती कदां नच सरे विपर्यीक बुद्धी॥वीचार येथ मतिचा गति तोचि शोधी॥१७॥

( भुजंगप्रयात. )

दिनानाथ दाता अनाथा सदांचा ॥ कृपाळू वळे मेघसा बोध वाचा ॥
अनामारुपा पार जेथें असेना ॥ जयावीण कांहीं दुजेसें दिसेना ॥ १८ ॥
अगा भाववीणा नसे भक्ति कांहीं ॥ पतीवीण कांता हिणावें न काहीं ॥
विचाराविणें काय कीजे विवेका ॥ अभीमान त्यागाविणें द्वैत देखा ॥ १९ ॥
जरी ज्ञान झालें महाकारणाचें ॥ तरी सौख्य तेथें घडेनाची साचे ॥
महाकारणा जाणता होउनीयां ॥ कसा होसि येथें महाकार काया ॥ २० ॥
चुकेनाचि फेरा अहंभावनेचा ॥ कसा देखु येई नभाचे तरेचा ॥
मनाच्या विकारें विरा वेंची येथें ॥ न साहे परी साहणें गूणपंथें ॥ २१ ॥
अहंतेगुणें आप दूजें करावें ॥ सदां कर्दमीं कामदर्पी भरावें ॥
न सोसोनि कांहीं नसे मार्ग आणी ॥ असे जाणता चिंत्ति हें सर्व बाणी ॥२२॥
मुळां जीवनूं सींपीतां वृक्ष वाढे ॥ हरीभक्ति तैसी निजीं नीज जोडे ॥
जशा फांदियापानपुष्पें फळानें ॥ निजाचे गडी धुंडिती ध्यानध्यानें ॥ २३ ॥

( यूथिका. )

आत्मबोध सहजें गुण कीर्तनीं ॥ भक्तियोग चवथा उभवे मनीं ॥
ऐक्यते वरूनिया सुख पाविजे ॥ द्वैत तोंवरि हरी गति भाविजे ॥२४॥
कामना सकळही पुरतील गा ॥ लाग संत वचनी धरूनी लगा ॥
वाढवी भरवसा निज अंतरीं ॥ सत्य हा हरी तुझा अरि अंतरीं ॥ २५ ॥

( इंद्रवज्रा. )

कां गा मनाचा लय माजवीला ॥ अंतीं असे हा बहुते भुकेला ॥
नेणोनि सत्ता पर पार जातां ॥ ना पार यासी दिसते अहंता ॥ २६ ॥
लाभली नरतनु सुखकारी ॥ भाविता भिति कशी जगचारीं ॥
आननी हरिकथामृतगाना ॥ योगयागतप भार त्यजाना ॥ २७ ॥

( यूथिका. )

या कळीमधिं दुजी तरण्या गती ॥ना दिसे अनुभवि वदले नीती ॥
संत साधु तरले लय लावुनी ॥ टाकुनी अभिमती कलि लागुनी ॥ २८ ॥

( द्रुतविलंबित. )

कलि बहु सुखकारक लौकिकीं ॥ हरिकथामृत आर्त अलौकिकी ॥
अमरही हरिच्या पद भावनें ॥ अनुसरोनि भवीं तनु मागणें ॥२९॥
हरिपदा विधि शंकर भूलले ॥ परि दुरी सहजें रमुं लागले ॥
गुणनिधी जन चालक नेणता ॥ जपमखादिक ते बहु वानिता ॥ ३० ॥

( यूथिका. )

काळजात अशुभामधिं वा उगां ॥ भोगिलें नच पुढें दिसुं येत गा ॥
भंगसि स्थिर नसे तनु भावना ॥ गा मना निसिदिनीं रघुनंदना ॥ ३१ ॥

( वसंततिलका. )

आनंदकंद गवसे भजनीं हरीच्या ॥ स्वानंदयोग सहजीं सम देखणेचा ॥
भावें मिळोनि मिळणें भ्रित हे अनंता ॥ राहों अखंड भजनीं हरुनी अहंता॥३२॥

## निजठाय कथन.

( भुजंगप्रयात. )

भला लाभला लाभ हा हाटहाटी ॥ दिसे सेज ही हीतकारी मराठी ॥
नफा नाचि तोटा नटाकार हारी ॥ हरी रीजला नाटकीं ज्या विहारी ॥ १ ॥
नराकार नाहीं नसे नारिकारी ॥ तिजा पंढही जो नव्हेची विकारी ॥
तिघांलागिं जो भासवी नीजलीलि ॥ तयांठायिं भावो तयाचेचि लीले ॥ २ ॥
नसे हर्ष चिंता नसे आप्त दूजा ॥ नसे न्याय अन्याय रंकादि राजा ॥
नवी नित्य गोडी नसे स्तब्ध ताठा ॥ अजात्या घरीं जाहला जात तोटा ॥ ३ ॥
अगा नामरूपाविणा ठाव झाला ॥ यया देखतां काम अंगीं बुजाला ॥
कदां आठवेना असे देहधारी ॥ गमे मात्र सत्ता अनेका विकारीं ॥ ४ ॥
जधीं चिन्मया शीकरा पाहिलें हो ॥ तधीं दृश्य येकान्वया सेविलें हो ॥
प्रबोधी प्रभा हे पराहोनि राहे ॥ समानत्वतेसी वढू होनि राहे ॥ ५ ॥
जगाचा जमावा जयाचेनि होई ॥ नसोनी दिसे ठाव हेची नवाची ॥
जलें स्तब्धची राहणें ऐक्यठाया ॥ न होणें कधीं गूण छंदी लिठाया ॥ ६ ॥
नटाया अभीमान हा जेथ न्हेयी ॥ तधीं तेथ तैसें नसे द्वैत कांहीं ॥
दिसे मात्र तैसें परी भिन्न बाहें ॥ परा हे प्रबोधीं असा गूग लाहे ॥ ७ ॥
करी नाच कांहीं परी सर्व होई ॥ पराकारणें कर्म रूपें नवाई ॥

अभीमान ना नीरठायीं मुळींचा ॥ दिसे देखण्या आत्मभावार्थ याचा ॥ ८ ॥
असे तेज ठायीं निरारूप साचें ॥ तसेंची प्रबोधें गती आत्मवाचे ॥
वदों ज्ञान तें आत्मवादें प्रभावी ॥ प्रभे संगतीनें जळाभाव दावी ॥ ९ ॥
दया शांति सर्वांभुतीं हो असावी ॥ नसे जेथ दूजे तरी हे नसावी ॥
नसावी असावी त्यजोनी द्विधेला ॥ समाधीसुखा त्यागुनी बोध झाला ॥ १०॥
द्विवीधाकृती ऐक्यता पावलीया ॥ दयाशांति येते मुळावीण ठाया ॥
तधीं ठाव ना पूजनीं पूज्य गाया ॥ पुढें विप्र वासी कशा देई गाया ॥ ११ ॥
नसे विप्र धेनू द्विधा मानसानें ॥ कसा देखवें प्राकृती मानसानें ॥
कधीं जो न होई दुजा कोण ऐसा ॥ तयाचाचि तो जाणिवांवीण खासा ॥ १२॥
सदां सारिखा आरसासा वदावा ॥ स्फुरे मानसाळागिं हा भाव दावा ॥
परी आरसा पूर्णता नाच दावी ॥ चवी हे उगी ती परी खूण दावी ॥ १३ ॥
अविद्यामळी लिंपल्यावीण कांहीं ॥ रुपा पाहणें दूजिया होत नाहीं ॥
अगा पार ज्यापासुनी रूप बिंबे ॥ अनेकीं परी रूप बिंबे स्वबिंबे ॥ १४ ॥
जरी गूण मायाविणें आत्मसाचा ॥ परी ठाव ना दावि दूजा रूपाचा ॥
म्हणोनी गुणावीण या आत्मयासी ॥ जगीं काज नाहीं स्वरूपावकाशीं १५
स्वतां देखणा नाचि आत्मा स्वभावें ॥ परी दाविता साक्षि दूजानुभावें ॥
जसें जेथ नांदे गुणाच्या वसानें ॥ तसें रूप दीसे कृती भासमानें ॥ १६ ॥
दुजें नाच दावी कदां आरसा तो । जयाचें तया भासवी रूपसा तो ॥
समानी जगाची अशा मानिं होतें ॥ जगीं धन्य काया ययानींच होते ॥१७ ॥
मुळीं हे कळा वागणें अंतरासी ॥ विचारान्वयो जाग्रतीसी निरासी ॥
विवेकें विवंची विचारी सदांचा ॥ जगीं धन्यता लाभला हे सुखाचा ॥ १८॥
जरीं आत्मगुजीं गती प्राप्त झाली ॥ परी पाहिजे नित्य गोडी भुकेली ॥
असे देह संगीं अनित्यान्वयाचा ॥ तया बोधणें बोध हा नित्य साचा ॥ १९॥
कधीं ऐक्यते चित्त हें नाचि राहे ॥ स्वभावो यथा काम्यकर्मीच आहे ॥
परी गूण मोठा सदां संग जैसा ॥ तसें होतसे हेतहा आसभासा ॥ २० ॥
जरा कंद हा लिंग स्थूळान्वयाचा ॥ असे कारणीं लिप्त भावार्थ त्याचा ॥
जरीं दग्ध झाला न हा तों वरी हो ॥ कधीं ताप ना चूकणें या नरा हो॥२१॥
जरा लिंग देहाप्रती मोड हाची ॥ जया वासना बोलती सर्व साची ॥

निरें मोह याची बहू वाढ होई ॥ वरी स्थूळ दृश्यीं झटे वाढ घेई ॥ २२ ॥
फळे काम नाना तरेनें विराजे ॥ भुली येथ झाली वरी ही सुराजे ॥
यया दग्ध केल्याविणा जन्ममृत्यू ॥ चुकेना कधीं बोल हा सत्यसत्यू ॥ २३ ॥
विचारानळें बीज भर्जीत झालें ॥ पुढें नाच सूजे बहू साक्षि झाले ॥
जया तेज रंगे रसा आत्मभावा ॥ मिळों पातला आद्य भावो स्वभावा ॥२४॥
सदानंद झाला गळोनी पहीला ॥ चिदाकार भासू अभासीं वहीला ॥
असे होकि झाली द्विधाकार माया ॥ तिही साक्षि नाहीं उरे त्याजि ठाया ॥२५॥
यया भाग्यभागीं विभागी असे जो ॥ तया काय वर्णू वंदनी भाव माजों ॥
नसे दंभ ताठा अभीमान अंगीं ॥ सदा ऊभवे नीज आनंद रंगीं ॥
असोनी जनीं वीजनीं नांदताहे ॥ अभेदीपणें लौकिकीं मीळताहे ॥ २६ ॥
रसाळानुवादें वदे नीज ठाया ॥ ह्मणों ये कसें मानवी भूतकाया ॥
अनंता अपारा बरा सोयराहा ॥ परेहूनि पर्ता स्मरोनी नमूं हा ॥ २७ ॥

## १९ रुद्रगाथा.

अनुष्टुप.

निजानंद सदा ध्यावा ॥ सद्गुरू करुणानिधी ॥
भगवान् निरहंकारी ॥ निर्मों ही निज साधनी ॥ १ ॥
रभापती तमारी जो ॥ दुःखतापा विमोचिता ॥
सर्वसाक्षी सर्व लक्षी ॥ लक्षणीं नच मिळता ॥ २ ॥
अनामीअमनाकारी ॥ सर्व भूतांसमान ते ॥
मानापमानीन लाहे ॥ वाच्यवाचेहुनी दुरी ॥ ३ ॥
भवांबुधीं तरायाला ॥ लोकत्रयिं नसे दुजा ॥
कर्माकर्म शुभाशुभीं ॥ साम्यता सर्व देखणा ॥ ४ ॥
बहू नामी बहू गूणी ॥ करी लीला जगाकृती ॥
दिनार्थी द्रव ज्या चित्ता ॥ गर्व नाशा अरीरूपीं ॥ ५ ॥
दिसेनाची असोनीया ॥ जाणिवाकृतिमानसें ॥
नेणणें नेणते येथें ॥ जाणुनीयां अजाणता ॥ ६ ॥
निगमागम ज्या गाती ॥ शास्त्रें भांडति लौकिकीं ॥
पुराण महिमा वर्णी ॥ लागेना अंत या गुणें ॥ ७ ॥

भक्तभावें सुखावोनी ॥ नाचतो निजरंगणीं ॥
कीर्तनाची असे गोडी ॥ मानसीं प्रेमभावनें ॥ ८ ॥
जयामूखीं हरी नांदे ॥ अंतरा तेथ नाच दे ॥
सदां मार्गे पुढें रक्षी ॥ गोवळा धेनु ज्यारितीं ॥ ९ ॥
हरीदासीं नसे माया ॥ मान काया न सेविती ॥
सदानंद घनाठायीं ॥ वास केला सुखान्वयें ॥ १० ॥
रुद्र गाथा मुखें गातां ॥ शोक चिंता न शीवती ॥
विती शांती अनीती तें ॥ अनंतरूपीं वसेचिना ॥ ११ ॥

## राम सगुणवर्णन.

( अनुष्टुप )

नमोनियां गुरूपाया ॥ गुणी राम वदों मुखें ॥
अगूणी अरुपी जो कां ॥ असाक्षी अखिल जगा ॥ १ ॥
सदानंदू सदाह्मी जो ॥ सदाचारी सुदेखणा ॥
कृपानिधी दिनार्थी जो ॥ भक्तप्रिय सदां असे ॥ २ ॥
बहूरूपी बहूभाती ॥ समत्वें सम आपणा ॥
नीज दासांमधीं वागे ॥ निर्मोही करि साधना ॥ ३ ॥
नीजभक्तीं प्रिती मोठी ॥ सरोजीं भ्रम राजसीं ॥
नीजता जेधिचे ठायीं ॥ सुखावे रघु तेथ हा ॥ ४ ॥
कथा गोडी सुधा कोटी ॥ आवडी अक्षरीं जडे ॥
उडे भ्रांती अविद्येची ॥ शांति विद्या भरे ऊरीं ॥ ५ ॥
काळ वेळ न लागे या ॥ यातना चुकवी भया ॥
दयाभूतीं समत्वानें ॥ वागवी चित्त सर्वदां ॥ ६ ॥
नसे आणी कलीठायीं ॥ तरुणोपाय या जगा ॥
हरीभक्तीविणा चित्ता ॥ साधनें सर्व बाधती ॥ ७ ॥
कर्म शुद्धि मतीलागीं ॥ श्रुति वेद हेंचि बोलती ॥
परि कर्मी अहंभावो ॥ सूटला नच ऐकतों ॥ ८ ॥
कर्म चारा चरायाला ॥ भक्तिधेनु जयाधि ही ॥
तया गोडी प्रबोधाची ॥ वासरा पय ज्यापरी ॥ ९ ॥

शुद्धसत्वा वरी श्रद्धा ॥ धारणा गुरुभक्तिची ॥
अभिन्नता वरी वाढे ॥ ज्ञानविज्ञान तेधवां ॥ १० ॥
जसा अग्नी वसे गुप्त ॥ भस्मभागीं अपाणा ॥
सर्वज्ञ जाणता तोही ॥ लोपवी ज्ञान मीपणा ॥ ११ ॥
यथारूपा प्रतीपादी ॥ साक्ष ऐसी दिसे नची ॥
अगाध महिमा याची ॥ जाणती बुध क्रीयवान् ॥ १२ ॥
जीवदृष्टी फिरोनीयां ॥ शीवरूपी प्रभा वसे ॥
शिव आत्मा असे ज्ञाता ॥ भक्ति भावो ययाकडे ॥ १३ ॥
दुजा भावो सरे सारा ॥ रूप बिंबे अविनाशि जें ॥
सहजें सहजाकारें ॥ आकृती अनुभावित्या ॥ १४ ॥
नरजन्मीं कलीठायीं ॥ काळ भावो हरे असा ॥
म्हणोनीयां युगा अंतीं ॥ कली मोठा सुखदायकी ॥ १५ ॥
स्मरा रामा निशीदीनीं ॥ नित्यनेमी अनामिका ॥
हरा दोषा गुणाचीया ॥ पंचभूतीं स्थुलार्थिया ॥ १६ ॥
कामनाशा प्रतीवादी ॥ आदी आदित्य तर्क हा ॥
विनाशाप्रती पावी ॥ मोह भ्रांती तमासही ॥ १७ ॥
देहभाव उरे नाची ॥ कारणाहुनि दूर जो ॥
न जो लक्षाप्रती येई ॥ मानसा गुणभावनें ॥ १८ ॥
कीर्तनाची असी गोडी ॥ अंत्य युगामधीं असे ॥
कवी शास्त्रे पुराणें जे ॥ बोलिले संतसाधुही ॥ १९ ॥
मना धांवे पदीं लागे ॥ वेळ वायां नको पिटूं ॥
तोड सारी शोक चिंता ॥ वेळ भारी बरी असे ॥ २० ॥
मानवी साधली कूडी ॥ सर्व जोडीहुनी बरी ॥
व्यर्थ कर्मीं नको लोटुं ॥ आवडो विषयावरी ॥ २१ ॥
पूर्ण नाहीं कदां काम ॥ मोह दाटे उरीं फुकां ॥
सुरी भेदी सदां छाती ॥ द्वैतभाती प्रकाशक ॥ २२ ॥
म्हणोनीयां गुरूभक्ती ॥ हरी कीर्ती मुखें वदे ॥
भाव दे संतसंगार्थीं ॥ अर्थीं वास बरा असो ॥ २३ ॥

अनंतासी अनंती ही ॥ अन्य न्यून्य विवर्जिती ॥
वेद नीती सदां तोषे ॥ पोखवी प्रेमभावना ॥ २४ ॥

## २० युगभाव.

( सवाई )

श्रीगुरुनाथ समर्थपदाप्रति वंदुनि भाव व देव मुखीं ॥
हा भवनाशक आत्मविलास सबाह्यपणें मति होय सुखी ॥
स्थूळ अहंपद भावगती हरि ऐक्यपणा नच याकरितां ॥
भ्रांति मने वरुनी फसले युगभाव भला वदतों समता ॥ १ ॥
वांछित भोग अभोग सदां कडु ते बहु गोड दिसे गतिला ॥
तेथ झटे अति आग्रह मानुनि त्रास करी परि ना विटला ॥
काम मदादिकहे प्रिय जागति तेथ कदां नच शांति वसे ॥
द्वैतपणा उरिं घाय करी अरि अंत करी तधिं दुःख असे ॥ २ ॥
शाश्वत कोण असा मति शोध करीं तरिं काय उणें नसतें ॥
दृश्य अशाश्वत वैभव सर्वहि शाश्वतिं जाउनि सामवतें ॥
घोर मनोद्गति जाग्रति जाणिव गूण मताकृति पांघुरली ॥
द्वंद्वदिठी भव भावि तदां मग नित्य असे भ्रमि भांबवली ॥ ३ ॥
देह अहंपद मानुनि मानस मान भरे भव जागृति ते ॥
काम प्रदोद्भव संभव ते क्षणिं कामिनि लोभ करी ममते ॥
शोक जडे मुळ हेंचि असे तळ काळकृतिप्रति हाचि जमा ॥
भीत अभीमति वांछित शाश्वत नाश कळे वरि जोडि तमा ॥ ४ ॥
माय पिता सुत लेंक मनी बहु आवडती सतितें सदनीं ॥
गोत बहू जमले वमलें सुख आत्मपदाप्रति या भुवनीं ॥
कोण तपिं जपिं कोण वसे किति योग कळे मधिं भाव गती ॥
जोडति कारण कामचि याप्रति भ्रांतिविणें नच आणि गती ॥ ५ ॥
शांति सुखात्पद सद्गुरु साधन साध्यचतुष्ट जडे वरितो ॥
दाविल या भव भान कळासम मानस योग कळे वरितो ॥
जो सहजें भुत मात्रि न दे कधिं त्रास तयाप्रति येथ धरूं ॥
पूर्णास्थितीपदिं नाचळणें कधिं बाकि मती पुरुषा अमरूं ॥ ६ ॥

दुर्लभ ही तनु मानवि या जागिं लाधुनियां विषयीं हरितो ॥
आत्म अरी समरावीण आपण नेणुनियां भ्रमणें करितो ॥
शस्त्र करें धरि भोंवत आपण संभ्रम ते गिरकी जडते ॥
हें जड तेजस मानुनि नास्तिक कापि गळा कधिं ना परते ॥ ७ ॥
जाय लया सकळीक दिसे जग जाणत कां मग नेणतसा ॥
सावध कोण करी मति जाग्रत जो भुलला विषया अरसा ॥
दुःखचि तें सुख भाउनियां मतिभागिं अशाश्वत संग करी ॥
मोह धरी मम आस सुखोद्भव भावण पोषण गोड करी ॥ ८ ॥
ज्या मनुज्याप्रति मानतसे स्तुति निंदक तोचि जमे मुळचा ॥
जाड्यपणें करि धर्म तरीं अभि वर्म नसे रज हा उरिंचा ॥
देहगतीविण ना मति चिंतित नित्य दिसे नचि त्या मनुजा ॥
काळघरीं सरदार अघाप्रति होउनि राहिल नाहिं रजा ॥ ९ ॥

## सदपदानुभव.

( मालिनी. )

मन अमन कराया संगती सज्जनाची॥सदपद अनुभावो वागतो येथ साची ॥
रित नच वितरांची दूरची गोष्ट आहे॥सदय हृदय ज्याचें नाम त्या संत पाहे १
तळमळ भवभानापासुनी सूटला जो॥ हरिसम सकळींकीं साच जाणे मनीं जो॥
द्विविधपण नसे ज्या ऐक्यभावो स्वभावो॥भुमिवर गुरुरावो बोध ना योग्यभावो
अभिमति नच गेहीं म्हंत साधूपणाची॥दिनजन कळ वाहे अंतरीं ज्यास साची ॥
जगनग दिठिंमाजीं माधवो मानिताहे॥नमन चरणिं त्याचें साच हें चित्त वाहे ३
समपण नितिशब्दो भाव दावी सुखाचा॥रसिकपण रसाची वाणिती सत्य वाचा ॥
जिवशिव द्विपणाचें नाहिं पीसें जयासि॥जागिं सुजन ह्मणावा ठाव हा आत्मवासी ४
भव भय हरवायां कांस याची धरावी॥नच दुजि उपमाया या जागिं साक्ष भावीं
सकळ निति पुराणें वेद सिद्धांत बोली॥गुणचि वदति याचे साक्षपी जाण बोली ५
मन सुमन प्रभाती कांचनी कोंदणाची॥निगम निळ हरी हा जोडला अंतरींची ॥
नवधिधि मुळसूत्रीं बैसवी सांख्यशास्त्रीं॥प्रभु दिन निशीं त्याचे अंतरीं प्रेमपात्रीं ६
नरतनु नच साची जाणुनि मोहबुंथी॥त्यजित नच मति ही गुंतली द्वैतहेतीं ॥
भ्रमत भ्रम भरानें भान भ्रांती तमाची॥भव भिति धरुनीयां नाचणें हें उगाची ७

धन सुत घर दारा मोह कामीक सारा॥चिनमयकृत यारा शांति ना येथ थारा॥
अभिमति भ्रम वारा दृश्य भानीं घुमे हा॥गुण रुप कळ ऊठे व्यर्थ नाचे तसा हा ८
हरिहरविधिरूपें गूणरूपें स्वरूपें ॥ जगनिति कळ याची साक्षि वेदानुमापें ॥
त्रिगुणरुप पसारा व्याध्य व्यापार सारा।नटत समपणानें अंश तें कर्म सारा ९
गुणकृत जननी ती साक्षिणी नाम तुर्या॥अनुभव मति माया कारणी हेतवर्या॥
मुळ पुरुप कळा हे कामिनी आत्मयाची॥विसरुनि पतिलागीं प्रीत ती पुत्रि सांची
पतिहुनि सुति प्रीती माउलीची जगीं या॥जनरितिमधिं वागे त्याच मानें रुपींया
निजपति विसरोनी मोहबंदीं मती हे॥षडरिपु शर सोसी मानुनि सौख्य वाहे ११
खरमुखीं हणि लाता गाढवी त्या खराला॥प्रितिकर बहु वाटे दुःख नाहींच त्याला
किमपिहि नच सोडी पाठ तीची जसा तो॥नरतनु अभिधानीं कामिकीं भाव येतो
विषयीं रुचि मनाला वाटते आवडीनें ॥ करि सकळ पसारे अर्थःहेतूच मानें ॥
मति सम जव कार्यें प्राप्त होतीं फलातें॥सुख बहु मग मानी नातरी दुःख होतें
विषयिं अभिरुची ती भोगिली भोगताहे॥ नविनच चविला हे आरुची नाहिं पाहे
पशु करि रंवथाला बैसुनि खादल्यातें॥नरतनुहि तसी ही भोगिते भोगिल्यातें
क्षिण तनु जरि झाली आठवी जानि भावो॥विषयिक अनुभावें ठाव ना आत्मभावो
भव भ्रम मद मोहो कल्पना कल्पिताहे॥अमरण समयांतीं हेंचि मावे स्वभावें १५
किळस नच कशी ती येत नाहीं मनाला॥ जनन मरण बंदीं जाणुनी ऊगमाला ॥
नरतनुविण आणी सार्थकार्थी न दुजी ॥म्हणुनि घडिघडीनें राम जोडी स्वकाजीं॥
गुण रुप नच रामा धाम स्वानंदकारी॥सुखदुख नच याला भाव चित्ता विकारी
अभिमति त्यजुनीयां अंतरीं दृष्टि पावे ॥ सुख मग मति लागीं ऐक्यता येत भावें
हरिगुण कथनातें मान विश्वासमानें॥मति गिति निति पाहे नीज ठेवा मनानें ॥
निजहित मतिला हें तेधवां बाह्य लाजे॥गुण रुप कळ तूटे आत्मभावो विराजे १८
सदयपण जडोनी देह भावो स्वभावो ॥ घडत सहजता ती द्वैत दृष्टीं न ठावो ॥
दिनिनिसि हरि भावो नीज ध्यासें करोनी॥मग हरि सहजेंची ज्ञानदृष्टी कडोनी
हरिरुप सुजनाचें भक्तिरुपें हरीच्या॥इह रितिसम साक्षी कीटकीं भृंगिणीच्या ॥
घर करुनि अळीतें भृंगिणी आंत कोंडी।निजकळ अनुतापें भृंगिणीरूप जोडी २०
मन हरिरुप ध्यासें ध्यान ध्याताचि होतो॥कळित घडत लाभो फार हा साक्ष देतो॥
हरिभजनिं बहू गा साधु झाले जगीं या॥म्हणुनि हरि भजावा प्रेमवाणी तनू या॥

जप तप नच येथें लागती नाम साम्में॥अवघड हटयोगादीक तीं साध्य कामें।
हरिहरि मुखिं वाणी वाणितां सर्व सिध्धी॥जडति पदिं तयाचे अष्टभावादि रिध्धी
जडपण हरिनामें नासुनी तत्वप्राप्ती॥ सदपद अभिधानी साम्यता ऐक्यदीप्ती॥
सदयपण फळातें देत तें ज्ञान साचें॥ अभयवर अनंता नाम दे नाथ वाचे २३

## स्वरूपरूपवर्णन.

( वसंततिलका. )

गावें सदां जगदिशा निजछंद भावें॥आत्मानुभाव उभवे जग हें अभावे॥
भावेंविणा अभयता गति प्राप्त नाहीं॥भावार्थ भाव सहजीं उपमा न साही १
आहेत भाव बहु ते गुण आकृतीनें॥ नाना विकार भवती प्रकृतीप्रमाणें॥
आनंद भाव उभवी नच खंड ज्यासी॥स्वानंद तो वदुं नये भित साक्ष त्यासी २
पाहे मना तुजविणा तुज कोण सोडी॥ आनंदकंद मिळण्या निजभाव जोडी॥
जेथोनि द्वैत उभवे गति कारणानें॥ छेदी तया विवरुनी गुरु आकृतीनें॥ ३॥
जो शब्द भाव उभवे सहजागतीनें॥ काम्यार्थ द्वंद्व मुळ हे गुण आकृतीनें॥
वाचा परापर असे स्वरुपानुभावा॥तूझेंचि तूं द्विविध हें प्रकृती अभावा॥४॥
नाहींच शब्द मुळिं हा परि होत राहे॥ कैसानिधी जलपणें गति स्तब्ध राहे॥
वाचातिताप्रति कथी मुळ गूण वाचा॥ वाचा मना तवरुपें भर हा भवाचा ५
हा कारणार्थ प्रकृती जड लिंग भासू॥ अज्ञान येथ अभिमान जडे अभासू॥
जोडोनि कारण गती गुणछंदतालें॥ मोक्षादि भाव गमवी विधि कर्म बोलें ६
येथोनियां परत तूं निजधामिं येई॥ पाहोनियां तुज तुवां बहुसूख घेई॥
क्रीयेविणें सकळहीं पुरतील कोडें॥ भावार्थ हा गुरुविणा गमवील कोडें॥७॥
कोडें परी समजतां भविं भीति थोडे॥ थोडे यथार्थ कसणी इतरीं अजोडे॥
जोडेची ऐक्य असुनी विघडे दुजानें॥तापत्रया उभयही सहजीं तिजानें॥८॥
कांता अकांत पुरुषा करवी परानें॥ तेथें उपाय उभवे नच त्या वरानें॥
सौभाग्य ज्याकडुनि यां परि त्यास त्यागी॥आकांत जेथ सहजीं सुख तेंचि भोगी
झाली अनेक सहजें परभावबाधा॥ ना येकही सुखवितां समजोनि बाधा॥
तैसें परात्पर पति प्रति त्यागुनीयां॥ कां तूं मना विवरसी गुण भाव ठाया १०
आत्मानुभाव गतिनें सततीं असावें॥ या कर्म वर्म गतिनें कधिं ना कसावें॥
स्वानंद योगभर ज्या कवितांतरातें॥ स्वार्थार्थ साम्य सहजीं जडणी तरातें ११

स्वाध्याय संगम महा निज कारणाचा ॥ भावार्थ हा गमवितो गुण कारणाचा ॥
गूणें विणा अगुणि हा नच भाव होयी ॥ गूणावगूण समता सहजें नवाई १२
लाभेल सर्व परि हें सहसा न लाभे ॥ विवेकवंत वरि भाव तयासि लाभे ॥
ना भोग त्याग उभयाकृति साम्य जेथें ॥ भोगी अमोघ गतितें नच कर्म पंथें १३
नाना उपाय गति मान मती पसारे ॥ ना येकही स्वरुप तें जडण्या कसा रे ॥
जाणे प्रबुद्ध परि तो परहोनि राहे ॥ भोगोनि भोग दिसणें नच हो तया हे १४
जाणीव ग्रास करुनि नच नेणता जो॥जाणेल काय कवि हें कवितार्थ लाजो ॥
मी कोण होंचि नकळे तव हे कवीता॥ गूणानुबंध वसवी अभिमान गाथा १५
येथेंचि गूढ दिसते सकळी अविद्या ॥ बोलू रुपा अनुभवि गति ते सुविद्या ॥
विद्या न हे द्विविधता परि दोन मूलें॥झालीं प्रमाण सहजांतरिं हें न देखे १६
जे दाखवी मिपण टाळुनि आपणातें ॥जेथोनि कल्प समयीं द्विविधा न नातें ॥
तापत्रयाहुनि परात्पर वर्णिताहे ॥ विद्या सुबोध म्हणणें अनुमान नोहे ॥१७॥
ज्याचेनि गूण गति हे विलसे नसोनि ॥ भ्रांतीतमांध रजनी कसतो कसोनी ॥
सिद्धांत ना किमपिही सकळी अभाऊ॥कैशी गती म्हणुं यया प्रकृति स्वभाऊ१८
काम्यीक कर्म करितां गुणकर्मदृष्टी ॥ शांती ययांत नच ये म्हणुनीच सृष्टी ॥
कष्टी सदोदित दिठी अपमान मानी॥ यासी कसा बुधभवीं सुख आस मानी १९
जो सूखदुःख गतिनें विकळार्थ पावें ॥ आजन्म अंतवरि तो नच सुख पावे ॥
जो सूख इच्छि भविं या जगदृश्यमानें ॥ तेथेंचि दुःख वसते बहुतीं प्रमाणें २०॥
सारीच हे म्हणविते प्रकृती अविद्या ॥ जाणोनि त्याग मन तूं धरि ते सुविद्या ॥
नाहीं तरीं सहजचा असणें प्रसंगीं ॥ भोगी सुखे सकळहीं हरिनामरंगीं ॥२१॥
येथें तुला किमपिही भय तो नसावा ॥ वाटेल सत्य तरि हा वरणें गमावा ॥
पाहे उगाच सहजीं सकळीक अर्थी ॥ कर्तेपणा त्यजुनियां निज हें पदार्थी ॥२२॥
अज्ञानबंध गतिनें तनुमान झाला॥ हा पंचभूत गुणकर्म भला न काला ॥
मानोनियां अभिमती तनु बद्ध होसी॥ कर्तेपणा त्यजिलिया सुख ना उदासी २३
केलें अनेक गतिचे निमण्या पसारें॥ अर्थांतरी नच दुजे परि हें विकारें ॥
थारेल चित्त मग नासत नाच विद्या ॥ स्वात्मानुबोध उभवे करितांच विद्या २४
चैतन्य चित्त उभयां तर होत नाहीं ॥ दोनी मिळोनि वसती मुळ एक पाही ॥
वारी प्रणाम निधिनाम तरंग होती ॥ चित्तार्थ भाव बहु हे गुणरंग होती ॥२५॥

मिथ्या तरंग असुनी जल भाव दावी ॥ तैसेंच चित्त बहु हे मति कामभावी ॥
आत्मा निधी जळमती विपरीत लाटा ॥ यातें गणोनि फळ ना सकळीक तोटा २६
ऐसे अनेक गतिचे व्यवसाय केले ॥ आत्मानुबोध भरतीस्तव जे भुकेले ॥
झाले अनंतस्वरुपीं रुपगूण रंगे ॥ नामामृताहुनि दुजें स्थुलिं हो न रंगे ॥ २७ ॥

## २३ नामानंद.

( वसंततिलका. )

सीतापतीप्रति नमीन मि भावयोगें ॥ ऐक्यान्वयें करुनिया सकळीक रागे ॥
सिद्धी गणेश विधि वाग्वरवासिनी ते ॥ आराम रामसदनीं गुणभाव नातें ॥१॥
गाऊं गितीं बहु रितीं रघुराजनामें ॥ नामें करोनि भव हा त्यजुनी रिकामें ॥
सांगे उमेप्रति सदाशिव राममंत्रा ॥ टाकोनि आगम मती सकळीक तंत्रा ॥ २ ॥
वाल्मीक नाम कथनीं मुनिनाम पावें ॥ पापी असोनि तपि हा उलट्याच नांवें ॥
नामासमान दुसरी नच गोड लीला ॥ अत्यर्थ हा अवगमे निजभावभेला ॥३॥
नाहीं उणें हरिजना मन भाव हेतू ॥ हेतू पुरें सकळही नवरंग मातू ॥
भक्ती जडे अभिमती पुढतीं सरें ती॥द्वैतास ठाव नच भाव स्वभाव ज्याती ॥४॥
भक्ती असी स्वरूपिं ती प्रथमीं असावी ॥ स्वानंद भाव हरि हा वळखी गमावी ॥
शांती पदा मिळविण्यासमऐक्यभावो ॥ भावार्थ भाव सदशोधन आत्मरावो॥५॥
पूजा करोनि पुजितां रघुनाथयातें ॥ सर्वांतरी म्हण जनीं इशभावना ते ॥
जाते लया समपणा मग देव कैंचा ॥ भ्रांतीच ही पसरली नच शोध साचा ॥६॥
वीचार सार सममानसप्राप्तिलागीं ॥ गूरूविणें नच कळे सदचारमार्गीं ॥
नाना कळा सगुणि ह्या मतिभावरंगी ॥ शांतीप्रती मिळणि या नच होइ सांगी ७
मानोनि इष्ट पुजिलें परदैवतातें ॥ भावार्थ योग निजध्यास परोक्ष नातें ॥
भक्ती तसा इश गमे पुरवी स्वकोडें॥ ऐसें करी परि नसे सुख शांति जोडे ॥८॥
संतुष्ट मानस नसे द्विविधा मतीनें ॥ कामो घृती अभिमती द्विविधाच मानें॥
मी कोण हा जंववरी नच शोध झाला॥ पूजाविधी तववरी अरिभावझोला॥९॥
कर्तेपणाविण कधीं नच कर्म होतें ॥ नाहीं अभीमतिविणा जगिं कर्मकर्तें ॥
आहे अभिमति मना तंव देव कैंचा ॥ भ्रांती अभाव पसरे नच शोध याचा १०
देहींच देव असुनी भ्रमसी फुका रे ॥ नाभींत कस्तुरि असोनि मृगा वणीं रे ॥
नाभींत देव वसतो वदतो नरातें ॥ गीतेंत अर्थ उगवे मिरउद्गनातें ॥ ११ ॥

नाना वनें नदि महाभुमि येक पाही ॥ तैसेचि देव बहु ते सकळीक ठायीं ॥
नाना लिला हरिजिची नच पार इंचा ॥ हिंडोनि काय फुकटे भ्रमभाव साचा १२
गंगेंत स्नान करुनी तनु शुद्ध होते ॥ ऐसें वसे मनि तरी मति ना फिरे ते ॥
आहे गया म्हणुनियां मग तेथ जाई ॥ शुद्धयर्थ स्नान करुनी पदिं पिंड देई १३
नाहींच डाग मतिचा अघभाव जाई ॥ पुण्यार्थ कर्म करणें अघये उपायीं ॥
अंधाप्रती पुडिमिषें घरिं बोळवीतां ॥ येताति दोष सहजीं मुळ अंध होता १४
अज्ञान मानस वसें करि पुण्य भावो ॥ पापास ठाव सहजीं निज अंधभावो॥
सारा अभाव सम ना मन या भवींहो ॥ जाणोनि प्रेमप्रितिनें स्वरुपींच पाहो १५
स्फूरे मना मिपण तें हरि याच भावें ॥ भावे तरी मग नसे दुसरें परावें ॥
सर्वांतरीं हरि गमे मतिमाजिं ज्यासी॥काशीगयासमभुमी सकळीक त्यासी॥१६
नाहींच पुण्य करणें मतिमाजिं हेतू ॥ पापास ठाव मग ना तनु भावमातू ॥
साराच राम जगतीं असि ज्या दिठी हो॥ आरामतेप्रति असे घर तेंचि पाहो १७
भक्तींत भक्ति गमते निजभक्ति मोठी ॥ पोटींच काम शमणें अमनास घोटी॥
देवासही बहूप्रिती इच भक्तिठायीं॥ठावो इला पति जसा सतिलागि पाही॥१८
अद्वैत भक्त हरिचे हरि अंतरंगीं ॥ नीजार्थ भाव मतिनें समदेहभागी ॥
देहावभाव मतिला नच त्यासि लागे ॥ वागे हरीभवि असा स्वरुपावजागे १९
शांती जडे तनुमधीं समभाव होई ॥ होयी मना अमनता सुख हेंचि पाही ॥
साक्षीस या अवगमे निशिमाजिं झोपे॥झोपेंत शांति असती तममानमापें॥२०॥
देहास सूख शयनीं मनिं फार वाटे ॥ कार्यार्थ सांडुनि निजे सुख तेथ दाटे ॥
झोपेंत जो निजसुरातव त्यास कांहीं॥गोडी नसे जगरितींमधिं सर्व देही ॥२१॥
आहेच कारण तनू तमभावमाना ॥ साची परी रज उठे मग रंग नाना ॥
नाचे बहूगुणरुपें अभिमान हाची ॥ काळांतकाळसमयीं मग हाचि जाची ॥२२॥
कर्में अनादि असतीं घडलीं जसीं हो ॥ प्राप्ती तसी तनुभवीं मतितें पहा हो ॥
भोगार्थ कर्मिं जडली तनु पंचभूतीं॥ वेदांतसिद्ध मतिनें जगतीं वदंती ॥२३॥
भोगाविणें नच सुटे फळ आद्य कांहीं ॥ आणीक कर्म करणें सिलकीं पुढेंही ॥
वृक्षांतुनी विज उठे बिज ठाव वृक्षा ॥ तैसीच ही अभिमती सकळीक दिक्षा २४
नाहींच सूख तनुतें भवभानिं पाहे ॥ मानीं सुखें तितुकिहीं भ्रमणाचि पाहे ॥
साधील त्यास सकळी सुख याच देहीं॥आहे परी गुरुघरीं रित हे नवाई॥२५॥

आनंद संतमतिचा वदतों स्वभावें ॥ साक्षीनरूप जड हें हरिरंग भावें ॥
भावार्थ साधनें सभे सदसंतसंगा ॥ वाचे अनंतमतिनें वदतो प्रसंगा ॥ २६ ॥

## २३ करुणापर.

( वसंततिलका. )

गोविंद माधव हरी गरुडध्वजा रे ॥ नारायणा घननिळा धृतकौस्तुभा रे ॥
गोपीवरा गिरिधरा गडिगोपवेषा ॥ तारी मला नरहरी निगमा परेशा ॥१॥
दामोदरा यदुकुलोद्भव कंसनाशा ॥ राधा प्रिया करितसे तवपार्थे आशा ॥
माझी दया तुज असों सुतिं जेविं माता॥ताता मला तुचि जगीं अघनासि त्राता॥
आहे तुला सकळ ते जगरंग ठावे ॥ माझे तयांत तुजला गुण होति ठावे ॥
तूझीच ही सकाळि गा तिहि लोकिं सत्ता॥आहेस कारण जगा तुंचि एक दाता ॥
ठावें मला परि मती अजि हे भुकेली ॥ नाहीं तया उपमती सदठेव बोली ॥
बाळें जशीं जननितें नच देखतांना ॥ आक्रोष फार करिती नच देहमाना॥४॥
गायीविणा बचडिसी जिववणि देहो ॥ कांताविणें सति जशी तुजवीण मी हो ॥
मेघाविणें मयुर ते शशिला चकोरें ॥ मादीविणें नच पिलें तुजवीण मी रे ॥५॥
येई दयाळ सदया झट झेंप घाली ॥ घारी जसी फणिवरी तदनूहि बोली ॥
घारी फणी धरितसे तनुभक्षणार्थें ॥ तूंवा हरी चपळ ये मज रक्षणार्थें ॥ ६ ॥
तूं कोमला कलिमला जगिं नासण्याला॥ आधार सत्य गमतो पुनिता सुशीला॥
काळांतका अरिकुळांतुनि तारि मातें ॥ भ्रांती भरे मतितुनी भुकलों तमातें ॥७॥
कामादिक अडविल मति भूत झाली ॥ नाहींच सार्थक दिसे तनु नाश केली ॥
वाटे वहू भिति मना आजिं वासुदेवा॥ लावी पदीं अपुलिया मज देवदेवा ॥८॥
कोणा मिष तुज बरें आजि आठवूं मी ॥ सांगे रमापति तुगा मज देहधार्मी ॥
कायामनें करुनियां तुज हांक मारी॥ ऊसीर कां करिसि गा वधि हा तमारी ९
नाहीं दया जरि तुझी तरि व्यर्थ मी गा ॥ केला दगा सकळही अघघाणि ही गा
कांहीं न होत उपयोग फसून गेलों॥मेलों जितासम असे भविं नागवीलों॥१०॥
नाहींच शांति किमपी तुजवीण मातें॥कां रे मला ठकविसी नच तूज नातें ॥
ब्रीदास बोल नच लाववुं आपुल्या गा ॥ दीनास तारक असें पद हें तुझें गा ११
टाकूं नको भवपुरीं मज अच्युता रे ॥ गांजावलों बहु असें अजिं सत्य बा रे ॥
देई जरा तवघरीं मज आसरा तूं ॥ सेवा बरी मज घडो जड जीव हेतू ॥१२॥

मायाभ्रमें फुकट हा जड देह नासे ॥ जाणोनियां पुनपुन्हां तव पायिं धूसें ॥
नासेल देह मग हें नच येइ हातां ॥ मेघावळे झडकरी कर ठेविं माथा॥१३॥
आजूनि कां नच तुला सदया दया रे ॥ कीतो सिणों तनुकेरं मति फार भी रे ॥
आहे तृषार्थ मनिंचा घन होइं देवा ॥ शांती करी तृषित हा दुसरा न हेवा १४
धांवे ममेश अधमावरी ठेवि दृष्टी ॥ कष्टांत काळ सरतो निज देइ दृष्टी ॥
नाहीं मना थिर बरें घडिं एक आजीं॥माझी दशा समजही हिन वासना जी १५
काळाभयें दिननिशीं मन नाडलें हें ॥ नानातरा मन भराभर धांवताहे ॥
आधीं वळों मतिमधीं तव बोध ठेवा ।। वीविक दे कुशिमधीं अनुभाव भावा१६
तूझ्या पदीं गति असों मज देखण्याची ॥ वाचे करोनि वदवी गित भाव शूची ॥
नीचांत संगति नको सुजनांत ठेवी ॥ हेतू पुरा करि अजीं ममता हरावी १७
नाहींच काय सदया तव गेहिं देवा ॥ संपोन गेलि दिसते दिनकाज भावा॥
देवा तुला किति तरीं आजिं आठवूं मी।।आहे भुकाळ मतिचा निज हेतु कामीं ॥
तारा मला अजिं हरी दिनपाळका रे ॥ थारा करी तवपदीं कृपया मुरारे ॥
नासींच संसृति अजीं करिगा करूणा.॥ येई धण्या झडकरी सदबोधकीर्णा ॥१९॥
कांरे हरी मजवरी इतराजि केली ॥ माया दया तुझि बरें अजि काय झाली ॥
चोरीस गेलि असती परि चोर तूंचि ॥ चोरांत चोर सकळां जगिं होसि तूंचि २०
कामादिकें मज बरें बहु चोरडीलें ॥ साह्यां असे अजदिनीं तवप्रीत बोले ॥
भावाभरी मतिमधीं सतिबुद्धि व्हावी ॥ यावी दया सदयता मन शांत ठेवी २१
नाहीं धनीं धरसुतीं मति माझि देवा ॥ पायींच थार मज दे अजिं वासुदेवा ॥
धाता विधी सकळ तूं मज वाटतोसी॥ येकारुपें जगनगीं प्रतिपाळितोसी ॥२२॥
माझे बहूत अपराध क्षमा करावे ॥ प्रेमामृतें करुनिया मज थारवावें ॥
भीतों बहू भवपुरीं भव नाशनारे ॥ येरे हरी अजिं बरा जड देखण्यारे ॥२३॥
आतां नको विसरुं तूं मजलागिं देवा ॥ सेवा तुझी मजकरें घडली न देवा ॥
नामामृतास कसवा नच देहभागीं ॥ भक्ती नसे मम मनीं दिन मी अभागी २४
आतां क्षमा कर बरी ममभागिं ईशा ॥ टाळी अरी सुखभरी उदरीं परेशा ॥
नामामधीं मन जडो जडभाग जाऊं॥ मातापिता तुंचि मला गणगोत भाऊ॥२५
श्रीदावळी बरि तुवां अजिं राखि बापा ॥ तापा हरी मति बरी हरि देहतापा ॥
हे सांवळ्या तुजविणें मज कोण नाहीं ॥ सीतापती मज धनी अजिं तूंचि होई २६

नामामृतास जिव हा तृषितार्थ आहे ॥ तूला असों सघनता दिनहेत पाहे ॥
तापत्रयांतुनि सुटों अजिं देह माझा ॥ स्वामी करा वरि दया दीनदास तूझा॥२७
साधावया नच मती मज साधनें तीं ॥ कर्मै तसीं सकळही नच मानती तीं ॥
आहे तुझा भरंवसा भवतारका रे ॥ तारी दयानिधि रमापति या मुढा रे ॥२८॥
संतोषवा मम मना दिनपालका रे ॥ येई अनंतवदनीं गितकीर्तनी रे ॥
येई दयानिधि अनंत रुपीं अनंतीं ॥ भावी अनंत प्रित बा वरि देइ नीती ॥२९॥

---

# २४ प्रार्थनाष्टक ॥

ॐ प्रजाहतिस्रोऽअत्यायमीयुन्येऽअर्कमभितोविविश्रे ॥
बृहद्धतस्थोभुवनेष्वंतःपवमानोहरितऽआविवेश ॥ ऋक्. १

( विबुधप्रिया. )

ॐ नमो गुण संभवा भव नायका अजरामरा ॥
नीगमागम प्रेमळा सद्बोधका करुणाकरा ॥
साधकाप्रति आसरा नच दूसरा तुजवांचुनि ॥
पावना पतिता जना अजि पाव गा मज लागुनि ॥ १ ॥
दीन मी हिनबुद्धिचा तुज कारणीं अजिं प्रार्थितों ॥
पापनाशक तापमोचन नाथजी तुज ध्यायितों ॥
तापलों बहु संसृतीमाधिं भ्रांतिनें हरि साच गा ॥
कोण ना मज सोयरा तुजवांचुनी भविं जाण गा ॥ २ ॥
ज्ञान ना तव ध्यान ना नच दान तें घडलें मला ॥
दांडगा सरि येरंडापरि वाढलों दिन ये तुला ॥
सांगणें नच लागतें तुज फारसें दिनवत्सला ॥
सांच गा परि हांवरा मतिमाजिं मी वन आमला ॥ ३ ॥
या वयांत तुझी लिला मति गावया मम मानसीं ॥
दे सुखागितिं सौभरीं निज आसनीं सुखया खुसी ॥
संपती तुजपासिं गा हिच मागतों अजिं दे मसी ॥
देउनी निज पदांना भव ताप हा नुरवी कुशी ॥ ४ ॥

पूरवी मम वासना कनवाळु वा रमणारमा ॥
माधवा अजिं यादवा कमलानना हरि या तमा ॥
ऐकुनी महिमा तुझी पदिं भावना बहु जोडली ॥
खोडली गति आधली भवदाईयिची नित व्हावली ॥ ५ ॥
सात्विका गुणव्यापका प्रतिपाळका भवनायका ॥
लागला निजध्यास रे मज लागुनी यदुनायका ॥
या भवांतुनि सोडवा पद दाखवा कमलोद्भवा ॥
प्रीतिची कळ ऊठली मम मानसीं सदूद्भवा ॥ ६ ॥
काय गा मति गायसी निजकानना प्रति जावया ॥
जाहली बहु हांवरी मज न्हेई तूं प्रिति मानया ॥
आजिरी तनु ही करी सद्बोध हा मजलागिं दे ॥
गांजलों बहु पीडलों अजिं सोडवीं गितिं रंग दे ॥ ७ ॥
प्रार्थना तुजपासिं ही सद्सेवना निजनायका ॥
कौतुकें पुरवी ळळे सदबाप तूं मूळ मी निका ॥
हा अनंत जमा असो तव सेवकीं मुरनाशना ॥
ठेविलें शिर पांइ गा तुझिया भलें करि आमना ॥ ८ ॥

## २५ मानसहेत.

( विबुधप्रिया. )

गाइला मिं विनायका गुणनायका निजकौतुका ॥
तोषुनी मम मानसीं निजरंगणीं सद्वाटिका ॥
शारदा नमुनी पदीं शिशु भावनी जगमाउली ॥
सद्गुरूसद ऐक्यते पदिं वंदिला नित आदली ॥ १ ॥
हे दयानिधि राघवा सम व्हावया तुझि ही लिला ॥
आननीं वदवावया मति देई गा सद श्यामला ॥
मानवी तनु जोडली हितिं नाडली विषयीं भुलें ॥
आपली नच शोधिली गति कोणती मदिं भूललें ॥ २ ॥
हांवरा अजिं बावरा पतिमंद मीं तुज देखण्या ॥
ये धण्या झट धांव गा दिनवत्सला मृदु चीमण्या ॥

ठाव ना तव मावही भवभ्रांति गा मज मानवा ॥
नाडले बहु शोधितां परि ना गती सुखसंभवा ॥ ३ ॥
हा निधि भवभ्रांतिचा तरु बोलणें रव हा फिका ॥
बाहुनें जलसिंधुचें नच संपलें कधिं पोहका ॥
भ्रांति हें जळ शोभतें निधि मोह हा भवदाईंयचा ॥
तर्क हा कर पोहणें नच शाहणे सद्‌पंथिचा ॥ ४ ॥
माझिया मिपणास न्हे तुपणांमधीं मिळवावया ॥
तूंपणें मति माजि गा रस कीर्तनी रुचिभागिं या ॥
प्रेम दे सद्‌पाउलीं बहु भागलों तुज प्रार्थिता ॥
येईं गा त्यजिं आळसा कनवाळुवा अरिमारिता ॥५ ॥
भीत ना अरिच्या कुळा स्थुळ नावडे म्हणुनी हरी ॥
नास्तीकांमधिं शोभलें अरि खाइना भिति ना धरी ॥
मागणें नच फारसें तुजपासिं ही धनसंपदा ॥
ताप हा जडबुद्धिचा प्रभु नास तूं हरि आपदा ॥ ६ ॥
भक्ति दे निजमुक्ति ती मज आवडे तुज सांगतों ॥
भाव हा तवपायिं गा अजिं राखिला सदि प्राण तो ॥
व्याज तें मज प्रेम दे गित आननीं रुचि वागवी ॥
मागणें नच आणि तें निजबाळका सरि वागवी ॥ ७ ॥
माय तूं मनिं मानुनि तनु पोशिली बहु कौतुकें ॥
काय ती वदुं मीं मुखें तुंचि जाणसी नचि मी तुके ॥
भूक ही मनिं लागली रस औषधी मज देईं गे ॥
ही जरा मति नाठवीं पद निर्जरीं मज न्हेयि गे ॥ ८ ॥
कीर्तिचा तव चौघडा बहु वाजतो दिननायका ॥
वत्सला मज आसरा पादिं देइ गा निजनायका ॥
संकटीं मज धाव तूं किंति आळवूं मनिं वीटसी ॥
धीट हा म्हणुनी तुवां मनिं आपुल्या हरि मानसीं ॥ ९ ॥
क्षूधितामधिं मानि गा मजलागिं तूं दिन अर्भकीं ॥
होइ तूं मज बाप गा मग बोलि ही बहु रूचकीं ॥

हा अनंत मनामधीं पद साउली गति योजिली ॥
माउली गुरुनाथजी करि आदरें सद साउली ॥ १० ॥

## २६ प्रार्थना.

( वसंततिलका. )

ध्यातों अजीं तुज हरी सगुणा कृतीनें ॥ निर्गुण तूं परि मना शमनार्थ मानें ॥
प्रार्थू बरें अजर हें जड व्हावयासी ॥ प्रेमा भरी गित पदीं सद छंद कूसी ॥ १ ॥
गाऊं तुझे गुण कथे सदभावनेनें ॥ भावा भरूं नवविधी निजभक्तिमानें ॥
ध्यानें करोनि परिसे मम दीनवाणी ॥ वाणीच ही तव कृपा अमना न वाणी २
सर्वांतरीं भरुनियां सकळीक लोकीं ॥ भानू शशि सुरमुनी तप सत्यलोकीं ॥
योगी मुनी नरभुतीं स्थिर जंगमादी ॥ आहेस तूं भरुनियां सम आत्मबोधीं ॥ ३ ॥
वीकार ना तुजसि गा गुग रूप वाचे ॥ निर्द्वंद्व मानस सुषुप्तिपणांत साचे ॥
माया तुझीहि सकळीक जगांत वागे ॥ नाहींच ठाव परि गा दिसते जडांगें ॥ ४ ॥
कौतूक कारण कळा कळशक्तिरूपें ॥ रुपें बहु नटलि हे अतुळ प्रतापें ॥
भ्रांती भरें विचरते जग कारणीं ही ॥ माया हरी मतिरुपें कळ आत्मनीं ही ॥ ५ ॥
माया करीं नच मिळे जड जीवहेतू ॥ हेतू पुरे इह रितीं न वदेच मातू ॥
मायाच निर्मित जगा तिच नांदताहे ॥ तीला त्यजील असला नच कोण पाहे ६
साधू तरी कवण ते हरिसाधना मीं ॥ सूचे नची मज रिती बसतों रिकामी ॥
सारा पसार पसरे पर पार नाहीं ॥ नाहीं मना समपणा गुणरूपिं पाहीं ॥ ७ ॥
पायीं तुझ्या जरिं जडे मति ऐश्य भावें ॥ शांती वडे मन निवे स्वरुपावभावें ॥
क्षूधेस अन्न मिळतां मग तृप्ति होई ॥ इच्छा पुरे मग रुचे नच अन्न गेही ॥ ८ ॥
क्षूधा रूपें तवपदीं मिळणी जयासी ॥ प्रेमामृतें सुखविसी सुजनीं क्षुधेसी ॥
धालेपणीं गमति ते सुखशांतिमेळे ॥ निःसंग जे भ्रमरसें सद्बोधबोलें ॥ ९ ॥
देणें तुझें निजपणें निज सेवकांसी ॥ देसी बरें सुख हरी भरि हारवीसी ॥
क्षांति करोनि मन जाणिव दृश्य टाळी ॥ गातां लिलागुणरुपें पुढतीं नवाळी १०
दासास आस तुझि गा तुंहि दासभागीं ॥ दासास दास हरि तूं जडदेहभागीं ॥
दासासि त्रास पडतां नड तोडितोसी ॥ दासांत दाससम ते सद्लोकवासी ११
भोळे हरी गडि तुझे जगिं जन्म घेती ॥ प्रीती तुझी म्हणुनियां पुनरेव येती ॥
नामामृता तृपित ते जडदेहि झाले ॥ धाले परी पुनरपी स्थुळदेहिं आले ॥ १२ ॥

अन्नें करोनि बरवीं जरि तृप्ति झाली ॥ क्षूधा पुढें उठतसे तदनूहि बोली ॥
मुक्तास मुक्ति रुचते नच साक्ष मुक्ति ॥ भक्तीच कारण असे सकळीक युक्ति १३
प्रेमामृताविण दुजें नर लोकमाजीं ॥ नाहीं सुखारसमदें जिभ हे भितेजी ॥
सूखास सूख मति ही समभाग होतां ॥ साधे बरी अमनता मन ऐक्य होतां १४
पापी जरी हरि वदे तरि पाप नासे ॥ अग्नी तृणा मिळवितां तृण जेंवि नासे ॥
वाणी वदों हरि तुला कवणा मिपानें ॥ द्वेषें भयें सहजतां अघ भस्म होणें ॥ १५
नामाबरोबरि नसे सरी साधनातें ॥ श्रेष्ठांत श्रेष्ठ सकळी हरिगूण खातें ॥
लीलारुपें करुनियां पुनिताव काया ॥ माया निमे सुख गमे जगतीस छाया १६
प्रीती असे बहु तुला निजदास ठायीं ॥ तैसी नसे दुसरि ती जगिं आणि पाही ॥
नाहीं रमे वरि रमे नच योगि देहीं ॥ प्रीती तुझी हरि जसी निज संतगेहीं १७
नारायणा नरहरी मधुसूदना रे ॥ नामामृतामधिं गती मजलागिं दे रे ॥
कामामदासहित हा अरिभाग टाळी ॥ शांतीसुखा भरवि गा मजला नव्हाळी १८
संसारभाग न रुचे रुचि पायिं तूझ्या ॥ संसार कार गमतो हिच माझि पूजा ॥
संसार सर्व पुजना तव पायिं दीला ॥ आतां पुजा कवण ती समजावि बोला ॥१९
तीर्थें शुची करिति तीं परि दानमानें ॥ स्नानास खर्च नच तो मजपासिं नाणें ॥
तीर्थेंच सर्व महिला जल ठाव जेथें ॥ मानूनियां मनिं मि गा समभावनातें २०
विद्या नसे मति नसे जड देह देवा ॥ सेवा तुझी नच कळे मज वासुदेवा ॥
वेदांमधीं गति नसे नच शास्त्र कांहीं ॥ पायीं तुझ्या अजि भला जडलों उपायीं २१
पाहीं अजीं हरि मला कनवाळु दृष्टी ॥ कूर्मी जसी स्वपिलिं पाळित प्रेमदृष्टीं ॥
कष्टी असें तनुरुपें अरिभागिं देवा ॥ न्हेयी मला तवपदीं निज दावि ठेवा ॥२२॥
सिद्धीसमागम भला तव सिद्ध देहीं ॥ प्रीती करोनि मति ही रमते स्वगेहीं ॥
भूली जगीं जगनिती मग सिद्धि नाचे ॥ म्हंती चढे जगबळें अभिमान वाचे २३
थारांबरा मज खरा पदिंचा निवारा ॥ वारा खरा भवपुरामधिं हा पसारा ॥
थारा विरा नच बरा भविं कारभारा ॥ सारा नरा हरि घरांतिल भ्रांतिवारा ॥२४
कर्मानुसार गतिभोग सभोघ भोगूं ॥ लीला तुझी मुखिं वदूं न करूंच जोगू ॥
सोंगें कशास जड हें अजि सोंग येथें ॥ याचें मला नच रुचे नवलाव नातें ॥ २५
जन्माबरोबरी असी तनुपाठिं आहे ॥ याकारणें भिति मना बहु वागताहे ॥
मोहांत गुंग सुदले म्हणुनी असें हें ॥ वाटे परी लटिक तें भ्रमभाव पाहे ॥२६॥

केव्हांतरी मरण हें दिनिं येक आहे ॥ वर्षें शतीं दिन अजीं सम येक पाहें ॥
नाहीं चिरंजिव अशा वरि काय हेतू ॥ नाहींच कारण मला तनु लागिं व्हेतू ॥ २७
चैतन्य तूं मति कळा तनुमाजिं जोडे ॥ जोडे हरी तव लिला पुरतील कोडें ॥
हाडें त्वचा रुधिर मांस शिरा करोनि ॥ निर्माण ही तनु असे जडरूप मानी २८
पांचामधीं तिन बरे मिळणीच आठी ॥ हा ठीक नाहिं मठ वामट वाट आठीं ॥
ओठीं वदे तव पदें तरि लाभ आहे ॥ आहे सुखास पद हें अमनास पाहे २९
प्राण्यांस पातसम मानस नाम वाचे ॥ साचेंच साधन असे रुचले मतींचे ॥
माझें तुझें जानिं किजे सकळीक ओझें ॥ नाहींच यात सुख तें श्रमणें गुणाचें ३०
दे दे म्हणोनि वदतों मज हेंचि देई ॥ देई लिलागितरुपें कविते मवाई ॥
प्रेमास मानस मिळों कळि भाव टाळी ॥ माळी जगास तुंचि गा मज दे नवाळी ३१
बोधांतरांत गित हें बहु रूचिकारी ॥ शांतीस मानस मिळे नच खेदकारी ॥
वारीज नेत्र मिळण्यास अनंत वाणी ॥ वाणीरुपें वदत ही हरिनाम लेणीं ॥३२॥

## २७ स्फूट स्वानंदयोग.

( वसंततिलका. )

गोपाळ गोविंद हरे मुरमर्दना रे ॥ गोपाळ बाळ जगपाळक मी नमी रे ॥
तारी दयाळ प्रभुजी भववासनासी ॥ दारिद्र्य दुःख दुरितें करि या विदेशीं ॥१॥
दे ठाव कूसिं मजलागिं जनार्दना रे ॥ तारी अनाथ सखया किति आठवूं रे ॥
चित्तास आस तुझि गा बहु लागलीसे ॥ शांती करी पतितपावन मेघमीषें ॥२॥
संसारसागर बहू नच पार याचा ॥ भ्रांती भ्रमें गमतसे मन खेळ साचा ॥
कामादिकें जलचरें बहु दुष्ट येथें ॥ मोहाभिषें मिळणि या सकळांस येथें ॥ ३ ॥
वाटे मला भय बहू म्हणवोनि देवा ॥ प्रार्थितसें गहिंवरें तुज वासुदेवा ॥
अन्याय फार घडले नच माप त्याचें ॥ पोटांत घालि सकळी कनवाळु साचे ॥४॥
भक्ति जडों मम मनीं तव पादपद्मीं ॥ जैसा सदां भ्रमर तो रमतोचि पद्मीं ॥
प्रेमा जडो मतिमधीं तव नामकीर्ती ॥ भक्ती घडो निगम ती सगुणैक मूर्ती ॥५॥
राजीवलोचन रघू मुनिपुंगवा रे ॥ वैदेहनंदिनिवरा तुज आठवीं रे ॥
येई अजीं मम मना मनिं रामराया ॥ छाया करा कृपणता हरि दुःख माया ॥६॥
रामा तुला प्रिय बहू दिन लोक साचे ॥ गाती प्रिती करुनियां तव गुण वाचे ॥
दुःखाविणें तुच जगीं नच कोण चिंती ॥ आहे प्रचीत बहु ती जगलाघवी ती ॥७॥

ज्या आननांत स्मरणीं जागिं नाम आहे ॥ नाहीं उणें किमपि त्या जगतींत पाहें ॥
नामासमान नच साधन आणि दूजें ॥ जाणोनि प्रेम रसने वद सौख्य वोजे ॥८॥
संसारसार तव नामरुपें करूनि ॥ संसार घोर गमतो नच नाम ध्यानीं ॥
जाणोनियां तव पदीं दिन हेतु वाणि ॥ इच्छारुपें करुनियां वदतीहि वाणी ॥९
तापे रवी तव कृपें करुनिच देवा ॥ सोमास ठाव तव भाव स्वभाव देवा ॥
नाहीं तुमाविण दुजा जगतींत आणि ॥ सर्वांतरी भरुनियां तुंचि गूणखाणी ॥ १०
आत्मा तुंचि जगतिचा मुळ ऐक्यरूपें ॥ मायाभ्रमें बहुविधा दिसतिच रूपें ॥
मूळास ठाव विज तूं निजकंद ठेवा ॥ देवा मला पदिं धरीं सुखभागीं ठेवा ॥ ११
शंभोसमान सुर ना भुवनांत दूजा ॥ तोही स्मरें रघुविरा मग काय दूजा ॥
ऊमेप्रती वदतसे मुखीं राम वाणीं ॥ संतोषवी गिरिसुतेप्रति सूखखाणी ॥१२॥
सूखास ठाव रघु हा गमतो मनाला ॥ बोधामृतास सविताव भेला ॥
आदीं अनादि रुप हें जगतींत साचें ॥ साचे मना स्मरतसे स्मरणीक वाचे १३
कां तूं मना वणवणा करिसी रिकामें ॥ वांती नथे विषयिं कां बहु तूज कामें ॥
मोहाब्धि हा रजगुणें भव जाग्रतीचा ॥ माया मति निशिरुपें पथ अंध साचा १४
लीला लबाडि लगटे सलगी मनाची ॥ लांडी लबाडी खटलीं उठवी फुकाची ॥
स्थूळासवें रमुनियां स्वपणाच भावें ॥ फावे तसें विचरतें धन सूत हांवे ॥१५॥
हें चित्त सावध असो भवभान नासो ॥ गीतांतरीं हरिचिया निजरुप ध्यासों ॥
नाहीं तनू तुजसखी विघडी जरा ही ॥ साचेपणा इज नसे मुळ दुःख गेहीं १६
काया मनें करुनियां जरि देवराया ॥ पासीं मना वससि तूं पुनिता कराया ॥
छाया मिळे सुख गमे मदमोह तुटे ॥ शांती जडे अमनता मग दृश्य खुंटे॥१७॥
वाटा धिटाप्रति असे निजहेत भावें ॥ स्वानंदयोग सम तो समजोनि व्हावें ॥
केला अनंत मतिनें अजि हेत ऐसा ॥ पायाविणें नच बरें मज गोड पैसा ॥१८॥

## २८ प्रेमपर रामप्रार्थना.

(पृथ्वी.)

अगा गुण इशा गणाधिश तुं गां मला दे मति ॥
प्रसाद वरदा असों कर तुझा पदीं दे गती ॥
जमा धरि ससेवकामाधिं मिं गा हरी आपदा ॥
कळा गुणनिधी गुणाम मिं असें करीं दे पदा ॥ १ ॥

सदां पद गमों दयानिधि तुझें रमे शोभलें ॥
उमापति सदोदित प्रिति धरी उरीं जे भले ॥
जया पदिं मही सती गुरुचि त्या शिळा होउनी ॥
असे बहुदिनीं तिला रजकणीं पतीता धनी ॥ २ ॥
बरी गति दिली रघू तुमिं तदां मुलाचे सरी ॥
धनी तुंच बरा खरा गमतसे मनाचे पुरीं ॥
अगा प्रणव साक्षिणी सति तुझी असे जानकी ॥
विदेहतनया बरी सुनित ती भवीं साम कीं ॥ ३ ॥
अनूभव समागमीं मननशीळ ते जाणती ॥
जया कळवळा दिनावरि दया तया शोभती ॥
भला भरत तो मनीं शितळ जो स्वभावानिती ॥
सदां सुशिळ मानिती वडिलभाव ताता मिती ॥ ४ ॥
प्रबोध अरुणाकृती विलसतो जया मानसीं ॥
सुकाळिंच प्रकाशितो निजरूपा रवी मानसीं ॥
तदां सुनिति गा मनामधिं भरे पुरे कामना ॥
जनामधिं मना नको शिरुं बरें बहू यातना ॥ ५ ॥
गळां धरि सिताधवा रम सदां मना चिंतनीं ॥
नको गुतवुं मानसा कलिमला धना चिंतनीं ॥
हरासम बरा धरा मनानिं हा जगाचा पती ॥
वसो सुजन मानसीं निति तुला अनादी मिती ॥ ६ ॥
असे बहुत तारिले भवपुरीं गुणागायकां ॥
नसे मिति तया वदूं किति तरीं यदूनायका ॥
पूराणश्रवणीं बहू गित तुझें असें ऐकिलें ॥
परी गुण स्थुळावरी भ्रमभ्रमी असें भासलें ॥ ७ ॥
न थारत मनीं तरा बहुगुणी अनेका रितीं ॥
रितीं निजिं बरी असों मजवरी दयाळाहि तीं ॥
धनासरि तुला लिळानिधि बरी दिसे गा सरी ॥
रवामृत झरा सदां गित निती सबोधा वरी ॥ ८ ॥

अगा दिन मिं गा पदा मनिं धरी दिलेल्या गती ॥
अनादी गुण रूप तें गमतसे स्वदेहीं मती ॥
नको विसरुं गा रमावर मला कृपेचा करा ॥
गणाजि निजसेवकामधिं सदां करा चाकरा ॥ ९ ॥

हरा भरमदा समागम बरा करा सेवका ॥
वरा सुचवि मानसी कृपणता हरी सेवका ॥
न गोड मजला तुझ्याविण हरी भवाभीतरीं ॥
असे सतत हांवरा मतिमधीं दयेचा करीं ॥ १० ॥
धनावरि तसें जरी मन हरी जयाचें ठसे ॥
तया नच उणें दया निबरि दीनकृपा वसे ॥
सुनाभिकमळामधीं वसत जो चतूराननना ॥
न जाणत तुझ्या गुणा रववसे बरा तूं दीना ॥ ११ ॥
गळो मति अहंपणा उरिं नको जनीं हांव ती ॥
धनानिमित कामिनीकुचतटीं मना घे भिती ॥
गळों सकळ वासना मन मुरों तुझ्या गा गुणीं ॥
रमापति भवामधीं गमसि गा खरा तूं धणी ॥ १२ ॥
बरी रित तुझी गमे नरहरी शिरीं या करा ॥
धरा सम भरामधीं मुढ वहू असे भीतरा ॥
मला धरि जरा धरा वसरिला असों थार गा ॥
नको कसखुं मानसा रिपूपुरीं नको तो दगा ॥ १३ ॥
बरा जुट जटा शिवा उरिं ठसे सितेचा पती ॥
सदाशिव मना तुला गुरु बरा करी दे निती ॥
अगाध महिमा गुणाविरहिता करा गा त्वरा ॥
अनंत दिन हांवरा तुजघरीं पदा चाकरा ॥ १४ ॥
कळाहिन असे नसे बळ मती अशा पामरा ॥
तुझ्याच घरचा सदां वसवसी असे कूतरा ॥
अगा धनि तुं गा रमाधर बरा मळ वासरा ॥
सदां पिववि तूं पया वदनिं दे कृपेच्या करा ॥ १५ ॥

भवामधिं भिती बहू दिसत हे रिपु कामदा ॥
अगा तुजविणें हरी नच दुजा मिटी आपदा ॥
रसा नवविधी थरो मननिं या जमो बोध गा ॥
मुखीं वदवि गा कथा तव गुणीं रसा दे रिवा ॥ १६ ॥

भरा नवतिच्या हरा झडकरी रवा देऽमृता ॥
सुधाकर तुं गा चकोर मिं असें पुरें प्रेमता ॥
नसे बहुत वेळ ती कलि बडा गळा आकळी ॥
ह्मणोनि विनवित मी लिनपणीं भया हांकली ॥ १७ ॥

दुजा तुजविणें नसे भरंवसा मला दीसतो ॥
रमा गति पदीं सदां धरि करीं वदे मानतो ॥
जगीं कलि मला श्रमोनि बरवी बसे सेवना ॥
मळा हरविते जडा तनुचि या घना भावना ॥ १८ ॥

जगामधिं नसे सरी उदरिंची कळा देखणी ॥
जया सतत मानसा बरि असे गितीं घोंकणी ॥
तयावरि दया करी हरि बरी मुलाचे परी ॥
स्वभाव वळखी बरा करुनियां उराभीतरा ॥ १९ ॥

असे सतत घावरा हृदयिंचा मलीना मती ॥
परीवदत नाम गा दिनपणीं रमेच्या पती ॥
नको विसरुं गा मला पतितपावना तार तूं ॥
कृपाघन तुं अंबुजा सतत भीळ भावास तूं ॥ २० ॥

असो आसि दया दिठी मजवरी कृपा पाखरा ॥
जसी सतत अंडजावरी दया सदां पाखरा ॥
करोनि घरटामधीं पिलिं बरी प्रतीपाळिती ॥
स्वटोंचितुनि गा कणा धरुनियां तयां पाळिती ॥ २१ ॥

कसें भव तुझें हरी विलसतें गुणाभींतरी ॥
चराचर स्थळा नगीं भरुनियां असे अंतरीं ॥
बरी सडक ही गमे निजपुरीं घरीं जावया ॥
त्वरा करि मना उगीं उसिर कां भया नासया ॥ २२ ॥

टवाळ मतिची नको निति मला गमो आरसा ॥
विवेकमथनीं अनूभव भवीं दिगा सारसा ॥
सुबोध धन दे मना रमवि गा तुषारा उडो ॥
कळानिधि करा उरीं शितळ गा सप्रमा जडो ॥ २३ ॥

वदों किति तरी गुणा मित नसे तुझ्या गा हरी ॥
तुला बहु ति वर्णिलें बुधजनीं गती नीतरी ॥
तयामधिं मला तिळाभरि नसे कळाकूसरी ॥
परी म्हणवितों तुझा दिन मि गा वळे अंतरीं ॥ २४ ॥

दयाळुपण तें खरें ब्रिद करी दिना आजिचा ॥
नको विटवुं मानसा कलिमलामधीं या निचा ॥
टळोंच मद हा अहंपण मती नको ठेवुं ही ॥
नको घडवुं संगती कुनितिची न सोसेच ही ॥ २५ ॥

नकोच मन निंदकामधिं बसूं जळों तोंड तें ॥
सदां परघरीं हलाल गमतो बुटी तोंड ते ॥
जरा नच थरे मनामधिं उगें दुजाचें कदां ॥
फिरे वसवसां घरीं धरि भरे मना हंपदा ॥ २६ ॥

वदे मिच बरा सदां गुणमुखीं वदे भाट या ॥
असे तनु ति जीर्ण गा घरिं दगा नसे खावया ॥
तरी हुडकितो उगेंपण दुज्या कसें कर्म या ॥
घडेल नकळे अहो भवपुरीं घडे नर्क या ॥ २७ ॥

बहू पठण ते घरामधिं करी गितापाठ तो ॥
फिरे जनभरीं वदे सकळ तें बुडों नर्किं तो ॥
कशी हरि अशा करी गति बरी सदां आंधळा ॥
बळेंच दिधला कळोनि अरि हा मुठें तो गळा ॥ २८ ॥

दिसे उघड यातना सकळ बोलतो हांवरा ॥
परी चलत त्याचि रे गुणरितो सदां बावरा ॥
नको हरि मला अशी कधिं घडोंघडी संगती ॥
भितों बहुत गा तया दुरिं करी मती म्याड ती ॥ २९ ॥

असोंच अभिमान तूज हरि हा दिनाचा वरा ॥
घडों पदिं गती मला नित्रवि गा दयेच्या पुरा ॥
नको गुण कळा मनीं धरुं तुं गा तुटो आपदा ॥
अनंत मतिचा असे दिन बहू जडों हा पदां ॥ ३० ॥

या पृथ्वीवृत्तांत धात्वर्थानुरूपानें या भूलोकीं नरतनूसारखें शरीर नाहीं असें समजणारा साधक यास साधन अनन्य रामावांचून नाहीं म्ह. एकनाथउपासनाही अंतर्वृत्तीवांचून नाहीं.

## २९ प्रभुकीर्ति.

( मालिनी. )

गजवदन गुणाचा ईश वंदोनि भावें ॥ निगमकृति उभा रे ऐक्यता हे स्वभावें ॥
उगम जननि अंबा कारणा पैल दावी॥भवभिति हरणाची अर्ध मात्रा नवाई॥१
गुरुवरपद वंदूं संत साधु सुखानें ॥ अभिमति विसरावी माझिया चित्तमानें ॥
विनय गति असावी मागणें देहभावें॥बहु रितिं गुण छंदीं कीर्ति गातों स्वभावें २

( इंद्रवज्रा. )

मायाभ्रमाचे दरिमाजिं काया ॥ वागों न गा ही जग अंतराया ॥
दूजेपणा दूर करा गतीचे ॥ दावा स्वधामांतील नीज वाचे ॥ ३ ॥
नारायणा नाम तुझें मुखानें ॥ गावें सदांचें बहु सूख मानें ॥
नामामृतानें अजरा कृतीतें ॥ बुद्धीप्रभावें सदशोधनातें ॥ ४ ॥
तापत्रयातें शमनार्थ लीला ॥ रामायणादि मुनिच्या कलीला ॥
गुणाकृतीनें निजरंग ठेवा ॥ ठेवीयलासे गमना दुभावा ॥ ५ ॥

( भुजंग. )

मना प्रेम ज्या नित्य बोधें विराजे ॥ तया सार दृष्टी भवा हारवीजे ॥
रमाकांत याचें घरीं नीजरंगीं ॥ सुखाचेनि येई स्फुरे अंतरंगीं ॥ ६ ॥
मनाचा मवाळू कृपाळू दिनाचा ॥ धनाच्या सरीं ताप वारी भवाचा ॥
सदांचा स्वअर्थीं अनर्थीं न रीघे ॥ तया संगती मानसा चाल रीघे ॥७ ॥
भया त्याग वागें मना नित्य नेमीं ॥ सुखाकारणें शोधणें कोण हा मी ॥
अभीमान नाशाविणें स्वार्थ लाहे ॥ मुळीं बोलणें वोखटें जाण बा हें ॥ ८ ॥

अभीमान वैरी विचारें दुरावे ॥ विचाराकृती सज्जनासंग भावें ॥
अभावाकृती दूर भावीत बोधें ॥ सदां रंगले जे निजार्थी प्रबोधें ॥ ९ ॥
अनेकाकृती एक होणें जधीं हो ॥ तधीं नीवळे भ्रांति चित्ता न वावो ॥
गमे ऐक्यभूतीं हरी तेथ आहे ॥ बहू दाखले या सुखा दाविताहे ॥ १० ॥
जरी शोध केला निराकार यांचा ॥ गुणाकार वार्ता असीत्वंपदाचा ॥
जरी तत्पदाची जडे सोय खासी ॥ अनूमान सारा न जाई उदासी ॥ ११ ॥
नये गोडि कांहीं हरीभक्तिवीणें ॥ फुका शोध सारे अभीमान गूणें ॥
हरीनाम गातां अभीमान जीरे ॥ स्वभावें प्रभावें रमे ऐक्यकारें ॥ १२ ॥
निजध्यास नामीं सदां ज्यासि लागे ॥ तया अंतरीं तोचि वागे स्वरागें ॥
दिसे साक्ष कीर्ती अगूणी अजाती ॥ गुणातीत फांके गती आत्मज्योती॥१३

( इंद्रवज्रा. )

नामामृताचे सरि आसरीसा ॥ ना मंत्र आणी स्वसुखार्थ खासा ॥
बोलीयले वाल्मिक नारदादी ॥ जे पावले नित्य निजार्थ गादी ॥ १४ ॥

( शार्दूल० )

ज्याणीं आगमनीगमावळि बहु शोधयली संग्रहीं ॥
केली काव्य सुबोध भाविक गती शांती नये आग्रहीं ॥
झालें स्तब्ध मुखें हरीस्मरण तें तेव्हां करूं लागले ॥
शांतीचे पुर पातले निजलिले ऐक्यान्वया लाधले ॥ १५ ॥
गायीले गुणकौतुकें सकळही देती सुखा दाखले ॥
तेथेंची मन फावलें सुख बहू सर्वार्थता माखले ॥
मायेचा बडिवार कोण गणि हा साराचि दीसे हरी ॥
सारासार विचार काय करणें दूजेपणा संहरी ॥ १६ ॥

( इंद्रवज्रा. )

संसारदुःखांतुनि मोकळीता ॥ ताता न माता सुत आप्त कांता ॥
मायाभ्रमाचें सकळीक नातें ॥ जावें मरोनी अपवादघातें ॥ १७ ॥
देवा मला दे पदिं नित्य थारा ॥ मानीनची मी बहुता प्रकारा ॥
सोसे न कांहीं गति द्वैतकारी ॥ मानूं कसी हे नर आणि नारी ॥ १८ ॥
काया कृतांताकृतिचे सरीला ॥ माजी म्हणों ये नच हे स्वलीला ॥
काया नराची हरि आकळाया ॥ लागे मना या सहजां उपाया ॥ १९ ॥

कां शोध नाना करितोसि चित्तीं ॥ कैसी कळेना विनयार्थ नीती ॥
भीतीस राया गुण राम गायीं ॥ घेई मना तूं रससौख्य होई ॥ २० ॥

( वसंततिलका. )

प्रेमेविणा विनवणी करुनी न पावे ॥ प्रेमार्थ फार गतिचे परि ते परात्रे ॥
भावार्थ भाव गतिचा नवरंग साचा॥पाहे मना निशिदिनीं सदसंग याचा॥ २१

( इंद्रवज्रा. )

संन्यासदीक्षा बहु पंथ केले ॥ देहार्थ वीणें नच काय झालें ॥
अज्ञान आर्दी पदरीं असोनि ॥ दीसेल कैसा हरि त्या करोनी ॥ २२ ॥

( मालिनी. )

हरिपण हरि अंगें भक्तिभावें करोनि ॥ हरि नच अभिमानें भासणें कर्मध्यानी ॥
हरिपण हरवाया मोहमाया दुभेदी ॥ हरि हरविल गातां कौतुकानें प्रबोधी॥२३

( इंद्रवज्रा. )

तारुण्यसिंधू बहु घातकारी ॥ नानातरेनें विमुखी विचारी ॥
निंदानुवादें दिन जात खालीं ॥ निद्रावसानीं ममता मिळाली ॥ २४ ॥
कामीक बुद्धी अभीमान गेहीं ॥ माझें दुजाचें पर-बाध पाहीं ॥
दुःखास सूखाकृति मानुनीयां ॥ मोहाब्धिठायीं रमतो मराया ॥ २५ ॥
अंतीं न कोणी परकीय सारीं ॥ पाहे मना तूं बहुता प्रकारीं ॥
दारासुतादी धन आप्त बंधू ॥ मोहाकृतीचा भव हेत सिंधू ॥ २६ ॥
विद्या अविद्या उभयार्थ संधी ॥ जीवा शिवाची करणी प्रबंधी ॥
एकाकृती हे द्विविभाग केले ॥ शोधान्वयानें समतेसी आले ॥ २७ ॥
बाह्य दावित दिठी जडते अहंता ॥ वीषयोन्मुख भरे गति ते न होता ॥
यासची वदति बूध हो अविद्या ॥ आत्मभाव प्रगटे तधिं तेचि विद्या॥२८॥
स्वप्नांतरीं भास अनेक होती ॥ जाग्रतीसमयिं ते सकळीक जाती ॥
बाह्यभाव उभवी भ्रम कामकर्मीं ॥ आटपे स्वरुपबोध गती स्वधर्मीं ॥२९॥
ना कर्मकांडी नच ज्ञानयोगें ॥ नानाप्रकारें समता न वागे ॥
ना शास्त्रवादें भ्रम शांत होणें ॥ होणे अहंता दुर देहमानें ॥ ३० ॥
हेतू अनेकाकृतीचे मनाला ॥ ना तेथ सिद्धी निजबोध लीला ॥
जरीं शोधिले देह चारी विचारें ॥ अनंता नये साक्षपी दृश्यकारें ॥३१॥

## ३० उमारमा संवाद.

( भुजंगप्रयात. )

नमो मोरया एकदंता गणेशा ॥ मुळारंभ कार्या गुणाच्या परेशा ।
अगा पुरवा आवडी या दिनाची ॥ कथा वाढवी वादवीवाद याची ॥ १ ॥

( इंद्रवज्रा. )

वाचा परादी विधि कन्यका हीं ॥ वंदीन भावें जिव आत्मगेही ॥
मातें प्रबोधी पद अर्थ वाचें ॥ लीलाविवादें निजसाधनीचें ॥ २ ॥

( यूथिका. )

नाटकाकृति कथा सुरकामिनीची ॥ साचची वरि परि बहु गूढ जीची ॥
भावना निजकला गुणा जाणवी ॥ भेदुनी भवभ्रमा सुख वाढवी ॥ ३ ॥

( इंद्रवज्रा. )

गौरीरमा एक दिनीं वसंती ॥ मूनी जनांची भुमिका सुसंती ॥
एकांतवीहार करोनि दोघी ॥ बैसोनि संवाद करीत ओघी ॥ ४ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

कांताची गति जोखिती निजसती शांती धृती सौभरी ॥
निंदा वाद दिसे वरी पदरुपें निर्गूणता आदरी ॥
आदी सिंधुसुता अनादि गिरिजा तूर्येसही देखणी ॥
जी कां कार विदारुनी रवपुटी सिद्धांत दावी पणीं ॥ ५ ॥
दोघींचा झगडा विवाद पतिच्या निंदास्तुती साम्य की ॥
ऐका सज्जन कान देउनि सुखें शंका हरे नास्तिकीं ॥
सिंधूजा भव भावनाकृति वदे अंबेप्रती हांसुनी ॥
गर्वाचे रव खोचरे अनुभवे पोळी मना लासुनी ॥ ६ ॥

( वसंततिलका. )

बाई बरा नवतिचा निजरंग अंगीं ॥ हा तूमचा पति भुताकृतिनें असंगी ॥
जूनाट हा पति तुतें गतिमान तोकीं॥नाहीं सुखार्थ अवनी दिसतोचि नोकीं॥७॥

( भुजंगप्रयात )

सदांचा स्मशानी तनू भस्मकांती ॥ क्रिडा निग्रही ते गमे आत्मज्योती ॥
वदे पार्वती वासुदेवः कळत्रा ॥ अगे धांगडे ऐकणें शिवस्तोत्रा ॥ ८ ॥

सबाह्यांतरीं देखणा कांत माझा ॥ करी अंत तूझ्या पतीचा स्वओजा ॥
जया काळ भीती तया निंदिसी तूं ॥ मुढे राग मिथ्या तुझा भोग छेयू ॥९॥
स्मशानी धनी मानिसी काय माझा ॥ तुवां जाणिला नाच हा भाव वोजा ॥
दुडे ना कधीं ऊाजुनी लौकिकाला ॥ तुझा तो पती जाग्रती भाव काळा ॥१०॥
निशाणी जयाची स्मशानीं वसंती ॥ जियें पाहिलें दृष्टि ते जाण संती ॥
सदांचा सुकाळी वसे अर्धअंगीं ॥ प्रिती भावची अंतरीं आत्मरंगीं ॥ ११ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

आरामी सदनीं गिरिंदिरिमधीं भावार्थ हारी श्रमा ॥
कामारी मम कांत शांत गतिचा दावी गुणाच्या क्रमा ॥
तूझा तो बहु नाटकी चपळ गे धांवे पराच्या घरीं ॥
कंसारी गति चोर चाळकपणें चाळीत सूरासुरीं ॥ १२ ॥
बापाचा नच ठाव जातबुडवा गौळी कसा मानला ॥
कां गे डागुनि बोलसी निधिसुते खासा तुझा दादला ॥
गौरीचे रव ऐकूनी चडफडे कांता हरीची तधीं ॥
बोले त्रासुनि सुंदरी उणिवता शोधी गती अंबुधीं ॥ १३ ॥

( इंद्रवज्रा. )

ऐके भवानी तुज राग आला ॥ माझ्या पतीला बहु डाग दीला ॥
जाणोनी थोरी नच मान देसी ॥ दंभार्थ दीसे वदनीं उसोसी ॥ १४ ॥
गंगाधराची गति थोर केली ॥ कांता पदींची मम हे उदेली ॥
वंदोनि माथा शिवनाम पावे ॥ कैसे तुझे गे रव मानवावे ॥ १५ ॥

( शिखरिणि. )

जटाधारी नंगा हरपशुपती तापसमती ॥
नसे कांहीं खाया भवतिभ्रमवी भिक्षुक गती ॥
करीं घेई पात्रा नरशिर बरा नाम,करटी ॥
तुला कैसें आलें बहुपण गडे वाणि तुरटी ॥ १६ ॥

( भुजंगप्रयात. )

चिता भस्मधारी सदां गुंग भंगीं ॥ गजाची वपू वोढितो निस्त्य अंगीं ॥
असा संगती स्थीर तूं रानटी गे ॥ तुला पट्टणी कोण पूसे न रागें ॥ १७

( यूथिका. )

जोगडा पति तुझा तनु वृद्ध गे ॥ दीसती मजप्रती सकळी दुगे ॥
क्रोध फार नृपती सुत कांपिला ॥ शांत कोविं गणुं ये असल्या भला ॥१८॥

( शार्दूलविक्रीडित. )

तातें तूज दिली न कां ढकलुनी गीरीवरोनी तळीं ॥
कैसी दैवगती सती तुजप्रती लावीयली से गळीं ॥
नाहीं अंबर भूषणावरि प्रिती वैराग्यधारी तनू ॥
मानूं तूज अभाग्य तें प्रसवली केसे मिळे साधनू ॥ १९ ॥

( द्रुतविलंबित )

खवळली गिरिजा निधिजे वरी ॥ वदतसे क्रुरतें वरुनि सरी ॥
हरिप्रिये मजला नच सांगुं हें ॥ गुण तुझ्या पतिचे निशिमाजिं हे ॥२०॥

( शार्दूलविक्रीडित )

कां गे वाद तुझा फुका शशिमुखे कां लाज नाहीं तुला ॥
कांताचे मम आंगणीं धव तुझा ऊभा करा जोडला ॥
माता मानुनियां मला नमि भला तें नाकळेची तुतें ॥
पूसे सत्वर जाउनी पतिप्रति वेई मनीं भाव ते ॥ २१ ॥

( इंद्रवज्रा. )

कोणा न लागे परपार याचा ॥ आनंद तो भोगित मी सदांचा ॥
जेथोनि निर्माण गती अदोषी ॥ बोली तुझी हे कपटार्थ दोषी ॥ २२ ॥
आदी अनादी शिव शूळपाणी ॥ जैसें विलासा भवं हेत पाणी ॥
माणिक्य मुक्ता नर नाचि नारी ॥ जाणे स्वशोधें तव तो मुरारी ॥ २३ ॥

( शार्दूलविक्रीडित. )

गे तूं जाग्रति नाट्य भावनटणी येथें बहू बोलसी ॥
मानी ना तुज कांत तो परघरीं राहे सदांचा खुषी ॥
वैकुंठी कधिं सागरीं भुमिधरा निद्रा तनूचे वरी ॥
योगी मानससंपुटी क्षणभरी संताघरीं सौभरीं ॥ २४ ॥

धर्माचा बहु माळला पति तुझा दासा घरीं दास गे ॥
नाहीं ठाव अभाव हा तुज भरे भाऊं नको रान गे ॥
मूढे द्वैत कसें सरेल मतिचें निंदानुवादें सती ॥
पाहे पावनकारकाक्षविरुपीं वंदी सदा तो नितीं ॥ २५ ॥
ऐकोनी निधिजा सलज्ज वदनीं वीनोद कष्टावला ॥
भेदाभेद विमूख आसन करी लाभार्थ हा लाभला ॥ २६ ॥

( मालिनी. )

शिवमति गिरिजांगीं लेईली दिव्यदृष्टी ॥
भवभिति कसणीची बुद्धि त्यागीत कष्टी ॥
सकळ फळफळाचे नित्यरंगीं नवावे ॥
अभवभव अनंतीं कीर्तनीं रंग भावे ॥ ३७ ॥

REFBK-0003148

पहिला भाग समाप्त.

मराठी ग्रंथ संग्रहालय
३७८५

कै. प्रभाकर विठ्ठल गुप्ते, रा. ठाणे
यांचे स्मरणार्थ
संग्रहालयास देणगी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ...८८६६२......... वि: ...काव्य....
क्रमांक ...२०८८........... नों. दि: ...३१-३-७२...

# क्रीस तयार असलेल्या कांहीं ग्रंथांची यादी.

पुस्तकांतील विषय. किंमत रु. आ. पै.

**आनंदरामायण**—सरळ गोष्टीरूप रूपांतर. सचित्र नवी आवृत्ति.
हा मुळ ग्रंथ २५ हजार श्लोकात्मक असून, त्यांत संपूर्ण रामचरित्र व त्याच्या पुत्रपौत्रादिकांच्या कथा आहेत. .. ... १–८–०

**बृहद्योगवासिष्ठ**—अर्थात् वसिष्ठ महारामायण—श्रीवाल्मिकीमुनि प्रणीत ३२ हजार श्लोकात्मक ग्रंथाचें मराठी गोष्टीरूप रूपांतर. या ग्रंथांत श्रीवसिष्ठमुनि वक्ते व श्रीराम श्रोता, असा योग आणून अध्यात्म ज्ञानाचें गोड विवेचन केलें आहे. हा ग्रंथ दोन भागांत पूर्ण केलेला आहे, व शेवटीं वाचकांच्या सोयीकरितां दोन परिशिष्टें जोडलीं आहेत. दोन्ही भाग मिळून सवलतीची किंमत ... ... .. ८–०

**कथाकल्पतरु**—( पूर्वार्ध—स्तबक १ ते ७ ) अध्याय १२६
गोष्टीरूप भाषांतर. पुस्तकाचा आकार, ग्लेज कागद व कापडी पुठ्ठ्याची बांधणी, यांत भागवत, रामायण व १८ पुराणांतील पांचशांवर सुंदर कथा आल्या आहेत. सवलतीची किं. ... ४–०–०

**कथाकल्पतरु**—( उत्तरार्ध स्तबक ८ ते १४ ) अध्याय १४६
गोष्टीरूप भाषांतर, पुस्तकाचा आकार, ग्लेज कागद व कापडी पुठ्ठ्याची बांधणी. या भागांत संपूर्ण महाभारत, भगवद्गीता, विदुरनीति, भीष्मनीति, गीतामाहात्म्य व पांडवांविषयीं इतर पुराणांतरीच्या कथा आणि विस्तृत उपसंहार आहे. ... ४–०–०

**कथासरित्सागर***—सोमदेव भट्ट विरचीत १ लक्ष श्लोकात्मक कथांचें मराठी रूपांतर. यांत चित्ताकर्षक व मनोरंजक बोधपर अशा अनंत कथा गोष्टीरूपानें आल्या आहेत. पुस्तकाचे भाग असुन ते दोन व्हॉलममध्यें बांधले आहेत. दोन्ही व्हॉलूम किं. ५–०–०

**गणेशपुराण**—या पुराणांत उपासनाखंड व क्रीडाखंड अशीं दोन मुख्य खंडें असुन अध्याय २४८ आहेत. त्याचें गोष्टीरूप हें सुलभ रूपांतर मराठी भाषेंत केलें आहे. ... ... १–०–०

**उदासी महाराज**—प्रसिद्ध सत्पुरुष हरिहर महाराज उदासी यांचे चरित्रासह त्यांनीं केलेले प्रासादिक अभंग, पदें, इत्यादि कवितांचा संग्रह व गद्य लेख. नित्य भजनास योग्य. .. ... १–०–०

पत्ता:—दामोदर सांवळाराम आणि मंडळी, इंदुप्रकाश छापखाना, मुंबई नं. २